# सोलापूर महानगरपालिका

# लेखा परीक्षण अहवाल

# 2013-2014

सह संचालक, मनपा लेप,उपविभाग-2, स्थानिक निधी लेखापरिक्षा, नवी मुंबई
रायगड भवन, 7 वा मजला, सेक्टर 11, सीबीडी बेलापुर, नवी मुंबई

# <u>अस्वीकृती प्रमाणपत्र</u>

1. सदर लेखापरीक्षण अहवालात नोंदविलेले आक्षेप हे सोलापूर महानगरपालिका यांनी 2013-2014 या वर्षी साठी लेखापरीक्षणास सादर केलेल्या अभिलेखे व माहितीच्या आधारे नोंदविण्यात आलेले आहेत.

2. जी माहिती /अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आली नाही त्या संबंधातील अनियमितता /अपहार/अफरातफरीस लेखापरीक्षक जबाबदार राहणार नाहीत.

सोलापूर महानगरपालिकेचा **201**3-**1**4 या वित्तीय वर्षाचा लेखापरीक्षण अहवाल

जा.क्र.स्था-18/ब/सोलापूर मनपा/ले.प.13-14/

सह संचालक (मनपालेप),
स्थानिक निधी लेखापरीक्षा,
7 वा मजला, रायगड भवन,
सी.बी.डी. (बेलापूर),
नवी मुंबई 400 614.
दिनांक :

प्रति,
मा. आयुक्त,
सोलापूर महानगरपालिका,
सोलापूर.

सोलापूर महानगरपालिकेचे 2013-14 या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण या कार्यालयाचे श्री.अभिजित पिसाळ, सहाय्यक संचालक (मनपालेप), स्थानिक निधी लेखापरीक्षा, नवी मुंबई यांच्या पथकाने दि.13/02/2017 ते दि.15/02/2018 या कालावधीत पूर्ण केले.

श्री. मंगेश ना. गावडे, उप संचालक (म.न.पा.ले.प), उपविभाग-2, स्थानिक निधी लेखापरीक्षा, रायगड भवन, नवी मुंबई यांनी सदर लेखापरीक्षण अहवालाचे पुनर्विलोकन केले आहे व दि.15/05/2018 रोजी श्री.अविनाश ढाकणे, आयुक्त, सोलापूर महानगरपालिका यांचेशी सदर अहवालाबाबत चर्चा करून लेखापरीक्षण अहवालाचे अंतिमीकरण केले.

लेखापरीक्षण कालावधीमध्ये सोलापूर महानगरपालिकेत खालील अधिकारी व पदाधिकारी कार्यरत होते.

| अ.क्र. | अधिकारी/पदाधिकारी | पदनाम | कालावधी |
|---|---|---|---|
| 1 | श्रीम.अलका दगडू राठोड | महापौर | दि. 01/04/13 ते दि. 31/03/14 |
| 2 | श्री.अजय सावरीकर | आयुक्त | दि.01/04/13 ते दि.03/07/13 |
| 3 | श्री.चंद्रकांत गुडेवार | आयुक्त | दि.04/07/13 ते दि.31/03/14 |

# अनुक्रमणिका

विभागनिहाय परिच्छेदांचे विवरण ....... 1

**I PART I : भाग १ ....... 3**

मागील लेखा परीक्षण अहवाल ....... 3

**PART II ....... 11**

**कलम ९ अ खालील आक्षेप ....... 12**

1 सोलापूर महानगरपालिकेच्या 2013-14 या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पातील अनियमततेबाबत..... 13

2 सोलापूर महानगरपालिकेच्या 2013-14 या आर्थिक वर्षाचे वार्षिक लेख्याबाबत.... ....... 17

3 कामगार कल्याण उपकराची वसूल न करण्यात आलेली रक्कम शासनाकडे जमा करण्यात येण्याबाबत. ....... 19

4 अग्रीम नोंदवहीतील उणिवाबाबत. ....... 20

5 पाणी पुरवठा व मलनित्सारण विभागातील झालेल्या विविध कंत्राटी कामामधून कामगार विमा व कामगार कल्याण उपकर वसूल केला नसल्याबाबत. ....... 23

6 उजनी येथे दुबार पंपिग करण्यासाठी पंप खरेदी करणे व बसविणेबाबत. ....... 27

7 नगर रचना विभागातील मोकळया जागेतील ले आऊट मंजुरी मध्ये झालेल्या अनियमितते बाबत. ....... 30

8 विकास योजना आरखडा (1997 ते 2007) नुसार आरक्षित केलेल्या जागांच्या भूसंपादनाची कार्यवाही केली नसल्याबाबत. ....... 32

9 महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान योजनेंतर्गत महानगरपालिका क्षेत्रात भाग-1 मधील रस्ते करणे. (2013-14) 34

10 महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान योजनेंतर्गत महानगरपालिका क्षेत्रात भाग-5 मधील रस्ते करणे. ....... 36

11 आग सुरक्षा निधीचे स्वतंत्र लेखाशिर्ष उघडून त्या निधीमधील खर्चाबाबत. ....... 38

12 घनकचरा विभागासाठी खरेदी करण्यात आलेल्या 1.1 घनमीटरचे कंटेनर, 4.5 घनमीटरचे कंटेनर व HANDCART इ. च्या खरेदीमधील अनियमितताबाबत.... ....... 39

13 नविन अन्न व्यवसाय परवाना देताना झालेल्या अनियमितेबाबत.... ....... 42

14 गलिच्छ वस्ती सुधारणा (वसुली) कार्यालय श्री ए.यु.कोरबू,व.श्रे लिपीक (संध्या निलंबीत)यांचेकडून झालेल्या अपहार रक्कम रु.2378291/-बाबत. (2013-14) ....... 44

15 वित्तीय वर्ष 2013-14 या कालावधीमध्ये सोलापुर महानगरपालिकेच्या सर्व खात्यातील रेकार्ड स्कॅनिंग करणेकामी स्कॅनर खरेदीमधील झालेल्या अनियमितताबाबत ....... 47

16 सोलापुर महानगरपालिका तसेच जिल्हा अधिकारी कार्यालय व इतर ठिकाणी सी.सी.टीव्ही कॅमेरे बसवतांना झालेल्या अनियमितताबाबत. ....... 53

**कलम ९ ब खालील आक्षेप ....... 62**

17 UIDSSMT योजनेंतर्गत सोलापूर शहर व हद्दवाढ भागात पिण्याचे पाण्याचे पाईप लाईन करणेसाठी DI K-7 ग्रेडचे पाईप खरेदी करणे (जुलै 13 च्या LETTER OF CREDIT च्या अनुषंगाने खरेदी) कामातील अनियमिततेबाबत..63
18 अक्कलकोट रोड एम.आय.डी.सी. ते सुनिल नगर रस्त्यामधील बाधित होणारे पोल शिफ्टिंग करणे, कामातील अनियमिततेबाबत (2013-14)....66
19 जुना वार्ड क्र. 59 टी.पी. 1/37 हरिजन वस्ती येथे सुधारणा करणे. (2013-14)....68
20 सोरेगाव स्मशानभूमी येथे विविध सुधारणा करणे. (2013-14) ....69
21 नागरी दलित वस्ती सुधारणा योजने (2011-2012) अंतर्गत प्र.क्र 2 मांतंग वस्ती समाज मंदिर परिसरात फ्लोरिंग व कंपाउड वॉल बांधने. ....71
22 अक्कलकोट रोड, M.I.D.C., निवारानगर, सिद्धेश्वरनगर, कामगार वसाहत रस्ता करणे कामातील अनियमिततेबाबत. (भाग - 1 मधील काम) ....72
23 कौंतम चौक ते मधला मारुती चौक पर्यंतचा रस्ता करणे कामातील अनियमिततेबाबत. ....74
24 प्र.क्र.50 मधील अमन हॉटेल, नईजिंदगी चौक ते मौलाना आझाद चौक, पारशी विहीर समोर महरबा चौक अमन हॉटेल मजरेवाडीकडे जाणारा रस्ता करणे कामातील अनियमिततेबाबत. ....76
25 कामाचे किंमतीच्या 1% कामगार कल्याण उपकर वसूल केला नसलेबाबत. ....78
26 केंद्रशासन पुरस्कृत कमी खर्चाच्या स्वच्छता योजनेंतर्गत मनपा क्षेत्रातील आर्थिक्ि दुर्बल घटकांकरीता वैयक्तिक शौचालय बांधकामाच्या खर्चाचे देयकातील अनियमिततेबाबत ....80
27 सोलापूर महानगरपालिकेमध्ये बांधकाम परवाना प्रकरणांमध्ये आढळून आलेल्या अनियमितताबाबत.......100
28 सोलापूर महानगरपालिकेमध्ये बांधकाम परवाना प्रकरणांमध्ये कामगार कल्याण उपकाराची कमी वसुली केलेबाबत...... ....102
29 श्री. पंकज कन्स्ट्रकशन यांच्या मौजे शेळगी, सर्वे नं.69/2, तुळजापूर रोड येथील लेआऊट मंजुरीमधील अनियमितता.......104
30 बांधकाम परवाना विभागातील जमा होणा-या रक्कमेच्या अनुषंगाने अभिलेख लेखापरीक्षणाकरीता उपलबध झाले नसल्याबाबत.......106
31 आंबेडकर नगर, ब्रम्हचैतन्य नगर, विद्या नगरी, साईश नगर, बंजारा सोसायटी ते निर्मिती गणेश येथ पिण्याची पाईप लाईन घालणे या कामातील नियमिततेबाबत.......107
32 मजरेवाडी येथे 2.00 + 2.00 द.क्ष.लि. व सोरेगाव येथे 1.00 द.क्ष.लि. व प्रतापनगर येथे 0.50 द.क्ष.लि. क्षमतेची उंचीवरील पाण्याची टाकी बांधणे कामातील अनियमिततेबाबत. ....110
33 पाणी पुरवठा केद्रांकडील वीज बिल देयकास इलेक्ट्रीसीटी डयुटी देय नसताना आदा केल्याने जादा रक्कम प्रदान झालेबाबत.......112
34 विडी घरकुल येथे 2.00 द.ल.लि. उंचावरील टाकी बांधणे मधील अनियमिततेबाबत.......113
35 पॉवर फॅक्टर कमी आल्याने महावितरण कंपनीकडुन इंन्सेटिव्ह कमी मिळाल्याने मनपाचे झालेल्या नुकसानबाबत.......117

36 जुना वॉर्ड क्र. 51 वाडिया हॉस्पीटल व कोनापुरे चाळ येथे रस्तो डांबरीकरण करणे या कामातील अनियमिततेबाबत........118
37 हिप्परगा तलाव दुबार पपिंग करण्यासाठी पंप खरेदी करणे व बसवणे यामधील अनियमितताबाबत.........120
38 उजनी येथे इन्टेक चेनलची खोली वाढवणे. (उजनी पंप हाऊस येथील चर मधील गाळ काढणे व चॅनलसाठी भिंत बांधणे)यामधील अनियमितताबाबत...........122
39 मोठ्या निवासी कराच्या वसुलीबाबत...........123
40 मालमत्ता कर बसविण्याच्याद्दष्टीने करपात्र मुल्यमध्ये सुधारणा केले नसलेबाबत. ...........125
41 कर संकलन विभागाच्या(शहर व हद्दवाढ) 2013-14 या वित्तीय वर्षातील कर निर्धारण प्रकरणांतील केलेल्या करांच्या आकारणीमधील उणीवांबाबत... ...........126
42 मोबाईल टॉवरवरील थकीत कराबाबत. ...........128
43 करमणूक कराची रक्कम वेळीच वसूल केली नसल्याबाबत...........130
44 सोलापूर महानगरपालिकेच्या 2013-14 या आर्थिक वर्षाच्या विना परवाना इमारतींच्या कर निर्धारण प्रकरणांना मालमत्ता कराच्या शास्तीची कमी दराने आकारणी केलेबाबत.. ...........132
45 अवैध बांधकामावर मालमत्ता कर कमी शास्ती आकारणी केलेबाबत...........135
46 अवैध बांधकामावर मालमत्ता कर कमी शास्ती आकारणी केलेबाबत...........137
47 महाराष्ट्र शिक्षण कर व नौकर शाश्वत्ती कर (रोजगार हमी कर) शासनाकडे उशिरानेजमा केल्याबाबत... ...138
48 आरोग्य खात्याच्या डी. एस. विभागामार्फत करण्यात आलेल्या फिनेल व जंतुनाशक खरेदीमधील अनियमितताबाबत.... ...........141
49 बजेट नियत्रंण नोदवहीनुसार वित्तीय वर्ष 2013-14 मधील खालील देयके उपलब्ध न झाल्याबाबत..........143
50 सोलापूर महानगरपालिकेचे उत्पन्न वाढीच्या दृष्टीकोणातून आरोग्या खात्याचे अन्न परवाना विभागाकडून नविन 83 व्यवसायांचा समावेश करण्याच्या दृष्टीने सादर केलेल्या प्रस्तावाबाबत ...........145
51 डी.एस. विभागाकरिता फॉगिंग माशिन खरेदीतील त्रुटीबाबत...........147
52 एक्सरे फिल्म-केमिकल साहित्य खरेदीतील अनियमितेबाबत.................149
53 वित्तीय वर्ष 2013-14 या कालावधीत निविदा न काढता केलेल्या साहित्याच्या खरेदी मधील अनियमितताबाबत...........151
54 वित्तीय वर्ष 2013-14 या कालावधीत कुटुंब कल्याण कार्यक्रमाअंतर्गत शासनाकडून मिळणारे वेतन अनुदानामधील अनियमितता ...........152
55 वित्तीय वर्ष 2013-14 या कालावधीत वाहनांच्या देखभाल/दुरुस्तीवर करणेत आलेल्या खर्चामधील अनियमितता... ...........153
56 वित्तीय वर्ष 2013-14 या कालावधीत मेडी फॉर्मा यांच्याकडून औषध खरेदी मधील अनियमितताबाबत....155
57 डी.एस.विभागातील जंतुनाशके पावडर खरेदी नस्तीमधील (बील क्र.66/12-03-14) अनियमितताबाबत.157
58 कर आकारणी व कर संकलन विभाग, नागरी सुविधा केंद्र, लेखा विभाग व इतर विभागांकरिता विकसित केलेल्या संगणक आज्ञावलीबाबत. ...........159

59 आयकराच्या रक्कमा विलंबाने भरणा केल्याबाबत........161
60 गौण खनिजावरील स्वामित्वधनाची वसूल करण्यात आलेली रक्कम विलंबाने जमा करण्यात आल्याबाबत. 163
61 शासकीय निधीचे रोख नोंदवहीतील नोंदीच्या अनियमिततेबाबत. ........164
62 वित्तीय वर्ष 2013-2014 या आर्थिक वर्षातील मूल्यवर्धित कराच्या जमा रक्कमेबाबत........166
63 जनरल फंड (मनपा निधी) च्या रोखवहीतील अनियमितताबाबत..........168
64 शासकीय निधीच्या(रोखवहीमधील रेखांकन करताना आढळुन आलेल्या् अनियमिततेबाबत...........170
65 विभागीय कार्यालय क्र. 7 यांच्याकडील वर्ग- 4 कर्मचाऱ्याच्या सेवापुस्तकातील अनियमिततेबाबत............173
66 प्रभाग क्र.1 मधील हजरतबाग चाळ येथे ड्रेनेज लाइन टाकणे कामातील अनियमिततेबाबत.. ..........175
67 स्थानिक संस्था कर विभागाच्या 2013-14 या वित्तीय वर्षातील कर निर्धारण प्रकरणांतील केलेल्या करांच्या आकारणीमधील उणीवांबाबत... ........176
68 सोलापूर महानगरपालिका जकात कर विभागातील जकात व एसकॉर्ट पावती पुस्तकांचे वापराबाबत... .......179
69 वित्तीय वर्ष 2013-14 मधील स्थानिक संस्था कर वसूलीबाबत. ........180
70 महानगरपालिकेने दिलेल्या वकील फी प्रदानामधून आयकर कपात केली नसलेबाबत. ........181
71 सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये अतिक्रमण करून टाकलेल्या टपरीधारकावर दंडात्मक कारवाईबाबत 183
72 आर्थिक वर्ष 2013-14 मध्ये मेजर शॉपींग सेंटर कडून गाळेधारकाकडून गाळाभाडे रक्कमेची वसूली करण्यात आलेली नसल्याबाबत.... ........185
73 आर्थिक वर्ष 2013-14 मेजर शॉपिंग सेंटर कडून सेवा कराची वसूली करण्यात आलेली नसल्याबाबत.........189
74 श्री. सिद्धेश्वर बहुउद्देशीय महिला विकास संस्थेस झुणका भाकर सुरू करणेस दिलेल्या मोकळ्या जागेबाबत... 191
75 2013-2014 स्टेशनरी साहीत्य खरेदीमधील अनियमितता........193
76 2013-2014 स्टेशनरी खरेदीमधील अनियमितता (निविदा मागवून केलेली खरेदी)........194
77 वित्तीय वर्ष 2013-14 या कालावधीत नागरी हिवताप योजनेच्या अंमलबजावणीतील अनियमितताबाबत 196
78 2013-2014 मध्ये पुरुष सेवकांसाठी गणवेश खरेदीमधील अनियमितताबाबत.. ........197
79 सोलापुर महानगरपालिका वित्तीय वर्ष 2013-14 मधील सेवकासांठी पादत्राणे खरेदीबाबत अनियमितता...200
80 गलिच्छ वस्ती सुधारणा (वसूली) विभागाकडून महाराष्ट्र शिक्षण कर व नौकर शाश्क्लीकर (रोजगार हमी कर) शासनाकडे जमा न करण्यात आल्याबाबत........201
81 नागरी समुदाय विकास योजना अंतर्गत वित्तीय वर्ष 2013-2014 मधील अभिलेखे उपलब्ध न झाल्याबाबत..... ........203
82 अतिक्रमण विभागाचे अभिलेखे उपलब्ध न झालेबाबत. ........204
83 1 ते 10 वी पर्यंतच्या मुलींना मोफत बस प्रवास या योजनेतील अनियमितताबाबत........205

84 नगर अभियंता मशनरी विभागाच्या वाहनांच्या देखभाल/दुरुस्तीवर करणेत आलेल्या खर्चामध्ये झालेल्या अनियमितताबाबत. ......206
85 उद्यान विभागाकडील प्राणी संग्रहालयाकरिता दररोज बीफ पुरविणेचे वार्षिक दरकराराबाबत ......207
86 घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत घराघरातून कचरा संकलन, वर्गीकरण व वाहतूक मक्त्यातील अनियामितता........ ......209

**कलम ९ क खालील आक्षेप ......214**

**------------------ निरंक ------------------ ......215**

**कलम ९ ड खालील आक्षेप ......217**

87 नेहरूनगर स्मशानभूमी येथे विविध सुधारणा करणे (फेज-1 व 2). (2013-14) ......218
88 पुर्न:डांबरीकरण नाला ते बलादव हॉस्पिटल रस्ता करणे कामातील अनियमिततेबाबत. ......219
89 विद्युत विभागाकडील रस्त्यावरील दिवे दुरुस्तीसाठी लागणारे साहित्य खरेदीमधील अनियमिततेबाबत. ..220
90 8 % ईटीपी (ETP) चार्जेस वसुलीबाबत.... ......222
91 पाणीपुरवठा विभागाची 2013-14 व 2014-15 या आर्थिक वर्षातील पाणी उपसा,पाणीपट्टी, नळ कनेक्शनधारका संबधित माहिती व इतर अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध न केल्याबाबत. ......223
92 चिंतलवार वस्ती येथे ड्रेनेज लाईन घालणे व खाजगी नळांना मीटर बसविणे याकामाची निविदा नस्तीव मोजमाप नोंदवही उपलब्ध न केल्याबाबत. ......226
93 होटगी रोड ते कंबर तलाव लगत नव्याने ड्रेनेज पाईप लाईन टाकणे बाबत...... ......226
94 विकास आराखडयाची अंमलबजावणीसाठी आरक्षित जागा संपादनासाठी प्रदान केलेली TDR प्रमाणपत्र उपलब्धतेबाबत. ......229
95 भविष्य निर्वाह निधी विभागाकडील नोंदीच्या अनियमिततेबाबत. ......230
96 परिभाषित अशंदान निवृत्तीवेतन योजनेच्या अमंलबजावणीमधील उणिवाबाबत. ......232
97 सोलापूर महानगरपालिकेच्या 2013-14 या आर्थिक वर्षाच्या कर्ज नोंदवहीतील अनियमततेबाबत.. ......234
98 मुदत ठेवीवरील व्याजाच्या रकमा कमी मिळालेबाबत. ......237
99 महानगरपालिका सेवकांना लागू करण्यात आलेल्या सहाव्या वेतन आयोगानुसार सुधारीत वेतन श्रेणीबाबत238
100 2013-2014 या आर्थिक वर्षात लेखाशाखेत रोखपालाकडे जमा होणा-या रक्कमाबाबत व नोंदवहीबाबत..... 239
101 महाराष्ट्र नागरी सेवा नियमाप्रमाणे अधिकारी /कर्मचारी यांच्या सेवापुस्तकांमध्ये आवश्यक नोंदी न घेण्याबाबत.... ......241
102 वित्तीय वर्ष-2013-2014 या आर्थिक वर्षातील बयाणा/सुरक्षा अनामत रक्कमेबाबत... ......242
103 मालमत्ता कराची धनादेशाव्दारे जमा रकमांची पक्की पावती उशिराने केली जात असल्याबाबत. ......244
104 मालमत्ता कराच्या थकीत रक्कमाबाबत. ......247
105 मालमत्ता कराचे धनादेश बँकेतून न वटता परत आल्याबाबत.... ......249

106 वित्तीय वर्ष 2013-14 या वर्षातकर संकलन विभाग व संगणक विभाग यांचे कडील मालमत्ता करांचे जमा रक्कमामध्ये असलेल्या तफावतीबाबत. ........ 253
107 वित्तीय वर्ष 2013-14 मधील पाणीपट्टी थकबाकी बाबत... ........ 255
108 नगरसेवक - पदाधिकारी यांचे दूरध्वनी, लेखनसामुग्री व लेटरपॅड छपाईवर करण्यात आलेल्या खर्चाबाबत. 257
109 वित्तीय वर्ष 2013-14 या वर्षात अंदाजपत्रकामध्ये अनावश्यक तरतुद करण्यात आल्याबाबत... ........ 258
110 धनादेशाव्दारे प्राप्त झालेल्या रकमेची धनादेश वाटण्यापूर्वी कच्ची पावती न देता पक्की पावती देण्यात आल्याबाबत. ........ 259
111 अग्निशामक विभागाकडील फायरमनच्या सेवा पुस्तकातील त्रुटी बाबत. ........ 261
112 वित्तीय वर्ष 2013-14 या कालावधीत अग्निशमक विभागातील जडसंग्रह नोंदवहीतील त्रूटी बाबत. ........ 263
113 वित्तीय वर्ष 2013-14 या कालावधीत अग्निशामन विभागातील लॉगबुकमधील त्रृटीबाबत.. ........ 264
114 आश्वासित प्रगती योजनेची (पहिला लाभ) अंमलबजावणी मधील अनियमिततेबाबत. ........ 265
115 वित्तीय वर्ष 2013-14 या कालावधीत सामान्य प्रशासन विभागाच्या भांडार शाखेकडील लेखे/नोंदवहया नियमानुसार न ठेवलेबाबत. ........ 268
116 कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांचे आकृतीबंधाबाबत अनियमितताबाबत..... ........ 269
117 विभागीय कार्यालय -7, मधील वर्ग-4 च्या कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तकातील त्रुटी बाबत. ........ 270
118 विहित मुदतीत रोख रक्कम कोषागारात जमा केली नसल्याबाबत..... ........ 272
119 विभागीय कार्यालय-6,4,2,8 मधील वर्ग-4 च्या सेवापुस्तकामधील त्रुटी बाबत ........ 273
120 कुटुंब कल्याण विभागाच्या रोखवहीमधील त्रुटीबाबत.... ........ 275
121 प्राणी संग्रहालयाकरिता पालेभाज्या व फळभाज्या पुरविण्याबाबतच्या निविदेबाबत... ........ 276
122 वर्ष 2013-14 चे तरतुद रजिष्टर प्रमाणे झालेल्या खर्चाची माहीती उपलब्ध करुन देण्यात न आल्याबाबत..... 277
123 स्थानिक संस्था कर व पारगमन शुल्काची 2013-2014 आर्थिक वर्षाचे बजेट बुक मध्ये प्रत्यक्ष जमा रक्कम व स्थानिक संस्था कर विभागाने सादर केलेल्या विवरणपत्रात दर्शविलेल्या जमा रक्कम यातील तफावतीबाबत..... 278
124 स्थानिक संस्था कर विभागाच्या 2013-2014 या वित्तीय वर्षातील कर निर्धारण प्रकरणातील कर आकारणी अनियमिततेबाबत ........ 280
125 सोलापूर महानगरपालिकेच्या मास मंडई ( मटन मार्केट ) शाक मंडई ( भाजीपाला मार्केट) या विभागाचे डिमांड रजिष्टर लेखापरीक्षण केले असता 2013-14 या वित्तीय वर्षात खालील मास मंडई मटन मार्केट )शाक मंडई ( भाजीपाला मार्केट गाळे/ओटा धारकाकडून भाडयाची रक्कम वसूल केली नसल्याबाबत ........ 281
126 वित्तीय वर्ष 2013-14 मध्ये मास मंडई ( मटन मार्केट ) व शाक मंडई ( भाजीपाला मार्केट) मधील ओटा/गाळे भाडेधारकाकडून रक्कमेची वसूली करण्यात आलेल्या पावती पुस्तकाच्या हस्तांतरण नोंदवहीबाबत........ 285
127 वित्तीय वर्ष 2013-14 या मधील सोलापूर महानगरपालिकेच्या हुतात्मा स्मृती मंदिरा (नाट्यगृह) पासून वसूल झालेल्या भाडे संबधीत अनियमितता ........ 287

128 वित्तीय वर्ष 2013-2014 मध्ये भूमी व मालमत्ता मधील गाळेधारकाकडून भाडयाच्या रक्कमेची वसूली करण्यात आलेल्या पावती पुस्तकाच्या हस्तांतरण नोंदवहीबाबत.... 289
129 वित्तीय वर्ष 2013-14 मध्ये गलिच्छ वस्ती सुधारणा (वसुली) कार्यालय मधील इष्ठांकानुसार कर संकलन अनियमितताबाबत. 292
130 अतिक्रमण विभागाचे आस्थापनेवर झालेल्या खर्चामधील अनियमितताबाबत. 293
131 वित्तीय वर्ष 2013-14 या कालावधीत वार्षिक महसुली उत्पन्नामधुन बांधील खर्च वजा जाता येणा-या रक्कमेच्या 5 टक्के रक्कम महिला व बाल कल्याण योजनेसाठी निधी राखीव ठेवण्यामध्ये झालेल्या अनियमितताबाबत. 294
132 नगर अभियंता मशनरी विभागाच्या वाहनांच्या लॉगबुकबाबत. 295
लेखा परीक्षकनिहाय परिच्छेदांचे विवरणपत्र 298
**विवरणपत्रे व जोडपत्रे 299**

## *विभागनिहाय परिच्छेदांचे विवरण*

| विभाग | ९अ | ९ब | ९क | ९ड |
|---|---|---|---|---|
| इतर | | | | |
| आयुक्तालय | | | | |
| सामान्य प्रशासन | | 75, 76, 77 | | 114, 115, 116 |
| नगर सचिव | | | | 108, 109 |
| शहर अभियंता किंवा सार्वजनिक बांधकाम | 9, 10 | 19, 20, 21, 22, 23, 24, 25, 26 | | 87, 88 |
| शहर अभियंता आणि विद्‌युत विभाग | | 17, 18 | | 89, 90 |
| पाणी पुरवठा व मल निसा:रण | 5, 6 | 31, 32, 33, 34, 35, 36, 37, 38 | | 91, 92, 93 |
| लेखा विभाग | 1, 2, 3, 4 | 59, 60, 61, 62, 63, 64 | | 95, 96, 97, 98, 99, 100, 101, 102 |
| नगर रचना | 7, 8 | | | 94 |
| जकात किंवा स्थानिक संस्था कर किंवा उपकर | | 67, 68, 69 | | 123, 124 |
| कर निर्धारण व संकलन | | 39, 40, 41, 42, 43, 44, 45, 46, 47 | | 103, 104, 105, 106, 107 |
| आरोग्य | 13 | 48, 49, 50, 51, 52, 53, 54, 55, 56, 57 | | 120 |
| भूमी व मालमत्ता विभाग | | 72, 73, 74 | | 128 |
| वाहन विभाग | | 84 | | 132 |
| विधी विभाग | | 70, 71 | | |
| घन कचरा व्यवस्थापन प्रकल्प | 12 | 86 | | |
| भांडार | | 78, 79 | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| परवाना व मंडई विभाग | | | | 125, 126 |
| संगणक किंवा माहिती तंत्रज्ञान | 15, 16 | 58 | | |
| झोपडपट्टी सुधार | 14 | 80 | | 129 |
| नागरी समुदाय विकास प्रकल्प विभाग | | 81 | | |
| महिला व बालकल्याण विभाग | | 83 | | 131 |
| अग्निशमन विभाग | 11 | | | 110, 111, 112, 113 |
| अतिक्रमण विभाग | | 82 | | 130 |
| प्रभाग कार्यालये | | 65, 66 | | 117, 118, 119 |
| उद्यान विभाग | | 85 | | 121, 122 |
| जन्म मृत्यु नोंदणी विभाग | | | | |
| समाज विकास किंवा सामाजिक न्याय विभाग | | | | |
| इमारत मंजूरी विभाग | | 27, 28, 29, 30 | | |
| नाट्य गृह | | | | 127 |

# I Part I : भाग १

## मागील लेखा परीक्षण अहवाल

13 व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार राज्यातील सर्व महानगरपालिकांचे व त्यांच्या अंतर्गत असलेल्या उपक्रमांचे वैधानिक लेखापरीक्षण वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र.स्थानिले1010/ प्र.क्र. 26ब/विमाप्रशा, दिनांक 31/03/2011 अन्वये संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, नवी मुंबई यांचेकडे सोपविण्यात आले आहे. त्यानुसार सोलापूर महानगरपालिकेचे लेखापरीक्षण 2011-12 या वित्तीय वर्षापासून सुरु करण्यात आले. सोलापूर महानगरपालिकेच्या मागील लेखापरीक्षण अहवालातील प्रलंबित परिच्छेदांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

लेखापरीक्षण अहवाल वर्ष 2011-12 व 2012-13

| अ.क्र. | लेखापरीक्षण वर्ष | परिच्छेद क्रमांक | एकूण |
|---|---|---|---|
| 1 | 2011-12 | 1 ते 158. | 158 |

2012-13 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद. (चालू लेखापरीक्षणाचे मागील वित्तीय वर्ष)

| परिच्छेद क्रमांक | शिर्षक |
|---|---|
| 1 | सोलापूर महानगरपालिकेच्या 2012-13 आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकातील अनियमिततांबाबत |
| 2 | 2012-2013 चे वार्षिक लेखे परीक्षणास उपलब्ध करुन न दिल्याबाबत. |
| 3 | प्रमाणके रेखांकनास उपलब्ध न करण्याबाबत |
| 4 | करांची जमा रक्कम लेखाशाखेत जमा न करता परस्पर बँकेतुन खर्च केल्याबाबत |
| 5 | कामगार कल्याण उपकराची रक्कम वसूल न केल्याबाबत |
| 6 | गौण खानिजावरील स्वामीत्वधनाची वसूल केलेली रक्कम शासनास विलंबाने जमा केलेबाबत. |
| 7 | नियमबाह्यरित्या रोखीने रकमा प्रदान केल्याबाबत |
| 8 | धनादेश नोंदवही,बँक स्टेटमेंट व वापरलेल्या धनादेशाच्या स्थळप्रती लेखा परीक्षणास उपलब्ध करुन न दिल्याबाबत |
| 9 | दोन किंवा त्यापेक्षा जास्त कार्यात्मक पदोन्नती मिळालेल्या कर्मचारी व अधीकारी यांना सेवांतर्गत अश्वासित प्रगती योजना मंजूर केल्याबाबत |
| 10 | बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य आवास योजना कामातील अनियमितता |
| 11 | शहरी गरीबांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम घटकाखाली केलेला रुपये 8,38,000/- खर्चाचे आवश्यक अभिलेख लेखापरीक्षणासाठी उपलब्ध न झालेबाबत |
| 12 | सुवर्णजयंती शहरी रोजगार योजनांतर्गत सामाजिक संरचनेमध्ये समाजविकास संस्थाना केंद्र शासनाने दिलेल्या अनुदानातुन केलेल्या रुपये 9,30,225/- खर्चापृष्ठयर्थचे अभिलेख |

| | |
|---|---|
| | लेखापरिक्षणास उपलब्ध न केलेबाबत |
| 13 | महानगरपालिकेकडील स्थानिक संस्था कर प्रणाली अंतर्गत आढळून आलेल्या त्रुटीबाबत. |
| 14 | अनोंदणीकृत व्यापा-याकडून स्थानिक संस्था कराची वसूली न केलेबाबत. |
| 15 | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत सोलापूर शहर मल:निस्सारण व्यवस्था सुधारणे कामाबाबत |
| 16 | पोस्ट बेसिक शाळा नेहरुनगर येथे पिण्याचे पाण्याचे पाईप लाईन टाकणे कामाचे अनियमिततेबाबत. |
| 17 | उजणी/पाकणी पंपहाउस येथील देखभाल दुरुस्ती कामाचे मजुरीसह 3 वर्षासाठी चालविण्यास देणे कामामधील अनियमिततेबाबत. |
| 18 | अनुसूचित जाती / नवबौद्ध घटकांसाठी घरकुल योजने अंतर्गत लाभार्थ्यांची निवड करतांना झालेली अनियमितता |
| 19 | अनुसूचित जाती / नवबौद्ध घटकांसाठी घरकुल योजने अंतर्गत लाभार्थ्यांची निवड करतांना झालेली अनियमितता |
| 20 | गलिच्छ वस्ती सुधारणा योजना विभागाकडील अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध न केल्याबाबत |
| 21 | आरोग्य विभागाकडील रु. 24,95,532/- ची औषध खरेदीची अभिलेखे लेखापरीक्षणासाठी उपलब्ध न झाल्या बाबत. |
| 22 | महिला व बालकल्याण समितीने राबविलेल्या योजना वरील खर्चानुषगाने आवश्यक अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध न झाल्याबाबत. |
| 23 | अवैध बांधकामाना लावलेल्या शास्तीबाबतची कर निर्धारण प्रकरणे व शास्ती वसुली बाबतची माहिती लेखापरीक्षणास उपलब्ध करून न दिल्याबाबत. |
| 24 | मोठ्या निवासी इमारतीवरील कर ( फ्लोरेज टॅक्स ) निर्धारण प्रकरणे लेखा परीक्षणासाठी उपलब्ध करून न दिल्याबाबत. |
| 25 | मोठ्या निवासी इमारतीवर निवासी कर न लावता कर निर्धारण केल्याने झालेल्या आर्थिक नुकसानीबाबत. |
| 26 | महाराष्ट्र शिक्षण कर व नौकर शाश्वनती कर (रोजगार हमी कर) शासनाकडे उशिराने जमा केले बाबत. |
| 27 | बांधकाम परवानाबाबत लेखा परिक्षणास अभिलेखे सादर न केल्याबाबत. |
| 28 | विकास हक्क प्रमाणपत्राबाबत लेखा परिक्षणास अभिलेखे सादर न केल्याबाबत.(विकास हक्क प्रमाणपत्र (डी.आर.सी.) |
| 29 | बाजार गाळे बाजारभावापेक्षा कमी दराने भाड्याने दिल्याने झालेल्या आर्थिक नुकसानीबाबत. |
| 30 | सोलापूर मनपा हद्दीत वृक्षसंवर्धन व जतन अधिनियम 1975 ची अंमलबजावणी न केल्याबाबत. |
| 31 | यांत्रिक विभागाकडील अभिलेख्यातील अनियमततेबाबत. |

| | |
|---|---|
| 32 | महानगरपालिका सेवकांना लागू करण्यात आलेल्या 6 व्या वेतन आयोगानुसारच्या सुधारित वेतनश्रेणीस शासनाची मान्यता घेण्यात आली नसल्याबाबत |
| 33 | महानगरपालिका मुख्य लेखापरिक्षकांचे कामकाजाबाबत |
| 34 | आग सुरक्षा निधीचे स्वतंत्र लेखाशिर्ष उघडून त्या निधीमधील खर्चाबाबत |
| 35 | आयकराच्या रक्कमा विलंबाने भरणा केल्याबाबत |
| 36 | भविष्य निर्वाह निधीमधील मुदत ठेवीवर व्याजाची रक्कम कमी मिळालेलेबाबत. |
| 37 | निवृतीवेतन निधीमधील रक्कम कमी व्याज दराने गुंतवणूक केल्याबाबत. |
| 38 | मक्तेदारांच्या देयकातून कमी दराने व्हॅट वसूल केल्याने झालेल्या रु.51,29,050/- इतक्या रक्कमेच्या आर्थिक नुकसानी बाबत |
| 39 | कर्मचारी/अधिकारी यांचे भविष्य निर्वाह निधी खात्यातील नोंदीच्या त्रुटीबाबत. |
| 40 | परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेतील त्रुटीबाबत |
| 41 | अग्रीम नोंदवहीतील त्रुटीबाबत. |
| 42 | भविष्य निर्वाह निधीमध्ये शिल्लक कमी असल्याबाबत. |
| 43 | UIDSSMT निधीचे रोखवहीशी बँक खाते पासबुकाचा ताळमेळ घेतला नसल्याबाबत |
| 44 | म.न.पा.निधी (जनरल फंड ) च्या रोखवही ( किर्द ) मधील अनियमितता |
| 45 | धनादेश साठा नोंदवही ठेवण्यात आली नसल्याबाबत |
| 46 | अश्वासित प्रगती योजनेची (पहिला लाभ) चुकीच्या पध्दतीने अंमलबजावणी केली जात असल्याबाबत. |
| 47 | आवेक्षक चौबे यांचे पदोन्नती व पदावनीबाबत |
| 48 | कर्ज निवारण निधी (सिंकींग फंड) बाबत |
| 49 | माहे फेब्रुवारी 2013 मध्ये म.न.पा. च्या विविध विभागासाठी घेतलेल्या डिझेल बिलाबाबत |
| 50 | डिझेल बिलापोटी परिवहन विभागास देण्यात आलेल्या अग्रिमाबाबत |
| 51 | स्थानिक संस्था कराची कमी आकारणी केलेबाबत. |
| 52 | युनायटेड जनरल एजन्सी यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका स्थानिक संस्था कर नियम 2010 अंतर्गत व्यवसायाची नोंदणी न करता व्यवसाय केल्यामुळे नियम 48 (2) (क) व (3) नुसार कार्यवाही करणेबाबत. |
| 53 | ईचगेरीमठ ते व्दारकानगरी ते मशाळवस्तीपर्यंत पिण्याचे पाण्याची पाईप लाईन टाकणे कामाचे अनियममिततेबाबत. |
| 54 | पिण्याच्या पाण्याचे पाईप खरेदीचे साठा नोंदवही ठेवले नसलेबाबत |
| 55 | कस्तुरबा टाकीजवळ 2.00 द.ल.लिटर क्षमतेची उंचावरील टाकी बांधणे कामाचे अनियममिततेबाबत |

| | |
|---|---|
| 56 | पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन टाकणे कामाची निविदा जादा दराने निश्चीत केलेबाबत. |
| 57 | आदित्यनगर ते नवीन डोणगांवनाका येथे पिण्याचे पाण्याचे पाईप लाईन टाकणे कामाचे अनियमिततेबाबत |
| 58 | सैफुल चौक ते नाथ होम्स ते डायमंडशाळेपर्यंत पिण्याचे पाण्याची पाईप लाईन टाकणे कामातील अनियमिततेबाबत |
| 59 | देगांव येथे 1.00 द.ल.लिटर क्षमतेची उंचावरील पाण्याची टाकी बांधणे व पाईप लाईन टाकणे कामाचे अनियममिततेबाबत. |
| 60 | बसवेश्वरनगर येथे 0.60 द.ल.लिटर क्षमतेची उंचावरील पाण्याची टाकी बांधणे व पाईप लाईन टाकणे कामाचे अनियममिततेबाबत. |
| 61 | छत्रपती शिवाजी सर्वोपचार रुग्णालय येथे 300 mm व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे कामाचे अनियमिततेबाबत. |
| 62 | होटगीरोड कंबर तलाव लगतची ड्रेनेज लाईन टाकणे कामाचे अनियमिततेबाबत. |
| 63 | सोलापूर शहर व हद्दवाढ भागामध्ये पाणी पुरवठा सुधारणा करणेसाठी इलेक्ट्रो मॅग्नेटिक मिटर व बल्क वॉटर मिटर बसविणे |
| 64 | बाळेगाव येथे 2.0 द.ल.लि. क्षमतेची उंच पाणी टाकी बांधणे कामातील अनियमितता |
| 65 | सोलापूर महानगरपालिका हद्दीतील केगांव भागात 0.8 द.ल.लि. क्षमतेची उंच पाणी टाकी बांधणे कामातील अनियमितता |
| 66 | मजरेवाडी 2+2 द.ल.लि., सोरेगाव 1 द.ल.लि. प्रतापनगर 0.5 द.ल.लि.क्षमतेची उंच टाकी बांधणे कामातील अनियमितता |
| 67 | उजनी,पाकणी,टाकळी,भवानी पेठ व MBR जुळे सोलापूर, जलशुध्दीकरण केंद्राचे पंपीग स्टेशनवर APFC पॅनल व कॅपॅसिटर बसविणे |
| 68 | वडकबाळ ते होनमुर्गी फाटा पर्यंत 1200 mm व्यासाची M.S. पाण्याची पाईप लाईन घालणेबाबत |
| 69 | ट्रान्समिशन पाईप लाईन टाकणे स्पेशल्स व व्हॉल्व्ह बसविणे कामाचा मजुरीसह मक्ता देणे कामाबाबत. |
| 70 | UIDSSMT योजनेअंतर्गत जुळे सोलापूर ते डी.एस.पी. बंगल्यापर्यंत 1016 मी.मी. व्यासाची लोखंडी पाईपलाईन घालणे या कामातील अनियमिततेबाबत |
| 71 | केंद्र शासन पुरस्कृत राजीव आवास योजने अंतर्गत झोपडपट्ट्यातून सर्वेक्षण करणे या कामातील अनियमितता |
| 72 | एकात्मिक झोपडपट्टी विकास कार्यक्रमांतर्गत भगवाननगर येथे घरकुल बांधणे या कामातील अनियमितता. |
| 73 | अल्पसंख्यांक बहुल नागरी क्षेत्रात मुलभूत नागरी सुविधा पुरविणे या कार्यक्रमांतर्गत वार्ड क्रमांक 63 मधील जन्नत ए फिरदोस मुस्लीम कब्रस्ताण येथे रस्ता तयार करणे या कामातील अनियमितता |

| | |
|---|---|
| 74 | 13 व्या वित्त आयोगा अंतर्गत एम्पलॉयमेंट चौक ते कुमार चौक व रामलाल चौक,महापौर बंगला ते राष्ट्रीय महामार्ग पर्यंत रस्ता विकसित करणे या कामातील अनियमितता. |
| 75 | सर्व साधारण रस्ते अनुदानातून केलेल्या रस्त्याच्या कामातील अनियमितता |
| 76 | नागरी दलित वस्ती योजने अंतर्गत कामाच्या देयकातून मूल्यवर्धित कर, कामगार कल्याण उपकर व विमा रक्कम वसूल न केल्याबाबत |
| 77 | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान (जिल्हास्तर) योजनेतर्गत रस्ते अनुदानातून केलेल्या रस्त्याच्या कामातील अनियमितता. |
| 78 | जिल्हा वार्षिक योजना 2011-12 अंतर्गत रस्ते विकसित करण्यासाठी प्राप्त अनुदानातून केलेल्या खर्चातील अनियमितता. |
| 79 | वार्ड क्रमांक 29 विडी घरकुल येथे पिरॅमिड मेडीटेशन हॉल बांधणे या कामावरील खर्चाबाबत |
| 80 | महात्मा गांधी प्राणी संग्रहालय येथे मास्टर प्लॅन अंतर्गत स्नेक एन्क्लोजर या कामाचा विमा न उतरविल्यामुळे मक्तेदाराकडून विमा रक्कम वसूल करणे बाबत |
| 81 | नगर अभियंता यांचे अधिनस्त असलेले भांडार व हॉटमिक्स प्लॅन्ट च्या लेखापरीक्षणामध्ये आढळून आलेल्या अनियमितता. |
| 82 | केंद्रशासन पुरस्कृत कमी खर्चाच्या स्वच्छता योजनेंतर्गत मनपा क्षेत्रातील आर्थिक दुर्बल घटकांकरीता वैयक्तीक शौचालय बांधकामाच्या खर्चातील अनियमितता |
| 83 | मनपा परिसरातील कचरा गोळा करून त्याची वाहतूक करणे कामातील अनियमितता |
| 84 | आरोग्य विभागांतर्गत अँटीरॅबीज इंजेक्शन खरेदीमधील अनियमितता |
| 85 | आरोग्य विभागाकडील वाहनाच्या देखभाल/दुरुस्तीवर केलेल्या खर्चातील अनियमितता बाबत. |
| 86 | आरोग्य विभागाकडील वाहनांच्या इंधनावर व देखभाल दुरुस्तीवर मर्यादेपेक्षा जादा खर्च केल्याबाबत. |
| 87 | इंद्रभुवन बिल्डिंग मधील मेन इलेक्ट्रिक पॅनेल पासून केबल घालणे स्वीच बसविणे या कामातील अनियमितता |
| 88 | सोलापूर शहरातून जाणाऱ्या शिवाजी चौक ते भैया चौक ते पत्रकार भवन- कंबर तलाव ते सोरेगाव रस्ता दरम्यान रस्त्याचे मध्यभागी पोल उभारून लाईट व्यवस्था करणे या कामातील अनियमितता |
| 89 | नगरसेवक - पदाधिकारी यांचे दूरध्वनी, लेखनसामुग्री व लेटरपॅड छपाईवर करण्यात आलेल्या खर्चाबाबत. |
| 90 | करसंकलन (शहर) विभागाने केलेल्या करनिर्धारणातील अनियमितता. |
| 91 | बांधकाम परवानगी न घेतलेल्या बांधकामावर शास्ती आकारून वसूल न केल्याबाबत. |
| 92 | मोबाईल टॉवर वरील थकीत कराबाबत. |
| 93 | अवैध मालमत्ता करावर दुप्पट शास्ती आकारणी करुन वसुली केले नसलेबाबत. |

| | |
|---|---|
| 94 | मिळकत कर कमी आकारणीबाबत. |
| 95 | श्री.मारुती निवृत्ती नवले अध्यक्ष तथा सचिव सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ, केगाव यांना मालमत्ता कर कमी आकारणी केलेबाबत. |
| 96 | पाणीपट्टी थकबाकी बाबत |
| 97 | मालमत्ता कर थकबाकी बाबत |
| 98 | कर संकलन रक्कम जमा करण्यात येत असलेल्या बँक खात्याचा ताळमेळ घेण्यात आलेला नाही |
| 99 | बांधकाम वापर परवानाधारकाकडून कामगार कल्याण उपकर वसुल न केलेबाबत. |
| 100 | मोकळया जागेतील ले आऊट मंजूरीतील अनियमिततेबाबत. |
| 101 | बांधकाम परवाना मिळकतदाराकडून बांधकाम विकास शुल्क वसुल न केलेबाबत. |
| 102 | बांधकाम परवाना धारकाकडून उपकर व त्यावरील व्याज वसुल केले नसलेबाबत. |
| 103 | डॉ.अंत्रोळीकर मेजर शॉपींग सेंटरमधील भाडयाने दिलेल्या गाळेधारकाकडून भाडे व व्याज वसुल न केल्याबाबत. |
| 104 | बाजार गाळे भाडयाने देणेत आलेल्या नोंदवहीतील अनियमिततेबाबत |
| 105 | मंडई विभागामार्फत भाडयाने देणेत आलेल्या गाळयाची भाडे वसुली न केल्याबाबत. |
| 106 | उद्यान विभागामार्फत लोखंडी बाकडे खरेदीतील अनियमततेबाबत. |
| 107 | आवेक्षक पदावरील 5 वर्षाच्या सेवेनंतर केलेल्या वेतन निश्चितीबाबत |
| 108 | स्त्री सेवक कर्मचा-यासाठी गणवेश खरेदीबाबत |
| 109 | पुरुष सेवकांसाठी गणवेश कापड खरेदीबाबत. |
| 110 | अग्निशामक सेवकांसाठी गमबुट खरेदी मधील अनियमितता |
| 111 | स्टेशनरी साहित्य खरेदी मधील अनियमितता |
| 112 | ट्रक माऊंटेड, सक्शन कम जेटिंग मशिन खरेदीबाबत |
| 113 | इ.1ली ते 10 वी पर्यतच्या मुलींना मोफत बस प्रवास या योजनेतील अनियमितता बाबत |
| 114 | शिल्लक रक्कमेची गुंतवणूक व गुंतवणूक नोंदवही मधील त्रुटी बाबत |
| 115 | अग्निशमन सेवा विकसित करण्यासाठी शासनाने महानगरपालिकेस दिलेल्या कर्जाच्या परतफेडीबाबत. |
| 116 | अनुसूचित जाती / नवबौध्द घटकांसाठी घरकुल योजना राबविणे लाभार्थ्यांचा बायोमेट्रीक सर्व्हे करणे |
| 117 | सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेअंतर्गत 2012-13 वित्तीय वर्षात घटकनिहाय प्राप्त अनुदानातून झालेल्या कमी अधिक खर्चाबाबत |
| 118 | सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेअंतर्गत 2012-13 आर्थिक वर्षाकरीता निश्चित केलेली भौतिक उद्दिष्टे साध्य झाली नसल्याबाबत |

| | |
|---|---|
| 119 | सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेच्या बचतगट या घटकाच्या भौतिक व आर्थिक उद्दिष्ट साध्य न झाल्याबाबत |
| 120 | शहरी स्वयंरोजगार कार्यक्रमातील अनियमितता |
| 121 | हुतात्मा स्मृति मंदीर विभागाकडील लेख्यातील अनियमितता बाबत |
| 122 | निवडणूक खर्चाचे लेखे लेखापरीक्षणास उपलब्ध केले नसल्याबाबत. |
| 123 | विभागीय कार्यालयाकडील वर्ग 4 कर्मचा-यांचे सेवापुस्तकातील उणिवाबाबत |
| 124 | स्थानिक संस्था कर व पारगमन शुल्काची 2012-2013 आर्थिक वर्षाचे बजेट बुकमधील प्रत्यक्ष जमा व स्थानिक संस्था कर विभागाने सादर केलेल्या विवरणपत्राप्रमाणे जमा यामधील तफावतीबाबत. |
| 125 | पारगमन शुल्क वसुली संदर्भात अभिलेख्यात आढळून आलेल्या त्रुटींबाबत. |
| 126 | महानगरपालिका यांनी रस्ता अनुदानामधून किमान 10% तरतूद वाहतूक नियंत्रण व्यवस्था, रस्त्यावरील दिशा दर्शक फलक व इतर स्ट्रीट फर्निचर बसविणे, झेब्रा क्रॉसिंग तयार करणे इत्यादीसाठी खर्च करणेबाबत |
| 127 | महानगरपालिकेच्या सर्व विभागाकडील वाहनांचे लॉगबुक हिस्ट्रीशीट नोंदवहया अपूर्ण असल्या बाबत. |
| 128 | केंद्रशासन पुरस्कृत कमी खर्चाच्या स्वच्छता योजनेंतर्गत मनपा क्षेत्रातील आर्थि क दुर्बल घटकांकरीता वैयक्तीक शौचालय बांधकामाबाबतचे दस्तऐवज उपलब्ध करुन देणेबाबत |
| 129 | विद्युत विभागाकडील विद्युत साहित्य खरेदी व साठा नोंदवही बाबत |
| 130 | शासनाकडून निवृत्ती वेतनापोटी अनुदान उपलब्ध करून न घेतलेबाबत |
| 131 | महिला व बाल कल्याण समिती नर्सिंग प्रशिक्षण योजनेच्या अंमलबजावणीतील अनियमितता |
| 132 | 150 एम.एम. व्यासाचे विंधन विहिरी घेणे व त्यावर इंडिया(मार्क2) ची हातपंप पुरवणे व बसविणे कामाची अनियमिततेबाबत. |
| 133 | 8 % ईटीपी (ETP) चार्जेस वसुलीबाबत |
| 134 | पेटी कॅशबुक ठेवले नसलेबाबत. |
| 135 | झोन क्र.3 मधील रस्त्यासाठी मुरुम पुरवठा केलेबाबत. |
| 136 | झोन क्र.1 मधील रस्त्यासाठी मुरुम पुरवठा केलेबाबत. |
| 137 | झोन क्रमांक 2 कडील प्रभाग समिती बैठकीच्या नोंदवहीतील अनियमितता |
| 138 | मालकत्ता कराची धनादेशाव्दारे / जमा रकमांची पक्की पावती उशिराने केली जात असल्याबाबत. |
| 139 | कर संकलन विभाग व संगणक विभाग यांचे कडील मालमत्ता करांचे जमा रकमा यामध्ये असलेल्या तफावतीबाबत |
| 140 | करमणूक कराची रक्कम वेळीच वसूल केली नाही |
| 141 | विवाह नोंदणी फी रक्कम वसुलीबाबत |
| 142 | अतिक्रमण विभागाकडील नोंदवहयातील अनियमितता |

| | |
|---|---|
| 143 | जन्म-मृत्यू विभागाचे जमा रक्कमांचे लेखापरीक्षणाबाबत |
| 144 | आग प्रतिबंधक व जीवसुरक्षा यंत्रणा सुस्थितीत कार्यान्वित असल्याचे प्रमाणपत्र प्राप्त करुन न घेतल्याबाबत. |

"उपरोक्त नमूद केलेल्या आक्षेपांचे संदर्भात त्या त्या वर्षाचे पुढील अभिप्रायामध्ये नमूद करण्यात आलेले परिच्छेद क्रमांक अंतिम समजण्यात यावेत."

पुनर्विलोकन अहवालामध्ये समाविष्ट परिच्छेदांचा तपशिल

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लेख्यावरील पुनर्विलोकन अहवालामध्ये समाविष्ट परिच्छेदांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | ले.प. वर्ष | परिच्छेद क्रमांक | एकूण |
|---|---|---|---|
| 1 | 2011-12 | 13,19,31,46,70,77,82,88,96,103,106,107,112,121, 122,133,151,10,43,6 | 20 |
| 2 | 2012-13 | 21,22,24,38,42,59,66,72,82,102,117,122,92,97,103, 2. | 16 |

# Part II

# भाग एक

## गंभीर अनियमितता

## कलम ९ अ,ब,क खालील आक्षेप

# कलम ९ अ खालील आक्षेप

लेखापरीक्षकाच्या दृष्टीने जे प्रदान कायद्याविरुद्ध आहे असे प्रत्येक प्रदान

## *1 सोलापूर महानगरपालिकेच्या 2013-14 या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पातील अनियमततेबाबत..*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 10**

*लेखा शीर्ष : अंदाजपत्रक मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9अ*

***खर्चाचे अंदाज वाढविण्यासाठी जमा बाजू अवास्तवरित्या वाढविलेली आहे, असे दिसून येते. अर्थसंकल्प हा वास्तववादी असणे आवश्यक आहे. अवास्तविक अंदाजपत्रकीय जमेच्या आधारावर विकास कामांना मंजुरी दिल्यामुळे मनपाच्या दायित्वामध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ होत आहे. 2013-14 अखेर स्पील ओव्हर कामांचे एकूण दायित्व रक्कम रु.328.95 कोटी एवढे असल्याचे दिसून येते. एकूण स्पील ओव्हरची रक्कम 2012-13 व 2013-14 च्या प्रत्यक्ष जमा रक्कमेपेक्षा जास्त आहे. 2012-13 मधील स्पील ओव्हर कामासाठी 2013-14 चे अंदाजपत्रकात तरतूद केल्याचे दिसत नाही. 2013-2014 च्या अंदाजपत्रकात मागासवर्गीय कल्याणकारी योजनांसाठी तरतूद दर्शविलेली नाही. अंदाजपत्रकात अपंग कल्याणासाठी रक्कम रु.13.80 कोटी एवढी तरतूद करणे आवश्यक असताना रक्कम रु.1.00 कोटी एवढी तरतूद दर्शविलेली आहे. 2016-17 च्या अंदाजपत्रकातील नक्की आकड्यानुसार रक्कम फक्त रु.4.18 लाख प्रत्यक्ष खर्च वित्तीय वर्ष 2014-15 मध्ये केला आहे. वर्षाअखेरीस प्रत्यक्ष जमा ही अंदाजाच्या 53.66% इतकीच तर प्रत्यक्ष खर्च हा अंदाजाच्या 53.66% इतका करण्यात झाला आहे.***

सोलापूर महानगरपालिकेच्या 2013-2014 या वर्षाच्या अर्थसंकल्पात आढळून आलेल्या उणीवांबाबत अर्धसमास क्रमांक 43 दि.27/09/2017 अन्वये खुलासा मागविला असता लेखा विभागाने कोणतेही अनुपालन सादर केले नसल्याने लेखापरीक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय कायम करण्यात येत आहे.

सोलापूर महानगरपालिकेच्या 2013-2014 या वर्षाच्या मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम कलम 95, 96, 100 अन्वये अनुक्रमे मा. आयुक्त, मा.स्थायी समिती, मा. महासभा यांनी मान्य केलेल्या अर्थसंकल्पीय रक्कमा खालीलप्रमाणे आहेत.

(आकडे - रुपये कोटी मध्ये )

| | आयुक्त | स्थायी समिती | महासभा |
|---|---|---|---|
| जमा | 354.89 | 382.39 | 459.99 |

| | | | |
|---|---|---|---|
| खर्च | 354.89 | 382.39 | 459.99 |

1) महाराष्ट्र अर्थसंकल्पीय नियम पुस्तिका प्रकरण 3 मधील परिच्छेद 30 (बी) नुसार मागिल 03 वर्षाचे प्रत्यक्ष जमा खर्च विचारात घेऊन अर्थसंकल्पीय अंदाज करणे आवश्यक आहे. मागील वर्षांच्या जमा रकमा खालीलप्रमाणे आहेत.

| आर्थिक वर्ष | प्रत्यक्ष जमा (रु.कोटी) | वाढीची टक्केवारी |
|---|---|---|
| 2008-09 | 144.45 | ---- |
| 2009-10 | 162.52 | 12.50 |
| 2010-11 | 200.38 | 23.29 |
| 2011-12 | 157.54 | (-) 21.37 |
| 2012-13 | 218.73 | 38.84 |
| 2013-14 | 299.35 | 36.86 |

वरील तक्ता विचारात घेता, मागील तीन वर्षाची जमेची सरासरी वाढ फक्त 13.58 % आहे. व 2012-2013 च्या प्रत्यक्ष जमेशी तुलना करता, 203-2014 चे जमा-खर्चाचे अंदाजपत्रक 110.30% ने जास्त आहे. यावरून खर्चाचे अंदाज वाढविण्यासाठी जमा बाजू अवास्तवरित्या वाढविलेली आहे, असे दिसून येते. अर्थसंकल्प हा वास्तववादी असणे आवश्यक आहे. अवास्तविक अंदाजपत्रकीय जमेच्या आधारावर विकास कामांना मंजुरी दिल्यामुळे मनपाच्या दायित्वामध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ होत आहे. 2013-14 अखेर स्पील ओव्हर कामांचे एकूण दायित्व रक्कम रु.328.95 कोटी एवढे असल्याचे दिसून येते. एकूण स्पील ओव्हरची रक्कम 2012-13 व 2013-14 च्या प्रत्यक्ष जमा रक्कमेपेक्षा जास्त आहे. 2012-13 मधील स्पील ओव्हर कामासाठी 2013-14 चे अंदाजपत्रकात तरतूद केल्याचे दिसत नाही. अल्प प्रमाणात तरतूद व खर्च केल्याने विकास कामे वर्षानुवर्षे प्रलंबित राहून ठेकेदारास देय होणाऱ्या रकमांमध्ये वाढ होत आहे. तसेच भाववाढीमुळे कामावरील खर्च वाढत जावून महापालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे. जुन्या कामांचे दायित्व जास्त असताना नवीन कामे मोठ्या प्रमाणात हाती घेतली जातात.

2. नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.जीईएन-1793/1198/नवी-14, दि.17/07/1993 व शासन निर्णय क्र.जीईएन-1093/325, दि.17/04/1993 अन्वये महिला व बाल विकास कल्याण यासाठी 5% तरतूद करणे आवश्यक आहे. सोलापूर मनपाच्या मुख्य सभेने मान्य केलेल्या 2013-2014 च्या अंदाजपत्रकात बांधील खर्च नमूद केला नाही. त्यामुळे महिला व बाल विकास कल्याण योजनांसाठी बांधील खर्च वजा जाता आवश्यक 5% तरतूद किती येते, याची परिगणना करता आली नाही.सोलापूर मनपाच्या मुख्य सभेने मान्य केलेल्या 2013-2014 च्या अंदाजपत्रकात महिला बालकल्याणकारी योजनांसाठी तरतूद केली नाही.

3. नगरविकास विभाग शासन निर्णय दिनांक 03 जुलै-1982 नुसार मागासवर्गीय कल्याणकारी योजनांवर 5% तरतूद करणे आवश्यक आहे. 2013-2014 च्या अंदाजपत्रकात मागासवर्गीय कल्याणकारी योजनांसाठी तरतूद दर्शविलेली नाही. 2013-2014 च्या अंदाजपत्रकात आंबेडकर आवास योजनेसाठी रक्कम रु.2.00 कोटी एवढी तरतूद दर्शविलेली आहे. 2016-17 च्या अंदाजपत्रकातील नक्की आकड्यानुसार प्रत्यक्ष खर्च वित्तीय वर्ष 2014-15 निरंक आहे.

4. नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमांक जीईएन-1655/प्र.क्र.46 /नवी-33, दि.14/02/2002

अन्वये अपंग कल्याणासाठी 3% तरतूद करणे आवश्यक आहे. त्यानुसार 2013-2014 च्या अंदाजपत्रकात अपंग कल्याणासाठी रक्कम रु.13.80 कोटी एवढी तरतूद करणे आवश्यक असताना रक्कम रु.1.00 कोटी एवढी तरतूद दर्शविलेली आहे. 2016-17 च्या अंदाजपत्रकातील नक्की आकड्यानुसार रक्कम फक्त रु.4.18 लाख प्रत्यक्ष खर्च वित्तीय वर्ष 2014-15 मध्ये केला आहे.

5. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन परिपत्रक क्र.जीईएन-1098/प्र.क्र.-21/98/नवी-24 मंत्रालय मुंबई दिनांक 9 मार्च 1998 अन्वये महानगरपालिकांनी व नगरपालिकांनी खेळ व संघ दत्तक घेणे आणि क्रीडा यावर दरवर्षी किमान 5% खर्च करणे आवश्यक आहे. सोलापूर मनपाच्या मुख्य सभेने मान्य केलेल्या 2013-2014 च्या अंदाजपत्रकात 5% प्रमाणे रक्कम रु.23.00 कोटीची क्रीडा विभागासाठी तरतूद करणे आवश्यक होते. तथापि, 2013-2014 च्या अंदाजपत्रकात क्रीडा विभागासाठी केवळ रु.62.75 लाख एवढी तरतूद दर्शविलेली आहे. 2016-17 च्या अंदाजपत्रकातील नक्की आकड्यानुसार रक्कम फक्त रु.13.05 लाख प्रत्यक्ष खर्च वित्तीय वर्ष 2014-15 मध्ये झाला आहे.

6. महाराष्ट्र नागरी क्षेत्र झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम 1975 प्रकरण 6, कलम 15 अन्वये एकूण जमा रकमेच्या अर्धा टक्का म्हणजे रु.2.30 कोटी रकमेची वृक्ष प्राधिकरण खाती तरतूद करणे आवश्यक आहे. तथापि सोलापूर मनपाच्या मुख्य सभेने मान्य केलेल्या 2013-2014 च्या अंदाजपत्रकात रु.2.28 कोटी तरतूद आवश्यक असताना त्यासाठी तरतूद केली नाही.

7. मालमत्ता करासाठी सुमारे 50,000 प्रॉपार्टीजचा शोध या सदराखाली 2013-2014 आर्थिक वर्षामध्ये रु.10.00 कोटी जमा अपेक्षित धरली असताना त्या सदरी रक्कम जमा करणेसाठी कोणतीही कार्यवाही केली नाही.

8. अंदाजपत्रकाच्या तपासणी अंती असे दिसून येते कि, अंदाजपत्रक तयार करताना प्रथम खर्चाच्या बाबींचा विचार करून त्यानुसार जमेच्या रक्कमा अवास्तवरीत्या वाढविण्यात आल्या आहेत. वर्षाअखेरीस प्रत्यक्ष जमा ही अंदाजाच्या 53.66% इतकीच तर प्रत्यक्ष खर्च हा अंदाजाच्या 53.66% इतका करण्यात झाला आहे.

9. नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियम 26(2) प्रमाणे अंदाजपत्रकीय वर्षारंभापुर्वी जी विद्‌यमान देणी अदा करता येणे अशक्य आहे, अशांची खात्री करून घेवुन त्यांची तरतूद त्या वर्षाच्या अंदाजपत्रकामध्ये करणे आवश्यक असताना स्पील ओवर कामांसाठी अंदाजपत्रकामध्ये तरतूद केली नसलेने मागील वर्षातील जी कामे चालू वर्षात प्रगतीपथावर आहेत, त्या कामाची देय रक्कम कोणत्या अर्थसंकल्पीय लेखाशीर्षावर खर्च टाकली आहे, हे समजून येत नाही.

10. 2016-17 च्या अर्थसंकल्पामधील नक्की आकड्यानुसार वित्तीय वर्ष 2013-14 मधील महसुली जमा रक्कम रु.299.38 कोटी असून त्यामधून अस्थापनावरील केलेला खर्च रु.178.29 कोटी आहे. सदरच्या खर्चाचे प्रमाण हे जमेच्या 59.55% असून अस्थापानावरील खर्चात दरवर्षी वाढ होत असून महसुली जमा वाढवणे आवश्यक आहे.

महानगरपालिकेच्या आर्थिक स्थितीबाबत अभिप्राय

सोलापूर महानगरपालिकेच्या वित्तीय वर्ष 2013-14 लेखापरीक्षणामध्ये अर्धसमास पत्र क्र.57 दि.08/11/17 अन्वये विहित नमुन्यात महानगरपालिकेचे दि.31.03.2014 अखेरचे मत्ता व दायित्व विवरणपत्राची मागणी करण्यात आली होती. परंतु, सदरची माहिती लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही. त्यामुळे महानगरपालिकेचे दि.31.03.2014 अखेरचे मत्ता व दायित्वची पडताळणी करून

आर्थिक स्थितीची पाहणी करता आली नाही. तथापि वित्तीय वर्ष 2013-14 मधीलप्रत्यक्ष जमा, गुंतवणुका, कर्जे, अग्रीमे व इतर लेख्यांवरून महानगरपालिकेच्या आर्थिक स्थितीबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) सोलापूर महानगरपालिकेस येणे असलेली अग्रिम रक्कम रु 60.64 कोटी इतकी असून सदर अग्रिम रक्कमा ह्या 2003-04 पासून प्रलंबित असून सदरची रक्कम मनपा निधीमध्ये समायोजित करणे आवश्यक आहे. 2012-13 मध्ये प्रलंबित अग्रिम रक्कम रु.50.00 कोटी होती, सदरच्या रक्कमेमध्ये दरवर्षी वाढ होत आहे.

2) मार्च 14 अखेर मिळकत कराची थकबाकी रक्कम रु.150.85 कोटी इतकी आहे. मार्च 13 अखेर मिळकत कराची थकबाकी रक्कम रु.89.27 कोटी होती, सदरच्या रक्कमेमध्ये दरवर्षी वाढ होत आहे.

3) मार्च 14 अखेर पाणीपट्टीची थकबाकी रक्कम रु.51.25 कोटी इतकी आहे. मार्च 13 अखेर पाणीपट्टीची थकबाकी रक्कम रु.48.04 कोटी होती, सदरच्या रक्कमेमध्ये दरवर्षी वाढ होत आहे.

4) सोलापूर महानगरपालिकेवर मार्च 14 अखेर रक्कम रु.29.52 कोटी इतके कर्ज शिल्लक आहे. कर्जाची वेळेत परतफेड होत नाही.

5) 2013-14 अखेर स्पील ओव्हर कामांचे एकूण दायित्व रक्कम रु.328.95 कोटी एवढे आहे. एकूण स्पील ओव्हरची रक्कम 2013-14 च्या प्रत्यक्ष जमा रक्कमेपेक्षा जास्त आहे.

6) मनपाची आर्थिक स्थिती बिकट असल्यामुळे 2013-14 मधील निवृत्तीवेतनाची रक्कम विलंबाने अदा केली जात आहे.

7) मनपाचे अंशदायीनिवृत्तीवेतन योजनेतील मनपा हिश्याची रक्कम जमा केली नाही, त्यामुळे सदर रकमेची व त्यावरील व्याजाची तुट भविष्यात भरून काढण्यासाठी तरतुद केली नाही.

उपरोक्त बाबी विचारात घेता महानगरपालिकेचे आर्थिक स्थिती अत्यंत असमाधानकारक आहे.

**महानगरपालिकेने आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी खालील उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे.**

1) अनुत्पादक व भांडवली खर्चामध्ये काटकसर करणे.

2) प्रशासकिय खर्च कमी करणे. आस्थापना खर्चामध्ये काटकसर करणे.

3) मिळकत कराची व पाणीपट्टीची थकबाकी वसुल करणे.

4) महानगरपालिका आकारु शकते असे सर्व कर आकारणी करुन वसुल करणे. त्यासाठी करदात्या नागरींकाचा असंतोष होवु नये म्हणून दिल्या जाणा-या सर्व सुविधांचा दर्जा अत्यंत समाधानकारक होईल, याद्दष्टीने प्रशासनात कार्यक्षमता व व्यावसायिकता निर्माण करणे.

5) पाणी पुरवठा योजनेमध्ये पाण्याचा अपव्यय टाळावा. पाणी गळती, चोरी होणार नाही याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. पाणी पुरवठा योजना आर्थिक दृष्टया स्वंयपूर्ण होण्यासाठी उपाययोजना कराव्यात.

6) वाहनाचा वापर काटकसरीने करावा. अतितातडीच्या प्रसंगी विमान प्रवासाचा अवलंब करावा.

7) मनपाच्या मालमत्तेपासून मिळणा-या उत्पन्नाकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

8) निरुपयोगी साहित्य, जसे वाहनांचे सुटे भाग, फर्निचर, वर्तमानपत्र रद्दी, जुनी यंत्रसामुग्री व अवजारे, जुनी वाहने इ.ची किमान किंमत ठरवून जाहिर लिलावाव्दारे विक्री करणे.

9) अंदाजपत्रकातील तरतूदी व कायदेशीर तरतूदींचे पालन करावे.

## *2 सोलापूर महानगरपालिकेच्या 2013-14 या आर्थिक वर्षाचे वार्षिक लेख्याबाबत....*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 07**

*लेखा शीर्ष : वार्षिक लेखे मनपा व शासन निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***राष्ट्रीय लेखा नियमपुस्तीकेनुसार विहित नमुन्यात ठेवलेल्या रोखवह्या लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आल्या नाहीत. सोलापूर महानगरपालिकेचे 2011-12, 2012-13, 2013-14 व 2014-15 या वर्षाचे वार्षिक लेखे स्थायी समितीस केव्हा सादर केले, याची विहित नमुन्यात माहिती सादर केली नाही. वार्षिक लेखे तपासणीसाठी रोखवह्या, journal accounts, ledger accounts, notes of accounts, stock registers, मालमत्ता नोंदवही, गुंतवणूक नोंदवही, building registers, road registers, advance registers, details of work in progress of capital accounts, sub schedules, current and fixed assets statements, करांच्या थकबाकीची माहिती व विवरणपत्रे उदा. details of tax receivable, बँक खाती व त्यातील शिल्लक bank balances, cashbook balances, cash in hand, details provision for overdues and bad debt व इतर अनुषंगिक अभिलेखे लेखापरिक्षणासाठी उपलब्ध केले नाहीत. सोलापूर महापालिकेने वित्तीय वर्ष 2013-14 साठी DOUBLE ENTRY SYSTEM मध्ये journal acountcs, ledger acountcs ठेवलेले नाहीत. तथापि एकेरी नोंद पद्धतीतील माहिती संकलित करून BALANCE SHEET तयार केली आहे. त्यामुळे द्विनोंद पद्धतीने लेखे ठेवण्याची प्रत्यक्ष कार्यवाही झाली नाही. सोलापूर मनपाच्या वित्तीय वर्ष 2013-14 चा जमा-खर्चाचा वर्गीकृत गोषवारा Classified Abstract तपासणीसाठी उपलब्ध करण्यात आलेला नाही. नोंदवहीमध्ये लेखाशिर्षानिहाय खर्चाची एकत्रित बेरीज मारली नाही. त्यामुळे खर्चाचा एकत्रित गोषवारा कळून येत नाही. खतावणीमधील नोंदी मुख्य लेखापाल यांच्या स्वाक्षरीने प्रमाणित केलेल्या नाहीत, त्यामुळे नोंदींची योग्यतेबाबत खात्री होत नाही. सोलापूर महापालिकेची एकूण किती बँक खाती व त्यांच्या रोखवह्या आहेत त्यांची बँकनिहाय व योजनानिहाय स्वक्षांकित यादी लेखापरीक्षणास उपलब्ध केली नाही. OTHER INVESTMENT चे Sub Schedules जोडलेले नाही. करांच्या थकबाकीची माहिती म्हणजे details of tax receivable व Capital Work In Progress हे BALANCE SHEET तयार करताना विचारात घेतले नाहीत.***

लेखा विभागाकडे वित्तीय वर्ष 2013-14 चे वार्षिक लेख्यांची तपासणी करण्यासाठी खालिलप्रमाणे अभिलेखे उपलब्ध करणेस्तव अर्धसमास पत्र क्र.57 दि.08/11/2017 अन्वये मागणी करूनही अभिलेखे उपलब्ध झाली नव्हते, तथापि मा. आयुक्त यांच्याशी दि.15/05/2018 रोजी

झालेल्या अहवालाच्या अंतिमीकरणाची बैठकीत आयुक्तांनी विभाग प्रमुखांना दिलेल्या सूचनेनुसार वार्षिक लेखेचे काही अभिलेख विभागाचे पत्र क्र. निरंक दि.18/05/2018 अन्वये उपलब्ध केले. त्यांची तपासणी करून आढळून आलेल्या अनियमितताबाबत अर्धसमास पत्र क्र.145 दि.12/06/2018 अन्वये खुलासा मागितला असता विभागाने अनुपालन सादर केले नाही, त्यामुळे सोलापूर महानगरपालिकेच्या वार्षिक लेख्यांची संबंधित खालील आक्षेप कायम करण्यात येत आहेत.

1) राष्ट्रीय लेखा नियमपुस्तीकेनुसार विहित नमुन्यात ठेवलेल्या रोखवह्या लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आल्या नाहीत.

2) मुंबई प्रांतिक अधिनियम 1949 कलम 106(3) अन्वये प्रत्येक आर्थिक वर्ष झालेनंतर शक्य तितक्या लवकर महानगरपालिका लेखापरीक्षकाने महानगरपालिकेच्या मागील आर्थिक वर्षाच्या संपूर्ण लेख्यावरील आपला अहवाल स्थायी समितीसमोर सदर करून वार्षिक लेखे मंजूर करून घेणे आवश्यक आहे. त्यानुसार सोलापूर महानगरपालिकेचे 2011-12, 2012-13, 2013-14 व 2014-15 या वर्षाचे वार्षिक लेखे स्थायी समितीस केव्हा सादर केले, याची खालील नमुन्यात माहिती सादर केली नाही.

| अ.क्र. | वित्तीय वर्ष | प्रशासनाने वार्षिक लेखे स्थायी समितीकडे सादर केलेल्याचा दिनांक | स्थायी समितीने मंजूरी दिल्याचा ठराव क्र. व दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|
| | | | | |

तसेच 2013-14 या वर्षाचे वार्षिक लेखे तपासणीसाठी रोखवह्या, journal a/cs, ledger a/cs, notes of accounts, stock registers, मालमत्ता नोंदवही, गुंतवणूक नोंदवही, building registers, road registers, advance registers, details of work in progress of capital a/cs, sub schedules, current & fixed assets statements, करांच्या थकबाकीची माहिती/विवरणपत्रे (details of tax receivable), बँक खाती व त्यातील शिल्लक (bank balances), cashbook balances, cash in hand, details provision for overdues & bad debt व इतर अनुषंगिक अभिलेखे लेखापरिक्षणासाठी उपलब्ध केले नाहीत.

3) सोलापूर महापालिकेने वित्तीय वर्ष 2013-14 साठी DOUBLE ENTRY SYSTEM मध्ये journal a/cs, ledger a/cs ठेवलेले नाहीत. तथापि एकेरी नोंद पद्धतीतील माहिती संकलित करून BALANCE SHEET तयार केली आहे. त्यामुळे द्विनोंद पद्धतीने लेखे ठेवण्याची प्रत्यक्ष कार्यवाही झाली नाही. सादर केलेल्या BALANCE SHEET मध्ये FIXED ASSETS मध्ये विविध शासकीय योजनांची कामासाठी खर्ची पडलेली रक्कम दर्शवली आहे, तथापि सदर योजनांच्या निधीमधून निर्माण झालेली विविध मालमत्ता (ASSETS) उदा. मैदाने, मोकळी जागा, इमारती रस्ते, उद्याने स्मारके इ. चे मूल्य निर्धारित करून त्यांचा समावेश FIXED ASSETS मध्ये करणे आवश्यक होते. तसेच जुन्या इमारतींचे घसारा काढून येणारी चालू किमत (CURRENT VALUE) चा समावेश करणे आवश्यक होते, परंतु त्याप्रमाणे कार्यवाही झाली नाही. त्यामुळे महापालिकेची निश्चित आर्थिक स्थिती स्पष्ट होत नाही.

4) सोलापूर मनपाच्या वित्तीय वर्ष 2013-14 चा जमा-खर्चाचा वर्गीकृत गोषवारा (Classified Abstract) तपासणीसाठी उपलब्ध करण्यात आलेला नाही.

5) वित्तीय वर्ष 2013-14 च्या उपलब्ध करून दिलेल्या खर्च खतावणी (नमुना नं.13) नोंदवहीमध्ये अनेक नोंदी अपूर्ण आहेत. तसेच अनेक नोंदी कच्च्या स्वरुपात शिसपेन्सिलने नोंदविल्या आहेत.

नोंदवहीमध्ये लेखाशिर्षानिहाय खर्चाची एकत्रित बेरीज मारली नाही. त्यामुळे खर्चाचा एकत्रित गोषवारा कळून येत नाही. खतावणीमधील नोंदी मुख्य लेखापाल यांच्या स्वाक्षरीने प्रमाणित केलेल्या नाहीत, त्यामुळे नोंदींची योग्यतेबाबत खात्री होत नाही. जमा खतावणी (नमुना नं.13) नोंदवहीमध्ये अनेक नोंदी कंसात नोंदविल्या आहेत. त्या नोंदी हिशोबात/बेरजेत धरलेल्या दिसत नाहीत. खातावणीमधील नोंदी मुख्य लेखापाल यांच्या स्वाक्षरीने प्रमाणित केलेल्या नाहीत, त्यामुळे नोंदींची योग्यतेबाबत खात्री होत नाही.

6) सोलापूर महापालिकेची एकूण किती बँक खाती व त्यांच्या रोखवह्या आहेत त्यांची बँकनिहाय व योजनानिहाय स्वक्षांकित यादी लेखापरीक्षणास उपलब्ध करण्यात यावी.

7) OTHER INVESTMENT चे Sub-Schedules जोडलेले नाही. करांच्या थकबाकीची माहिती (details of tax receivable) व Capital Work In Progress हे BALANCE SHEET तयार करताना विचारात घेतले नाहीत.

DGPAGPM8503 (Ref No : 2, Hmm No : 145)

## *3 कामगार कल्याण उपकराची वसूल न करण्यात आलेली रक्कम शासनाकडे जमा करण्यात येण्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 1**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी निधी*
*अनियमितता कलम : 9अ*

***इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार विनियमन व सेवाशर्ती) अधिनियम 1996 व त्या अंतर्गत इमारत व इतर बांधकाम कामगार उपकर अधिनियम 1996 नुसार बांधकाम मूल्यावर 1% उपकर वसूल करण्याबाबत तरतूद आहे. सदर तरतुदी नुसार बांधकाम मूल्याच्या 1 टक्का उपकराची रक्कम दि.1/07/2010 पासून न चुकता वसूल करून शासन जमा करणे आवश्यक आहे. माहे सप्टेंबर 2013 पासून उपकराची रक्कम वसूल केलेली आहे. तथापि जुलै-2010 ते ऑगस्ट,2013 पर्यंतच्या कालावधीची कामगार कल्याण उपकराची रक्कम शासन जमा करण्यात आलेली नाही. सप्टेंबर 2013 पासून वसूल करुन जमा करण्यात आलेल्या रक्कमाचे चलने / प्रमाणके संबधीत विभागाकडून प्राप्त झालेली नाही.***

उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग , महाराष्ट्र शासन , यांचे कडील शासन निर्णय क्रमांक बिसीए 2009/प्र.क्र.108/कामगार, 7-अ दिनांक 17 जून 2010 नुसार इमारत व इतर बांधकाम कामगार

(रोजगार विनियमन व सेवाशर्ती ) अधिनियम 1996 व त्या अंतर्गत इमारत व इतर बांधकाम कामगार उपकर अधिनियम 1996 नुसार बांधकाम मूल्यावर 1% उपकर वसूल करण्याबाबत तरतूद आहे. सदर उपकर अधिनियमाच्या कलम 3 आणि केंद्र शासनाच्या इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर नियम 1998 च्या नियम 3 नुसार निर्गमित केलेल्या दि.26.9.1996 च्या अधिसूचनेनुसार ज्यांचे काम घेण्यासाठीचे करार 1 जुलै 2010 व तद्नंतर करण्यात येईल अशा बांधकाम मूल्याच्या 1 टक्का उपकराची रक्कम दि.1/07/2010 पासून न चुकता वसूल करून शासन जमा करणे बाबत तरतूद आहे.

उपकर उशिरा भरल्यास कलम 8 नुसार कोणताही मालक विहित केलेल्या वेळेत उपकर निर्धारणाच्या आदेशानुसार उपकराची रक्कम न भरल्यास उपकराच्या रक्कमेवर प्रतीमहा किंवा ज्या तारखेपासून उपकर भरण्यास पात्र आहेत , त्या तारखेपासून 2% व्याज भरण्यास पात्र राहील. अशी तरतूद असतांना सोलापूर महानगरपालिकेने माहे सप्टेंबर 2013 पासून उपकर वसूल केला असून तो शासन जमा केला असल्याचे दिसून येते. परंतु सप्टेंबर 2013 पासून वसूल करुन जमा करण्यात आलेल्या रक्कमाचे चलने / प्रमाणके संबधीत विभागाकडून प्राप्त झालेली नाही. त्यामूळे चलनाद्वारे प्रत्यक्ष शासनाकडे उपकराचा भरणा केव्हा केला याची खात्री होत नाही.

उपरोक्त दि.17/06/2010 च्या शासन निर्णयानुसार कामगार उपकर वसूल करण्याची कार्यवाही 1/07/2010 पासून करणे आवश्यक असतांना माहे सप्टेंबर 2013 पासून उपकराची रक्कम वसूल केलेली असल्याने दि.1.07.2010 ते ऑगस्ट 2013 पर्यंतची येणे असलेली कामगार कल्याण उपकराची रक्कम परीगणित करून व्याजासह शासन जमा करण्याबाबत अर्धसमास क्र.44 दिनांक 27/09/2017 अन्वये विचारणा करण्यात आलेली असता विभागाने दि.17/11/2017 च्या पत्रान्वये खुलासा सादर केलेला असून दि.1.07.2010 ते ऑगस्ट,2013 पर्यंतची एकूण किती रक्कम शासनाकडे जमा करण्यात आलेली आहे याबाबतचे विवरणपत्र व अभिलेख विभागाने सादर केलेली नसल्याने विभागाने सादर केलेला खुलासा अमान्य करण्यात येत आहे.

FDSDKPM7201 (Ref No : 42, Hmm No : 44)

## *4 अग्रीम नोंदवहीतील उणिवाबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 09**

*लेखा शीर्ष : अग्रीमे मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***अग्रीम नोंदवहीमध्ये खात्यास पुर्वी दिलेल्या अग्रीमाच्या नोंदी खातेनिहाय नोंदविल्या जात नाहीत. नोंदवहीमध्ये फक्त त्या आर्थिक वर्षामध्ये दिलेल्या अग्रीमाच्याच नोंदी केल्या जातात. खात्याने चालु वर्षात किती रकमेचे कोणत्या वर्षाचे समायोजन केले आहेत याची गोषवारा काढला जात नाही. आर्थिक वर्ष समाप्तीनंतर खात्यास अदा अग्रीम रक्कम, समायोजित रक्कम व प्रलंबित अग्रीम रक्कम याचा गोषवारा नोंदवहीमध्ये नोंदविला जात नाही. मनपाचे वेगवेगळ्या खात्यास दिलेले अग्रीमे रक्कम रु.60,64,21,663/- इतके 2003-04 पासून प्रलंबित आहेत. सन 2003-04 पुर्वी प्रलंबित अग्रीमे नसल्याबाबत खात्याने प्रमाणीत केलेले नाही. अग्रीम नोंदवहीमध्ये नोंदविण्यात आलेली रक्कम व वर्गीकरण नोंदविण्यात आलेली रक्कम यामध्ये रक्कम रु.7,46,61,204/- इतकी तफावत आहे. अग्रीम नोंदवहीमध्ये नोंदविण्यात आलेल्या अग्रीमे ही कोणत्या प्रमाणकान्वये प्रदान केली आहेत त्याचा प्रमाणक क्रमांक व दिनाक नमूद करणेत येत नाही. मुंबई वित्तीय नियमावली 1959 मधील नियम क्र.142 नुसार अग्रीम मंजुर करताना पुर्वीची अग्रीमे समायोजित केल्याशिवाय पुढील अग्रीम देण्यात येऊ नये असे असताना खात्याने पुर्वीचे खात्याकडे अग्रीमे प्रलंबित असताना पुन्हा अग्रीमे देण्यात आली आहेत. मनपाचे अधिकरी व कर्मचारी यांना घर बांधणीसाठी अग्रिम रक्कम रु.17,10,500/- इतका देण्यात आल्याचे दिसुन येत असुन इतरही प्रयोजनासाठी अग्रिम देण्यात आला असल्यास अशा सर्व वैयक्तिक कर्मच्या-याच्या नावे दिलेल्या अग्रिम रक्कमांची व प्रलंबित अग्रीमांची माहीती व अभिलेख मागणी करुनही लेखापरीक्षणास सादर केली नाही.***

सोलापुर मनपा अंतर्गत असणारे लेखा विभागामर्फत अग्रीम नोंदवही ठेवण्यात येत आहे. 2013-14 या अर्थिक वर्षात नोंदवहीमध्ये नोंदविण्यात आलेल्या नोंदीची तपासणी केली असता आढळुन आलेल्या त्रुटीबाबत अर्धसमास पत्र क्र.58 दि.10/11/2017 अन्वये विचारणा केली होती. खात्याने त्यांचेकडील पत्र क्र.मुले6/लेखा परिक्षण/57/2017 दि.26/12/2017 अन्वये अनुपालन सादर केले आहे. खात्याने सादर केलेल्या अनुपालनाचा विचार करता लेखापरीक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1)अग्रीम नोंदवहीमध्ये खात्यास दिलेल्या अग्रीमाच्या नोंदी खातेनिहाय नोंदविल्या जातात. नोंदवहीमध्ये फक्त त्या आर्थिक वर्षामध्ये दिलेल्या अग्रीमाच्याच नोंदी केल्या जातात. परंतु त्या खात्यास यापुर्वी देण्यात आलेल्या अग्रीमापैकी किती अग्रीमे प्रलंबित आहेत याच्या नोंदी केल्या जात नाहीत. त्यामुळे खात्याकडे किती अग्रीमे प्रलंबित आहेत याची तपासणी करता येत नाही.

पुर्वीचे प्रलंबित अग्रीमाची नोंद पुढील वर्षाच्या अग्रीम नोंदवहीत प्रलंबित दाखविण्यात येते असे खात्याने अनुपालन सादर केले आहे.

अनुपालनासोबत अभिलेखे सादर केले नसल्याने अनुपालन मान्य करता येत नाही.

2) अग्रीम नोंदवहया हया प्रत्येक वर्षासाठी स्वतंत्र नोंदवही ठेवण्यात येत आहे. खात्याने सादर केलेले समायोजित प्रमाणाकाची नोंद ही ज्या वर्षात अग्रीम घेण्यात आले आहे त्या वर्षाच्या नोंदवहीमध्ये नोंदविले जाते. त्यामुळे खात्याने चालु वर्षात किती रक्कमेचे समायोजन केले आहे याची खात्री करता येत नाही.

आक्षेपात नमूद केलेनुसार कार्यवाही करणेत येत असल्याचे कळविल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

3) आर्थिक वर्ष समाप्तीनंतर खात्यास अदा अग्रीम रक्कम, समायोजित रक्कम व प्रलंबित अग्रीम रक्कम याचा गोषवारा नोंदवहीमध्ये नोंदविला जात नाही.

आक्षेपात नमूद केलेनुसार दक्षता घेण्यात असल्याचे खात्याने कळविल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

4) खात्याने प्रलंबित अग्रीमाची सादर केलेल्या माहीतीची तपासणी केली असता लेखापरीक्षण कालावधीपर्यंत मनपाचे वेगवेगळ्या खात्याकडे रक्कम रु.60,64,21,663/- इतके प्रलंबित आहेत. सदरची रक्कम ही 2003-04 या अर्थिक वर्षापासून प्रलंबित आहे. प्रलंबित अग्रीमे हे प्रदिर्घ कालावधीसाठी समायोजित केले नसल्याने त्याचा गैरवापर होण्याची शक्यता नाकरता येत नाही. तरि प्रलंबित अग्रीमे समायोजित करणेबाबत खात्याकडे पाठपुरवा करण्यात येवून अग्रीम समायोजित करण्यात यावे.

प्रलंबित अग्रीमे समायोजन करण्याकरीता पाठपुरवा करण्यात येत असल्याचे खात्याने कळविल्याने आक्षेप कायम करण्यात येत आहे.

5) सन 2003-04 पुर्वी प्रलंबित अग्रीमे नसल्याबाबत खात्याने खुलासा केलेला नाही. त्याबाबत मनपाच्या अभिलेखावरुन 2003-04 पुर्वी प्रलंबित अग्रीमे नसल्याबाबत प्रमाणित करण्यात यावे.

प्रलंबित अग्रीमाबाबत अभिलेख्याची पडताळणी करण्यात येत असल्याचे खात्याने कळविल्याने आक्षेप कायम करण्यात येत आहे.

6) अग्रीम नोंदवहीमध्ये माहे मार्च 2014 मध्ये रक्कम रु.10,25,79,489/- इतके खातेप्रमुखाना दिल्याच्या नोंदी करण्यात आल्या आहेत व वर्गवारी नोंदवहीमध्ये अग्रीम या लेखाशिर्षाखाली रक्कम रु.2,79,18,285/- इतकी नमूद करण्यात आली आहे. अग्रीम नोंदवहीमध्ये नोंदविण्यात आलेली रक्कम व वर्गीकरण नोंदविण्यात आलेली रक्कम यामध्ये रक्कम रु.7,46,61,204/- इतकी तफावत आहे. तफावतीबाबत ताळमेळ घेऊन सविस्तर तपशील सादर करावा. अशा प्रकारे इतर महिन्यामध्ये नोंदविण्यात आलेल्या रकमेबाबत ताळमेळ घेऊन तफावत नसल्याबाबत खात्री पटवावी.

अग्रीम नोंदवहीमध्ये नोंदविण्यात आलेली रक्कम व वर्गीकरण नोंदविण्यात आलेली रक्कम याबाबत ताळमेळ घेण्यात येत असल्याचे खात्याने कळविल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

7) अग्रीम नोंदवहीमध्ये नोंदविण्यात आलेल्या अग्रीमे ही कोणत्या प्रमाणकान्वये प्रदान केली आहेत त्याचा प्रमाणक क्रमांक व दिनाक नमूद करणेत येत नाही.

आक्षेपात नमूद केलेनुसार सन 2015-16 पासून कार्यवाही करणेत येत आहे असे खात्याने कळविले आहे.

सन 2013-14 चे नोंदीबाबत खुलासा केला नसल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

8) मुंबई वित्तीय नियमावली 1959 मधील नियम क्र.142 नुसार अग्रीम मंजुर करताना पुर्वीची

अग्रीमे समायोजित केल्याशिवाय पुढील अग्रीम देण्यात येऊ नये असे असताना खात्याने पुर्वीचे खात्याकडे अग्रीमे प्रलंबित असताना पुन्हा अग्रीमे देण्यात आली आहेत हे नियमबाह्य आहे.

मनपाच्या विविध विभागास मुख्यलेखापाल कार्यालयाकडून अग्रीम मंजूर करण्यात येत नसून अग्रीम मंजूर केल्यानंतर त्याचे आदेश मुख्यलेखापाल यांचे स्वाक्षरीने निर्गमित करण्यात येते व त्याचे धनादेश देण्यात येतात. अग्रीम मंजूरीचे प्रस्ताव खाते प्रमुख रास्तपणे मंजुरीसाठी मा.आयुक्त, मा.अतिरीक्त आयुक्त, उपायुक्त तसेच सहाय्यक आयुक्त (स./म.) यांचेकडे सादर करुन ते मंजुर करून आदा करण्यासाठी मुख्यलेखापाल कार्यालयाकडे पाठविण्यात येतात असे खात्याने अनुपालन सादर केले आहे.

आक्षेपात नमूद केलेनुसार खात्याने संयुक्तीक अनुपालन सादर केले नसल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

9) मनपाच्या वित्तिय वर्ष 2017-18 च्या अंदाजपत्रकामध्ये वित्तिय वर्ष 2013-14 चे नक्की आकडे म्हणुन मनपा सेवकांना घर बांधणीसाठी रक्कम रु.17,10,500/- इतका अग्रीम दिल्याचे नमुद करण्यात आले आहे. त्यानुसार मनपाचे अधिकरी व कर्मचारी यांना घर बांधणीसाठी अग्रिम देण्यात आल्याचे दिसुन येत असुन इतरही प्रयोजनसाठी अग्रिम देण्यात आला असल्यस अशा सर्व वैयक्तिक कर्मच्या-याच्या नावे दिलेल्या अग्रिम रक्कमांची व प्रलंबित अग्रीमांची माहीती व अभिलेख मागणी करुनही लेखापरीक्षणास सादर केली नाही. तरी ती सादर करावी.

आक्षेपात नमूद केलेले अभिलेखे सादर करणेत येत आहे असे खात्याने कळविले आहे. अनुपालनासोबत अभिलेखे सादर केले नसल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

DGPKVSM6101 (Ref No : 57, Hmm No : 58)

## *5 पाणी पुरवठा व मलनित्सारण विभागातील झालेल्या विविध कंत्राटी कामामधून कामगार विमा व कामगार कल्याण उपकर वसूल केला नसल्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 11**

*लेखा शीर्ष : महाराष्ट्र सुवर्ण जय शासन/मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9अ*

वसूलपात्र रक्कम रु. 54170.00/-

| |
|---|
| ***बांधकाम मूल्याच्या 1 टक्का उपकराची रक्कम दि.1/07/2010 पासून न चुकता वसूल करून शासन जमा करणे बाबत तरतूद आहे. परंतु पहिल्या धावत्या बिलातून रक्कम रु.27085/- वसूल केलेली नाही. महाराष्ट्र सार्जनिक*** |

***बांधकाम नियमावलीमधील परिशिष्ट क्र.24 नुसार कामाच्या किंमतीचे कार्यकारी अभियंता यांनी 5 % व उपअभियंता यांनी 100 % मोजमापे तपासणी करून मोजमाप पुस्तकामध्ये नोंदविण्यात आलेले मोजमापेसमोर तारखेसह स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. परंतु अशी कार्यवाही करणेत आली नाही. विमा रक्कम रु. 27085/- वसुल करुन शासकीय विमा निधीकडे भरणा करावी.***

1)कामाचे नाव : अलकुंटे चौक ते भोजप्पा टेकडी ड्रेनेज लाईन टाकणे.
सु.बे/म.का.स.सं./ठेकेदाराचे नाव: कल्याणी कंन्स्ट्रक्शन, सोलापूर
तांत्रिक मंजुरी : क्र.133, दिनांक 22/08/2013
स्थायी समिति मंजुरी : ठराव क्रमांक 484, दिनांक 28/02/2014
अंदाजपत्रकातील जिल्हा दरसुची वर्ष : DSR 2012 -13
पूर्वगणन पत्रक रक्कम : र.रु.15,68,650/-
इसारा रक्कम : र.रु.14505/-
निविदा रक्कम : र.रु.14,50,438/- ( 4% कमी दराने )
देयक मूल्य: र.रु.725288 + 58023 = 783311
करारनामा मुद्रांक शुल्क : र.रु.600
कार्यारंभ आदेश : जा.क्र./साआअ/जलवित/17, दिनांक 09/12/2013
एम बी नंबर/ पृष्ठ क्रमांक : एम बी नंबर 794 व पृष्ठ क्रमांक 7 ते 11
काम पूर्ण झाल्याचा दिनांक : अपूर्ण
पहिल्या देयकातील कपाती

| सुरक्षा अनामत | विक्रीकर | आयकर | एलबीटी | उपकर | पाणी किंमत | विमा | ईटीपी | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 14506 | 14506 | 14506 | 1813 | --- | 200 | --- | 58023 | 103554 |

2) कामाचे नाव: वसुंधरा कॉलनी मागे डोके घर ते ढेकळे घरापर्यंत ड्रेनेज लाईन टाकणे.
सु.बे/म.का.स.सं./ठेकेदाराचे नाव: कल्याणी कंन्स्ट्रक्शन, सोलापूर
तांत्रिक मंजुरी : क्र. दिनांक 26/11/2013
स्थायी समिति मंजुरी ठराव क्रमांक : 483, दिनांक 28/02/2014
अंदाजपत्रकातील जिल्हा दरसुची वर्ष : DSR 2012-13
पूर्वगणन पत्रक रक्कम : र.रु.15,83,280/-
निविदा रक्कम : र .रु.14,63,966/- (10.10% कमी)
देयक मूल्य : र .रु.1210769 + 96862 = 1307631
करारनामा मुद्रांक शुल्क: र.रू.600/-
कार्यारंभ आदेश : जा.क्र./साआअ/जलवित/170, दिनांक 09/12/2013

सोलापूर        महानगरपालिका

एम बी नंबर/ पृष्ठ क्रमांक : एम बी नंबर 24 व पृष्ठ क्रमांक 15 ते 19

काम पूर्ण झाल्याचा दिनांक : अपूर्ण

पहिल्या देयकातील कपाती

| सुरक्षा अनामत | विक्रीकर | आयकर | उपकर | पाणी किंमत | विमा | ईटीपी | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 24215 | 24215 | 24215 | --- | -- | ---- | 96862 | 169607 |

सोलापूर महापालिकेच्या पाणीपुरवठा व मलनित्सारण विभागाने जिल्हा वार्षिक योजना सन 2012-13 मध्ये समाविष्ट असलेल्या महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियानाअंतर्गत ड्रेनेज लाईन घालणे या कामांच्या निविदा नस्ती, देयक व मोजमाप पुस्तिकेची तपासणी केली असता आढळून आलेल्या त्रुटींबाबत अर्धसमास पत्र क्र. 14 दि.28/06/2017 अन्वये विभागास खुलासा करण्याबाबत कळविण्यात आले असता विभागाकडून याबाबत काहीही खुलासा करण्यात आला नाही. त्यानुसार खालील प्रमाणे लेखापरिक्षण अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग क्र.विमास1098/प्र.क्र.28/98 दि.19/08/1998 अन्वये राज्यातील सर्व महानगरपालिकांनी त्यांच्या विविध योजनांतर्गत देण्यात येणाऱ्या कंत्राटी कामाचा विमा व्यवहार फक्त शासकीय विमा निधीकडे करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, क्रमांक जीईएन1098/1357/प्र.क्र.166/98/नवी-24 3 नोव्हेंबर 2003, मुद्दा क्र. 3 नुसार काही विशिष्ट परीस्थितीत कंत्राट दाराला कंत्राटी कामाची देय रक्कम प्रदान करण्याची तातडीची आवश्यकता भासल्यास कंत्राटी कामाच्या मूल्याच्या सरासरी अंदाजे रु.1/-(प्रतिशेकडा) या दराने रक्कम वळती करून उर्वरित रक्कम प्रदान करण्यात यावी व नंतर शासकीय विमा निधीकडे ही रक्कम धनादेश वा धनाकर्षाद्वारे विमा उतरविण्यासाठी हस्तांतरीत करण्यात यावी.

वरील कामासाठी मक्तेदाराने कामाचा तसेच कामावरील कामगारांचा विमा उतरविले असलेबाबत कागदपत्रे नस्तीमध्ये अढळ होत नाही. विमा रक्कम रु. 27085/- वसुल करुन शासकीय विमा निधीकडे भरणा करावी.

2) महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, क्रमांक जीईएन1098/1357/प्र.क्र.166/98/नवी-24 3 नोव्हेंबर 2003, मुद्दा क्र. 1 नुसार प्रत्येक प्रकारच्या कंत्राटी कामाचे स्वीकार पत्र व कार्यादेश कंत्राट दाराला निर्गमित करताना त्याची एक प्रत शासकीय विमा निधी या कार्यालयास अग्रेषित करावी.या प्रकारे तरतूद असतानाही कुठल्याही कंत्राटी कामाचे स्वीकार पत्र व कार्यादेश प्रत शासकीय विमा निधी या कार्यालयास अग्रेषित केलेली नाही. सबब शासन निर्णयातील तरतुदीचे पालन झालेले नाही.

3) महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, क्रमांक जीईएन1098/1357/प्र.क्र.166/98/नवी-24 3 नोव्हेंबर 2003, मुद्दा क्र. 2 नुसार प्रत्येक महापालिकेने कंत्राटी कामापोटी कंत्राटदारास रक्कम प्रदान करण्यापूर्वी कंत्राटदाराने कंत्राटी कामाचा विमा योग्य प्रकारे शासकीय विमानिधीकडे उतरवून या संबधिचा पुरावा सादर केलेला आहे

याची खात्री करावी तद्‌नंतरच कंत्राटी कामापोटी देय रक्कम प्रदान करावी .

परंतु वरील प्रमाणे महापालिकेने कंत्राटी कामापोटी कंत्राटदारास रक्कम प्रदान करण्यापूर्वी कंत्राटदाराने कंत्राटी कामाचा विमा योग्य प्रकारे शासकीय विमानिधीकडे उतरवून या संबधिचा पुरावा सादर केलेला आहे याची खात्री न करता देयाकांचे प्रदान केलेले आहे. सबब शासन निर्णयातील तरतुदीचे पालन झालेले नाही.

4) उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, महाराष्ट्र शासन, यांचे कडील शासन निर्णय क्रमांक बिसीए 2009/प्र.क्र.108/कामगार, 7-अ दिनांक 17 जून 2010 नुसार इमारत व इतर बांधकाम कामगार ( रोजगार विनियमन व सेवाशर्ती ) अधिनियम 1996 व त्या अंतर्गत इमारत व इतर बांधकाम कामगार उपकर अधिनियम 1996 नुसार बांधकाम मूल्यावर 1% उपकर वसूल करण्याबाबत तरतूद आहे. सदर उपकर अधिनियमाच्या कलम 3 आणि केंद्र शासनाच्या इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर नियम 1998 च्या नियम 3 नुसार निर्गमित केलेल्या दि. 26.9.1996 च्या अधिसूचने नुसार ज्यांचे काम घेण्यासाठीचे करार 1 जुलै 2010 व तद्‌नंतर करण्यात येईल अशा बांधकाम मूल्याच्या 1 टक्का उपकराची रक्कम दि.1/07/2010 पासून न चुकता वसूल करून शासन जमा करणे बाबत तरतूद आहे.परंतु पहिल्या धावत्या बिलातून रक्कम रु.27085/- वसूल केलेली नाही. त्यामुळे कामगार कल्याण उपकराची रक्कम रु. 27085/- वसुलपात्र असून ती शासनखाती भरणे आवश्यक आहे.

5) महाराष्ट्र सार्जनिक बांधकाम नियमावली नुसार तांत्रिक अधिका-याने जागेचे स्थळ निरीक्षण करुन प्रस्तावित कामाबाबत सविस्तर अहवाल सादर करणे आवश्यक असून त्याआधारे कामाच्या बाबीच्या अंदाजपत्रकात समावेश करणे अपेक्षित आहे. परंतु सदर अहवालाची प्रत निविदा नस्तीमध्ये उपलब्ध झाली नाही.

6) महाराष्ट्र सार्जनिक बांधकाम नियमावली प्रमाणे बांधकामाच्या प्रमाणकाचे प्रदान करताना मोजमाप पुस्तकातील तपशीलवार मापे नोंदविलेले प्रत्येक पृष्ठ लाल शाईच्या कर्ण रेषेने खोडून टाकणे आवश्यक आहे. तसेच ज्यानुसार बिल संमत करण्यात आले आहे. त्या रोख प्रमाणकाचा क्र.दिनांक तसेच धनादेशाचा तपशील गोषवा-याखाली लाल शाईने नमूद करणे आवश्यक आहे.

7) कामासाठी वापरण्यात आलेले नकाशे, एल सेक्शन अंदाजपत्रक संचिकेत आढळून आलेले नाहीत.

8) संबंधित कामाच्या बाबतीत थर्ड पार्टी टेक्नीकल ऑडीट केलेले नाही.

9) मुंबई प्रांतिक महानरगपालिका अधिनियम-1949 कलम (10) ( दोन) ( च) नुसार महानगरपालिकेच्या कोणत्याही संविदेमध्ये पदाधिकाऱ्यांचा (नगरसेवकांचा) प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष सहभाग असल्यास असा पदाधिकारी अपात्र ठरतो. त्यामुळे महापालिकेच्या कोणत्याही संविदेत पदाधिकाऱ्यांचा प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष सहभाग असणार नाही. यासाठी निविदाधारकांडून निविदा संदर्भात पदाधिका-यांशी प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष संबंध नसल्याचे प्रतिज्ञापत्र घेणे आवश्यक आहे. तथापि अशा प्रकारचे प्रतिज्ञापत्र घेतलेले नाही.

10) लेखापरीक्षनाच्या वेळी काही निवड प्रमाणके तपासताना विमा व उपकर वसूल न करता देयके प्रदान केलीची बाब निदर्शनास आली आहे. अशा प्रकारे सदरील आर्थिक वर्षात विमा व उपकर वसूल न करता देयके प्रदान केली आहेत काय, याची खात्री करून महानगरपालिका मुख्यलेखपरिक्षकाच्या मान्यतेने अनियमितता

दूर करावी.

11) महाराष्ट्र सार्जनिक बांधकाम नियमावलीमधील परिशिष्ट क्र.24 नुसार कामाच्या किंमतीचे कार्यकारी अभियंता यांनी 5 % व उपअभियंता यांनी 100 % मोजमापे तपासणी करून मोजमाप पुस्तकामध्ये नोंदविण्यात आलेले मोजमापेसमोर तारखेसह स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. परंतु अशी कार्यवाही करणेत आली नाही.

DATVRKM8002 (Ref No : 16, Hmm No : 14)

## *6 उजनी येथे दुबार पंपिग करण्यासाठी पंप खरेदी करणे व बसविणेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 17**

*लेखा शीर्ष : मनपा मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 8249971.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 526100.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 661655.00/-

***शासन निर्णय दि.19.01.2013 प्रमाणे 10 लाखावरील कामाकरिता ई- निविदा प्रक्रिया विभागाकडून राबविण्यात आलेली नाही. मूळ खरेदीची बिले सादर केली नसताना देयके अदा केलेली आहेत. काम पूर्णत्वाचा दाखला सादर करण्यात आला नाही. कोणत्या कंपनीचे पंप पुरविण्यात आले याबाबतची खात्री झाली नाही. ड्राईग इस्टीमेट न काढता रक्कम रु.5,26,100/- एकरकमी (Lump sum) देयक अदा करण्यात आले. करारनाम्यामध्ये कामाच्या मक्त्याची रक्कम नमूद करण्यात आलेली नाही. कामगारांच्या मजुरीचे दर पूर्वगणन पत्रामध्ये कश्याच्या आधारे घेण्यात आले याबाबतची खात्री पटली नाही.विक्री कर नोंदणी प्रमाणपत्र नस्तीत आढळले नाही. त्यामुळे 2% ऐवजी 5 % व्हट कपात करणे आवश्यक असल्याने तफावतीची रक्कम रु.2,47,498/- वसुलपात्र आहे. कामगार कल्याण उपकराची 1 टक्का रक्कम रु.82,498/- वसुलपात्र असून ती शासनखाती भरणे आवश्यक आहे. बिलातून 1% प्रमाणे विमा रक्कम वसूल केलेली नाही. त्यामुळे विमा रक्कम रु.82,498/- वसुल करुन शासकीय विमा निधीकडे भरणा करणे आवश्यक आहे. रक्कम रु.34,24,552/- एवढा अग्रिम प्रदान करण्यात आल्याने सदर रक्कमेवर बँक दराने व्याज वसूल करण्यात यावी. महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक 20 फेब्रुवारी 2014 भाग एक -अ मध्ये उपविभाग असाधारण क्र.33 Group no. II Serial NO.2 All epuipments for equipments for electronic communication करिता 4% प्रमाणे LBT रक्कम कपात करणे आवश्यक असल्याने रक्कम रु.2,49,161/- कमी कपात केलेली आहे. कामाचे सन 2011-12 चे MGP ची दरसूची लेखापरीक्षणास सादर केली नाही. तांत्रिक व वित्तीय लिफाफा उपलब्ध झाला नाही. मक्क्तेदाराने कामगाराला दिलेल्या वेतनातून PF, ESI व कामगार निधी शासनाकडे भरल्याबाबतचे अभिलेखे /चलने उपलब्ध झाले***

***नाहीत. खरेदी करण्यात आलेल्या 10 नवीन पंपाचे टेस्ट रिपोर्ट सादर करण्यात आलेली नाही. ऑपरेशन मेंटेनन्स बाबतचे लॉगबुक सादर करण्यात आलेले नाही.***

अर्धसमास पत्र क्र.06 दिनांक 23/05/2017 अन्वये पाच कामाच्या यादीतील 5 कामापैकी चार कामांचे अभिलेख लेखापरीक्षणाकरिता उपलब्ध झालेले असून, त्यातील उजनी धरणाची पाणी पातळी कमी झाल्याने उजनी हेड वर्क्स येथे चरीमध्ये पाणी घेऊन पाणी पुरवठा सुरळीत राहणेकरिता (अ) 10 HP चे जुने 20 पंप सेट बसविणे (ब) नवीन 10 HP चे 10 पंप सेट पुरविणे, बसविणे, ऑपरेशन, मेंटेनन्स करणे या बाबतच्या नस्तीचे लेखापरिक्षण केले असता, नस्ती मधील माहिती पुढील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| कामाचे नाव | उजनी धरणाची पाणी पातळी कमी झाल्याने उजनी हेड वर्क्स येथे चरीमध्ये पाणी घेऊन पाणी पुरवठा सुरळीत राहणेकरिता (अ) 10 HP चे जुने 20 पंप सेट बसविणे (ब) नवीन 10 HP चे 10 पंप सेट पुरविणे, बसविणे, ऑपरेशन, मेंटेनन्स करणे. |
| सु.बे/म.का.स.सं./ठेकेदाराचे नाव | विजय प्रताप इलेक्ट्रीक्ल्स |
| तांत्रिक मंजुरी | --- |
| प्रशासकीय मंजुरी | स्थायी समिती ठराव क्रमांक 582, दिनांक 05/04//2013 |
| अंदाजपत्रकाची रक्ककम | 95.03 लाख |
| बजेट तरतुद | 3.64 कोटी |
| निविदा कालावधी व दैनिकाचे नाव | दै.संचार |
| इसारा रक्काम | 95,032/- |
| निविदा रक्कवम | 95,03,144/- |
| सुरक्षा अनामत | 1,90,064/- |
| कामाचा कालावधी | ऑगस्ट 2013 अखेरपर्यंत |
| करारनामा मुद्रांक शुल्कर | 8700/- |
| कार्यारंभ आदेश | जा.क. सा अ/उजणी-7/दि.9/4/2013 |
| धावते/अंतीम देयक<br>एकुण खर्च रक्कतम रु. | 1) रु.52,28,926/-<br>2) वाढीव कामाचे देयक रु.9,99,573/-<br>3) रु.11,57,910/-<br>4)रु.8,83,562/- |

विजय प्रताप इलेक्ट्रीक्ल्स यांनी सादर केलेला तांत्रिक लिफाफा, वित्तीय लिफाफा , पूर्वगणक पत्रक (Estimate) तसेच निविदा प्रसिध्दी बाबाची कागदपत्रे कोर्टात असल्याने ,सदर कागदपत्रे लेखापरिक्षणास तपासता आलेली नाहीत. उजनी येथे दुबार पंपिग करण्यासाठी पंप खरेदी करणे व बसविणेबाबत च्या नस्तीचे लेखापरिक्षण केले असता नस्ती मधील अनियामित्तेबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 144 दिनांक 12/06/2018 अन्वये विभागास विचारणा केली असता विभागाने याबाबतचा खुलासा सादर केलेला

नसल्याने खालील आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

1. शासन निर्णय दि.19.01.2013 प्रमाणे 10 लाखावरील कामाचे ई-निविदा कार्यप्रणालीचा अवलंब करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही विभागाकडून करण्यात आलेली नाही.

2. दैनिक संचार या स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात दि. 08/01/2013 रोजी दिली असून त्याबाबतचे अंक नस्तीत नसल्याने जाहिरातीची खात्री पटत नाही. किमान एका जिल्हास्तरीय व एक राज्यस्तरीय वृत्तपत्रात जाहिरात देणे आवश्यक असताना, त्याप्रमाणे कार्यवाही न केल्याने स्पर्धात्मक निविदा प्रक्रियेचा फायदा महापालिकेस झाला नाही. मूळ खरेदीची बिले सादर केली नसताना देयके अदा करण्यात आली.

3. काम पूर्णत्वाचा दाखला नस्तीत आढळून आलेला नाही.

4. दि.31/01/2013 रोजी झालेल्या प्री-बीड मिटिंग मध्ये सदर कामासाठी किर्लोस्कर कंपनीचे पंप पुरविण्याबाबत सहमती झाली असताना, खरेदी केलेल्या सर्व पंप, मशिनरी व साहित्य, स्पेअर पार्टचे मूळ बिल नस्तीत नसल्याने मालाचा केव्हा पुरवठा केला? कोणत्या कंपनीचे पंप पुरविण्यात आले याबाबत याची खात्री झाली नाहीत.

5. पूर्वगणक पत्रातील अ.क्र. 29 मधील 10 HP चे 10 पंप साठी फाऊनडेशन सिविल वर्क चेनल खोदाई कट्टा बनवणे या बाबीसाठी नकाशे व ड्राईग स्पेसिफीकेशन काढून व DSR दरानुसार पूर्वगणक पत्र तयार करून त्याप्रमाणे होणाऱ्या कामाचे देयक अदा करण्याचे अभिलेख नस्तीमध्ये सादर करणे आवश्यक होते. तथापि ड्राईग इस्टीमेट न काढता सदरच्या बाबीसाठी रक्कम रु.5,26,100/- एकरकमी (Lump sum) देयक अदा केले आहे. त्यामुळे सदरची रक्कम आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

6. निविदा मागविताना 8% ETP ची रक्कम पूर्वगणक पत्रात समाविष्ठ करून कामाच्या निविदा मागविण्यात आली आहे. करारनाम्यामध्ये कामाच्या मक्त्याची रक्कम नमूद करण्यात आलेली नाही. याबाबत खुलासा प्राप्त झाला नाही.

7. कामगारांच्या मजुरीचे दर पूर्वगणनक पत्रामध्ये कश्याच्या आधारे घेण्यात आले, याबाबतची खात्री पटली नाही.

8. विक्रीकर आयुक्त यांची अधिसूचना दि. 04/04/2012 अन्वये कंत्राटदाराचे विक्री कर नोंदणी प्रमाणपत्र नस्तीत आढळले नाही. त्यामुळे 2% एवजी 5 % व्हट कपात करणे आवश्यक असताना होते. तफावतीची रक्कम रु.2,47,498/- वसुलपात्र ठेवण्यात यात आहे.

9. महाराष्ट्र शासन, उदयोग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र.बीसीए-2009/प्र.क्र.108 कामगार-7, दिनांक 17/06/2010 अन्वये उपकराची रक्कम 1 टक्का वसूल करणे आवश्यक आहे. परंतु धावत्या बिलातून रक्कंम रु.82,498/- वसूल केलेली नाही. त्यामुळे कामगार कल्याण उपकराची रक्कम रु.82,498/- वसुलपात्र असून ती शासनखाती भरण्यात यावी.

10. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग क्र.विमास1098/प्र.क्र.28/98 दि.19/08/1998 अन्वये राज्यातील सर्व महानगरपालिकांनी त्यांच्या विविध योजनांतर्गत देण्यात येणा-या कंत्राटी कामाचा विमा व्यवहार फक्त शासकीय विमा निधीकडे करणे आवश्यक आहे. विमा संचालक, शासकीय विमा निधी, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र क्र.प्रविनी-2300/सहविमा/जिप-2 दि.07 जानेवारी 2004 नुसार मंजूर निविदा रकमेच्या 1% विमा कामासाठी व कामगाराच्या सुरक्षेसाठी विमा निधीत भरणे आवशयक आहे. सदर कामाचा विमा उतरविले असलेबाबत कागदपत्रे नस्तीमध्ये आढळले नाही. सर्व बिलातून 1% प्रमाणे विमा रक्कम वसूल केलेली नाही. त्यामुळे विमा रक्कम रु.82,498/- वसुल करुन शासकीय विमा निधीकडे भरणा करावी.

11. निविदा अटी शर्ती मध्ये अग्रिम देण्याची अट नसताना रक्कम रु.34,24,552/- एवढा अग्रिम प्रदान

करण्यात आलेला आहे. त्यामुळे सदर रक्कमेवर बँक दराने व्याज वसूल करण्यात यावा.

12. मक्कतेदार विजय प्रताप इलेक्ट्रीक्ल्स यांना पहिल्या , दुसरे व अंतिम बिल अदा करण्यात आलेले असून, सदर बिला मध्ये इलेक्ट्रीक्ल्स वस्तूची खरेदीची रु. 52,91,954/- एवढी रक्कम समाविष्ट आहे. महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक 20 फेब्रुवारी 2014 भाग एक -अ मध्ये उपविभाग असाधारण क्र.33 Group no. II Serial NO.2 All epuipments for equipments for electronic communication करिता LBT 4% नुसार रक्कम रु.2,11,678/- देयकातून कपात करणे आवश्यक होते. परंतु पहिल्या , दुसरे व अंतिम बिला मधून रक्कम रु.2,11,678/- एवढी रक्कम वसूल केलेली नाही. तसेच वाढीव कामाच्या तिसऱ्या रक्कम रु.9,99,573/- च्या बिलामधून मधून 0.25% LBT रक्कम रु.2,499/- कपात करण्यात आलेली आहे. या बिला मधून सुद्धा 4% प्रमाणे LBT रक्कम रु.39,982/- कपात करणे आवश्यक असल्याने रक्कम रु.37,483/- एवढी रक्कम कमी कपात केलेली आहे. त्यामुळे एकूण रक्कम रु.2,49,161/- वसूल करण्यात यावी.

13. सदर कामाचे सन 2011-12 चे MGP ची दरसूची लेखापरीक्षणास सादर केली नाही. त्यामुळे दराबाबतची खात्री करता आली नाही.

14. मक्कतेदार विजय प्रताप इलेक्ट्रीक्ल्स यांचा तांत्रिक व वित्तीय लिफाफा उपलब्ध झाला नाही.

15. मक्कतेदाराने कामगाराला दिलेल्या वेतनातून PF, ESI व कामगार निधी शासनाकडे भरल्याबाबतचे अभिलेख /चलने लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत.

16. खरेदी करण्यात आलेल्या 10 नवीन पंपाचे टेस्ट रिपोर्ट सादर करण्यात आलेले नाहीत.

17. ऑपरेशन मेंटेनन्स बाबतचे लॉगबुक सादर करण्यात आलेले नाही.

18. अर्धसमास पत्र क्र.06 दिनांक 23/05/2017 अन्वये पाच कामाच्या यादीतील अ.क्र.5 मधील मोहिते नगर येथे पिण्याची पाईप लाईन टाकणे याबाबतची नस्ती लेखापरीक्षणास विभागाकडून उपलब्ध करून देण्यात आली नाही.

एकूण आक्षेपाधीन रक्कम रु.5,26,100/-

एकूण वसूल पात्र रक्कम रु.6,61,655/-

FDSDKPM7201 (Ref No : 139, Hmm No : 144)

## *7 नगर रचना विभागातील मोकळया जागेतील ले आऊट मंजुरी मध्ये झालेल्या अनियमितते बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**अनियमितता संख्या : 03**

*लेखा शीर्ष : नगर रचना मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***मोकळया जागेची लांबी ही 42.32 मी. असून सरासरी रुंदी 15 मी. इतकी आहे. सरासरी रुंदीच्या जास्तीत जास्त 2.5 पट 37.5 मी. इतकी लांबी असणे आवश्यक होती. परंतु प्रत्यक्षात सरासरी रुंदीच्या लांबी 2.82 पट घेण्यात आली आहे. हे नियमबाह्य आहे. सोलापूर मनपा विकास नियमावलीतील रेग्युलेशन न. 23 प्रमाणे प्लॉटचे क्षेत्रफळ 2 हेक्टर पेक्षा जास्त असेल तर 5 टक्के जागा शॉपिंग सेंटर किंवा डिपार्टमेंटल स्टोअर साठी राखीव ठेवणे आवश्यक आहे. संबधित ले आउट प्लॉटचे क्षेत्रफळ (plottable area )33349.18 चौ. मी. असून 5 टक्के प्रमाणे 1667.45 चौ. मी. क्षेत्र शॉपिंग सेंटर किंवा डिपार्टमेंटल स्टोअरसाठी राखीव ठेवण्यात आलेले नाही. हे नियमबाह्य आहे.***

सोलापूर महानगरपालिके अंतर्गत असणारे नगर रचना विभागातील निवडक महिन्यातील मोकळया जागेतील ले आऊट मंजुरीच्या नस्तींची तपासणी तपासणी केली असता आढळून आलेल्या त्रुटींबाबत अर्धसमास पत्र क्र. 24 दि.03/08/2017 अन्वये विभागास खुलासा करण्याबाबत कळविण्यात आले असता विभागाकडून याबाबत काहीही खुलासा करण्यात आला नाही. त्यानुसार खालील प्रमाणे लेखापरिक्षण अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1) मे. कृती इन्फ्रास्ट्रक्चरचे भागीदार रजनीकांत शहा व इतर अंतिम ले आऊट आदेश क्र .62 / दि. 26 /03/2014 च्या नस्तीची तपासणी करण्यात आली असता पुढील प्रमाणे अनियमितता आढळुन आल्या. सोलापूर मनपा विकास नियमावलीमधील नियम क्र.22.1(c) नुसार जर रुंदी ही 24 मीटर पेक्षा कमी असेल तर मोकळ्या जागेची लांबी ही रुंदीच्या 2.5 पेक्षा जास्त नसावी. परंतु सदर प्लॉटमध्ये दोन ठिकाणी मोकळी जागा सोडण्यात आली आहे. एका मोकळया जागेची लांबी ही 42.32 मी. असून सरासरी रुंदी 15 मी. इतकी आहे. सरासरी रंदीच्या जास्तीत जास्त 2.5 पट 37.5 मी. इतकी लांबी असणे आवश्यक होती. परंतु प्रत्यक्षात सरासरी रुंदीच्या लांबी 2.82 पट घेण्यात आली आहे. हे नियमबाह्य आहे.

2) श्री.सुभाष शिवलिंग कटगेरी व सिद्धाराम शिवलिंग कटगेरी यांचे सुधारित ले आऊट मंजूर क्र.209/09.03.2015 च्या नस्तीची तपासणी करण्यात आली. ले आऊट नकाशातील प्लॉटला 132.50 मी. लांबीचा ॲसेस रस्ता असून त्याची रुंदी 9 मी. इतकी आहे. सोलापूर मनपा विकास नियमावतील रेग्युलेशन न. 52.3 मधील टेबल क्र .6 नुसार प्लॉटींगमधील 75 ते 150 मीटर ॲसेस रस्त्याची लांबी असल्यास सदर रस्त्याची रंदी 12 मी. असणे आवश्यक आहे. परंतु सदर प्लॉटमध्ये 132.50 मी. पेक्षा जास्त लांबीचा ॲसेस रस्ता हा 9 मी रुंदीचा तयार केला असल्याने तो नियमबाहृय आहे.

3) श्री. बसवराज देशमुख यांच्या अंतिम ले आऊट मंजूर क्र. 59 /24.03.2015 च्या नस्तीची तपासणी करण्यात आली. सोलापूर मनपा विकास नियमावलीतील रेग्युलेशन न. 23 प्रमाणे प्लॉटचे क्षेत्रफळ 2 हेक्टर पेक्षा जास्त असेल तर 5 टक्के जागा शॉपिंग सेंटर किंवा डिपार्टमेंटल स्टोअर साठी राखीव ठेवणे आवश्यक आहे. संबधित ले आउट प्लॉटचे क्षेत्रफळ (plottable area ) 33349.18 चौ. मी. असून 5 टक्के प्रमाणे 1667.45 चौ.

मी. क्षेत्र शॉपिंग सेंटर किंवा डिपार्टमेंटल स्टोअरसाठी राखीव ठेवण्यात आलेले नाही. हे नियमबाहय आहे.

DATVRKM8002 (Ref No : 19, Hmm No : 24)

## *8 विकास योजना आरखडा (1997 ते 2007) नुसार आरक्षित केलेल्या जागांच्या भूसंपादनाची कार्यवाही केली नसल्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 03**

*लेखा शीर्ष : नगर रचना*
*अनियमितता कलम : 9अ*

***महानगरपालिकेने एकूण 796 आरक्षणे क्षेत्राच्या संपादनासाठी रक्कम रु.7530.56 लाख जागा मालकांना अदा करून जागा ताब्यात घेणे आवश्यक होते तसेच रक्कम रुपये 1830.03 लाख आरक्षित रस्त्यांच्या संपादनासाठी संबधित जागा मालकांना अदा करून जागा ताब्यात घेवून त्यांचा विकास करणे आवश्यक होते. 796 जागांसाठी रक्कम रु. 7530.56 लाख एवढ्या रक्कमेची तरतूद करण्यासाठी महापालिकेने कोणतेही प्रयोजन केलेले दिसून येत नाही. संपादित केलेल्या आरक्षणावर बांधकाम, रस्ता डांबरीकरण, सिमा भिंत यासाठी येण्याऱ्या खर्चाची 20 टक्के तरतूद अर्थसंकल्पात करणे बंधनकारक आहे. परंतु तशी तरतूद केल्याचे बजेट नोंदवहीत दिसून आले नाही. महानगरपालिकेने एकूण 796 आरक्षित क्षेत्रापैकी एकूण किती क्षेत्रे ताब्यात घेतली आहेत याची माहिती उपलब्ध केली नाही.***

महानगरपालिकेच्या नगररचना विभागातील विकास योजना आराखडा तपासाला असता आढळून आलेल्या त्रुटींबाबत अर्धसमास पत्र क्र. 25 दि. 04/08/2017 अन्वये विभागास खुलासा करण्याबाबत कळविण्यात आले असता विभागाकडून याबाबत काहीही खुलासा करण्यात आला नाही. त्यानुसार खालील प्रमाणे लेखापरिक्षण अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1. महानगरपालिका क्षेत्रात एकूण 869 आरक्षण क्षेत्र असून त्यापैकी 796 क्षेत्रे महापालिकेसाठी आरक्षित करण्यात आलेले आहेत व उर्वरित 73 क्षेत्रे इतर संस्थासाठी (राज्य व केंद्र शासन, खाजगी संस्था,एन.जी.ओ) आरक्षित करण्यात आलेली आहेत. महापालिकेसाठी आरक्षित करण्यात आलेल्या 796 क्षेत्रासाठी एकूण 7530.56 लाख इतके भूसंपादांची रक्कम निश्चित करण्यात आलेली आहे. महानगरपालिकेने एकूण 796 आरक्षित क्षेत्रापैकी एकूण किती क्षेत्रे ताब्यात घेतली आहेत याची माहिती उपलब्ध केली नाही. महाराष्ट्र

नगररचना अधिनियम-1966 चे कलम 127 अन्वये विकास योजना मंजूर होऊन ती अंमलात आल्यापासून 10 वर्ष कालावधीत जर नियोजन/समुचित प्राधिकरणाने सार्वजनिक आरक्षणाची भूसंपादनाची कार्यवाही केली नाही तर जमीन मालक सबंधित प्राधिकरणावर खरेदी सूचना नोटीस बजावू शकतो अशी नोटीस बजावल्यानंतर सबंधित प्राधिकरणामार्फत 6 महिन्यात भूसंपादनाची कार्यवाही करणे आवश्यक आहे. अन्यथा आरक्षणे आपोआप रद्द होतात अशी तरतूद आहे.

2.नगर विकास विभाग मुंबई शासन निर्णय क्र.टीपीएस-3692/11732/नवी-11दि.3/6/1994 अन्वये सोलापूर महानगरपालिकेला 2001 पासून अंमलबजावणीचे आदेश आहेत. महानगरपालिकेने एकूण 796 आरक्षणे क्षेत्राच्या संपादनासाठी र.रु.7530.56 लाख जागा मालकांना अदा करून जागा ताब्यात घेणे आवश्यक होते तसेच रक्कम रुपये 1830.03 लाख आरक्षित रस्त्यांच्या संपादनासाठी संबधित जागा मालकांना अदा करून जागा ताब्यात घेवून त्यांचा विकास करणे आवश्यक होते.

3. महाराष्ट्र नगररचना अधिनियम-1966 मधील कलम 26(2) अन्वये संपादित केलेल्या आरक्षणावर बांधकाम, रस्ता डांबरीकरण, सिमा भिंत यासाठी येण्याऱ्या खर्चाची 20 टक्के तरतूद अर्थसंकल्पात करणे बंधनकारक आहे. परंतु तशी तरतूद केल्याचे बजेट नोंदवहीत दिसून आले नाही.

| अ.क्र. | सेक्टर न. | एकूण आरक्षित क्षेत्रे | जागा संपादनाची रक्कम लाख) ( |
|---|---|---|---|
| 1 | 1 | 50 | 868.55 |
| 2 | 2 | 46 | 414.08 |
| 3 | 3 | 52 | 624.49 |
| 4 | 4 | 39 | 161.03 |
| 5 | 5 | 21 | 225.18 |
| 6 | 6 | 43 | 1455.88 |
| 7 | 7 | 37 | 372.24 |
| 8 | 8 | 30 | 176.88 |
| 9 | 9 | 97 | 622.97 |
| 10 | 10 | 44 | 148.29 |

| | | | |
|---|---|---|---|
| 11 | 11 | 73 | 481.24 |
| 12 | 12 | 91 | 407.18 |
| 13 | 13 | 95 | 974.17 |
| 14 | 14 | 31 | 213.64 |
| 15 | 15 | 35 | 220.86 |
| 16 | 16 | 51 | 163.88 |
| | एकूण | 796 | 7530.56 |

उपरोक्त तक्त्यांनुसार 796 जागांसाठी र .रू.7530.56 लाख एवढ्या रक्कमेची तरतूद करण्यासाठी महापालिकेने कोणतेही प्रयोजन केलेले दिसून येत नाही. जागा ताब्यात घेवून त्यांचा विकास न केल्याने महापालिका क्षेत्रात नागरिक पायाभूत सोयी सुविधा पासून वंचित राहिल्याचे दिसून येत आहे.

DATVRKM8002 (Ref No : 20, Hmm No : 25)

## *9 महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान योजनेंतर्गत महानगरपालिका क्षेत्रात भाग-1 मधील रस्ते करणे. (2013-14)*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 04**

*लेखा शीर्ष : महाराष्ट्र सुवर्णजयं शासन निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 6783255.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 6783255.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 312568.00/-

***स्थानिक संस्था कराची अतिप्रदान रक्कम रु.2,44,735/- ठेकेदाराकडून वसुल करणेत यावी. करारानाम्याशिवाय कामाचा आदेश देणे नियमबाह्य आहे, तसेच कराररनामा न केल्याने शासनाचे महसूल रक्कम रु.13,100/- चे नुकसान झाले आहे. शासन निर्णय दि.19.01.13 अन्वये 10 लाखावरील कामांसाठी ई-निविदा राबविणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही. उपरोक्त कामांसाठी खर्ची पडलेली***

***रक्कम रु.67,83,255/- वर 1% प्रमाणे कामगार उपकराची रक्कम रु.67,833/- ठेकेदाराकडून वसुलपात्र आहे.***

निविदा मान्यता :मा.स्थायी समिती यांच्याकडील ठराव क्र. दि.07.01.201 अन्वये
प्राकलन :- रु.1,39,78,786/- निविदा मंजूर दर :- 07% कमी दराने.
निविदा रक्कम- रु.1,39,78,786/-
कामाचा आदेश :- नगर अभियंता कार्या. जा. क्र. नअ/74 दि.13/05/2013.
कामाचा कालावधी- 8 महिने.

सदरच्या महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान योजनेंतर्गत महानगरपालिका क्षेत्रात भाग-1 मधील रस्ते करणे, या कामाची नस्ती, मोजमाप पुस्तिका व प्रमाणक तपासले असता त्याअनुषंगाने निदर्शनास आलेल्या उणीवाबाबत अर्धसमास क्रमांक 30 दि.05/08/2017 अन्वये खुलासा मागविला असता विभागाने कोणताही खुलासा सदर केला नसल्याने लेखापरीक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. प्राकलन (Estimate) तयार करताना कामावर वापरण्यात येणाऱ्या साहित्याच्या दरांचे (दरसुचीतील बेसिक दर) दर पृथक्करण करताना साहित्याच्या दरावर 4% स्थानिक संस्था कर आकारणी करून साहित्याचा दर निश्चित केला आहे. नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील अधिसूचना दि.06/08/2012 मधील नियम 5 नुसार महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये काम हाती घेणाऱ्या कोणत्याही व्यापा-याला किंवा व्यक्तीला अशी कामे हाती घेण्यासाठी शहराच्या हद्दीत आयात केलेल्या मालाच्या किमतीवर त्याच्या कंत्राटी मूल्याच्या एकूण किमतीवर 0.25% इतक्या ठोक दराने स्थानिक संस्था कर वसुल करावा असे नमूद आहे. त्यानुसार कंत्राटदाराच्या देयकामधून 0.25% दराप्रमाणे स्थानिक संस्था कराची रक्कम वसुल केली आहे. परंतु दर पृथक्करण करताना 4% दराने स्थानिक संस्था कर वाढवून दर मंजूर केल्याने खालीलप्रमाणे ठेकेदारास अतिप्रदान झाले आहे.

| मोजमाप पुस्तक क्र. व पृष्ठ क्र. | कामावर खर्ची पडलेली एकूण रक्कम रु. | अंदाजपत्रकात 4% दराने LBT समाविष्ट केलेल्या बाबींची एकूण रक्कम रु. | कंत्राटदारास अदा केलेली LBT ची 4% रक्कम रु. | ठेकेदाराकडून वसुल केलेली LBT ची रक्कम रु. | अतिप्रदानाची रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|
| कामाचे नाव :- भारतीय चौक ते जोडबसवन्ना चौक रस्ता करणे. | | | | | |
| 26/55-66 | 30,81,114 | 26,24,269 | 1,04,971 | 5,505 | 99,466/- |
| कामाचे नाव :- कुंभार वेस ते चिराग अली टाकिया रस्ता करणे. | | | | | |
| 51/154-163 | 29,08,269 | 27,49,369 | 1,09,974 | 00 | 1,09,974/- |
| कामाचे नाव :- स्वस्तिक स्वीट होम ते कुचन शाळापर्यंत रस्ते करणे. | | | | | |
| 584/14-16 | 7,93,872 | 8,82,361 | 35,295 | 00 | 35,295/- |
| एकूण | | | 2,50,240/- | 5505/- | 2,44,735/- |

सदरची अतिप्रदान रक्कम रु.2,44,735/- ठेकेदाराकडून वसुल करणेत यावी.

2. सदरच्या कामाचा करारनामा नस्तीत उपलब्ध नाही. करारानाम्याशिवाय कामाचा आदेश देणे नियमबाह्य आहे, तसेच करारनामा न केल्याने शासनाचे महसूल रक्कम रु.13,100/- चे नुकसान झाले आहे.

3. निर्णय दि.19.01.13 अन्वये 10 लाखावरील कामांसाठी ई-निविदा राबविणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही. हे नियमबाह्य असल्याने सदरच्या कामावरील खर्च पडलेली रक्कम रु.67,83,255/-

आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

4. उपरोक्त कामांचे अंदाजपत्रक तयार करताना 1% कामगार कल्याण उपकराची रक्कम गृहीत धरून अंदाजपत्रक तयार केले आहे. परंतु ठेकेदारास देयक अदा करताना पुन्हा 1% उपकराची रक्कम देयकात समाविष्ट केली आहे. त्यामुळे दोन वेळा उपकाराची रक्कम समाविष्ट करून ती एकदाच अदा केली असल्याने 1% कामगार उपकराची रक्कम ठेकेदारास अतिप्रदान झाली आहे, अशाप्रकारे उपरोक्त कामांसाठी खर्ची पडलेली रक्कम रु.67,83,255/- वर 1% प्रमाणे रक्कम रु.67,833/- ठेकेदाराकडून वसुलपात्र आहे.

उपरोक्त त्रुटी भाग-1 मधील इतर कामात असण्याची शक्यता असून त्यांची तपासणी करून मुख्य लेखापरीक्षकांच्या मान्यतेने त्या दूर करण्यात याव्यात.

आक्षेपाधीन रक्कम= रु.67,83,255/-

वसुलपात्र रक्कम= रु.3,12,568/-

DGPAGPM8503 (Ref No : 33, Hmm No : 30)

## *10 महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान योजनेंतर्गत महानगरपालिका क्षेत्रात भाग-5 मधील रस्ते करणे.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**अनियमितता संख्या : 03**

*लेखा शीर्ष : महाराष्ट्र सुवर्णजयं शासन निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 2433772.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 2433772.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 115618.00/-

***स्थानिक संस्था कर अतिप्रदान रक्कम रु.91,281/- ठेकेदाराकडून वसुल करणे आवश्यक आहे. सदरच्या कामाचा करारनामा नस्तीत उपलब्ध नाही. कामांसाठी खर्ची पडलेली रक्कम रु.24,33,772/- वर 1% कामगार उपकराची रक्कम रु.24,337/- वसुलपात्र आहे.***

ठेकेदाराचे नाव :- मे. सिद्धेश्वर कन्स्ट्रक्शन.

निविदा मान्यता : मा.स्थायी समिती यांच्याकडील ठराव क्र.560 दि.28.02.2016 अन्वये

निविदा मंजूर दर :- 15.55% कमी दराने.

कामाचा आदेश :- नगर अभियंता कार्या. जा. क्र. नअ/70 दि.30/04/2013.

कामाचा कालावधी- 3 महिने.

सदरच्या महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान योजनेंतर्गत महानगरपालिका क्षेत्रात भाग-5 मधील रस्ते करणे, यातील काही कामाची नस्ती, मोजमाप पुस्तिका व प्रमाणक तपासले असता त्याअनुषंगाने निदर्शनास आलेल्या उणीवाबाबत अर्धसमास क्रमांक 31 दि. 05/08/2017 अन्वये खुलासा मागविला असता

विभागाने कोणताही खुलासा सादर केला नसल्याने लेखापरीक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. प्राकलन (Estimate) तयार करताना कामावर वापरण्यात येणाऱ्या साहित्याच्या दरांचे (दरसुचीतील बेसिक दर) दर पृथक्करण करताना साहित्याच्या दरावर 4% स्थानिक संस्था कर आकारणी करून साहित्याचा दर निश्चित केला आहे. नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील अधिसूचना दि.06/08/2012 मधील नियम 5 नुसार महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये काम हाती घेणाऱ्या कोणत्याही व्यापा-याला किंवा व्यक्तीला अशी कामे हाती घेण्यासाठी शहराच्या हद्दीत आयात केलेल्या मालाच्या किमतीवर त्याच्या कंत्राटी मूल्याच्या एकूण किमतीवर 0.25% इतक्या ठोक दराने स्थानिक संस्था कर वसुल करावा असे नमूद आहे. त्यानुसार कंत्राटदाराच्या देयकामधून 0.25% दराप्रमाणे स्थानिक संस्था कराची रक्कम वसुल केली आहे. परंतु दर पृथक्करण करताना 4% दराने स्थानिक संस्था कर वाढवून दर मंजूर केल्याने खालीलप्रमाणे ठेकेदारास अतिप्रदान झाले आहे.

| मोजमाप पुस्तक क्र. व पृष्ठ क्र. | कामावर खर्ची पडलेली एकूण रक्कम रु. | अंदाजपत्रकात 4% दराने LBT समाविष्ट केलेल्या बाबींची एकूण रक्कम रु. | कंत्राटदारास अदा केलेली LBT ची 4% रक्कम रु. | ठेकेदाराकडून वसुल केलेली LBT ची रक्कम रु. | अतिप्रदानाची रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|
| कामाचे नाव :- डोंगरे पान शॉप ते जुनी पोलीस लाईन रस्ता करणे. | | | | | |
| 01/156-173 | 15,86,026 | 15,54,703 | 62,188 | 3,965 | 58,223/- |
| कामाचे नाव :- वार्ड क्र. 4 शेलागी परिसर येथे रस्ता करणे. | | | | | |
| 119/119-125 | 8,47,746 | 8,26,549 | 33,062 | 00 | 33,062/- |

सदरची अतिप्रदान रक्कम रु.91,281/- ठेकेदाराकडून वसुल करणे आवश्यक आहे. सदरच्या कामाचा करारनामा नस्तीत उपलब्ध नाही. करारानाम्याशिवाय कामाचा आदेश देणे नियमबाह्य आहे, तसेच करारनामा न केल्याने शासनाचे महसूल रक्कम रु.14,200/- चे नुकसान झाले आहे.

2. शासन निर्णय दि.19.01.13 अन्वये 10 लाखावरील कामांसाठी ई-निविदा राबविणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही. हे नियमबाह्य असल्याने सदरच्या कामावरील खर्च पडलेली रक्कम रु.24,33,772/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

3. उपरोक्त कामांचे अंदाजपत्रक तयार करताना 1% कामगार कल्याण उपकराची रक्कम गृहीत धरून अंदाजपत्रक तयार केले आहे. परंतु ठेकेदारास देयक अदा करताना पुन्हा 1% उपकराची रक्कम देयकात समाविष्ट केली आहे. त्यामुळे दोन वेळा उपकाराची रक्कम समाविष्ट करून ती एकदाच अदा केली असल्याने 1% कामगार उपकराची रक्कम ठेकेदारास अतिप्रदान झाली आहे, अशाप्रकारे उपरोक्त कामांसाठी खर्ची पडलेली रक्कम रु.24,33,772/- वर 1% प्रमाणे रक्कम रु.24,337/- वसुलपात्र आहे.

उपरोक्त त्रुटी भाग-5 मधील इतर कामात असण्याची शक्यता असून त्यांची तपासणी करून मुख्य लेखापरीक्षकांच्या मान्यतेने त्या दूर करण्यात याव्यात.

आक्षेपाधीन रक्कम= रु.24,33,772/-

वसुलपात्र रक्कम= रु.1,15,618/-



## *11 आग सुरक्षा निधीचे स्वतंत्र लेखाशिर्ष उघडून त्या निधीमधील खर्चाबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 02**

*लेखा शीर्ष : आग सुरक्षा निधी मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9अ*

***महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम 2006 मधील कलम 25 तसेच महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र.704/अस दिनांक 23/09/2009 नुसार अग्निशमन सेवा विकसित करण्यासाठी आग सुरक्षा निधी (Fire Protection Fund) निर्माण करणे, नागरी स्थानिक स्वराज्य संस्था यांना बंधनकारक असतांना स्वतंत्र लेखाशिर्ष उघडण्यात येवून त्याचा स्वतंत्र लेखा ठेवण्यात आलेला नाही.***

सोलापूर महानगरपालिका अंतर्गत असणारे अग्निशमन विभागाचे 2013-14 या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण केले असता सदर अनियमिततेबाबत अर्धसमास क्रमांक 81, दि.13/12/17 अन्वये विभागास विचारणा करण्यात आली. विभागाने कोणताही खुलासा अद्यापपर्यंत सादर केला नसल्याने लेखापरीक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम 2006 मधील कलम 25 तसेच महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र. 704/अस दिनांक 23/09/2009 नुसार अग्निशमन सेवा विकसित करण्यासाठी **आग सुरक्षा निधी** (Fire Protection Fund) निर्माण करणे, नागरी स्थानिक स्वराज्य संस्था यांना बंधनकारक आहे. त्याचे स्वतंत्र लेखाशिर्ष उघडण्यात यावे व त्यामध्ये हा निधी जमा करण्यात यावा. तसेच अशाप्रकारे आग सुरक्षा निधीमध्ये जमा होणा-या रकमेचा जानेवारी ते जून व जुलै ते डिसेंबर असा सहामाही अहवाल प्रत्येक वर्षाच्या जानेवारी व जुलैमध्ये संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा व अग्निशमन सल्लागार यांना पत्राव्दारे पाठवावा असे कळविण्यात आले आहे. परंतु सोलापूर मनपाने अशी कार्यवाही 2013-14 या आर्थिक वर्षामध्ये केल्याचे दिसून आले नाही. त्यामुले सदर निधित किती रक्कम जमा करण्यात आली याची पडताळणी करता आली नाही.

2) सदर निधीमधून प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम 2006 च्या कलम 25(3)

नुसार अत्याधुनिक साधनसामुग्री व उपकरणे खरेदी करण्यात यावीत. काही प्रमाणात अधिकारी / कर्मचारी यांचे वेतन व भत्ते यावर खर्च भागविण्यासाठी वापरण्यात यावी, अशी तरतूद करण्यात आली आहे. सदर निधी स्वतंत्र लेखाशिर्षामध्ये ठेवला नसल्यामुळे हा निधी वरील प्रयोजानासाठीच खर्च केल्याची पडताळणी करता आली नाही.

DGPAGPM8503 (Ref No : 39, Hmm No : 81)

## *12 घनकचरा विभागासाठी खरेदी करण्यात आलेल्या 1.1 घनमीटरचे कंटेनर, 4.5 घनमीटरचे कंटेनर व Handcart इ. च्या खरेदीमधील अनियमितताबाबत....*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 12**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 4665708.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 4665708.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 317988.00/-

***निविदेस व्यापक प्रसिद्धी दिली नाही. कामास दोनच निविदा प्राप्त असल्याने किमान दोन वेळा निविदेस मुदतवाढ देणे आवश्यक असताना केवळ एकदाच मुदतवाढ दिली आहे, त्यामुळे स्पर्धात्मक निविदा प्रक्रियेचा फायदा महापालिकेस झाला नाही. स्थायी समितीचा निविदा मान्यतेचा ठराव लेखापरीक्षणास उपलब्ध झाला नाही. मक्तेदारांची तांत्रिक लिफाफ्यातील कागदपत्रे लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाहीत. Test Report नसताना बिले अदा केल्याने रक्कम रु.46,65,708/- आक्षेपाधीन ठेवण्यांत येत आहे. कामाचा करारनामा व पुरवठा आदेश नस्तीत उपलब्ध झाले नाहीत. मालाचा पुरवठा केल्याबाबतची डिलिव्हरी चलने नस्तीत नसल्याने मालाचा केव्हा पुरवठा केला? याची खात्री होत नाही. सदरच्या कामांची रक्कम रु.46,65,708/- च्या खर्चाची प्रमाणके लेखापरिक्षणास उपलब्ध झाली नाहीत. सदरच्या कामाचे त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखापरीक्षण केले नाही. SPECIFICATION नुसार माल पुरवल्याबाबतचा आरोग्याधिकारी यांचा दाखला नस्तीत प्रकरणी समाविष्ट नाही. निविदा अट क्र.5 नुसार निविदाकारांनी निविदा दर हे सर्व करासहित नमूद करणेबाबत कळवले होते, परंतु देयक अदा करताना 5% मूल्यवर्धित कराची रक्कम पुरवठादाराच्या दरामध्ये समाविष्ट करून दिले आहेत. त्यामुळे पुरवठादारास रक्कम रु.3,17,988/- चे अतिप्रदान झाले असून ते वसूल करण्यात यावे.***

कामाचा तपशील :-

1. प्रशासकीय मान्यता.- मा. आयुक्त यांची दि.15.11.2013 च्या टिपणीस दि.21/11/13 रोजीची

मान्यता.

2. अंदाजित खर्च- a) 30 नग 1.1 घनमीटरचे कंटेनर - रु.25,00,000/-
b) 37 नग 4.5 घनमीटरचे कंटेनर - रु.25,00,000/-
c) 175 नग Handcart, 100lit. Capacity- रु.25,00,000/-

3. निविदेस मान्यता -

A) 1.1 घनमीटरचे कंटेनर = स्थायी समिती ठराव क्र.695 दि.13/02/15 अन्वये कार्योत्तर मान्यता.

B) 4.5 घनमीटरचे कंटेनर = स्थायी समिती ठराव क्र.696 दि.13/02/15 अन्वये कार्योत्तर मान्यता.

C) Handcart = स्थायी समिती ठराव क्र.697 दि.13/02/15 अन्वये कार्योत्तर मान्यता.

4. पुरवठा आदेश- 1) 1.1 घनमीटरचे कंटेनर = जा.क्र./आअ/भां1/487, दि.01/03/14.
2) 4.5 घनमीटरचे कंटेनर = जा.क्र./आअ/भां1/487, दि.01/03/14.
3) Handcart = जा.क्र./आरोग्याधिकारी 489, दि.01/03/14.

5. जाहीर निविदा नोटीसला मान्यता- मा. आयुक्त यांची दि.21/11/13 ची मान्यता.

6. निविदा कालावधी- दि.06/012/13 ते 26/12/13

7. प्राप्त निविदा- a) 30 नग 1.1 घनमीटरचे कंटेनर- 02
b) 37 नग 4.5 घनमीटरचे कंटेनर - 03
c) 175 नग Handcart, 100 lit. Capacity - 03.

7. मंजूर पुरवठादारांचा तक्ता-

| अ.क्र. | खरेदीची बाब | नग | पुरवठादाराचे नांव | वाटाघाटी नुसार टेंडर दर | कामाची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 1.1 घनमीटरचे कंटेनर | 90 | प्रगती स्टील फेब्रीकेशन व फायबर्स | 19,985/- | 17,98,650/- |
| 2 | 4.5 घनमीटरचे कंटेनर | 37 | प्रगती स्टील फेब्रीकेशन व फायबर्स | 43,434/- | 16,07,058/- |
| 3. | Handcart, 100 lit. Capacity | 175 | प्रगती स्टील फेब्रीकेशन व फायबर्स | 7200/- | 12,60,000/- |
| | एकूण खरेदीची रक्कम | | | | 46,65,708/- |

महानगरपालिका सोलापुर येथे आरोग्य खात्यामार्फत 2013-14 साठी 1.1 घनमीटरचे कंटेनर, 4.5 घनमीटरचे कंटेनर व Handcart इ. ची खरेदी ई-निविदा प्रक्रिया राबवून (तिन्ही बाबींसाठी स्वतंत्र निविदा) केली असून सदरची खरेदीच्या उपलब्ध करण्यात आलेल्या काही मूळ कागदपत्रांची व काही छायांकित कागदपत्रांच्या नस्तीची तपासणी केली असता त्याअनुषंगाने निदर्शनास आलेल्या उणीवाबाबत अर्धसमास क्रमांक 91 दि. 22/12/2017 अन्वये खुलासा मागविला असता विभागाने कोणताही खुलासा सदर केला नसल्याने लेखापरीक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. सदरच्या प्रत्येक कामाचा अंदाजित खर्च 25,00,000/- असल्याने किमान एका जिल्हास्तरीय व एक राज्यस्तरीय वृत्तपत्रात जाहिरात देणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही न केल्याने निविदेस व्यापक प्रसिद्धी दिली नाही. तसेच 1.1 घ.मी. चे कंटेनर पुरवण्याच्या कामास दोनच निविदा प्राप्त असल्याने किमान दोन वेळा निविदेस मुदतवाढ देणे आवश्यक असताना केवळ एकदाच मुदतवाढ दिली आहे, त्यामुळे स्पर्धात्मक निविदा प्रक्रियेचा फायदा महापालिकेस झाला नाही.
2. स्थायी समितीचा निविदा मान्यतेचा ठराव लेखापरीक्षणास उपलब्ध झाला नाही.
3. मक्तेदारांची तांत्रिक लिफाफ्यातील कागदपत्रे लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाहीत, तसेच निविदा दराची (E- tender द्वारे पुरवठादारानी सादर केलेले दर) कागदपत्रे लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाहीत, त्यामुळे निविदा केव्हा उघडल्या व मूळ निविदा दराची खात्री करता आली नाही.
4. सदरच्या 1.1 घ.मी. चे कंटेनर पुरवण्याच्या कामाच्या निविदा काढण्यापुर्वी मा. आयुक्त यांनी बाजारातून दराबाबत तोंडी चौकशी करणेबाबत आदेश दिले असता प्रगती स्टील फेब्रीकेशन व फायबर्स यांचा 1.1 घनमिटरचे कंटेनरसाठी प्रती नग दर रु.15,750/- व MSSIDC चा प्रती नग दर रु.13,900/- असल्याचे टिपणी आ.क्र.152 दि.04/09/13. मध्ये नमूद आहे. तसेच MSSIDC च्या साहित्याचा दर्जा उच्च असल्याचे नमूद आहे. तथापि त्यांना पुरवठा आदेश दिले नाहीत.
5. देयके अदा करण्यापूर्वी साहित्याचा महाराष्ट्र शासन औद्योगिक प्रशिक्षण संस्था, विजापूर रोड, सोलापूर यांचेकडून Test Report तपासुन घेतलेला नाही. त्यामुळे साहित्याच्या दर्जाची खात्री पटत नाही. Test Report नसताना बिले अदा केल्याने रक्कम रु.46,65,708/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.
6. कामाचा करारनामा व पुरवठा आदेश नस्तीत उपलब्ध झाले नाहीत.
7. मालाचा पुरवठा केल्याबाबतची डिलिव्हरी चलने नस्तीत नसल्याने मालाचा केव्हा पुरवठा केला? याची खात्री होत नाही.
8. मक्तेदार श्री. बसव इंडस्ट्रीज. यांचे दि.05/09/14 च्या बिल रक्कम मागणीच्या पत्रानुसार त्यांनी 2000 लिटर फिनेल पैकी 1000 लिटर फिनेलचा पुरवठा केला असून त्याच्या रक्कमेची मागणी केली आहे. त्यानुसार रक्कम वेळेत अदा केलेचे दिसत नसून उर्वरित 1000 लिटर फिनेलचा पुरवठा करणे बाकी असल्याचे दिसत आहे. त्यामुळे मालाचा पुरवठा वेळेत झाला नाही.
9. सदरच्या कामांची रक्कम रु.46,65,708/- च्या खर्चाची प्रमाणके लेखापरिक्षणास उपलब्ध झाली नाहीत. त्यामुळे देयकातून कपात करावयाच्या रक्कमांची तपासणी करता आली नाही.

| अ.क्र. | साहित्याचा तपशील | बिल क्र. | दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1. | 1.1 घनमिटरचे कंटेनर | 08 | 25.06.14 | 17,98,650/- |
| 2. | 4.5 घनमिटरचे कंटेनर | 03 | 26.05.13 | 16,07,058/- |
| 3. | Handcart | 12 | 15.07.14 | 12,60,000/- |
| | एकूण खरेदीची रक्कम | | | 46,65,708/- |

10. सदरच्या कामाचे त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखापरीक्षण केले नाही.
11. SPECIFICATION नुसार माल पुरवल्याबाबतचा आरोग्याधिकारी यांचा दाखला नस्तीत प्रकरणी समाविष्ट नाही.
12. डी.एस. विभागाकडील साठ नोंदवहीची तपासणी केली असता पृष्ठ क्र.94, 95, 96 वर

खालीलप्रमाणे नोंदी आढळून आल्या.

| पृष्ठ क्र. | बाब | प्राप्त नग | माल मिळाल्याचा दिनांक | रक्कम रु.( निविदा दर + 5% विक्रीकर) |
|---|---|---|---|---|
| 94 | 4.5 घनमिटरचे कंटेनर | 20 | 71/दि.9.12.14 | 868680 + 43434 |
| 94 | 4.5 घनमिटरचे कंटेनर | 37 | 72/दि.9.12.14 | 1607058 + 80353 |
| 95 | 1.1 घनमिटरचे कंटेनर | 35 | 70/ दि.9.12.14 | 699475 + 41269 |
| 95 | 1.1 घनमिटरचे कंटेनर | 90 | 62/21.05.14 | 1798650 + 89932 |
| 96 | Handcart | 175 | --- | 1260000 + 63000 |

8) उपरोक्त नोंदीवरून मालाचा पुरवठा विलंबाने केलेला दिसत आहे, परंतु करारनामा व पुरवठा आदेश उपलब्ध न झाल्याने विलंब आकाराची गणना करता आली नाही, तथापि विलंब आकाराची गणना करून पुरवठादाराकडून विलंब दंड वसूल करणेत यावा.

9) निविदा अट क्र.5 नुसार निविदाकारांनी निविदा दर हे सर्व करासहित नमूद करणेबाबत कळवले होते, परंतु देयक अदा करताना 5% मूल्यवर्धित कराची रक्कम पुरवठादाराच्या दरामध्ये समाविष्ट करून दिले आहेत. त्यामुळे पुरवठादारास रक्कम रु.3,17,988/- चे अतिप्रदान झाले असून ते वसूल करण्यात यावे.

DGPAGPM8503 (Ref No : 51, Hmm No : 91)

## *13 नविन अन्न व्यवसाय परवाना देताना झालेल्या अनियमितेबाबत.....*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***परवाना धारकांना नवीन परवाना देताना अर्जदाराकडे मुंबई दुकाने व संस्था अधिनियम, 1948 नमुना क(ड) महाराष्ट्र दुकाने व संस्था नियम 1961 च्या नियम 6 अन्वये व्यवसायाच्या नोंदणीचा दाखला असणे आवश्यक असताना अन्न व परवाना विभागाकडून व्यवसायधारकाकडे व्यवसायाच्या नोंदणीचा दाखला नसताना अन्न व परवाना विभागाकडून नवीन परवाना देण्यात आलेला आहे.***

सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या अन्न व परवाना विभागाकडून विविध प्रकारचे परवाने देण्यात येतात. अन्न व परवाना विभागाने वित्तीय वर्ष 2013-14 मध्ये कोणकोणते परवाने देण्यात आले आहेत, याबाबतच्या नस्त्याची मागणी अन्न व परवाना विभागाकडे केली असता विभागाकडून याबाबत फक्त एकच नस्ती लेखापरीक्षणास प्राप्त झाली. सदर नस्तीचे लेखापरीक्षण केले असता खालील अर्जदाराना व्यवसाय परवाने देण्यात आलेले आहेत.

| अ.क्र. | परवाना धारकाचे नाव | व्यवसायाचे नांव |
|---|---|---|
| 1 | श्री. सचिन ब्रम्हदेव थोरात | थंडपेय |
| 2 | श्री. सिध्देश्वर बेकरी | बेकरी |
| 3 | श्री. विलास चंद्रकांत स्वामी | खाद्यपदार्थ तयार करुन विक्री करणे |
| 4 | श्री. शिवाजी गणपत सलगर | शितपेय |
| 5 | श्री. रिझवान जावीद हुसेन | शितपेय |
| 6 | श्री.आकाश परमानंद खानचांदनी | शितपेय |
| 7 | श्री. अमजद हुसेन हाजी भोलुमिया | वनस्पती खाद्य तेल व्यापारी |
| 8. | हिजी म. फय्याज कय्युम शेख | पेंटिंग करणे |
| 9 | हिजी म. फय्याज कय्युम शेख | इलेक्ट्रिक पावर वर्कशॉप |
| 10. | श्री. महेंद्र सुधाकर आठवले | खाद्यपदार्थ |
| 11 | श्री. अजीज शब्बीर दुरुगकर (बागेवान) | शितपेय |
| 12 | श्री. संजय हरीलाल यादव | इलेक्ट्रिक पावर स्टील फर्निचर |
| 13 | श्री. म. रफिक म. इसाक शेख | इलेक्ट्रिक पावर व इंजिनिअरिंग वर्क्स |
| 14 | श्री. रिझवान जावीद हुसेन बेलीफ | खानावळ |
| 15 | श्री. अजीज शब्बीर दुरुगकर (बागेवान) | खानावळ |
| 16 | श्री. शिवाजी गणपत सलगर | हॉटेल |
| 17 | श्री.आकाश परमानंद खानचांदनी | खाद्यपदार्थ |
| 18 | उस्मान मो.इक्बाल त्रदाफ | बेकारीमाल उत्पादन विक्री |
| 19 | श्री. महादेव कलप्पा सिंदगी | शितपेय |
| 20 | श्री. हाजीअली मुसुफअली खातीब | खानावळ |
| 21 | सौ.स्वाती शरद चव्हाण | खानावळ |

उपरोक्त परवानाधारकांना नवीन परवाना देताना अर्जदाराकडे मुंबई दुकाने व संस्था अधिनियम, 1948 नमुना क(ड) महाराष्ट्र दुकाने व संस्था नियम 1961 च्या नियम 6 अन्वये व्यवसायाच्या नोंदणीचा दाखला असणे आवश्यक असताना सदर व्यवसायधारकाकडे व्यवसायाच्या नोंदणीचा दाखला नसताना अन्न व परवाना विभागाकडून नवीन परवाना देण्यात आलेला आहे, हे नियमबाह्य आहे.

यासंदर्भात अर्धसमास पत्र क्रमांक 113 दिनांक 29/01/2017 अन्वये विभागास विचारणा केली असता विभागाने याबाबतचे अनुपालन सादर केलेले नाही. त्यामुळे सदरचे आक्षेप कायम करण्यात आलेला आहे.

## *14 गलिच्छ वस्ती सुधारणा (वसुली) कार्यालय श्री ए.यु.कोरबू,व.श्रे लिपीक (संध्या निलंबीत)यांचेकडून झालेल्या अपहार रक्कम रु.2378291/-बाबत. (2013-14)*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 06**

*लेखा शीर्ष : सामान्य प्रशासन विभा मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 2378291.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 2378291.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 2378291.00/-

***श्री अकबर उमर कोरबु हे आकारणी व वसुली अधिकारी गलिच्छ वस्ती सुधारणा कार्यालयाकडे वरीष्ठ श्रेणी लिपीक( वसुली इन्स्पेक्टर) म्हणुन कार्यरत असतांना रोज बँकेत जाऊन रोख व चेकचा भरणा आय सी आय सी बँकेत जमा करणे हे काम त्यांना दिनांक 12/01/2012 ते दि.11/10/2013 पर्यंत देण्यांत आलेले होते. मुख्यलेखापाल यांचे जा.क्र.मुले-6 दिनांक 14/10/13 ने दिनांक 30/9/13 रोजी एकूण भरण्यामध्ये रक्कम रु.9000/- ची तफावत असलेबाबतचे पत्र आकारणी व वसुली अधिकारी गलिच्छ वस्ती सुधारणा कार्यालयास प्राप्त झाले होते. श्री कोरबु यांचेकडील चलन बुकाची चौकशी केली असता ते दिनांक 15/10/13 पासुन चलन बुकासहीत गैरहजर असल्याचे निदर्शनास आले होते. महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम 1979 च्या 4(1)(क) अन्वये व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 56(2) मधील (फ) मधील तरतुदीनुसार श्री कोरबु यांचे निलंबन केले आहे. तसेच दिनांक 23/10/13 ला पोलीस स्टेशनमध्ये गु.र.नं.313 अन्वये श्री ए.यु.कोरबू यांच्या विरोधात रु.289998/- च्या अपहार प्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.***

श्री अकबर उमर कोरबु हे आकारणी व वसुली अधिकारी गलिच्छ वस्ती सुधारणा कार्यालयाकडे वरीष्ठ श्रेणी लिपीक(वसुली इन्स्पेक्टर) म्हणुन कार्यरत असतांना रोज बँकेत जाऊन रोख व चेकचा भरणा आय सी आय सी बँकेत जमा करणे हे काम त्यांना दिनांक 12/01/2012 ते दि.11/10/2013 पर्यंत देण्यांत आलेले होते.

मुख्यलेखापाल यांचे जा.क्र.मुले-6 दिनांक 14/10/13 ने दिनांक 30/9/13 रोजी एकूण भरण्यामध्ये रक्कम रु.9000/- ची तफावत असलेबाबतचे पत्र आकारणी व वसुली अधिकारी गलिच्छ वस्ती सुधारणा कार्यालयास प्राप्त झाले होते. श्री कोरबु यांचेकडील चलन बुकाची चौकशी केली असता ते दिनांक 15/10/13 पासुन चलन बुकासहीत गैरहजर असल्याचे निर्दक्षनास आले होते.

महाराष्ट्र नागरी सेवा ( शिस्त व अपील)नियम 1979 च्या 4(1)(क) अन्वये व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 56(2) मधील (फ) मधील तरतुदीनुसार श्री कोरबु यांचे निलंबन केले आहे. तसेच दिनांक 23/10/13 ला पोलीस स्टेशनमध्ये गु.र.नं.313 अन्वये श्री ए.यु.कोरबू यांच्या विरोधात

सोलापूर महानगरपालिका

रु.289998/-च्या अपहार प्रकरणी गुन्हा दाखल केला आहे

अपहाराचे विवरणपत्र खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | दिनांक | एकत्रित किर्दी प्रमाणे एकूण भरणा रक्कम | ICIC बँकविवरण पत्रानुसार बँकेत प्रत्यक्ष भरणा रक्कम | चलन पुस्तक क्रमांक | चलन क्र. व दिनांक | किर्दीनुसार भरणा रकमेपेक्षा कमी झालेली भरणा रक्कम | अपहार रक्कम रुपये | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | 12/1/12 | 158462 | निरंक | 173 | 17219/ 13-1-12 | 158462 | 158462 | बँकेत जमा नाही |
| 2 | 22/3/12 | 127872 | 27872 | 173 | 17271/ 26-3-12 | 100000 | 100000 | बँकेत जमा नाही |
| 3 | 19/4/12 | 121962 | 21962 | 160 | 15912/ 30-4-12 | 100000 | 100000 | बँकेत जमा नाही |
| 4 | 15/5/12 | 69542 | 29542 | 160 | 15932/ 16-5-12 | 40000 | 40000 | |
| 5 | 25/6/12 | 120040 | 30040 | -- | 15964/ 26-6-12 | 90000 | 90000 | |
| 6 | 9/7/12 | 73544 | 33544 | 160 | 15975/ 10-7-12 | 40000 | 40000 | |
| 7 | 10/7/12 | 137470 | 37470 | 160 | 15998/ 8-8-12 | 50000 | 50000 | |
| 8 | 7/8/12 | 96089 | 46089 | 160 | 15998/ 8-8-12 | 50000 | 50000 | |
| 9 | 14/8/12 | 76975 | 36975 | 324 | 32303/ 16-8-12 | 40000 | 40000 | |
| 10 | 10/9/12 | 119066 | 19066 | 324 | 32321/ 11-9-12 | 100000 | 100000 | |
| 11 | 27/9/12 | 138596 | 38596 | 324 | 32324/ 28-9-12 | 100000 | 100000 | |
| 12 | 17/10/12 | 90633 | 30633 | 324 | 32347/ 18-10-12 | 60000 | 60000 | |
| 13 | 18/10/12 | 126565 | 26565 | 324 | 32348/ 19-10-12 | 100000 | 100000 | |
| 14 | 29/10/12 | 113943 | 13943 | 324 | 32355/ 30-10-12 | 100000 | 100000 | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 15 | 5/11/12 | 94304 | 34304 | 324 | 32361/ 6-11-12 | 60000 | 60000 | |
| 16 | 9/11/12 | 105850 | 35850 | 324 | 32365/ 12-11-12 | 70000 | 70000 | |
| 17 | 16/11/12 | 145268 | 45268 | 324 | 32367/ 17-11-12 | 100000 | 100000 | |
| 18 | 29/11/12 | 174792 | 74792 | 324 | 32376/ 30-11-12 | 100000 | 100000 | |
| 19 | 17/12/12 | 102059 | 42059 | 324 | 32390/ 18-12-12 | 60000 | 60000 | |
| 20 | 20/12/12 | 207963 | 107963 | 324 | 32393/ 21-12-12 | 100000 | 100000 | |
| 21 | 16/1/13 | 153213 | 53213 | 385 | 38412/ 17-1-13 | 100000 | 100000 | |
| 22 | 21/1/13 | 145433 | 45733 | 385 | 38417/ 23-1-13 | 100000 | 100000 | |
| 23 | 29/1/13 | 170181 | 70181 | 385 | 38421/ 30-1-13 | 100000 | 100000 | |
| 24 | 25/2/13 | 97381 | 57381 | 385 | 38441/ 26-2-13 | 40000 | 40000 | |
| 25 | 11/3/13 | 98273 | 68273 | 385 | 38452/ 12-3-13 | 30000 | 30000 | |
| 26 | 12/3/13 | 142196 | 42196 | 385 | 38453/ 13-3-13 | 100000 | 100000 | |
| 27 | 12/4/13 | 70169 | 50169 | 696 | 69510/ 15-4-13 | 20000 | 20000 | |
| 28 | 25/9/13 | 116794 | 56794 | 493 | 49234/ 26-9-13 | 60000 | 60000 | |
| 29 | 27/9/13 | 127530 | 27530 | 493 | 49237/ 30-9-13 | 100000 | 100000 | |
| 30 | 11/10/13 | 59829 | निरंक | पुस्तक गहाळ | -- | 59829 | 59829 | |
| | एकूण अपहाराची रक्कम रु. | | | | | | 2378291 | |

उपरोक्त विवरणपत्रानुसार दिनांक 12/01/2012 ते दि.11/10/2013 पर्यंत एकूण रक्कम रु.2378291/- रक्कमेचा अपहार झालेला आहे.

श्री ए.यु.कोरबू,यांच्या गलीच्छ वस्ती सुधारणा (वसुली) विभागाकडील कार्यकालाची तपासणी सामान्य प्रशासन विभागाअंतर्गत मुख्य लेखापरीक्षक,मुख्यलेखापाल कार्यालयातील प्रत्येकी एक अधिकारी दिनांक 23/12/2013 रोजी गठीत करुन कोरबू यांच्या अभिलेख्याची तपासणी केली व

समितीने आपला अंतिम अहवाल दिनांक 23/12/2013 रोजी मा.आयुक्त यांचेकडे सादर केला आहे. सदर समितीने रक्कम रु.2378291/- इतक्या रक्कमेचा अपहार झाल्याचे सोबतच्या विवरणपत्रानुसार निर्दशात आणले आहे.

वित्तीय वर्ष 2011-12, 2012-13 व 2013-14 चा मुळ रेकार्ड मा.मुख्य न्याय दंडाधिकारी कोर्ट क्र.1 जिल्हा न्यायालय सोलापुर येथे पावती बुक एकूण संख्या 246 सादर केलेली आहेत. त्यामुळे सदरचे अभिलेख लेखापरिक्षणास सादर करण्यात आलेले नाहीत.

1) उपरोक्त बाबत विभागाने एकत्रित किर्द व बँक विवरणपत्र यांचेशी ताळमेळ घेतला असता तर अपहार झालाच नसता.

2) यासारखे गैरव्यवहार/अफरातफर महानगरपालिकेच्या इतर विभागात झाले असल्यास त्याबाबत लेखापरीक्षणास अवगत करण्याबाबत कळवले असता त्याबाबतची कोणतीही माहीती उपलब्घ केली नाही.

3) अशी अनियमितता/गैरव्यवहार पुन्हा होऊ नयेत म्हणून महानगरपालिकेने कोणत्या उपाययोजना राबविल्या ते लेखापरीक्षणास अवगत करणेबाबत कळविले असता त्याबाबतची कोणतीही माहीती उपलब्घ केली नाही.

4) 2013-14 मध्ये कीती पावत्या छपाई केल्या त्यांची देयके,प्राप्त पावती पुस्तके व शिल्लक पावती पुस्तके,वापर केलेली पावती पुस्तकांची संख्या इ. माहीती व पावती पुस्तक (साठा नोंदवहीप्रमाणे) उपलब्ध करुन दिली नाही.

5) सदर गुन्हयाच्या बाबतीत पुढील कार्यवाहीबाबत व निकालाबाबत तसेच सदरच्या रक्कमेच्या वसुलीबाबत स्थानिक निधी लेखापरिक्षण विभाग,कोकण भवन,नवी मुंबई यांस व मा विभागीस आयुक्त,पुणे यांना माहिती कार्यवाही झाल्यानंतर सादर करावी.

वरील अपहाराबाबत विभागाला अर्धसमास ज्ञापन क्र.100 दिनांक 05/01/2018 नुसार खुलासा सादर करण्याबाबत कळविले असता विभागाने त्यांचे पत्र क्र.गवसु/499दिनांक 31/01/2018 नुसार ग.व.सु कार्यालय श्री ए.यु.कोरबू (व.श्रेलि) यांची केस न्यायालय कोर्ट मध्ये केस चालू असल्याने सदरची माहिती न्याय प्रविष्ठ आहे.असा खुलासा सादर केलेला आहे. मा.दंडाधिकारी सोलापुर येथे केस चालू असुन सदर कालावधीला रेकॉर्ड कोर्टात सादर केलेला आहे. असे विभागाने कळविलेले आहे. त्यामुळे वरील आक्षेप कायम ठेवण्यांत येत आहे. मा. कोर्टाच्या अंतिम निर्णयानुसार कार्यवाही करण्यांत यावी.

FDSJRDM6801 (Ref No : 89, Hmm No : 100)

## *15 वित्तीय वर्ष 2013-14 या कालावधीमध्ये सोलापुर महानगरपालिकेच्या सर्व खात्यातील रेकार्ड स्कॅनिंग करणेकामी स्कॅनर खरेदीमधील झालेल्या अनियमितताबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**अनियमितता संख्या : 10**

*लेखा शीर्ष : संगणक विभाग मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 3696400.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 3696400.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 153035.00/-

***एकूण किती निविदा प्राप्त झाल्या आहेत याचा तपशिल, तसेच प्राप्त निविदा दर, तुलनात्मक तक्ता, मंजूर किमान निविदा दर व तांत्रिक कागदपत्रे लेखापरिक्षणास उपलब्ध केली नाहीत. काम पुर्ण झाल्याचे अभिलेख्यावरुन दिसुन येत नाही. सर्व साहित्याची नोंद जडसंग्रह नोंदवहीमध्ये घ्यावयाची आहे. ती घेतली नाही. बिलातुन 49 दिवसाचे विलंब दंड रु. 250/- प्रमाणे रक्कम रु.12500/- वसुल केलेली आहे. उर्वरित फरकाची रक्कम रु.12500/- साई सर्व्हीसेस यांचेकडून वसुल करुन महानगरपालिका यांचे निधीमध्ये जमा करावी. फरकाची LBT रक्कम रु140535/- साई सर्व्हीसेस यांचेकडुन वसुल करुन महानगरपालिका यांचे निधीमध्ये जमा करावी. शासकिय प्रयोगशाळेकडून फॅक्टरी रिपोर्ट घेतलेला नाही. बँक गॅरेन्टी रक्कम रु.1,44,000/- ची श्री साई सर्व्हीसेस यांचेकडून घेतल्याचे दिसुन येत नाही.***

जनन-मयत दाखले, बांधकाम परवाने दाखले मिळकतीचे विविध प्रकारच्या कामांचे रेकार्ड Digitization होणे आवश्यक आहे. त्यामुळे मुळ रेकार्ड जतन करण्यासाठी विविध खात्याची स्कॅनिंगची सोय होणे आवश्यक आहे. त्यासाठी खालील नमुद स्पेशिफिकेशन नुसार स्कॅनर खरेदी करणे आवश्यक आहे.

| Sr.No | SMC Dept.List | A-4 size Scanner | All in one Scanner, Printer, Fax | A-3 size Scanner(High Quality) | A-3 size Scanner(Medium Quality) | Plotter |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Commissioner Office | 0 | 1 | 0 | | |
| 2 | Asstt. Commissioner(G) | 0 | 1 | 0 | | |
| 3 | Asstt. Commissioner(R) | 0 | 1 | 0 | | |
| 4 | Asstt. Commissioner(Spl. | 0 | 1 | 0 | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 5 | GAD | 5 | 1 | 0 | 1 | |
| 6 | Extension Property Tax | 2 | 1 | 0 | 1 | |
| 7 | Assessor and Collector | 2 | 1 | 0 | 1 | |
| 8 | Labour welfare and public relation | 1 | 0 | 0 | 1 | |
| 9 | Internal Audit | 0 | 1 | 0 | 0 | |
| 10 | Legal Advisor | 0 | 1 | 0 | 1 | |
| 11 | Deputy Registrar | 0 | 1 | 0 | 0 | |
| 12 | Record Keeper | 1 | 1 | 0 | 2 | |
| 13 | Chief Accountant | 2 | 1 | 0 | 2 | |
| 14 | Chief Audit | 1 | 1 | 0 | 1 | |
| 15 | Municipal Secretary | 3 | 1 | 0 | 1 | |
| 16 | Public Health Engineer | 10 | 2 | 1 | 3 | |
| 17 | Fire Brigade | 0 | 1 | 0 | 0 | |
| 18 | City Engineer | 10 | 1 | 1 | 4 | |
| 19 | Garden | 0 | 1 | 0 | 0 | |
| 20 | Light | 0 | 1 | 0 | 0 | |
| 21 | Land & Estate | 1 | 1 | 0 | 1 | |
| 22 | Sports | 0 | 1 | 0 | 0 | |
| 23 | UCD | 1 | 1 | 0 | 1 | |
| 24 | Slum | 0 | 1 | 0 | 1 | |
| 25 | Market | 0 | 1 | 0 | 0 | |
| 26 | Health | 5 | 1 | 0 | 1 | |
| 27 | Food & License | 0 | 1 | 0 | 1 | |
| 28 | Antiencroachment | 0 | 1 | 0 | 0 | |
| 29 | LBT | 5 | 1 | 1 | 1 | |
| 30 | Building Permission | 2 | 1 | 1 | 0 | |
| 31 | Nagar Rachna | 1 | 1 | 0 | 1 | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 32 | Zone No.1 | 0 | 1 | 0 | 1 | |
| 33 | Zone No.2 | 0 | 1 | 0 | 1 | |
| 34 | Zone No.3 | 0 | 1 | 0 | 1 | |
| 35 | Zone No.4 | 0 | 1 | 0 | 1 | |
| 36 | Zone No.5 | 0 | 1 | 0 | 1 | |
| 37 | Zone No.6 | 0 | 1 | 0 | 1 | |
| 38 | Zone No.7 | 0 | 1 | 0 | 1 | |
| 39 | Zone No.8 | 0 | 1 | 0 | 1 | |
| 40 | Woman Welfare | 0 | 1 | 0 | 0 | |
| | Total | 52 | 40 | 4 | 33 | |

या करिता पुढीलप्रमाणे खर्च केला आहे.

| Sr.No | Technical Specification | Quantaty | Rate/Qty. in Rs. | Total Rs. | Remark |
|---|---|---|---|---|---|
| 1 | A-4 size Scanner Flatbed Scanner | 52 | 5200 | 270400 | Rates including installation |
| 2 | All in one (Scanner, Printer) Fax | 40 | 21000 | 840000 | |
| 3 | A-3 size Scanner (High Quality) | 4 | 175000 | 700000 | |
| 4 | A-3 size Scanner (Medium Quality) | 33 | 22000 | 726000 | |
| 5 | Plotter | 1 | 1160000 | 1160000 | |
| | Total | 130 | | 3696400 | |

निविदा प्रक्रिया खालील प्रमाणे आहे.
बयाणा रक्कम रु.74000/-, निविदा नमुना रु.2000/-
ई निविदा प्रसिध्दी 3/3/14 10 वाजता
ई दस्ताऐवज लोड प्रारंभ 3/3/14 11 वाजता
ई निविदा दस्ताऐवज डाऊनलोड समाप्त 18/3/14 सा.5.30 मिनीट
ई निविदा उघडणार 27/3/14 दुपारी 1.00 वाजता

शासनाच्या आदेशानुसार ई निविदा उघडताना नियुक्त प्रतीनिधीपैकी किमान दोन प्रतीनिधीसमोर निविदा उघडण्यात येऊन त्यावर समंतीदर्शक स्वाक्षरी घेणे आवश्यक आहे. तशी कार्यवाही झालेली नाही.

तरी वरील प्रकारची योजना राबविणेसाठी रक्कम रु 3696400/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदर रक्कम नियोजन समिती, जिल्हा अधिकारी कार्यालय यांचेकडून सन 2013-14 मध्ये रक्कम

मिळणेबाबत दिनांक 26/2/14 रोजी पत्र पाठविले आहे.

प्रशासकिय मान्यता आदेश क्र.2013-14/जिनिस/सं.स-4/जिवायो/प्रमा/प्र.क.92/605 दिनांक 26/2/14 आहे.

लेखाशिर्ष (40) (03) नाविन्यपुर्ण योजना (34311632) 52 यंत्रासामुग्री व साधनसरामुग्री रक्कम रु.36.96 लाख निधी जिल्हा अधिकारी कार्यालयाकडून वित्तीय वर्ष 2013-14 मध्ये कधी प्राप्त झाला आहे. याचा तपशील निरीक्षण पथकास सादर केलेला नाही.

सदरबाबत खालीलप्रमाणे त्रुटी आढळून येते.

1) एकूण किती निविदा प्राप्त झाल्या आहेत याचा तपशिण,lतसेच प्राप्त निविदा दर, तुलनात्मक तक्ता, मंजूर किमान निविदा दर व तांत्रिक कागदपत्रे लेखापरिक्षणास उपलब्ध केली नाहीत. Satyam sales, Editice Corpotion Technologies, Parmeshwari Enterpises यांची निविदा तसेच सर्व निविदाधारक यांचा तुलनात्मक तक्ता नस्तीमध्ये दिसुन येत नाही. तसेच स्पेशिफिकेशनमध्ये जे दर दिलेले आहे त्याचे बाजार मुल्य कसे ठरविले याबाबत कोटेशन निविदा नस्तीमध्ये नाही.

2) शासनाचे निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचना नियम निकषानुसार करणे बंधनकारक आहे त्याप्रमाणे सदर निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली नाही.

3) सदर मार्च 2014 अखेरपर्यंत पुर्ण करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे काम पुर्ण झाल्याचे अभिलेख्यावरुन दिसुन येत नाही.

4) स्कॅनर खरेदी करताना ती राज्य शासनाच्या दरकराराप्रमाणे करावयाची आहे. त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

5) सर्व साहित्याची नोंद जडसंग्रह नोंदवहीमध्ये घ्यावयाची आहे. ती घेतली नाही.

6) मंजुर निविदाकाराने तत्सम प्रकारचे काम हे कमीत कमी निविदेच्या 50 टक्के रक्कमे इतके शासकीय संस्थेत केले पाहीजे. तसेच त्याची आर्थिक उलाढाल ही साधारणता निविदेच्या रक्कमेइतकी असायला पाहीजे. त्याप्रमाणे कार्यवाही केल्याचे दिसुन येत नाही.

7) साई सर्व्हीसेस यांनी तीन वर्षाचे आयकर विवरणपत्र सादर केले नसताना त्याची निविदा पात्र ठरवून पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. हे नियमबाहय आहे.

8) साई सर्व्हीसेस यांचे दरासोबत वाटाघाटी करुन रक्कम रु 3876400/- खर्चास करारनामा करुन घेणेस व वर्क ऑर्डर देणेस मा.स्थायी समितीकडे पाठविण्याचे 1 जुलै 2014 रोजी मुख्य लेखा परीक्षक तसेस मा. आयुक्त यांनी दिनांक 16/08/14 ला मान्यता दिलेली आहे.

करारनामामध्ये खालीलप्रमाणे त्रुटी आढळून येतात.

1) करारनामा कधी केला याबाबत स्वाक्षरी नाही.

बी) करारनामामध्ये किती स्कॅनर खरेदी करणार व त्याची किमंत इ. तपशिल नमुद केला नाही.

सी) बँक गॅरेन्टी रक्कम रु.1,44,000/- ची श्री साई सर्व्हीसेस यांचेकडून घेतल्याचे दिसुन येत नाही.

डी) करारनामामध्ये Advance देणेबाबत तरतुद नसताना साई सर्व्हीसेस यांना Advance दिलेला आहे.

ई) करारनाम्यातील अट क्र.5 नुसार स्कॅनर खरेदी केलेल्या विभागातील कर्मचारी यांना

स्कॅनर ऑपरेट करण्याबाबत प्रशिक्षण दिले जाईल, असे असताना कर्मचा-यांना प्रशिक्षण दिलेले नाही.

एफ) करारनाम्यातील अट क्र.8 नुसार मालाची योग्यता व गुणवत्ता, नियुक्त केलेले अधिकारी अथवा एजन्सी यांचेकडून वस्तु सुस्थितीत आहे असे प्रमाणपत्र दिल्यानंतरच मालाचे प्रदान केले जाईल अशी तरतुद आहे. तथापी सदरची कार्यवाही पुर्ण न करता साई सर्व्हीसेस यांना मालाचे देयक अदा केलेले आहे.

जी) करारनामामध्ये मालाचा पुरवठा उशिरा प्राप्त झाला तर रु.500/- प्रती दिवसाप्रमाणे वसुल करुन रक्कम महानगरपालिका यांचे निधीमध्ये जमा करावयाची आहे. तथापि बिलातुन 49 दिवसाचे विलंब दंड रु. 250/- प्रमाणे रक्कम रु.12500/- वसुल केलेली आहे. उर्वरित फरकाची रक्कम रु.12500/- साई सर्व्हीसेस यांचेकडून वसुल करुन महानगरपालिका यांचे निधीमध्ये जमा करावी.

9) अग्रिम रक्कम रु.1725600/- तसेच दुसरे बील रक्कम रु.2022000/- असे एकूण रु.3747600/- यावर 0.25% LBT रु.9669/- वसुल केलेली आहे. तथापी 4% प्रमाणे LBT वसुल होणे आवश्यक आहे. फरकाची LBT रक्कम रु140535/- साई सर्व्हीसेस यांचेकडुन वसुल करुन महानगरपालिका यांचे निधीमध्ये जमा करावी.

10) शासकिय प्रयोगशाळेकडून फॅक्टरी रिपोर्ट घेतलेला नाही.

स्कॅनर खरेदीची यादी जिल्हाधिकारी कार्यालयास निधी मंजुर करताना सादर केली तेवढेच स्कॅनर खरेदी करणे आवश्यक असताना निविदा मंजूर करताना स्कॅनरच्या संख्येचा उल्लेख न केल्यामुळे महानगरपालिकेने कमी साहित्याची खरेदी केलेली आहे.

| | स्कॅनरचा प्रकार | जिल्हा अधिकारी कार्यालयास सादर केलेली स्कॅनरची संख्या | साई सर्व्हीसेस यांचेकडून खरेदी केलेले नची संख्या | कमी खरेदी केलेले स्कॅनची संख्या |
|---|---|---|---|---|
| 1 | A-4 size Scanner Flatbed Scanner | 52 | 23 | 29 |
| 2 | All in one (Scanner, Printer) Fax | 40 | 28 | 12 |
| 3 | A-3 size Scanner (High Quality) | 4 | 3 | 1 |
| 4 | A-3 size Scanner (Medium Quality) | 1 | -- | 1 |

वरील असलेल्या त्रुटीबाबत विभागाला अर्धसमास ज्ञापन क्र.117 दिनांक 02/02/2018 खुलासा सादर करण्याबाबत कळविले असता विभागाने खुलासा सादर केलेला नाही. त्यामुळे वरील आक्षेप कायम ठेवण्यांत येत आहे.

## *16 सोलापुर महानगरपालिका तसेच जिल्हा अधिकारी कार्यालय व इतर ठिकाणी सी.सी.टीव्ही कॅमेरे बसवतांना झालेल्या अनियमितताबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 21**

*लेखा शीर्ष : संगणक विभाग मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 17992145.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 17992145.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 675243.00/-

***सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्र.मतंसं,नस्ती.2012, प्र.क्र.273/39 दिनांक 16.01.2013 नुसार सदरच्या कामाची ई- निवीदा काढलेली नाही. सदर निविदेतील M.K.Engineering and co. यांनी दोन वर्षाच्या AMC साठी रक्कम रु.1787850/- इतकी रक्कम निविदेमध्ये भरली असतांना साई ऐंटरप्रायजेस ला वाटाघाटी न करता रक्कम रु.3000000/- दराने AMC ला मंजुरी दिलेली आहे. निविदा प्रक्रिया नियमबाहयरित्या राबविलेली आहे. बिलावर माल सुस्थितीत व योग्य दर्जाचा असल्याबाबत विद्युत विभागाकडून अभिप्राय नोंदविणे आवश्यक असताना तो नोंदविल्याचे दिसुन येत नाही. तसेच शासकिय प्रयोगशाळेकडून Test Report घेतलेला नाही. सदर कॅमेरे कोठे बसविले आहेत याबाबतचा कार्यकारी अभियंता विदयुत विभाग यांचा अहवाल घेतल्याचे दिसुन येत नाही. निविदेत मालाचा पुरवठा Specificed Company Zicom as per tender submitted) Material along with U.L.Certification याप्रमाणे करण्याबाबत नमुद आहे. तथापि केवळ स्पेशिफिकेशन नुसार निविदा मागविणें आवश्यक असताना विशिष्ट कंपनीच्या मालाचा निविदेत उल्लेख करणे सयुक्तिक नाही. त्यामुळे Zicom कंपनीस खरेदीबाबत लाभ दिल्याचे निदर्शनास येते. उद्योग उर्जा व कामागार विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.भाखंस 1088,2512,उद्योग-6 दिनांक 2.01.1992 मधील परिच्छेद क्र.8.3 ई नुसार वर्षामधील आवश्यकतेनुसार वस्तु खरेदी करण्यासाठी संख्या करारापेक्षा दरकरार करणे आवश्यक आहे. तथापी महानगरपालिने त्याप्रमाणे कार्यवाही न करता 4 निविदाकारापैकी श्री साई सर्व्हीसेसची एकूण बेरीज ही लोएस्ट याप्रमाणे निविदा प्रक्रिया ही चुकीच्या पध्दतीने राबविली आहे.***

सोलापुर महानगरपालिका इंद्रभवन परीसरातील इमारतीमध्ये विविध विभाग आहेत. अधिकारी व कर्मचारी यांच्यावर देखरेख व कामकाजात पारदर्शकता ठेवणेचे दृष्टीकोणातुन CCTV तसेच जिल्हाधिकारी कार्यालयात देखील CCTV बसविण्याबाबत मा.जिल्हाधिकारी यांचे दिनांक 10-9-2013

सोलापूर महानगरपालिका

चे रक्कम रु.14000000/- सदर योजनेकरीता खर्च करण्याबाबत वित्तीय वर्ष 2013-14 करीता सोलापुर महानगरपालिकांना आदेश दिलेले आहेत.

सोलापुर महानगरपालिका अ.क्र.1 ते 27 ठि काणी बसवावयाचे CCTV तसेच मा. जिल्हाअधिकारी कार्यालयाकडील खात्याची अ.क्र.1 ते 28 ची यादीनुसार खालील प्रमाणे साहित्य लागणार आहे.

स्पेसिफिकेशन 1)16 Channel DVR:- कॅमेरे कोणत्या ठीकाणी लावायचे आहे. त्या जागेचा तपशिल As per the Guidance of SMC of Z.P. and Z.P.

Video Compression- H264

Analong Video output-pal/NTSC/Adaption

Recording Resolulation-4 CiF/ACIF

Frame Rate CIF.Fps real Time

Video Bit Rate-CIF/QCIF.25FPS (P)

Stream Type-Video &Audio 30FPS(N)

UBS interface-2UBS 2.0

Alarm in Alarm out -16 ch/4ch

Hard Disec-1 TB included

1)VERIFOCAL LENS IR BULLET CAMERA -porch and passage of SMC & Z.P.

2) IR BULLET CAMERA- Outer Area and Building of SMC & Z.P.

3) IR DOME CAMERA- SMC & Z.P. office

4) IR DOME CAMERA- SMC & Z.P. office

5) IR DOME CAMERA- SMC & Z.P. office

6) Speed DOME CAMERA- SMC & Z.P. office Area i.e Fence of SMC & Z.P

7) Video Cable with Conduct & Laying

8) Core power cable Conduct & laying

9) Lan Cable Conduct & Laying

10) LED TV (42)

11) 5 KVA ONLINE UPS

12) CMS OLFTWARE FOR CENTRALISE MONITORING STATION &ALERT SERVICES

13) Power supply for Camera i) 122/1AMP

14) 24 Port Switch

15) CMS Software for Maximum 250 Camera Connect

16) Maintenance of two year

वलील साहित्य महानगरपालिका व जिल्हा कार्यालय परिसर जिल्हा परिषदेकरीता खरेदी करावे लागणार आहे.

| अ.क्र. | वस्तु प्रकार | Single unit/items rate | Total Cost |
|---|---|---|---|
| 1 | Item No1 (Approx-35) | 5000 | 1750000 |
| 2 | Item No 2 (Approx-5) | 25000 | 125000 |
| 3 | Item No 3 (Approx-130) | 12500 | 1625000 |
| 4 | Item No 4 (Approx-40) | 10000 | 400000 |
| 5 | Item No 5 (Approx-50) | 10000 | 500000 |
| 6 | Item No 6 (Approx-35) | 55000 | 1925000 |
| 7 | Item No 5 (Approx-140) | 8500 | 1190000 |
| 8 | Item No 6 (Approx-35) | 55000 | 1925000 |
| 9 | Item No 7 (Approx 25000 mts) | 90 | 2250000 |
| 10 | Item No 8(Approx 25000 mts) | 70 | 1750000 |
| 11 | Item No 9 (Approx 5000Mts) | 90 | 450000 |

| | | | |
|---|---|---|---|
| 12 | Item No 10 (Approx 4) | 75000 | 300000 |
| 13 | Item No 11 (Approx 2) | 70000 | 140000 |
| 14 | Item No 12 (Approx 4) | 300000 | 600000 |
| 15 | Item No 13 (Approx 450) | 500 | 225000 |
| 16 | Item No 14 (Approx 2) | 5000 | 10000 |
| 17 | Item No 15 (Approx 2) | 100000 | 200000 |
| | Total | | 13940000 |

सोलापुर महानगरपालिका इंद्रभवन परिसरातील इमारतीमध्ये विविध विभाग आहे. त्या विभागामध्ये व जिल्हाधिकारी कार्यालयातील सी.सी.टीव्ही कॅमेरे बसविण्याचे आदेश असुन एकूण खर्च रु.21958500/- झालेला असुन मा.जिल्हाधिकारी यांचे दिनांक 10/9/2013 चे रक्कम रु.14000000/- प्रशासकिय मान्यता आहे. तसेच मा.आयुक्त यांची मान्यता दिनांक 26/11/13 ला आहे. स्थायी समीती ठराव क्र.311/10-12-13 आहे. वाढीव रक्कम रु.7958500/- उपलब्ध होणेबाबत जा.क्र.वै/364 दिनांक 4/10/13 नुसार नियोजन समीतीकडे प्रस्ताव पाठविलेला होता. ही योजना दोन टप्यामध्ये करण्यात आली आहे. महानगरपालिकाच्या खात्याची यादी व जिल्हाधिकारी कार्यालयाची यादी याप्रमाणे आहे.

मुख्य लेखापरीक्षक यांचे समकक्ष दिनांक 5/10/2013 ला 5 निविदा प्राप्त होऊन खालील निकष नुसार 1) RAXA Security Service Ltd 2) M.K.Engineering com. 3) Sai Service 4) Acma computer Ltd 5) Smarth security system India pvt. यांचेपैकी तांत्रीक लिफाफा मधील निकष पुर्ण झाल्यानंतर 1) RAXA Security Service Ltd 2) M.K.Engineering com. 3) Sai Service 4) Acma computer Ltd यांचा वित्तीय लिफाफा उघडण्यास मुख्य लेखापरीक्षक खालील निकष द्वारे परवानगी दिलेली आहे.

Product offer by company 2) Eptlomh Ecetomvr 3) C.A Account Certificate 4) Service Tax Registration 5) Vat Registration 6) Previous work Experience Certificate 7) Shop Act Company Registration 8) System Integrated Certificate 9) Drawing map 10) Staff Details 11) EMD 12) UL Certification

उपरोक्त प्रमाणपत्र निरीक्षण पथकास तपासणीत आढळून आलेले नाही.

चार पात्र निविदाकारांचा वित्तीय लिफाफा दिनांक 7/10/2013 रोजी मुख्यलेखापाल कार्यालयात उघडण्यात आला होता. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | मक्तेदारांचे नांव | कामाचा खर्च | मेन्टनन्स | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | M.K.Engineering com | 22342993 | 1787850 | 24130843 |
| 2 | Acma competer Ltd | 17081414 | 3416283 | 20497697 |
| 3 | RAXA Security Service Ltd | 19530097 | 3745000 | 23308397 |
| 4 | Sai Service | 14992145 | 3000000 | 17992145 |

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73(क) अन्वये मा. आयुक्त यांचे दिनांक 26/11/2013 चे टिप्पणीन्वये मान्यता आहे. व करारनामा त्याच दिवशी करण्यांत आलेला आहे. तसेच स्थायी समिती ठराव 391/10-12-13 असुन वर्कऑर्डर दिनांक 13/12/2013 ला दिलेली आहे.

न्युनतम दर असलेले निविदाकार श्री साई सर्व्हीसेस यांच्याशी वाटाघाटी करुन निविदेत दिलेल्या दरापेक्षा 0.75 टक्के सुट देवून रक्कम रु.17857204/- इतके दर निश्चित करण्यांत आले आहेत.

सदर कामाच्याबाबत खालील प्रमाणे आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

1) सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्र.मतंसं/नस्ती-2012/प्र.क्र.273/39 दिनांक 16/01/2013 नुसार सदरच्या कामाची ई-निवीदा काढलेली नाही.

2) शासनाचे R.C.बाबतचे पत्र दिनांक 10/9/13 नुसार सी.सी.टीव्ही कॅमेरे खरेदी करताना ती राज्य शासनाच्या दरकराराप्रमाणे खरेदी करणे आवश्यक असताना ती त्याप्रमाणे खरेदी केलेली नाही.

3) सदर योजनेला प्रशाकिय मान्यता रक्कम रु.14000000/- प्रत्यक्ष खर्च हा रक्कम रु.17992145/- कसा केला. ज्यादा झालेला योजनेवरील खर्च रक्कम रु.3992145/- आक्षेपित ठेवण्यांत येत आहे.

तसेच शासनाचे सन 2009 च्या शासन निर्णयानुसार महानगरपालिकेच्या Technical विभागाकडून Third Party Technical Audit करणे आवश्यक असताना ते केले नाही.

4) महानगरपालिका क्षेत्रात किती सी.सी.टीव्ही कॅमेरे बसवावयाचे आहे. याबाबत प्रत्येक विभागनिहाय अहवाल मागविल्याचे दिसुन येत नाही. तसेच (Estimate) अंदाजपत्रक कशाच्या आधारे तयार केले DSR किंवा दरपत्रके मागवून किंमत ठरविल्याचे दिसुन येत नाही.

5) सदर योजनेवर खर्च करतांना विदयुत विभागाची तांत्रिक मान्यता व त्यांचे अभिप्राय घेतल्याचे दिसुन येत नाही.

6) खरेदी करण्यांत आलेला साठा हा डिलीव्हरी चलनाच्या आघारे साठा नोंदवहीमध्ये घेणे आवश्यक आहे. तथापी त्याप्रमाणे कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही.

7) बिलावर माल सुस्थितीत व योग्य दर्जाचा असल्याबाबत विद्युत विभागाकडून अभिप्राय नोंदविणे आवश्यक असताना तो नोंदविला नाही. तसेच शासकिय प्रयोगशाळेकडून Test Report घेतलेला नाही.

8) सदर कॅमेरे कोठे बसविले आहेत याबाबतचा कार्यकारी अभियंता (विदयुत विभाग) यांचा अहवाल घेतला नाही.

9) निविदेत मालाचा पुरवठा Specificed Company (Zicom as per tender submitted) Material along with U.L.Certification याप्रमाणे करण्याबाबत नमुद आहे. तथापि केवळ स्पेशिफिकेशन नुसार निविदा मागविणे आवश्यक असताना विशिष्ट कंपनीच्या (Icon) मालाचा निविदेत उल्लेख करणे सयुक्तिक नाही. त्यामुळे Zicom कंपनीस खरेदीबाबत लाभ दिल्याचे निदर्शनास येते.

10) सर्व मालाची नोंद ही जडसंग्रह नोंदवहीमध्ये घेणे आवश्यक असताना सदर नोंदवही निरीक्षण पथकास तपासणीकरिता उपलब्ध करुन दिलेली नाही.

11) जिल्हाधिकारी यांचे पत्र दिनांक 10/09/2013 नुसार महानगरपालिकेने प्रशासकिय विभाग (मंत्रालय मुंबई) यांना प्रशासकिय मान्यता,प्रत्यक्ष खर्च व भौतीक साध्य याबाबतचा तपशील कळविलेला नाही.

12) सी.सी.टीव्ही कॅमेरे सुरक्षीत असलेबाबत प्रमाणपत्र दरवर्षी जिल्हा अधिकारी यांचेकडे सादर करणे आवश्यक असताना तो सादर केलेला नाही.

13) उद्योग उर्जा व कामागार विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.भाखंस/1088 /2512/उद्योग-6 दिनांक 2/01/1992 मधील परिच्छेद क्र.8(3) ई नुसार वर्षामधील आवश्यकतेनुसार वस्तु खरेदी करण्यासाठी संख्या करारापेक्षा दरकरार करणे आवश्यक आहे. तथापी महानगरपालिने त्याप्रमाणे कार्यवाही न करता 4 निविदाकारापैकी श्री साई सर्व्हीसेस ची एकूण बेरीज ही लोएस्ट याप्रमाणे निविदा प्रक्रिया ही चुकीच्या पध्दतीने राबविली आहे. निविदेमध्ये प्रत्येक वस्तुनिहाय वाटाघाटी करणे आवश्यक होते त्याप्रमाणे ती न केल्याने खालीलप्रमाणे महानगरपालिकेचे नुकसान झालेले आहे.

| अ.क्र. | सी.सी.टीव्ही | सी.सी.टीव्ही कॅमेरांची | निविदाकार ACMA | मंजुर निविदाकार | फरक प्रती | नुकसानीची |
|---|---|---|---|---|---|---|

| | कॅमेरा प्रकार | संख्या | COMPUTER यांचे निविदेतील न्युनतम असलेले दर रु. | साई सर्व्हीसेस यांचे निविदेतील मंजुर दर रु. | नगा प्रमाणे | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 16 CHANNEL DVR HAVING | 38 | 20460 | 35250 | 14790 | रु.562020/- |
| 2 | 8 Channel; DVR having Alter service Through Central Monitoring | 22 | 14520 | 27350 | 12830 | रु.282260/- |
| 3 | Verifocal lens IR Bullet Camera | 135 | 6300 | 18270 | 11970 | रु.1615950/- |
| 4 | IR Dome Camera 10 mtr. rang | 50 | 4950 | 11310 | 6360 | रु.318000/- |
| 5 | IR Dome Camera | 55 | 4950 | 11310 | 6360 | रु.318000/- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | 20 mtr. rang | | | | | |
| 6 | IR Dome Camera 30 mtr. rang | 65 | 6300 | 11310 | 5010 | रु.325650/- |
| 7 | IR Bullet Camera | 147 | 7100 | 13485 | 6385 | रु.938595/- |
| 8 | Speed Dome Camera | 92 | 34320 | 37000 | 2680 | रु.246560/- |
| 9 | 24 Port Switch | 4 | 3432 | 3500 | 68 | रु.272/- |
| 10 | Desktop | 2 | 26400 | 40000 | 13600 | रु.27200/- |
| | एकूण नुकसानीची रक्कम रु. | | | | | रु.4634507/- |

उपरोक्त विवरणपत्रानुसार अ.क्र.1 ते 10 मधील निविदाकार ACMA COMPUTER यांचे निविदेतील न्युनतम असलेले दर मंजुर करुन निविदा मंजुर केली असती तर महानगरपालिकेची रक्कम रु.4634507/- ची बचत झाली असती.

तसेच साई सर्व्हीसेसच्या निविदेमध्ये अ.क्र.14 मध्ये CMS Software For Centralise Monitoring Station & Alert service 2 नग तसेच निविदेतील 16 MS Software for Maximum 250 camera 2 नगाकरीता दर नमुद केले नाही. तरी साई एंटरप्रायजेसची निविदा मंजुर केली. हे नियमबाहय आहे.

14) निविदेतील शर्ती व अटी निविदेतील रक्कमेच्या प्रमाणानुसार राबविल्या नाहीत.

15) मंजुर निविदाकाराने तत्सम प्रकारचे काम हे कमीत कमी निविदेच्या 50% रक्कमेइतके शासकीय संस्थेत केले पाहीजे. तसेच त्याची आर्थिक उलाढाल ही साधारणता निविदेच्या रक्कमेइतकी असायला पाहीजे. त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही.

16) श्री साई सर्व्हीसेस यांनी तीन वर्षाचे आयकर विवरणपत्र सादर केले नसताना त्याची निविदा पात्र ठरवून पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. हे नियमबाहय आहे.

17) सदर निविदेतील M.K.Engineering & co. यांनी दोन वर्षाच्या AMC साठी रक्कम रु.1787850/- इतकी रक्कम निविदेमध्ये भरली असताना साई ऐंटरप्रायजेसला वाटाघाटी न करता रक्कम रु.3000000/- दराने AMC ला मंजुरी दिली. हे नियमबाहय आहे.

18) सी.सी.टी.व्ही.कॅमेरे बसविण्याच्या पुर्वी रु.8286260/- इतक्या रक्कमेचा ॲडव्हान्स श्री साई सर्व्हीसेस यांना दिलेला आहे.

करारनामा यामध्ये स्पष्ट उल्लेख आहे की, No payment in advance will be paid. Payment will be done after satisfactory supply and installation testing &approval by the appointed committee of SMC. so after user Acceptance Test UTA based on satisfactory functioning of all cameras for the month and proper training of staff of SMC to handle this system. उपरोक्त प्रमाणे कार्यवाही केली नाही.

श्री साई सर्व्हीसेस यांचे करारनामा यामध्ये किती ठीकाणी किती कॅमेरे लावायचे आहे. त्याची रक्कम प्रती नगाप्रमाणे एकूण रक्कम किती होते, याचा काहीही उल्लेख केलेला नाही.

19) रक्कम रु.17992145/- इतकी रक्कम श्री साई सर्व्हीसेस यांना अदा केलेली आहे. त्यावर LBT 4%प्रमाणे रक्कम रु.719686/- मधुन वसुल केलेली LBT (0.25%) प्रमाणे रु.44643/- वजा जाता रु.675243/- फरकाची रक्कम श्री साई सर्व्हीसेस यांचेकडून वसुल करुन महानगरपालिकेच्या निधीमध्ये जमा करणे आवश्यक आहे.

20) सदर मालाचा पुरवठा केलेबाबतचे पुरवठा चलने (डिलीव्हरी चलने) लेखापरिक्षण पथकास उपलब्ध करुन दिलेली नसल्याने पुरवठा कधी झालेला आहे व किती साहित्याचा पुरवठा झालेला आहे, याची खात्री करता येत नाही.

21) Pre-Bid Meeting चे इतिवृत्त लेखापरिक्षण पथकास सादर केलेले नाही.

अर्धसमास ज्ञापन क्र.86 दिनांक 21/12/2017 खुलासा सादर करण्याबाबत कळविले असता विभागाने खुलासा सादर केलेला नाही. त्यामुळे वरील आक्षेप कायम करण्यात येत आहे.

FDSJRDM6801 (Ref No : 100, Hmm No : 86)

# कलम ९ ब खालील आक्षेप

लेखापरीक्षकाच्या दृष्टीने कोणत्याही व्यक्तीच्या अक्षम्य हयगयीमुळे अथवा गैरवर्तणुकीमुळे जी कोणतीही तुट अथवा जे कोणतेही नुकसान झाले आहे अशा तुटीची किंवा नुकसानीची रक्कम तसेच कंत्राट देण्यात झालेल्या अनियमितता, निर्णयामुळे झालेली महसूल हानी आणि धोरणात्मक निर्णयामुळे झालेले आर्थिक नुकसान

## ***17 UIDSSMT योजनेंतर्गत सोलापूर शहर व हद्दवाढ भागात पिण्याचे पाण्याचे पाईप लाईन करणेसाठी DI K-7 ग्रेडचे पाईप खरेदी करणे (जुलै 13 च्या letter of credit च्या अनुषंगाने खरेदी) कामातील अनियमिततेबाबत..***

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 376689.00/-

***नस्तीत guarantee certificate आढळून आले नाही. पाईपची नोंद राष्ट्रीय लेख संहिता नियमपुस्तिका 2011 अन्वये विहित केलेल्या नमुन्यातील Dead Stock नोंदवहीमध्ये घेण्यात आल्याचे दिसून येत नाही. तसेच पाईपची उपयोगीत्मक नोंद (Usage Entry) घेणेत आले नसल्याचे लेखापरीक्षणास आढळून आले. सार्वजनिक बांधकाम नियमावलीमधील परिशिष्ट क्र.24 नुसार मोजमाप पुस्तकामध्ये नमूद केलेली मोजमापे उपअभियंता यांनी 100 टक्के व कार्यकारी अभियंता यांनी 5 टक्के मोजमापे तपासल्याचे मोजमापासमोर तारखेसह स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. परंतु तशी कार्यवाही केली नाही. कामाचा किमान करारानाम्यास मुदतवाढ घेणे किवा पुरवणी करारनामा करणे आवश्यक होते. भाववाढीपोटी अदा केलेली मे.जिंदाल सॉ लि. यांच्याकडून रक्कम रु.3,76,689/- वसूलपात्र आहे***

सोलापूर शहर व हद्दवाढ भागात पिण्याचे पाण्याचे पाईप लाईन पुरविणे कामाची निविदा नोटीस क्र.SMC/PHE/SKO दि.17.09.2008 अन्वये मागविण्यात आली होती. तथापि सदरची निविदा नस्ती लेखापरीक्षणास उपलब्ध केली नाही.

सदरच्या कामासाठी स्थायी समिती ठराव क्र. 800 दि.12/08/2009 नुसार LANCO व JINDAL कंपनीकडून 2% सवलतीने रक्कम रु.12.73 कोटीची खरेदी करण्यास मान्यता देण्यात आली होती व स्थायी समिती ठराव क्र. 801 दि.12/08/2009 नुसार LANCO कंपनीकडून 1% सवलतीने रक्कम रु.6.33 कोटीची खरेदी करण्यास मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार सादर कंपनीबरोबर दि.22/08/09 रोजी करारनामा करण्यात आला होता व पुरवठा आदेश जा.क्र.429(LANCO) व जा.क्र.430(JINDAL) दि.24/08/09 रोजी देण्यात आले होते. सदरच्या कामाची मुदत 24 महिने होती. परंतु महापालिकेने जुलै 2013 मध्ये LETTER OF CREDIT कंपनीला देवून जुन्या करारानुर खरेदी प्रस्तावित केली. करारनामामध्ये सदरच्या कामास भाववाढ देतेवेळी केंद्र शासनाकडून प्रसिध्द होणाऱ्या WPI इंडेक्सनुसारच

सुचविलेल्या सूत्रानुसार प्रत्येक पुरवठ्याच्यावेळी मागील महिन्याचे इंडेक्स धरूनच पाईपचे प्रति रनिंग मीटर दर काढणेत येईल असा निर्णय घेणेत आला आहे.

सदर नस्तीची व मोजमाप पुस्तकातील नोंदीची तपासणी केली असता त्याअनुषंगाने निदर्शनास आलेल्या उणीवाबाबत अर्धसमास क्रमांक 09 दि. 25/05/2017 अन्वये खुलासा मागविला असून विभागाचे पत्र जावक क्र. 186 दिनांक 10/07/2017 ने सादर केलेले अनुपालन विचारात घेऊन लेखापरीक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) पुरवठादाराने पाईप पुरवठा कामाचा विमा उतरविला असल्याची कागदपत्रे नस्तीमध्ये अढळ होत नाहीत. तरी पाईपचा defect कालावधीकरिता विमा उतरविल्याची कागदपत्रे लेखा परीक्षणास सादर करावीत. विभागाने अनुपालानामध्ये उत्पादन कंपनीकडून पाईप खरेदी केल्याने व defect कालावधीसाठी guarantee certificate कंपनीने दिलेले असल्याने विमा उतरवला नसल्याचे नमूद केले आहे, तथापि नस्तीत guarantee certificate आढळून आले नाही.

2) खरेदी करण्यात आलेले सर्व पाईपची नोंद राष्ट्रीय लेख संहिता नियमपुस्तिका 2011 अन्वये विहित केलेल्या नमुन्यातील Dead Stock नोंदवहीमध्ये घेण्यात आल्याचे दिसून येत नाही. तसेच पाईपची उपयोगीत्मक नोंद (Usage Entry) घेणेत आले नसल्याचे लेखापरीक्षणास आढळून आले. विभागाने अनुपालानामध्ये रजिस्टर लेखापरीक्षणाच्या वेळी सादर केल्याचे नमूद केले आहे, तथापि ते विहित नमुन्यात नाही व Dead Stock नोंदवही व उपयोगीत्मक नोंदी केल्याचे सादर केले नाहीत.

3) सार्वजनिक बांधकाम नियमावलीमधील परिशिष्ट क्र.24 नुसार मोजमाप पुस्तकामध्ये नमूद केलेली मोजमापे उपअभियंता यांनी 100 टक्के व कार्यकारी अभियंता यांनी 5 टक्के मोजमापे तपासल्याचे मोजमापासमोर तारखेसह स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. परंतु तशी कार्यवाही केली नाही.

4) मुळ निविदा नस्ती लेखापरीक्षणास उपलब्ध करून दिली नसल्याने त्यावर भाष्य करता आले नाही. जुन्या करारनाम्यांची मुदत संपली असल्याने पुरवठा आदेश/ तसेच letter of credit देण्यापूर्वी नवीन/सुधारित करारनामा करणे आवश्यक होते, तसेच सदर कामाची बँक ग्यारंटी घेतली नाही. विभागाने अनुपालानामध्ये दोनदा करारनामा करणेचा प्रश्न उदभवत नसल्याचे नमूद केले आहे, परंतु किमान करारानाम्यास मुदतवाढ घेणे किवा पुरवणी करारनामा करणे आवश्यक होते, असे मत आहे.

5) शासनाने भाववाढी संदर्भात Material Component बाबतची परिगणना कशी करणे याबाबत खालीलप्रमाणे सूत्र देण्यात आले आहे.

$$P2 = 0.85 \times P \times [ R /100 ( P1 - Po )/Po ]$$

परंतु मनपाने तसे न करता $P2 = P \times [ R/100 (P1 - Po)/Po ]$ असे सूत्र मांडून भाववाढीची परिगणना केली आहे. तसेच P1 ची व P0 ची किंमत करारनाम्यात नमूद केलेनुसार पुरवठा केल्याच्या महिन्याच्या अगोदरच्या/ लगतपुर्वीच्या महिन्याचा इंडेक्स दर विचारात न घेता पुरवठा केल्याच्या दोन महिन्यापुर्वीच्या इंडेक्सचा दर विचारात घेऊन परिगणना करण्यात आली आहे.

भाववाढीची रक्कम शासनाने दिलेल्या सूत्रानुसार परिगणना करून रक्कम प्रदान करणे आवश्यक होती. परंतु मनपाने सूत्रात बदल केल्याने व चुकीचे इंडेक्स दराने पाईप पुरवठा केल्याने ठेकेदारास अतिप्रदान झाले आहे. तसेच मे. जिंदाल सॉ लि. यांनी पाईप वेळेत पुरवठा केला नसल्याने त्यांना माहे. ऑक्टोबर 2013 पासून दंड आकारणेत आला आहे. पुरवठादारास ज्या महिन्यापासून दंड आकारणी केली आहे, त्या महिन्याचा इंडेक्स दर हा कायम करून(त्या महिन्यात इंडेक्स दर गोठवून) त्यापुढील कामास कायम केलेल्या इंडेक्स

दराप्रमाणे भाववाढ देणे आवश्यक होते.परंतु मनपाने तसे न करता त्यापुढील वाढीव इंडेक्स दराने भाववाढ प्रदान केली आहे. त्यामुळे पुरवठादारास खालील विवरणपत्रानुसार जादा रक्कम प्रदान झाली आहे.

| | M/S. Jindal saw Ltd. | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Pipe size | Month of Supply | Index Rate enO month before | Actual Paid per meter | Payable Rate | Diff. | Qty. Supply | Recoverable Amount |
| 200mm | Aug-13 | 142.8 | 1437.91 | 1420.613 | 17.30 | 1793 | 31013.28 |
| 350mm | Aug-13 | 142.8 | 3112.33 | 3074.968 | 37.36 | 231 | 8630.679 |
| 300mm | Aug-13 | 142.8 | 2511.7 | 2481.493 | 30.21 | 71.5 | 2159.768 |
| 250mm | Aug-13 | 142.8 | 1982.2 | 1958.364 | 23.84 | 625.5 | 14909.6 |
| 200mm | Sept-13 | 141.5 | 1440.72 | 1412.871 | 27.85 | 3591.5 | 100019.9 |
| 250mm | Sept-13 | 141.5 | 1986.08 | 1947.691 | 38.39 | 1833 | 70367.35 |
| 250mm | Oct-13 | 142.2 | 1981.23 | 1953.438 | 27.79 | 353.5 | 9824.555 |
| 250mm | April-14 | 142.2 | 2040.35 | 1953.438 | 86.91 | 1022 | 88824.3 |
| 250mm | Jully-14 | 142.2 | 2062.64 | 1953.438 | 109.20 | 298.5 | 32596.87 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 300mm | Jully-14 | 142.2 | 2613.62 | 2475.252 | 138.37 | 44 | 6088.207 |
| 350mm | Jully-14 | 142.2 | 3238.63 | 3067.233 | 171.40 | 71.5 | 12254.87 |
| | एकूण | | | | | | 376689.4 |

भाववाढीपोटी मे.जिंदाल सॉ लि. यांच्याकडून रक्कम रु.3,76,689/- वसूलपात्र आहे. सदरची रक्कम वसूल करण्यात यावी. विभागाने अनुपालानामध्ये करारनाम्यात नमूद सूत्रानुसार भाववाढ दिल्याचे नमूद केले असून ते सूत्र चुकीचे असल्याने खुलासा मान्य करता येत नाही.

DGPAGPM8503 (Ref No : 3, Hmm No : 09)

## *18 अक्कलकोट रोड एम.आय.डी.सी. ते सुनिल नगर रस्त्यामधील बाधित होणारे पोल शिफ्टिंग करणे, कामातील अनियमिततेबाबत (2013-14)*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 06**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 1962391.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 280727.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 68736.00/-

***3% प्रमाणे रक्कम रु.3,28,801/- वर रु.9,864/- चा स्थानिक संस्था कर पुरवठादाराकडून वसूल करण्यात यावा. सदरच्या कामाचे त्रयस्थ संस्थेमार्फत तांत्रिक लेखापरीक्षण केले नाही. महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता नियम 167(4) व महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका नियम 227 (2) (अ) नुसार प्रत्येक अतिरिक्त कामावर रु 10,000 पेक्षा जादा खर्च करावयाचा झाल्यास अशा जादा परीमाणासाठी व नवीन बाबींसाठी सक्षम प्राधिका-यांची पुर्वमान्यता घेणे आवश्यक आहे. मात्र सदर बाबींवर रक्कम रु.2,80,727/- एवढा वाढीव खर्च अतिरिक्त परीमाणासाठी पुर्वमान्यता न घेता करण्यात आला आहे. मूल्यवर्धित कराची रक्कम रु.58,872/- संबंधितांकडून वसूल करावी. काम पूर्णत्वाचा दाखला नस्तीत आढळून आला नाही. शासन निर्णय दि.19.01.2013 प्रमाणे 10 लाखावरील कामाचे ई- निविदा कार्यप्रणालीचा अवलंब केला नाही, हे नियमबाह्य आहे.***

ठेकेदाराचे नाव :- श्री. इलेक्ट्रिकल्स
करारनामा :- दि.16.11.2013 मुद्रांक शुल्क = रक्कम रु.900/-
निविदा मान्यता :मा.स्थायी समिती यांच्याकडील ठराव क्र. 273 दि.30.11.2013 अन्वये.
प्राकलन :- रु.17,98,536/- निविदा मंजूर दर :- 02.00% कमी दराने.
पुगप मान्यता- स्थापत्य समिती ठ.क्र.39 दि.20/09/2013.
कामाचा आदेश :- सहाय्यक आयुक्त (वि), लाईट विभाग कार्या. जा. क्र. 720 दि. 21/11/2013.
कामाचा कालावधी- 2 महिने.
एकुण खर्च:- रक्कम- रु.19,62,391/-
मोजमाप पुस्तिका क्र.90.

सदरच्या अक्कलकोट रोड एम.आय.डी.सी. ते सुनिल नगर रस्त्यामधील बाधित होणारे पोल शिफ्टिंग करणे या कामाची नस्ती, मोजमाप पुस्तिका व प्रमाणक तपासले असता असता त्याअनुषंगाने निदर्शनास आलेल्या उणीवाबाबत अर्धसमास क्रमांक 02 दि.12/04/2017 अन्वये खुलासा मागविला असून विभागाने अद्यापपर्यंत अनुपालन सादर केले नसल्याने लेखापरीक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. सदरच्या कामासाठी रक्कम रु.3,28,801/- चे विद्युत साहित्य (HT stay, 11 kv termination kit, Conductor, insulator) वापरले असून त्यावर 3% प्रमाणे स्थानिक संस्था कर भरल्याची पावती नस्तीत आढळून आली नाही. 3% प्रमाणे रक्कम रु.3,28,801/- वर रु.9,864/- चा स्थानिक संस्था कर पुरवठादाराकडून वसूल करण्यात यावा.

2. सदरच्या कामाचे त्रयस्थ संस्थेमार्फत तांत्रिक लेखापरीक्षण केले नाही.

3. महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता नियम 167(4) व महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका नियम 227 (2) (अ) नुसार प्रत्येक अतिरिक्त कामावर रु 10,000 पेक्षा जादा खर्च करावयाचा झाल्यास अशा जादा परीमाणासाठी व नवीन बाबींसाठी सक्षम प्राधिका-यांची पुर्वमान्यता घेणे आवश्यक आहे. मात्र सदर बाबींवर रक्कम रु.2,80,727/- एवढा वाढीव खर्च अतिरिक्त परीमाणासाठी पुर्वमान्यता न घेता करण्यात आला आहे. सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका नियम 228 नुसार तोंडी आदेशाअन्वये किवा मंजुरी मिळेल असे ग्रुहीत धरून अतिरिक्त काम करणेचे नसताना पुर्वमान्यतेशिवाय काम केल्याचे नस्तीवरून दिसून येते. परंतु मा. आयुक्त यांचे पत्र जा. क्र.3835 दि.28/11/14 अन्वये काम पूर्ण झाल्यानंतर मान्यता घेतली आहे. त्यामुळे केलेला खर्च रु.2,80,727/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

4) विक्रीकर आयुक्त यांची अधिसूचना दि. 04/04/2012 अन्वये कंत्राटदाराचे विक्री कर नोंदणी प्रमाणपत्र नस्तीत आढळले नाही. त्यामुळे 2% एवजी 5% व्हट कपात करणे आवश्यक होते.त्यामुळे उर्वरित 3% मूल्यवर्धित कराची रक्कम रु.58,872/- संबंधितांकडून वसूल करावी.

5) काम पूर्णत्वाचा दाखला नस्तीत आढळून आला नाही.

6) शासन निर्णय दि.19.01.2013 प्रमाणे 10 लाखावरील कामाचे ई-निविदा कार्यप्रणालीचा अवलंब केला नाही, हे नियमबाह्य आहे.

आक्षेपाधीन रक्कम= रु.2,80,727/-
वसुलपात्र रक्कम= रु.68,736/-

DGPAGPM8503 (Ref No : 10, Hmm No : 02)

## *19 जुना वार्ड क्र. 59 टी.पी. 1/37 हरिजन वस्ती येथे सुधारणा करणे. (2013-14)*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 07**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 1469046.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 26350.00/-

***महासभेची प्रशासकीय मान्यता न घेता कामा हाती घेतल्याने नियमांचे उल्लंघन झाले आहे. सदरच्या कामाची निविदा 12.00% जास्त दराने स्वीकारली आहे. कामाचे शासन निर्णय क्र. संकीर्ण 2008/1338/प्र.क्र.171/08/नावी-20 दि.20/03/2009 नुसार त्रयस्थ संस्थेमार्फत तांत्रिक लेखापरीक्षण केले नाही. सदरच्या कामातून 1% कामगार कल्याण उपकराची रक्कम रु.14,690/- कपात केला नाही. शासन निर्णय दि.19.01.13. अन्वये 10 लाखावरील कामांसाठी ई-निविदा राबविणे आवशक असताना त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही. हे नियमबाहय आहे. गौण खनिजाची स्वमित्वाधनाची रक्कम रु.11,260/- शासन खाती भरणा केल्याचे दिसून येत नाही.***

कामाचे नांव: जुना वार्ड क्र. 59 टी.पी. 1/37 हरिजन वस्ती येथे सुधारणा करणे.
ठेकेदाराचे नाव :- भारत कन्स्ट्रकशन व फेब्रीकेशन.
करारनामा :- दि.23.05.2013 मुद्रांक शुल्क = रक्कम रु.200/-
निविदा मान्यता :मा.स्थायी समिती यांच्याकडील ठराव क्र. 124 दि.16.0.2013 अन्वये.
प्राकलन :- रु.15,90,358/- निविदा मंजूर दर :- 12.00% जास्त दराने.
निविदा रक्कम- रु.13,35,995/-
कामाचा आदेश :- नगर अभियंता कार्या. जा. क्र. नअ/गवसू/ता.1167 दि.24/05/2013.
कामाचा कालावधी- 3 महिने/90 दिवस.
पहिले धावते देयक रक्कम- रु.10,33,885/-
दुसरे धावते देयक रक्कम- रु.4,35,161/-
कामाची स्थिती- लेखापरीक्षण कालावधी मार्च 2015 पर्यंत काम अपुर्ण आहे.
मोजमाप पुस्तिका क्र. 584.

सदरच्या जुना वार्ड क्र. 59 टी.पी. 1/37 हरिजन वस्ती येथे सुधारणा करणे या कामाची नस्ती, मोजमाप पुस्तिका व प्रमाणक तपासले असता त्याअनुषंगाने निदर्शनास आलेल्या उणीवाबाबत अर्धसमास क्रमांक 20 दि. 20/06/2017 अन्वये खुलासा मागविला असून विभागाने कोणताही खुलासा सादर केला नसल्याने लेखापरीक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. सदरच्या कामास मा. सर्वसाधारण सभेची मान्यता घेतल्याची दिसत नाही. महासभेची प्रशासकीय मान्यता न घेता कामा हाती घेतल्याने नियमांचे उल्लंघन झाले आहे.

2. सदरच्या कामाची निविदा 12.00% जास्त दराने स्वीकारली आहे.

3. सदरच्या कामाचे शासन निर्णय क्र. संकीर्ण 2008/1338/प्र.क्र.171/08/नावी-20 दि.20/03/2009 नुसार त्रयस्थ संस्थेमार्फत तांत्रिक लेखापरीक्षण केले नाही.

4. सदरच्या कामातून 1% कामगार कल्याण उपकर कपात केला नाही, त्यामुळे ठेकेदाराकडून रक्कम रु.14,690/- ठेकेदाराकडून वसुल करणेत येवून शासन खाती भरताना करण्यात यावा.

5. शासन निर्णय दि.19.01.13. अन्वये 10 लाखावरील कामांसाठी ई-निविदा राबविणे आवशक असताना त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही. हे नियमबाह्य आहे.

6. महाराष्ट्र महसूल व वन विभाग शा. नि. क्र. गौण खनिज/10/1009/सीआर/309 दि.11/02/2010 अन्वये ठेकेदाराने बांधकाम साहित्य म्हणून कामावर वापरलेली सर्व दगड, भुकटी,गोटे,बारीक खाडी,मुरुम, वाळू यांवर स्वमित्वधनाची रक्कम प्रती ब्रास रु.200/- प्रमाणे शासन खाती भरणा करावयाची आहे. परंतु या प्रकरणी सदरच्या कामासाठी वापरलेले साहित्य 159.40 घ.मी.(56.33 ब्रास * 200=11,260/-) गौण खनिजाची स्वमित्वाधनाची रक्कम रु.11,260/- शासन खाती भरणा केल्याचे दिसून येत नाही, सबब सदराची रकम रु.11,260/- ठेकेदाराकडून वसुलपात्र आहे.

7. कामाचा करारनामा हा कमी रक्कम रु.400/- च्या मुद्रांक शुल्क पेपरवर केला आहे. त्यामुळे रु. 400/- वसूलपात्र आहेत.

वसूलपात्र रक्कम = रु.26,350/-

DGPAGPM8503 (Ref No : 4, Hmm No : 12)

## *20 सोरेगाव स्मशानभूमी येथे विविध सुधारणा करणे. (2013-14)*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 04**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 4778642.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 47786.00/-

***कामाचा आदेश लेखापरीक्षणासाठी उपलब्ध झाला नाही. तसेच कामाच्या जागेचे मालकीबाबतचे पत्र नस्तीत आढळले नाही. कामासाठी वापरण्यात आलेले निळे स्वाक्षरीत नकाशे (blue print), L-सेक्शन, ले-आउट इ. लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही. . कामगार विम्याची रक्कम ठेकेदाराकडून वसूल करून शासन खाती भरणा करण्यात यावी. कामगार कल्याण उपकाराची रक्कम 1% दराने रक्कम रु.47,786/-ठेकेदाराकडून वसूल करून शासन खाती भरणा करण्यात यावी.***

ठेकेदाराचे नाव :- मे. अनिल पाटील.

प्रशासकीय मान्यता- जिल्हाधिकारी कार्या. पत्र क्र. 2014/नपा/प्रशा-2/प्र.क्र.45/आर.आर./265/2014 दि.02.03.2014.

| अक्र. | कामाची बाब | सोरेगाव स्मशानभूमी येथे विविध सुधारणा करणे. |
|---|---|---|
| 1 | प्राकलन | रु83,05,996/- |
| 2 | स्थायी समिती मान्यता | ठराव क्र315. दि11./09/14. |
| 3 | सर्वसाधारण सभा मान्यता | ठराव क्र108. दि26./08/14. |
| 4 | करारनामा | दि.12/02/14. |
| 5 | कामाची मुदत | महिने 12 |
| 6 | निविदा मंजूर दर | 3% कमी दराने |
| 7 | मोजमाप पुस्तिका क्र. | 602 |

कामावरील लेखापरीक्षण कालावधीतील खर्च -:

पहिले धावते देयक-/16,44,927.रु रक्कम -

दुसरे धावते देयक-/31,33,715.रु रक्कम -

कामाची स्थिती.आहे अपुर्ण काम पर्यंत 2015 मार्च कालावधी लेखापरीक्षण-

सदरच्या कामाची नस्ती, मोजमाप पुस्तिका व प्रमाणक तपासले असता त्याअनुषंगाने निदर्शनास आलेल्या उणीवाबाबत अर्धसमास क्रमांक 20 दि. 12/07/2017 अन्वये खुलासा मागविला असून विभागाने अद्यापपर्यंत कोणताही खुलासा सादर केला नसल्याने लेखापरीक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. कामाचा आदेश लेखापरीक्षणासाठी उपलब्ध झाला नाही. तसेच कामाच्या जागेचे मालकीबाबतचे पत्र नस्तीत आढळले नाही. त्यामुळे सदराची जागा महापालिकेची असल्याबाबत लेखापारीक्षणाची खात्री झाली नाही.

2. कामासाठी वापरण्यात आलेले निळे स्वाक्षरीत नकाशे (blue print), L-सेक्शन, ले-आउट इ. लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही. त्यामुळे कामाच्या योग्यतेबाबत लेखापारीक्षणाची खात्री झाली नाही.

3. सदरच्या कामाचा विमा उतरवला आहे, परंतु कामगारांचा विमा उतरवला नाही. कामगार विम्याची रक्कम ठेकेदाराकडून वसूल करून शासन खाती भरणा करण्यात यावी.

4. महाराष्ट्र शासन उद्योग,उर्जा व कामगार विभागाचा शासन निर्णय क्र. बीसीए 2009/प्र.क्र.108/ कामगार-7 दि.17/06/2010 अन्वये कामगार कल्याण उपकाराची रक्कम 1% दराने वसुल करणे आवशक होते, परंतु धावते बिलातून 1% दराने रक्कम रु.47,786/- वसुल केली नाही. सदरची रक्कम ठेकेदाराकडून वसूल करून शासन खाती भरणा करण्यात यावी.

एकूण वसूलपत्र रक्कम = रु.47,786/-

DGPAGPM8503 (Ref No : 5, Hmm No : 20)

## *21 नागरी दलित वस्ती सुधारणा योजने (2011-2012) अंतर्गत प्र.क्र 2 मांतंग वस्ती समाज मंदिर परिसरात फ्लोरिंग व कंपाउड वॉल बांधने.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 05**

*लेखा शीर्ष : गलिच्छ वस्ती सुधारण शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 1495253.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 809206.00/-

***ई.टी.पी.चार्जेसपोटी जादा वसूल झालेली र.रु.52713/- शासन खाती समायोजित करण्यात यावी. विमा रक्कम रु.14953/- वसुल करुन शासकीय विमा निधीकडे भरणा करावी. कामगार कल्याण उपकराची रक्कम रु.13800/- वसुलपात्र असून ती शासनखाती भरणे आवश्यक आहे. महाराष्ट्र सार्जनिक बांधकाम नियमावलीमधील परिशिष्ट क्र.24 नुसार कार्यकारी अभियंता यांनी 5 टक्के व उपअभियंता यांनी 100 टक्के मोजमापे तपासणी करून मोजमाप पुस्तकामध्ये नोंदविण्यात आलेले मोजमापेसमोर तारखेसह स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. परंतु अशी कार्यवाही करणेत आली नाही.***

महापालिकेच्या नगर अभियंता विभागाने गलिच्छ वस्ती सुधारणा योजना अंतर्गत मा.जिल्हाधिकारी यांचेकडील पत्र क्र.सावि/9/नपा/आरआर/1492/12/दिनांक 11.05.2012 चे प्रशासकीय आदेशान्वये नागरी दलित वस्ती सुधारणा योजने (2011-2012) अंतर्गत प्र .क्र 2 मांतंग वस्ती समाज मंदिर परिसरात फ्लोरिंग व कंपाउड वॉल बांधने या कामाची प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. या कामाची निविदा नस्ती,मोजमाप पुस्तिक व दुसरे धावते देयकाची तपासणी केली असता आढळून आलेल्या त्रुटींबाबत अर्धसमास पत्र क्र.13 दि.22/06/2017 अन्वये विभागास खुलासा करण्याबाबत कळविण्यात आले असता विभागाकडून याबाबत काहीही खुलासा करण्यात आला नाही. त्यानुसार खालील प्रमाणे लेखापरिक्षण अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1) मोजमाप पुस्तिका न.76 मधील दुसरे धावते देयकाच्या गोषवाऱ्यातील वजावटीमध्ये 57546/- ई.टी.पी.चार्जेस वसूल पात्र असताना र.रु.110529/-वसूल केलेली आहे. ई.टी.पी.चार्जेसपोटी जादा वसूल झालेली र.रु.52713/-शासन खाती समायोजित करण्यात यावी.

2) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग क्र.विमास1098/प्र.क्र.28/98 दि.19/08/1998 अन्वये राज्यातील सर्व महानगरपालिकांनी त्यांच्या विविध योजनांतर्गत देण्यात येणा-या कंत्राटी कामाचा विमा व्यवहार फक्त शासकीय विमा निधीकडे करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, क्रमांक जीईएन1098/1357/प्र.क्र.166/98/नवी-24 3 नोव्हेंबर 2003, मुद्दा क्र. 3 नुसार काही विशिष्ट परीस्थितीत कंत्राट दाराला कंत्राटी कामाची देय रक्कम प्रदान करण्याची तातडीची आवश्यकता भासल्यास कंत्राटी कामाच्या मूल्याच्या सरासरी अंदाजे रु.1/-(प्रतिशेकडा ) या दराने रक्कम वळती करून उर्वरित रक्कम प्रदान करण्यात

यावी व नंतर शासकीय विमा निधीकडे ही रक्कम धनादेश वा धनाकर्षाद्वारे विमा उतरविण्यासाठी हस्तांतरीत करण्यात यावी. वरील कामासाठी मक्तेदाराने कामाचा तसेच कामावरील कामगारांचा विमा उतरविले असलेबाबत कागदपत्रे नस्तीमध्ये अढळ होत नाही. विमा रक्कम रु.14953/- वसुल करुन शासकीय विमा निधीकडे भरणा करावी.

3) महाराष्ट्र शासन उदयोग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र.बीसीए-2009/प्र.क्र.108 कामगार-7, दिनांक 17/06/2010 अन्वये उपकराची रक्कम 1 % वसूल करणे आवश्यक आहे. परंतु बिलातून रक्कम रु. 13800/- वसूल केलेली नाही. कामगार कल्याण उपकराची रक्कम रु. 13800/- वसुलपात्र असून ती शासनखाती भरणे आवश्यक आहे.

4) महाराष्ट्र सार्जनिक बांधकाम नियमावलीमधील परिशिष्ट क्र.24 नुसार कामाच्या किंमतीचे कार्यकारी अभियंता यांनी 5 टक्के व उपअभियंता यांनी 100 टक्के मोजमापे तपासणी करून मोजमाप पुस्तकामध्ये नोंदविण्यात आलेले मोजमापेसमोर तारखेसह स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. परंतु अशी कार्यवाही करणेत आली नाही.

5) कामाचे फोटो नस्तीत उपलब्ध नाहीत, त्यामुळे प्रशासकीय मान्यतेमधील अटीचे पालन होत नाही.

DATVRKM8002 (Ref No : 15, Hmm No : 13)

## *22 अक्कलकोट रोड, M.I.D.C., निवारानगर, सिद्धेश्वरनगर, कामगार वसाहत रस्ता करणे कामातील अनियमिततेबाबत. (भाग - 1 मधील काम)*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 03**

*लेखा शीर्ष : सुवर्ण जयंती नागरोत् शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 933305.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 9291.00/-

***खोदाईसाठी जादा दर दिल्याने रक्कम रु. 9,291/- वसूल करण्यात यावे. कामाचे ठिकाण बदललेबाबत सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेण्यात आल्याचे कागदपत्रे नस्तीमध्ये आढळून येत नाहीत. रस्त्याचे डांबरीकरण करणेसाठी ठेकेदाराने आणलेले B.M. व B.C. च्या पावत्या नस्तीमध्ये आढळून येत नाहीत.***

अक्कलकोट रोड, M.I.D.C., निवारानगर, सिद्धेश्वरनगर, कामगार वसाहत रस्ता करणे कामाची माहिती खालीलप्रमाणे आहे.

1.अंदाजपत्रकिय रक्कम रु.44,67,105/-

2. प्रशासकीय मान्यता - मा.जिल्हाधिकारी, सोलापूर यांचेकडील आदेश दि.02/11/2012.

| अ.क्र. | देयक क्र. / दिनांक | फेज | DPR क्र. | लाभार्थीचे नावं | प्रदान करण्यात आलेली रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 178/ दि.12.8.2013 | फेज-1 | 3006 | श्री.चव्हाण वासुदेव बाळू | 9000 |
| 2 | 102/ दि.14.6.2013 | फेज-1 | 3005 | श्री. चव्हाण वासुदेव बाळू | 9000 |

याप्रमाणे इतर प्रकरणांमध्ये दुबार देयक झाले असल्यास त्यांची पडताळणी करून दुबार प्रदानाची रक्कम वसूल करावी.

f) प्रमाणक क्र.150 दि.30.7.2013 अ.क्र.3 श्री.शौकत हैदरसाब चिक्कली DPR 3926 फेज - I DPR मध्ये कोणाचेच नाव नसताना बिल सादर करण्यात आलेली आहे. त्यामुळे रक्कम वसूल करणे आवश्यक आहे.

g) लाभार्थी निवडीसाठी अशासकीय संस्थांच्या निवडीनुसार सदर कामाचे सहा फेज करून फेज 1 मधील लाभार्थ्यांना शौचालय बांधून देण्याचे आदेश असतांना नवभारत सामाजिक संस्था यांनी खालील लाभार्थी फेज V मधील असताना त्यांना लाभ देण्यात येवून नवभारत सामाजिक संस्था यांचे देयके प्रदान केलेली आहेत.

| अ.क्र. | प्रमाणक क्र. व दिनांक | DPR क्रमांक |
|---|---|---|
| 1 | 13/29.4.2013 | 98, 127, 755, 806 ,871,887 |
| 2 | 185/12.8.2013 | 49 |
| 3 | 290/9.10.2013 | 534, 855 |
| 4 | 173/12.8.2013 | 140 |

h) नवभारत सामाजिक संस्था यांना केवळ फेज 1 मधील लाभार्थ्यांचे शौचालय बांधून देण्याचे आदेश असतांना फेज क्र. VI मधील कामे करण्याचे आदेश नसतांना खालील लाभार्थी फेज VI मधील दाखवून नवभारत सामाजिक संस्था यांनी देयक सादर केलेली आहे.

| अ.क्र. | प्रमाणक क्र. व दिनांक | DPR क्रमांक |
|---|---|---|
| 1 | 211/9.10.2013 | 68, 249, 13, 115, 114, 174, 1217 |
| 2 | 93/ 14.6.2013 | 432, 470, 789, 823, 1312, 392, 484, 419, 482, 465 |
| 3 | 92/ 14.6.2013 | 69 |

| | | |
|---|---|---|
| 4 | 148/ 30.7.2013 | 483,281,492,306,501,262,526,283,524,354,1272 |

i) नवभारत सामाजिक संस्था यांनी सादर केलेल्या खालील देयकामध्ये खोडा खाड असल्याचे दिसून आले.

| अ.क्र. | प्रमाणक क्र. व दिनांक | DPR क्रमांक |
|---|---|---|
| 1 | 96 / 14.6.2013 | 939, 2580 |
| 2 | 97 / 14.9.2013 | 1,13,51,595 |
| 3 | 169/ 12.8.2013 | 1133 |
| 4 | 240/9.10.2013 | 4198 |
| 5 | 167/ 12.8.2013 | 1304 |
| 6 | 168/12.8.2013 | 2864 |
| 7 | 169 / 12.8.2013 | 1133 |
| 8 | 183/28.8.2013 | 1428 |

3) वित्तीय वर्ष 2013-14 या वर्षात मक्तेदार श्री.दीपक जे भिवरे यांना एकूण रक्कम रु. 4,23,000/-ची देयके अदा करण्यात आलेली आहे.सदर देयके, मोजमाप पुस्तके लेखापरीक्षणाकरिता उपलब्ध झाले नाही. वितीय वर्ष 2013-14 मध्ये मक्तेदारास प्रदान केलेल्या रक्कमेतून उद्योग,उर्जा व कामगार विभाग क्रमांक बीसीए.2009/प्र.क्र.108/कामगार.6 दिनांक 17.6.2000 नुसार 1 टक्के प्रमाणे कामगार कल्याण उपकराची रक्कम रु.4230/- तसेच कंत्राटदाराकडुन मुल्यवर्धीत कराची 2 टक्के प्रमाणे रक्कम रुपये 8460/-ची वसुली करण्यात आलेली नाही. दीपक जे धिवरे यांना प्रदान केलेल्या देयकातील सदर एकूण रक्कम रु.12690/-वसुलपात्र आहे.

4) 2013-14 या आर्थिक वर्षामध्ये खालील मक्तेदारांना प्रदान केले आहे.

| अ. क्र. | मक्तेदाराचे नांव | प्रदानाची एकूण रक्कम रुपये | वसूल न करण्यात आलेली 2 % प्रमाणे सुरक्षा अनामत रक्कम रु. |
|---|---|---|---|
| 1 | भारत कन्स्ट्रक्शन | 12375000 | 247500 |
| 2 | नवभारत सामाजिक प्रतिष्ठान | 7929000 | 158580 |

| | | | |
|---|---|---|---|
| 3 | दिपक भिवरे | 423000 | 8460 |
| | | 20727000 | 414540 |

निवीदा अटी व शर्तीनुसार वित्तीय वर्ष 2013-14 मध्ये लेखापरीकक्षनास उपलब्ध करून दिलेल्या देयकांची पडताळणी केली असता मक्तेदाराच्या बिलातुन 2 टक्के प्रमाणे सुरक्षा अनामत कपात करणे आवश्यक असतांना रक्कम रु. 414540/- ची वसुली करण्यात आलेली नाही. सदर रक्कम वसुलपात्र आहे.

5) मक्तेदाराचे बिल प्रदानापुर्वी विभागीय अधिकारी व सहाय्यक अभियंता यांनी कामाची 20 टक्के तांत्रिक तपासणी करणेबाबत आदेश असतांना त्याचे पालन न करता 2013-14 मध्ये मक्तेदारांना नियमबाहय प्रदान करण्यात आलेले आहे.

6) निवीदेतील मक्तेदाराच्या सर्वसाधारण अटी व शर्ती मधील अट क्र.24 नुसार कामाचे थर्डपार्टी ऑडीट मक्तेदाराने स्वखर्चाने करणे आवश्यक होते. परंतु फेज 1 ते 6 मधील मक्तेदारांनी कामाचे थर्ड पार्टी ऑडीट केल्याबाबतचे दस्त्ऐवज लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही.

7) देयकासोबत जोडण्यात आलेल्या चेकलीस्ट मधील अनुक्रमांक 13 नुसार देयकाची नोंद योग्य त्य नोंदवहीत घेण्यात आल्याचे नमूद आहे तथापि सदर नोद्वाही लेखापरीक्षणास उपलब्ध झालेली नाही.त्याचप्रमाणे देयकावरील लाभार्थ्यांची नावे व डी.पी.आर. वरील लाभार्थ्यांची नावे व क्रमांक यामध्ये तफावत असताना तसेच ते बरोबर असल्याची खात्री न करताच देयकासोबत जागेवर समक्ष पाहणी केली असता काम समाधानकारक पूर्ण झाल्याचे सहाय्यक अभियंता याचे प्रमाणपत्र जोडलेले आहे.

8) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 69(1) अन्वये आयुक्त ,सोलापूर महानगरपालिका यांचे कार्यालयीन आदेश जा.क्र. नआ/वै/178 दिनांक 27/11/2012 नुसार अंतर्गत लेखापरीक्षक यांना पूर्वी प्रदान करण्यात आलेले रु.40,000/- पर्यंतच्या मर्यादेत वाढ करून रु. 1 लाख पर्यंतचे बिलाचे लेखापरीक्षण करण्याचे अधिकार दिलेले आहेत. तथापि मक्तेदाराने देयक सादर करताना एकत्रित देयक तयार करून सादर न करताच तुकडे पडून रु.99000/- ची देयके तयार करून सादर केली. असे असताना सदर देयके एकाच धनादेशाद्वारे एकाच तारखेला प्रदान केल्याचे दिसून येते. यावरून देयकाचे अंतर्गत लेखापरीक्षण टाळण्याचे हेतूने तुकडे पडून देयके सादर केल्याचे दिसून येते.

9) सदर बाबतचे प्रकरण न्यायप्रवीष्ट असल्याने न्यायालयीन प्रकरणाची सद्यस्थिती लेखापरीक्षणासं अवगत करणेबाबत अर्धसमास पत्र क्र.150 दि.14/062018 नुसार कळविण्यात आलेले असताना संबधितानकडून खुलासा करण्यात आलेला नाही.

10) सोलापुर मनपाचे 2011-12 व 2012-13 या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षणात वैयक्तीक शौचालय बांधकामाबाबत घेतलेले आक्षेप कायम असून 2013-14 आर्थिक वर्षातील उपलब्ध करुन दिलेल्या

नस्त्या व दस्तऐवजांचे लेखापरीक्षणानुसार वरील प्रमाणे आक्षेप नोंदविण्यात येत आहेत.

**वसूलपात्र रक्कम**

| अ. क्र. | मक्तेदाराचे नांव | प्रदानाची एकूण रक्कम रुपये | वसूल न करण्यात आलेली 2 % प्रमाणे सुरक्षा अनामत रक्कम रु. | 1 टक्के प्रमाणे कामगार कल्याण उपकराची रक्कम रु. | मुल्यवर्धीत कराची 2 टक्के रक्कम रु. | रु.9000 प्रमाणे दुबार प्रदानाची रक्कम रु. | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | भारत कन्स्ट्रकशन | 12375000 | 247500 | 123750 | 247500 | 1449000 | 2067750 |
| 2 | नवभारत सामाजिक प्रतिष्ठान | 7929000 | 158580 | 79290 | 158580 | 54000 | 450450 |
| 3 | दिपक भिवरे | 423000 | 8460 | 4230 | 8460 | 0 | 21150 |
| | | 20727000 | 414540 | 207270 | 414540 | 1503000 | 2539350 |

DATMDSM7101 (Ref No : 140, Hmm No : 150)

## ***27 सोलापूर महानगरपालिकेमध्ये बांधकाम परवाना प्रकरणांमध्ये आढळून आलेल्या अनियमितताबाबत....***

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 05**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

सोलापूर महानगरपालिका

वसूलपात्र रक्कम रु. 421043.00/-

***स्थानिक संस्था कराची रक्कम रु.4,21,043/- संबंधितांकडून वसूल करण्यात यावी. उपरोक्त प्रकरणांशी संबंधित 2013 वर्षाचा रेडीरेकनरचे दर उपलब्ध झाले नाही. अट क्र. 4 नुसार 1 वर्षात बांधकाम पूर्ण करून वापर परवाना घेतल्याचे कोणत्याही नस्तीत दिसून आले नाही. बांधकाम परवान्यातील अट क्र. 28 नुसार किमान दोन झाडांचे वृक्षारोपण करून त्यांचे संगोपन करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही होत नाही. बांधकाम परवान्यातील अट क्र. 31 नुसार फायर विभागाचा ना हरकत दाखला घेणे आवश्यक असताना त्याप्रमाणे दाखला नस्तीत आढळून आला नाही.***

सदरच्या सोलापूर महानगरपालिकेमध्ये काही ठराविक बांधकाम परवाना प्रकरणांची तपासणी केली असता त्याअनुषंगाने निदर्शनास आलेल्या उणीवाबाबत अर्धसमास क्रमांक 33 दि.18/08/2017 अन्वये खुलासा मागविला असून विभागाने अद्यापपर्यंत कोणताही खुलासा सादर केला नसल्याने लेखापरीक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. काही प्रकरणांमध्ये महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग एक अ मधील नगरविकास विभागाची दि.06/08/2012 च्या अधिसूचनेनुसार स्थानिक संस्था कराची आकारणी केली जात नाही.

| अ.क्र. | जमीन मालकाचे नाव | परवाना क्र. | क्षेत्र (चौ.मी.) | दर | करावयाची आकारणी चार्जेस रु. | आकारणी केलेली रक्कम रु. | वसुल करावयाची रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | मे. अरिहंत डेवलपर्सचे भागीदार | 175 दि13/5/4. | 1181.52 | 150 | 177228 | 0 | 177228 |
| 2 | अब्दुल्ला पानगल. | 159 दि13/5/2. | 170.95 | 100 | 17095 | 0 | 17095 |
| 3 | शफिक पटेल. | 144 दि13/4/26. | 132.36 | 100 | 13236 | 0 | 13236 |
| 4 | इस्माईल मंगलगिरी व इतर. | 259 दि13/5/24. | 185.60 | 100 | 18560 | 0 | 18560 |
| 5 | नरसम्मा लीम्बोले व इतर. | 175 दि13/5/4. | 246.50 | 100 | 24650 | 0 | 24650 |
| 6 | शिवानंद गुरासाप्पा सावळी. | 50 दि13/4/5. | .960.24 | 100 | 96024 | 0 | 96024 |
| 7 | गोवर्धन वडनाल. | 98 दि13/4/17. | 74.16 | 100 | 7416 | 0 | 7416 |
| 8 | अभिषेक चव्हाण | 1245 दि13/3/29. | 134.22 | 100 | 13422 | 0 | 13422 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 9 | प्रभाकर नरसप्पा बुरा. | 142 दि13/4/26. | 391.17 | 100 | 39117 | 0 | 39117 |
| 10 | लीगप्पा चालप्पा कट्टा | 263 दि13/5/24. | 142.95 | 100 | 14295 | 0 | 14295 |
| | एकूण | | | | | | 4,21,043/- |

सदरची रक्कम रु.4,21,043/- संबंधितांकडून वसूल करण्यात यावी.

तसेच याप्रमाणे इतर प्रकरणांमध्ये देखील अनियमितता झाली असल्याची शक्यता आहे, याची तपासणी करून मुख्य लेखापरीक्षकांच्या मान्यतेने वसुली करून अनियमितता दूर करावी.

2. सदरच्या उपरोक्त प्रकरणांशी संबंधित 2013 वर्षाचा रेडीरेकनरचे दर उपलब्ध झाले नसल्याने जमीन विकास शुल्क, बांधकाम विकास शुल्क, बाल्कनी प्रेमियम, जिना व पेसेज प्रेमियम, पार्किंग चार्जेस व इतर चार्जेस यांच्या योग्येतेबाबत खात्री करता आली नाही.

3. बांधकाम परवान्यातील अट क्र. 5 नुसार बांधकाम पूर्ण झाल्यानंतर 1 महिन्याच्या आत वापर परवाना घेणे बंधनकारक आहे, परंतु, अट क्र. 4 नुसार 1 वर्षात बांधकाम पूर्ण करून वापर परवाना घेतल्याचे कोणत्याही नस्तीत दिसून आले नाही.

4. बांधकाम परवान्यातील अट क्र. 28 नुसार किमान दोन झाडांचे वृक्षारोपण करून त्यांचे संगोपन करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही होत नाही.

5. बांधकाम परवान्यातील अट क्र. 31 नुसार फायर विभागाचा ना हरकत दाखला घेणे आवश्यक असताना त्याप्रमाणे दाखला नस्तीत आढळून आला नाही.

एकूण वसूलपात्र रक्कम= रु.4,21,043/-

DGPAGPM8503 (Ref No : 7, Hmm No : 33)

## *28 सोलापूर महानगरपालिकेमध्ये बांधकाम परवाना प्रकरणांमध्ये कामगार कल्याण उपकाराची कमी वसुली केलेबाबत......*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 05**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 398163.00/-

***बांधकाम परवाना विभागातील निवडक प्रकरणे तपासली असता उपकाराची रक्कम रु.3,98,163/- इतकी कमी वसुली केली असल्याचे निदर्शनास आले आहे. वसुलपात्र रक्कम संबंधितांकडून वसुल करून शासन खाती जमा करावी, उपकर निर्धारणाच्या आदेशानुसार उपकाराची रक्कम न भरल्यास सदरच्या वसुलपात्र रक्कमेवर***

***प्रथमतः ज्या तारखेपासून उपकर भरण्यास पात्र आहेत अशा तारखेपासून 2% टक्के व्याजाची रक्कम संबंधितांकडून वसुल करून शासनास जमा करण्यात यावी.***

सदरच्या सोलापूर महानगरपालिकेमध्ये काही ठराविक बांधकाम परवाना प्रकरणांची तपासणी केली असता असता त्याअनुषंगाने निदर्शनास आलेल्या उणीवाबाबत अर्धसमास क्रमांक 33 दि. 08/08/2017 अन्वये खुलासा मागविला असून विभागाने अद्यापपर्यंत कोणताही खुलासा सादर केला नसल्याने लेखापरीक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. उद्योग, उर्जा व कामगार विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्र.बीसीए 2009/प्र.क्र.108/कामगार 7-अ दि.17/06/2010 नुसार बांधकाम मूल्यावर 1% दराने उपकर वसुल करावयाचा आहे, परंतु सोलापूर मनपातर्फे बांधकाम वापर परवानाधारकांकडून उपकराची आकारणी केली जात नाही.

बांधकाम परवाना विभागातील निवडक प्रकरणे तपासली असता उपकाराची रक्कम रु.3,98,163/- इतकी कमी वसुली केली असल्याचे निदर्शनास आले आहे. वसुलपात्र रक्कम संबंधितांकडून वसुल करून शासन खाती जमा करावी.

उपकर निर्धारणाच्या आदेशानुसार उपकाराची रक्कम न भरल्यास सदरच्या वसुलपात्र रक्कमेवर प्रथतमः ज्या तारखेपासून उपकर भरण्यास पात्र आहेत अशा तारखेपासून 2% टक्के व्याजाची रक्कम संबंधितांकडून वसुल करून शासनास जमा करण्यात यावी.

| अ.क्र. | जमीन मालकाचे नाव | परवाना क्र. | क्षेत्र (चौ.मी.) | दर (प्रति चौ.मी.) | करावयाची आकारणी चार्जेस रु. | आकारणी केलेली रक्कम रु. | वसुल करावयाची रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | मे. अरिहंत डेवलपर्सचे भागीदार | 175 दि13/5/4. | 1181.52 | 110 | 129967 | 0 | 129967 |
| 2 | अब्दुल्ला पानगल. | 159 दि13/5/2. | 170.95 | 110 | 18804 | 0 | 18804 |
| 3 | शफिक पटेल. | 144 दि13/4/26. | 132.36 | 110 | 14560 | 0 | 14560 |
| 4 | इस्माईल मंगलगिरी व इतर. | 259 दि13/5/24. | 185.60 | 110 | 20416 | 0 | 20416 |
| 5 | नरसम्मा लीम्बोले व इतर. | 175 दि13/5/4. | 246.50 | 110 | 27115 | 0 | 27115 |
| 6 | शिवानंद गुरासाप्पा सावळी. | 50 दि13/4/5. | 960.24 | 110 | 105626 | 0 | 105626 |
| 7 | गोवर्धन वडनाल. | 98 दि13/4/17. | 74.16 | 110 | 8158 | 0 | 8158 |
| 8 | अभिषेक चव्हाण | 1245 दि13/3/29. | 134.22 | 110 | 14764 | 0 | 14764 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 9 | प्रभाकर नरसप्पा बुरा. | 142 दि13/4/26. | 391.17 | 110 | 43,029 | 0 | 43,029 |
| 10 | लीगप्पा चालप्पा कट्टा | 263 दि13/5/24. | 142.95 | 110 | 15724 | 0 | 15724 |
| | एकूण | | | | | | 398163 |

तसेच याप्रमाणे इतर प्रकरणांमध्ये देखील अनियमिमतता झाली असल्याची शक्यता आहे, याची तपासणी करून मुख्य लेखापरीक्षकांच्या मान्यतेने वसुली करून अनियमितता दूर करावी.

2. सदरच्या उपरोक्त प्रकरणांशी संबंधित 2013 वर्षाचा रेडीरेकनरचे दर उपलब्ध झाले नसल्याने जमीन विकास शुल्क, बांधकाम विकास शुल्क, बाल्कनी प्रेमियम, जिना व पेसेज प्रेमियम, पार्किंग चार्जेस व इतर चार्जेस यांच्या योग्येतेबाबत खात्री करता आली नाही.

3. बांधकाम परवान्यातील अट क्र. 5 नुसार बांधकाम पूर्ण झाल्यानंतर 1 महिन्याच्या आत वापर परवाना घेणे बंधनकारक आहे, परंतु, अट क्र. 4 नुसार 1 वर्ष्यात बांधकाम पूर्ण करून वापर परवाना घेतल्याचे कोणत्याही नस्तीत दिसून आले नाही.

4. बांधकाम परवान्यातील अट क्र. 28 नुसार किमान दोन झाडांचे वृक्षारोपण करून त्यांचे संगोपन करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही होत नाही.

5. बांधकाम परवान्यातील अट क्र. 31 नुसार फायर विभागाचा ना हरकत दाखला घेणे आवश्यक असताना त्याप्रमाणे दाखला नस्तीत आढळून आला नाही.

एकूण वसूलपात्र रक्कम= रु.3,98,163/-

DGPAGPM8503 (Ref No : 8, Hmm No : 33)

## *29 श्री. पंकज कन्स्ट्रकशन यांच्या मौजे शेळगी, सर्वे नं.69/2, तुळजापूर रोड येथील लेआऊट मंजुरीमधील अनियमितता.....*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 06**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9ब*

***नियमावलीनुसार नव्याने लेआउट प्लान मंजुरीस्तव सादर करणे आवश्यक होते. त्याप्रमाणे कार्यवाही केली नसताना मंजुरी देण्यात आली आहे. हे नियमबाहय आहे. प्राथमिक स्वरूपाच्या मंजुरीतील अट क्र. 4 नुसार अंतिम मंजुरी देणेपुर्वी रस्ता, दिवाबत्ती, वृक्षलागवड इत्यादीची सोय सदरच्या जागेवर करणे आवश्यक होते. त्याप्रमाणे कार्यवाही केली नसताना मंजुरी देण्यात आली आहे. हे नियमबाहय आहे.प्राथमिक स्वरूपाच्या***

***मंजुरीतील अट क्र. 15 नुसार अंतिम मंजुरी देणेपुर्वी पाणी पुनर्भरण व साठवणूक योजना राबवणे आवश्यक होते. त्याप्रमाणे कार्यवाही केली नसताना मंजुरी देण्यात आली आहे. हे नियमबाह्य आहे. प्राथमिक स्वरूपाच्या मंजुरीतील अट क्र. 17. नुसार अंतिम मंजुरी देणेपुर्वी प्रत्येक प्लॉटसमोर किमान दोन वृक्ष लागवड करणे आवश्यक होते. त्याप्रमाणे कार्यवाही केली नसताना मंजुरी देण्यात आली आहे. हे नियमबाह्य आहे.***

सदरच्या श्री. पंकज कन्स्ट्रकशन यांच्या मौजे शेळगी, सर्वे नं.69/2, तुळजापूर रोड येथील जागेच्या लेआऊट मंजुरीच्या नस्तीची तपासणी केली असता त्याअनुषंगाने निदर्शनास आलेल्या उणीवाबाबत अर्धसमास क्रमांक 35 दि. 22/08/2017 अन्वये खुलासा मागविला असून विभागाने अद्यापपर्यंत कोणताही खुलासा सादर केला नसल्याने लेखापरीक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. सदरच्या भूमी अभिन्यासास (क्षेत्रफळ - 55220 चौ.मी.) प्राथमिक स्वरुपाची मान्यता दि.16.05.07 रोजी दिली होती, बांधकाम नियंत्रण नियमावलीमधील नियम 48 नुसार सदरची मान्यता ही एक वर्ष कालावधीसाठी वैध असून त्यानुसार दि.15.05.2008 रोजी त्याची मुदत संपली होती. परंतु सदरची मुदत संपल्यानंतर जागा मालकाने दि.27.05.09 रोजी मुदतवाढ मागितली व विभागाने सदरच्या मुदतवाढीस दि.13.05.10 रोजी मंजुरी दिली. नियमावलीनुसार नव्याने लेआउट प्लान मंजुरीस्तव सादर करणे आवश्यक होते. त्याप्रमाणे कार्यवाही केली नसताना मंजुरी देण्यात आली आहे. हे नियमबाहय आहे.
2. प्राथमिक स्वरूपाच्या मंजुरीतील अट क्र. 4 नुसार अंतिम मंजुरी देणेपुर्वी रस्ता, दिवाबत्ती, वृक्षलागवड इ. ची सोय सदरच्या जागेवर करणे आवश्यक होते. त्याप्रमाणे कार्यवाही केली नसताना मंजुरी देण्यात आली आहे. हे नियमबाह्य आहे.
3. प्राथमिक स्वरूपाच्या मंजुरीतील अट क्र. 15 नुसार अंतिम मंजुरी देणेपुर्वी पाणी पुन:र्भरण व साठवणूक योजना राबवणे आवश्यक होते. त्याप्रमाणे कार्यवाही केली नसताना मंजुरी देण्यात आली आहे. हे नियमबाह्य आहे.
4. प्राथमिक स्वरूपाच्या मंजुरीतील अट क्र. 17. नुसार अंतिम मंजुरी देणेपुर्वी प्रत्येक प्लॉटसमोर किमान दोन वृक्ष लागवड करणे आवश्यक होते. त्याप्रमाणे कार्यवाही केली नसताना मंजुरी देण्यात आली आहे. हे नियमबाह्य आहे.
5. प्राथमिक स्वरूपाच्या मंजुरीतील अट क्र. 18. नुसार अंतिम मंजुरी देणेपुर्वी ओला कचरा व्यवस्थापनाची सोय सदरच्या जागेवर करणे आवश्यक होते. त्याप्रमाणे कार्यवाही केली नसताना मंजुरी देण्यात आली आहे. हे नियमबाह्य आहे.
6. सार्वजनिक सोयीसुविधांसाठी जागेच्या क्षेत्रफळाच्या 25% क्षेत्रफळ राखीव ठेवणे आवश्यक असताना केवळ 5% क्षेत्रफळ ठेवले आहे. त्याप्रमाणे कार्यवाही केली नसताना मंजुरी देण्यात आली आहे. हे नियमबाह्य आहे.

तसेच, याप्रमाणे इतर प्रकरणांमध्ये देखील अनियमितता झाली असल्याची शक्यता आहे, त्यांची तपासणी करून मुख्य लेखापरीक्षकांच्या मान्यतेने सदरच्या अनियमितता दूर कराव्यात.

DGPAGPM8503 (Ref No : 9, Hmm No : 35)

## *30 बांधकाम परवाना विभागातील जमा होणा-या रक्कमेच्या अनुषंगाने अभिलेख लेखापरीक्षणाकरीता उपलबध झाले नसल्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 02**

*लेखा शीर्ष : बांधकाम परवाना*
*अनियमितता कलम : 9ब*

***बांधकाम परवाना विभागातील जमा होणा-या रक्कमेच्या अनुषंगाने अभिलेख लेखापरीक्षणाकरीता उपलबध करून देण्यात आले नाही.***

बांधकाम परवाना विभाग, सोलापूर महानगरपालिका विभागांतर्गत नविन इमारत बांधकामास मंजूरी देण्यात येते. मंजूरीच्या अनुषंगाने विकासकाकडून जमीन विकास शुल्क, निवासी/वाणिज्य इमारतीकरीता विकास शुल्क, उपकर, स्थानिक संस्था कर, जीना/लिफट अधिमुल्य शुल्क इत्यादीच्या अनुषंगाने रक्कम आकारण्यात/जमा करण्यात येतात. याबाबतचे प्राप्त लेखे तपासणीअंती निदर्शनास आलेल्या आक्षेपांच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) बांधकाम परवाना विभागातील पावती पुस्तक साठा नोंदवही लेखापरीक्षणाकरीता उपलबध न झाल्याने किती पावती पुस्तके भांडार विभागाकडून प्राप्त झाली? किती पावती पुस्तकांचा वापर करण्यात आला? व किती पावती पुस्तके शिल्लक आहेत? याबाबत पडताळणी करता आली नाही.

2)अभियंता/पर्यवेक्षक परवाना रु.10000/- इतके शुल्क आकारून देण्यात येतो. तसेच सदर परवान्याचे नुतनीकरण रक्कम रु.10000/- आकारून करण्यात येते. सोलापूर मनपा अंतर्गत नोंदणीकृत एकूण किती वास्तुशिल्पकार/स्थापत्य अभियंता आहेत? त्यांनी परवान्याचे नुतनीकरण केले किंवा कसे? तसेच नुतनीकरण केले नसल्यास नुतनीकरणापोटी एकूण किती रक्कम वसुलपात्र आहे? इत्यादीबाबत अभिलेख लेखापरीक्षणाकरीता उपलबध झाले नाहीत.

महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 1930 कलम 4 अन्वये लेखापरीक्षणासाठी अभिलेख सादर करण्याची जबाबदारी स्थानिक प्राधिकरणाची आहे. तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची ड प्रकरण 3 मधील नियम 6 (1)(2) अन्वये लेखापरीक्षणासाठी सर्व प्रमाणके, कागदपत्रे व स्पष्टीकरणे उपलब्ध करून देण्याचे सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे कर्तव्य आहे. परंतु त्याचे पालन झाले नाही.

वरील अभिलेखे उपलब्ध करून देण्याबाबत अर्धसमास पत्र क्र.26, दि. 04/08/2017 अन्वये विभागास कळविले असता, लेखापरीक्षणाचे अंतिम तारखेपर्यंत अभिलेखे उपलब्ध झाले नाहीत, त्यामुळे वरील बाबीचे

लेखापरीक्षण करता आले नाही.

DATVRKM8002 (Ref No : 21, Hmm No : 26)

## *31 आंबेडकर नगर, ब्रम्हचैतन्य नगर, विद्या नगरी, साईश नगर, बंजारा सोसायटी ते निर्मिती गणेश येथ पिण्याची पाईप लाईन घालणे या कामातील नियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 10**

*लेखा शीर्ष : महाराष्ट्र सुवर्ण ज शासन/मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 69785.00/-

***नगर विकास विभागाची अधिसूचना दिनांक 6 आगस्ट 2012 अन्वये मक्तेदारास अदा केलेल्या देयकामधून 0.25% स्थानिक संस्था कर वसूल केलेला नाही. त्यामुळे स्थानिक संस्था कराची रक्कम रु.6502/- वसुलपात्र असून ती शासनखाती भरणे आवश्यक आहे. विमा रक्कम रु. 43833/- वसुल करुन शासकीय विमा निधीकडे भरणा करावी. कामाची निविदा प्राकलन दराच्या 17.59% जास्त दराची स्विकारली आहे. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र. सा.बा.वि.क्र.CST/1087/CR-196/बी-2 दि.04.05.1988 नुसार कोणत्याही कामाची निविदा मंजूर करताना 5% किंवा यापेक्षा जास्त दराची निविदा मंजूर करू नये अशी तरतूद असताना 5% पेक्षा जादा दराची निविदा स्वीकारली आहे.***

| | |
|---|---|
| कामाचे नाव | आंबेडकर नगर, ब्रम्हचैतन्य नगर, विद्या नगरी, साईश नगर, बंजारा सोसायटी, ते निर्मिती गणेश येथ पिण्याची पाईप लाईन घालणे. |
| ठेकेदाराचे नाव | मयुरा कंन्स्ट्रक्शन सोलापूर |
| तांत्रिक मंजुरी | क्र.215, दिनांक 29/11/2013 |
| स्थायी समिती मंजुरी | ठराव क्रमांक 298, दिनांक 10/12/2013 |
| अंदाजपत्रकातील जिल्हा दरसुची वर्ष | MJP 2011-12 (corrogandum) |
| पूर्वगणन पत्रक रक्कम | र.रु.49,56,445/- |

| | |
|---|---|
| निविदा रक्कम | र.रु.37,27,623/- |
| देयक मूल्य | र.रु.841958 + 67357 = 901315<br>र.रु.887534 + 71003 = 958537<br>र.रु.871228 + 69698 = 940926 |
| करारनामा मुद्रांक शुल्क | 2900 |
| कामाचा कालावधी | महिने 8 |
| कामाचा देकार | 17.59 ने जादा |
| कार्यारंभ आदेश | जा.क्र./साआअ/शहा/2169, दिनांक 02/01/2014 |
| एम बी नंबर/ पृष्ठ क्रमांक | एम बी नंबर 44 व पृष्ठ क्रमांक 38,41,44 |
| काम पूर्ण झाल्याचा दिनांक | 28/08/2014 |

| पहिल्या देयकातील कपाती | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सुरक्षा अनामत | विक्रीकर | आयकर | एलबीटी | उपकर | पाणी किंमत | विमा | ईटीपी | एकूण |
| 16839 | 16839 | 16839 | -- | -- | -- | -- | 67357 | 117874 |

| दुस-या देयकातील कपाती | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सुरक्षा अनामत | विक्रीकर | आयकर | एलबीटी | उपकर | पाणी किंमत | विमा | ईटीपी | एकूण |
| 17751 | 17751 | 17751 | -- | -- | -- | -- | 71003 | 124256 |

| तिस-या देयकातील कपाती | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सुरक्षा अनामत | विक्रीकर | आयकर | एलबीटी | उपकर | पाणी किंमत | विमा | ईटीपी | एकूण |
| 17425 | 17425 | 17425 | -- | -- | -- | -- | 69698 | 121973 |

महापालिकेच्या पाणीपुरवठा व मालनित्सारण विभागाने वार्षिक योजना 2012-13 व पंचवार्षिक योजना 2012-2017 अंतर्गत आंबेडकर नगर, ब्रम्हचैतन्य नगर, विद्या नगरी, साईश नगर, बंजारा सोसायटी ते

निर्मिती गणेश येथ पिण्याची पाईप लाईन घालणे या कामाची निविदा नस्ती, देयक व मोजमाप पुस्तिकाची तपासणी केली असता आढळून आलेल्या त्रुटींबाबत अर्धसमास पत्र क्र.10 दि.28/05/2017 अन्वये विभागास खुलासा करण्याबाबत कळविण्यात आले असता विभागाकडून याबाबत काहीही खुलासा करण्यात आला नाही. त्यानुसार खालील प्रमाणे लेखापरिक्षण अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग क्र.विमास1098/प्र.क्र.28/98 दि.19/08/1998 अन्वये राज्यातील सर्व महानगरपालिकांनी त्यांच्या विविध योजनांतर्गत देण्यात येणाऱ्या कंत्राटी कामाचा विमा व्यवहार फक्त शासकीय विमा निधीकडे करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, क्रमांक जीईएन1098/1357/प्र.क्र.166/98/नवी-24 3 नोव्हेंबर 2003, मुद्दा क्र. 3 नुसार काही विशिष्ट परीस्थितीत कंत्राट दाराला कंत्राटी कामाची देय रक्कम प्रदान करण्याची तातडीची आवश्यकता भासल्यास कंत्राटी कामाच्या मूल्याच्या सरासरी अंदाजे रु.1/-(प्रतिशेकडा) या दराने रक्कम वळती करून उर्वरित रक्कम प्रदान करण्यात यावी व नंतर शासकीय विमा निधीकडे ही रक्कम धनादेश वा धनाकर्षाद्वारे विमा उतरविण्यासाठी हस्तांतरीत करण्यात यावी.

वरील कामासाठी मक्तेदाराने कामाचा तसेच कामावरील कामगारांचा विमा उतरविले असलेबाबत कागदपत्रे नस्तीमध्ये अढळ होत नाही. विमा रक्कम रु. 43833/- वसुल करुन शासकीय विमा निधीकडे भरणा करावी.

2) महाराष्ट्र शासन उदयोग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र.बीसीए-2009/प्र.क्र.108 कामगार-7, दिनांक 17/06/2010 अन्वये उपकराची रक्कम 1 % वसूल करणे आवश्यक आहे. परंतु पहिल्या धावत्या बिलातून रक्कम रु. 43833/- वसूल केलेली नाही. त्यामुळे कामगार कल्याण उपकराची रक्कम रु. 43833/- वसुलपात्र असून ती शासनखाती भरणे आवश्यक आहे.

3) महाराष्ट्र सार्जनिक बांधकाम नियमावली नुसार तांत्रिक अधिका-याने जागेचे स्थळ निरीक्षण करुन प्रस्तावित कामाबाबत सविस्तर अहवाल सादर करणे आवश्यक असून त्याआधारे कामाच्या बाबीच्या अंदाजपत्रकात समावेश करणे अपेक्षित आहे. परंतु सदर अहवालाची प्रत निविदा नस्तीमध्ये उपलब्ध झाली नाही.

4) महाराष्ट्र सार्जनिक बांधकाम नियमावली प्रमाणे बांधकामाच्या प्रमाणकाचे प्रदान करताना मोजमाप पुस्तकातील तपशीलवार मापे नोंदविलेले प्रत्येक पृष्ठ लाल शाईच्या कर्ण रेषेने खोडून टाकणे आवश्यक आहे. तसेच ज्यानुसार बिल संमत करण्यात आले आहे. त्या रोख प्रमाणकाचा क्र.दिनांक तसेच धनादेशाचा तपशील गोषवा-याखाली लाल शाईने नमूद करणे आवश्यक आहे. तसेच महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम परिशिष्ट-24 मधील अ.क्र.12,13 व 15 अन्वये मोजमाप पुस्तकात मापे उतल्यानंतर शेवटी गोषवारा तयार करणे अनिवार्य असून त्यामध्ये केलेल्या कामाच्या मोजमापाच्या प्रत्येक बाबींची संख्या, दर, युनिट व रक्कम दर्शविणे आवश्यक आहे. तथापि मोजमाप पुस्तकातील मोजमापे कर्णरेषेने खोडली नसून गोषवारा तयार केलेली नाही. तसेच गोषवा-याखाली काम पूर्णत्वाचा दिनांक नमुद केलेला नाही.

5) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग 1-अ मधील नगर विकास विभागाची अधिसूचना दिनांक 6

आगस्ट 2012 अन्वये मक्तेदारास अदा केलेल्या देयकामधून 0.25% स्थानिक संस्था कर वसूल केलेला नाही. त्यामुळे स्थानिक संस्था कराची रक्कम रु.6502/- वसुलपात्र असून ती शासनखाती भरणे आवश्यक आहे.

6)कामासाठी वापरण्यात आलेले नकाशे, एल सेक्शन अंदाजपत्रक संचिकेत आढळून आलेले नाहीत.

7) संबंधित कामाच्या बाबतीत थर्ड पार्टी टेक्नीकल ऑडीट केलेले नाही.

8) मुंबई प्रांतिक महानरगपालिका अधिनियम-1949 कलम (10) (दोन) (च) नुसार महानगरपालिकेच्या कोणत्याही संविदेमध्ये पदाधिकाऱ्यांचा (नगरसेवकांचा) प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष सहभाग असल्यास असा पदाधिकारी अपात्र ठरतो. त्यामुळे महापालिकेच्या कोणत्याही संविदेत पदाधिकाऱ्यांचा प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष सहभाग असणार नाही. यासाठी निविदाधारकांडून निविदा संदर्भात पदाधिका-यांशी प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष संबंध नसल्याचे प्रतिज्ञापत्र घेणे आवश्यक आहे. तथापि अशा प्रकारचे प्रतिज्ञापत्र घेतलेले नाही.

09) महाराष्ट्र सार्जनिक बांधकाम नियमावलीमधील परिशिष्ट क्र.24 नुसार कामाच्या किंमतीचे कार्यकारी अभियंता यांनी 5 % व उपअभियंता यांनी 100 % मोजमापे तपासणी करून मोजमाप पुस्तकामध्ये नोंदविण्यात आलेले मोजमापेसमोर तारखेसह स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. परंतु अशी कार्यवाही करणेत आली नाही.

10) कामाची निविदा प्राकलन दराच्या 17.59% जास्त दराची स्विकारली आहे. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र. सा.बा.वि.क्र.CST/1087/CR-196/बी-2 दि.04.05.1988 नुसार कोणत्याही कामाची निविदा मंजूर करताना 5% किंवा यापेक्षा जास्त दराची निविदा मंजूर करू नये अशी तरतूद असताना 5% पेक्षा जादा दराची निविदा स्वीकारली आहे.

DATVRKM8002 (Ref No : 14, Hmm No : 10)

## *32 मजरेवाडी येथे 2.00 + 2.00 द.क्ष.लि. व सोरेगाव येथे 1.00 द.क्ष.लि. व प्रतापनगर येथे 0.50 द.क्ष.लि. क्षमतेची उंचीवरील पाण्याची टाकी बांधणे कामातील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 05**

*लेखा शीर्ष :UIDSSMT शासन निधी*
*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 27805.00/-

***कामाचे देयकातून कामाचे किंमतीचे 1% कामगार कल्याण उपकराची रक्कम रु.27805/- वसूल करण्यात आली नाही. कामाची जागा मनपाच्या ताब्यात नसताना काम केल्याने कामावर करणेत आलेला खर्च वाया गेलेला आहे. मोजमाप पुस्तकामध्ये मोजमापे कार्यकारी अभियंता व उपाभियांता यांनी तपासल्याचे तारखेसह स्वाक्षरी***

***केली नाहीत. टाकीच्या कामाचे नकाशे सादर केली नाहीत.***

मजरेवाडी येथे 2.00 + 2.00 द.क्ष.लि. व सोरेगाव येथे 1.00 द.क्ष.लि. व प्रतापनगर येथे 0.50 द.क्ष.लि. क्षमतेची उंचीवरील पाण्याची टाकी बांधणे कामाची माहिती खालीलप्रमाणे आहे.

1.अंदाजपत्रकिय रक्कम रु.2,54,66,290/-

2. निविदा रक्कम रु.2,54,66,290/-

3. अंदाजपत्रक मान्यता - सर्व साधारण सभा ठराव क्र. 2 दि.20/05/2009

4. निविदा मान्यता - स्थायी समिती ठराव क्र. 944 दि. 21/08/2009

5. लेखाशिर्ष - UIDSSMT.

6. निधी - शासन.

7. ठेकेदाराचे नाव - मे.दास ऑफशोर्स इंजि. प्रा. लि.

8. कार्यारंभ आदेश क्र. साआअ/425 दि.24/08/2009 ( 30% जादा दराने)

9. कामाचा कालावधी - 20 महिने.

10. मुदतवाढ - दि.30/11/2011 पर्यंत विनादंडाने
दि. 31/03/2013 रु.1500/- प्रतिदिन दंडाने.

11. काम पूर्ण/अपूर्ण - अपूर्ण.

12. एकूण खर्च रु.1,58,49,806/- (10th आर.ए. बिल रु.27,80,478/-).

13. मोजमाप पुस्तक क्र.139.

सदर कामाचे देयकाची नस्ती व मोजमाप पुस्तकातील नोंदीची तपासणी केली असता आढळून आलेल्या अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्र.03 दि.08/05/2017 अन्वये विचारणा केली होती. त्यानुसार खात्याने त्यांचेकडील पत्र क्र.83 दि.17/05/2017 अन्वये अनुपालन सादर केले आहे. खात्याने सादर केलेल्या अनुपालानाचा विचार करता लेखापरीक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1)10वे धावते देयकाची तपासणी केली असता कामगार कल्याण उपकर देयकाचे 1% रक्कम रु.27,805/- वसूल करण्यात आली नाही. तरी सदराची रक्कम संबधीकडून वसूल करून शासनास जमा करण्यात यावी.

कामगार कल्याण उपकर वसुलीबाबतचे परिपत्रक कार्यालयास प्राप्त झालेनंतर वसुलीची कार्यवाही केली आहे असे खात्याने नमूद केले आहे. आक्षेपात नमूद केलेली रक्कम वसूल केलेबाबत खुलासा केला नसल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

2) सार्वजनिक बांधकाम नियमावलीमधील नियमानुसार कोणतीही जागा ताब्यात असल्याशिवाय काम करण्यात येऊ नये असे आदेश आहेत. तथापि सोलापूर मनपाने सोरेगाव व प्रतापनगर येथे बांधण्यात येण्याऱ्या पाण्याचे टाकीची जागा मनपाचे ताब्यात नसताना काम हाती घेणेत आले आहे. त्यामुळे सदर

कामावर खर्च करण्यत आलेली रक्कम अनुक्रमे रु.7,04,476/- व रु.4,07,312/- असे एकूण रु.11,11,788/- चे निविदा दर 30% जादा दरानुसार रु.14,45,324/- इतका खर्च व्यर्थ गेलेला आहे.

अनुपालन सन 2012-13 चे लेखापरीक्षणास सादर करणेत आलेले आहे असे खात्याने कळविले आहे. खात्याने अनुपालन काय सादर केले आहे याचा उल्लेख केला नाही. त्यामुळे आक्षेप कायम करण्यात येत आहे.

3) सार्वजनिक बांधकाम नियमावलीमधील परिशिष्ट क्र.24 नुसार मोजमाप पुस्तकामध्ये नमूद केलेली मोजमापे उपाभियांता यांनी 100 टक्के व कार्यकारी अभियंता यांनी 5 टक्के मोजमापे तपासल्याचे मोजमापासमोर तारखेसह स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. परंतु तशी कार्यवाही केली नाही.

मोजमापे तपासल्याबाबत मोजमाप पुस्तकामध्ये स्वाक्षरी केल्याचे खात्याने कळविले आहे. मोजमापासमोर तारखेसह स्वाक्षरी केले असल्याची कागदपत्रे सादर केली नसल्याने आक्षेप कायम करण्यात येत आहे.

4) कामाचे अंदाजपत्रक हे 2007-08 चे दरसूचीनुसार करण्यत आले आहे. निविदा माहे सप्टेंबर 2009 मध्ये केले असल्याने निविदाधारकाने सादर केलेले दर हे 2008-09 चे मंजूर दरसुचीमधील दराशी करण्यत आली असता ती कमी दराची आल्याने निविदा मंजूर करण्यत आली आहे. 2008-09 ची दरसूचीची मागणी केली असता लेखापरीक्षणास सादर केली नसल्याने 2008-09 चे दराची तपासणी करता आली नाही.

आक्षेपात नमूद केलेनुसार अनुपालन सादर केले नसल्याने आक्षेप कायम करण्यत येत आहे.

5) निविदा शर्त क्र.5 नुसार ठेकेदाराने टाकीचे नकाशा स्वखर्चाने तपासून घेण्याचे असून सदरचे नकाशे नस्तीत आढळले नाही.

अनुपालनासोबत टाकीचे नकाशा सादर केला नसल्याने आक्षेप कायम करण्यत येत आहे.

DGPKVSM6101 (Ref No : 23, Hmm No : 03)

## *33 पाणी पुरवठा केद्रांकडील वीज बिल देयकास इलेक्ट्रीसीटी डयुटी देय नसताना आदा केल्याने जादा रक्कम प्रदान झालेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 1**

*लेखा शीर्ष : सार्वजनिक आरोग्य अभि मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 235190.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 235190.00/-

***महाराष्ट्र इले. डयुटी अधिनियम 1958 चे क्लॉज 3 (2)(a) नुसार पाणी पुरवठा केंद्राकडील विद्युत बिलातून वीज आकार शुल्क (इलेक्ट्रीसीटी डयुटी) देय नाही. तरीही मनपा कडील पाणीपुरवठा केद्राकडील इलेक्ट्रीसीटी बिलात वित्तीय वर्ष 2013-14 मध्ये वीज आकार शुल्क (इलेक्ट्रीसिटी डयुटी) रक्ककम रु. 235190/- अदा केल्याचे आढळुन आले. सदरची रक्कम परत मागणी करून घेणे आवश्यक आहे.***

सोलापूर महानगरपालिकेकडील उजनी, पाकणी, भवानी पेठ, टाकळी, सोरेगाव व जुळे सोलापूर अशा सहा पाणी पुरवठा केंद्राकडील वीज बिल देयकांची तपासणी केली असता वीज बिल देयकात इलेक्ट्रीसिटी डयुटी देय नसताना आदा केल्यासचे आढळुन आले.

महाराष्ट्र इलेक्ट्रीसिटी डयुटी 1958 चे क्लॉइज 3 (2)(a) नुसार पाणी पुरवठा केंद्राकडील विद्युत बिलातून वीज आकार शुल्क (इलेक्ट्रीसीटी डयुटी) देय नाही. तरीही मनपा कडील पाणीपुरवठा केद्राकडील इलेक्ट्रीसीटी बीलात वित्तीय वर्ष 2013-14 मध्ये खालील प्रमाणे वीज आकार शुल्क (इलेक्ट्रीसिटी डयुटी) रक्कम आदा झाल्याचे आढळुन आले.

| अक्र. | पाणीपुरवठा केद्राचे नाव | कालावधी | वीज आकार शुल्क (इलेक्ट्रीसिटी डयुटी) रु. |
|---|---|---|---|
| 1 | टाकळी हेड वर्क्स | एप्रिल 2013 ते मार्च 2014 | **22527/-** |
| 2 | सोरेगाव वॉटर वर्क्स | एप्रिल 2013 ते नोव्हेंबर 2013 | **4557/-** |
| 3 | जुळे सोलापूर | मे 2013 ते मार्च 2014 | **208106/-** |
| | **एकूण** | एप्रिल 2013 ते मार्च 2014 | **235190/-** |

याबाबत अर्धसमास पत्र क्र. 18 दि. 12/07/2017 अन्वये कळविले असता विभागाने अनुपालनामध्ये अधीक्षक अभियंता म.रा.वि.वि. सोलापूर यांना दि. 29/07/2017 रोजी पाठविलेल्या पत्राची प्रत सादर केली आहे. सदर पत्रामध्ये त्यांनी 2013-14 ते 2017-18 या कालावधीत विद्युत बिलांमध्ये आकारलेली रक्कम रु.3916919/- ची मागणी विद्युत विभागाकडे केली आहे, परंतु सदरची रक्कम महानगरपालिकेस मिळाली नसल्याने सदरचा आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATRNDM7201 (Ref No : 76, Hmm No : 18)

## ***34 विडी घरकुल येथे 2.00 द.ल.लि. उंचावरील टाकी बांधणे मधील अनियमिततेबाबत.....***

सोलापूर महानगरपालिका

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**अनियमितता संख्या : 15**

*लेखा शीर्ष : सार्वजनिक आरोग्य अभि मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 7819317.00 /-

***सदर कामाचे अंदाजपत्रक MJP च्या दरसुची 2007/08 नुसार केले व दि.15/07/2008 ते 18/08/2011 या कालावधीत तीनदा प्रसिध्दीकरण केले असता फक्त दोनच निविदा प्राप्त झाल्या. सदर निविदा दि.07/09/2011 रोजी उघडल्यास असता मे. असो. इंजिनियर्स यांची 77% जादा ही सर्वात कमी दरांची निविदा होती. वाटाघाटी नुसार सदरची निविदा 66.02% जादा दाराने मंजूर केली. सदरची निविदा 2007/08 च्या दरसुचीनुसार 66.02% जादा म्हणजे 2011/12 चे दरसुचीनुसार ईस्टीमेट दरानुसार असल्याचे नमुद करुन नियम 73 (क) नुसार स्थायी समिती समोर मान्यतेसाठी सादर केली व त्यास स्थायी समिती ठराव क्र.222, दि.01/10/2012 नुसार मान्यता देण्यात आली. सदर निविदेच्या वैधानिक कालावधी 180 दिवस असताना व तो जाने. 2009 मध्ये संपुष्टात आला असल्यामुळे नवीन दरसूचीनुसार अंदापत्रक तयार करून निविदा प्रक्रिया राबविणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केली नसल्याचे आढळुन आले. वित्तीय वर्ष 2011-12 मध्ये निविदा 77% जादा दराने आल्याने अंदाजपत्रक सन 2011-12 चे दरसुची नुसार तयार करुन त्यानुसार निविदा मागविणे आवश्यक असताना वित्तीय वर्ष 2007-08 पुर्वीचे अंदाजपत्रक प्रमाणे मंजूर करणे चुकीचे आहे. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम यांचेकडील परिपत्रक क्र. सीएटी-१०८७/सीआर/१९६/बी-2 दि. 4.5.1988 नुसार अंदाजपत्रकापेक्षा 5% पेक्षा जादा दराने निविदा मंजूर करण्यात येवू नये, अशी तरतूद आहे. तथापि सदर कामाची निविदा 66.02% जादा दराची मंजूर करण्यात आली, हे नियमबाह्य आहे. L1 निविदा 77% जादा यांचेशी वाटाघाटी करता तो 66.02% जादा दराने म्हणजे सन 2011/12 चे अंदाजपत्रकानुसार ईस्टीमेट दराने असल्याचे नमुद करुन स्थायी समिती समोर मान्यतेस सादर केले आहे. परंतु सन 2011-12 चे दरसुचीनुसार अंदाजपत्रक तयार करणे आवश्यक असताना तसे अंदाजपत्रक केले नसल्याचे आढळुन आले. सदर कामाची रक्कम रु.1,17,11,818/- असल्याचे करारनामा रु.10900/- चे मुद्रांक शुल्क रक्कमेवर करणे आवश्यक् असताना र.रु.6200/- मुद्रांक शुल्क् रक्कमेवर केल्याचे आढळुन आले, तरी तफावत रक्काम रु.4700/- शासनाकडे जमा करणे आवश्यक आहे.***

विडी घरकुल येथे 2.00 द.ल.लि.उंचावरील टाकी बांधणे या कामाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

**कामाचा तपशिल**

1. निधी - 13 वा वित्तद आयोग
2. पुर्वगणक पत्रक - क्र.30, सन 2007-08
3. अंदाजपत्रक - र.रु.91,55,300/-
4. दरसुची - MJP - 2007/08
5. मक्याची रक्कुम - 70,54,462/-

6. कार्यादेश - 1731 दि. 02/01/2013
7. कामाची मुदत - 18 महिने

सदर कामावर वित्तीय वर्ष 2013/14 व 2014/15 या कालावधीत 7 धावत्या देयकापर्यंत खालील प्रमाणे खर्च झाल्याचे आढळुन आले.

| अ क्र. | धावते देयक क्रमांक | रक्केम रुपये |
|---|---|---|
| 1 | 1 | 9,79,312/- |
| 2 | 2 | -/9,79,313 |
| 3 | 3 | -/9,22,735 |
| 4 | 4 | -/19,21,410 |
| 5 | 5 | -/5,60,454 |
| 6 | 6 | -/12,80,944 |
| 7 | 7 | -/11,75,058 |
| **एकूण** | | **7819317/-** |

सदर कामची नस्ती, मोजमाप नोंदवही सह तपासणी केली व आढळून आलेल्या उणीवाबाबत अर्धसमास पत्र क्र.16 दि.30/06/2017 अन्वये कळविले असता विभागाने अनुपालन सादर केले नाही. त्यामुळे लेखा परीक्षणाचे अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत.

1. सदर कामाचे अंदाजपत्रक MJP च्या दरसुची 2007/08 नुसार तयार केले व दि.15/07/2008 ते 18/08/2011 या कालावधीत तीनदा प्रसिध्दीककरण केले असता फक्ते दोनच निविदा प्राप्त झाल्या. सदर निविदा दि.07/09/2011 रोजी उघडल्या असता मे. असो. इंजिनियर्स यांची 77% जादा ही सर्वात कमी दराची (L1) निविदा होती. वाटाघाटीनुसार सदरची निविदा 66.02% जादा दराने मंजूर केली. सदरची निविदा 2007/08 च्या दरसुचीनुसार 66.02% जादा म्हणजे 2011/12 चे दरसुचीनुसार ईस्टीमेट दरानुसार असल्याचे नमुद करुन नियम 73 (क) नुसार स्थायी समिती समोर मान्यतेसाठी सादर केली व त्यास स्थायी समिती ठराव क्र.222, दि.01/10/2012 नुसार मान्यता देण्यात आली. सदर निविदेची वैधता 180 दिवस असताना व ती जाने. 2009 मध्ये संपुष्टात आली असताना नवीन अंदापत्रक करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही, हे नियमबाह्य आहे.

2. वर्ष 2011/12 मध्ये निविदा 77% जादा दराने आल्याने अंदाजपत्रक सन 2011/12 च्या दरसुची नुसार तयार करुन त्यानुसार निविदा मागविणे आवश्यक असताना सन 2007/08 पुर्वीचे दरसुचीवर आधारित अंदाजपत्रकप्रमाणे निविदा मंजूर करणे चुकीचे आहे.

3. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम यांचेकडील परिपत्रक क्र. सीएटी-१०८७/सीआर/१९६/बी-2 दि. 4.5.1988 नुसार अंदाजपत्रकापेक्षा 5% पेक्षा जादा दराने निविदा मंजूर करण्यात येवू नये अशी तरतूद आहे. तथापि सदर कामाची निविदा 66.02% जादा दराची मंजूर करण्यात आली. हे नियमबाह्य आहे. L1 निविदा 77% जादा यांचेशी वाटाघाटी करता तो 66.02% जादा दराने म्हणजे सन 2011/12 चे अंदाजपत्रकानुसार ईस्टींमेट दराने असल्याचे नमुद करुन स्थायी समिती समोर मान्यते सादर केले आहे. परंतु सन 2011-12 चे दरसुचीनुसार अंदाजपत्रक तयार करणे आवश्यक असताना तसे अंदाजपत्रक केले नसल्याचे आढळुन आले.

4. सदर कामाची निविदा रक्कहम रु.1,17,11,818/- असल्याने करारनामा रु.10900/- च्या मुद्रांक

शुल्क रक्कमेवर करणे आवश्यक असताना रक्कम रु.6200/- च्या मुद्रांक शुल्क रक्कमेवर केल्याचे आढळुन आले, तरी तफावत रक्कम रु.4700/- ठेकेदाराकडून वसूल करून शासनाकडे जमा करणे आवश्यक आहे.

5. स्थायी समितीची मान्यता दि.01/10/2012 रोजीची असताना सदर कामाचे कार्यादेश दि.02/01/2013 रोजी म्हणजे 3 महिने विलंबाने दिले आहेत. विलंबाची योग्य कारणे लेखापरीक्षणास सादर केली आली नाहीत.

6. सदर कामाची मुदत कार्यादेश दि.02/01/2013 पासुन 18 महिने म्हणजे दि.02/07/2014 पर्यंत असताना पहिले धावते देयकातील दि.20/09/2013 च्या नोंदीनुसार सदर कामाची खोदाई कालावधी दि.01/7/2013 ते 30/09/2013 असल्याचे नमुद आहे यावरुन सदरचे कामाची सुरवात दि.02/01/2013 ते 01/07/21013 या सहा महिन्यात झाली नसल्याचे आढळुन आले. सदर कामाची मुदत 18 महिने असताना सहा महिने कामास सुरवात न करण्यायची कारणे लेखा परीक्षणास सादर करण्यात आली नाहीत.

7. सदरचे कामाची मुदत दि.02/07/2014 पर्यंत असताना मार्च 2015 पर्यंत सदर कामावर रक्कम रु.7819317/- खर्च झाला असताना सदरचे काम अपुर्ण असल्यांचे आढळुन आले निविदा व करारनामा अटी व शर्ती क्र. 4 नुसार मुदतवाढीसाठी मक्तेपदाराने मुदत संपण्यापूर्वी 15 दिवस अगोदर अर्ज करणे आवश्यक आहे. कारण योग्य वाटल्यास मा. आयुक्त यांना मुदतवाढीचे अधिकार आहेत. परंतु असा अर्ज सादर केला नाही.

8. करारनामा अटी व शर्ती अट क्र 17 नुसार काम मुदतीत पुर्ण न केल्यास व कारण 500 प्रतिदिन अथवा मा. आयुक्त हे निश्चीत करतील असे असताना त्याप्रमाणे कार्यवाही झाली नाही.

9. सदर कामाची मुदत दि.02/07/2014 पर्यंत असताना मुदतवाढ मंजूर नसताना 4 थे ते 7 वे धावते देयक नुसार मक्तेदारास आदा केलेली रक्केम रु.32,09,656/- (192410+560454+ 1280944+1175058) लेखापरीक्षणास मान्य करता येत नाही.

10. करारनामा अटी व शर्ती क्र.18 नुसार मुदतीनंतर केलेल्या कामाच्या 10% रक्कम नुकसान भरपाई म्हणून बिलातुन वसुल करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही झाली नसल्याने कामाची रक्कम रु.3208866/- चे 10% रक्कम रु.320887/- लेखापरीक्षणास मान्य करता येत नाही.

11. करारनामा अटी व शर्ती अट क्र. 20 नुसार या कामासाठी पुरवठा केलेल्या मटेरियलची रक्कम 80% व वापरानंतर 10% व हायड्रॉलिक टेस्टींग नंतर उर्वरीत 60% रक्केम अदा करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही झाली नाही. हायड्रॉलिक टेस्टींगच्या अगोदर देयके अदा केल्याने ठेकेदारास अतिरिक्त लाभ देण्यात आले आहेत.

12. सदर कामामध्ये वापरलेल्या गौण खनिजाची स्वामित्वधनाची रक्कम (रॉयल्टी) शासनास भरणा झाल्याची खात्री केली नसल्याचे आढळुन आले, त्यामुळे सदर गौण खनिजाची रक्कम शासनास भरणा केली नसल्यास शासन निर्णयानुसार रक्कम वसुल करुन शासनास भरणा करणे आवश्यक आहे.

13. सदरचे काम पुर्ण झाल्यानंतर हायड्रोलिक टेस्टींग कॅंव्हा केले याची नोंद लेखापरीक्षणास आढळुन आली नाही.

14. थर्ड पार्टी टेक्निकल ऑडीट केल्याची कागदपत्रे लेखापरीक्षणास आढळुन आली नाहीत.

15. साहित्या तपासणी अहवाल लेखापरीक्षणास आढळुन आले नाही.

## *35 पॉवर फॅक्टर कमी आल्याने महावितरण कंपनीकडुन इंन्सेटिव्ह कमी मिळाल्याने मनपाचे झालेल्या नुकसानबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 2**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 105287.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 105287.00/-

***मनपाने संकल्प इले. सांगली यांचेकडुन A.P.F.C. पॅनल बोर्ड व कॅपॅसिटरचे काम 2012-13 मध्ये केले होते. सदर कामाच्या अटी शर्ती मधील अट क्र. 16 प्रमाणे काम पूर्ण झाल्यानंतर 3 वर्षे मेंटेनन्सचे काम मक्तेदाराचे असून पॉवर फॅक्टर 1.00 पेक्षा कमी आल्यास व त्यामुळे महावितरण कंपनीकडुन मनपास वीज बिलात इंन्सेटिव्ह न मिळाल्यास त्या रक्कमेची मक्तेदार संकल्प इले. यांचेकडून वसूल करणेत येईल असे असताना वित्तीय वर्ष 2013-14 च्या उजनी, पाकणी व भवानी पेठ पाणी पुरवठा केंद्राकउील वीज देयकाची तपासणी केली असताना खालीलप्रमाणे वीज बिलात पॉवर फॅक्टर 1.00 पेक्षा कमी आल्याने कमी इंन्सेटिव्ह मिळाला, त्यामुळे मनपाचे रु.105287/- चे नुकसान झाले आहे. एमबीआर, जुळे सोलापूर कडील वीज बिले लेखा परीक्षणास तपासणीसाठी मिळाली नसल्याने सदर बिलातील पॉवर फॅक्टरबाबतची तपासणी करता आली नाही.***

1. सोलापूर महानगरपालिकेच्या उजनी, भवानी पेठ, एम बी आर जुळे सोलापूर व पाकणी येथील पाणी पुरवठा केद्रांचे वीज बिल दरमहा रु.1 कोटी महावितरण कंपनीस आदा केले जाते. सदरच्या वीज वापरात पॉवर फॅक्टर 1.00 असल्यास महावितरण कंपनीकडुन वीज बिलात 7% इंनसेटिव्ह दिला जातो. त्यामुळे सदर ठिकाणी पॉवर फॅक्टर 1.00 येण्यासाठी मनपाने संकल्प इले, सांगली यांचेकडुन A.P.F.C. पॅनल बोर्ड व कॅपॅसिटरचे काम 2012-13 मध्ये केले होते. सदर कामाच्या अटी शर्ती मधील अट क्र.16 प्रमाणे काम पूर्ण झाल्यानंतर 3 वर्षे मेंटेनन्सचे काम मक्तेदाराचे असून पॉवर फॅक्टर 1.00 पेक्षा कमी आल्यास व त्यामुळे महावितरण कंपनीकडुन मनपास वीज बिलात इंन्सेटिव्ह न मिळाल्यास त्याची रक्कम मक्तेदार संकल्प इले. यांचेकडून वसूल करणेत येईल अशी तरतूद असताना वित्तीय वर्ष 2013-14 च्या उजनी, पाकणी व भवानी पेठ पाणी पुरवठा केंद्राकउील वीज देयकाची तपासणी केली असताना खालीलप्रमाणे वीज बिलात पॉवर फॅक्टर 1.00 पेक्षा कमी आल्याने कमी इंन्सेटिव मिळाला, त्यामुळे मनपाचे रक्कम रु.105287/- चे नुकसान झाले आहे.

| अ.क्र. | पाणीपुरवठा केंद्राचे नाव | कालावधी | वीज बिल रक्कम | प्राप्त पॉवर फॅक्टफर | मिळालेली इंन्सेटिव्ह रक्कम रु. | 7% प्रमाणे मिळावयास आवश्यक इंन्सेटिव्ह रक्कम रु. | फरक रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | पाकणी | नोव्हेंबर 2013 | 2288910/- | 0.98 | 121750/- | 160224/- | 38474/- |
| 2 | भवानी पेठ | जून 2013 | 730460/- | 0.937 | 12825/- | 51132/- | 38307/- |
| 3 | भवानी पेठ | जुलै 2013 | 730800/- | 0.98 | 22650/- | 51156/- | 28506/- |
| | | | | | | **एकूण** | **105287/-** |

2) एम.बी.आर, जुळे सोलापूर यांच्याकडील वीज बिले लेखापरीक्षणासाठी तपासणीसाठी उपलब्ध करून दिली नसल्याने सदर बिलातील पॉवर फॅक्टरबाबतची तपासणी करता आली नाही.

उपरोक्त मुद्यांबाबत अर्धसमास पत्र क्र.05 दि.15/05/2017 अन्वये खुलासा मागितला असता विभागाने अनुपालन/खुलासा सादर केलेला नाही, त्यामुळे आक्षेप कायम ठेवण्यात आले आहेत.

DATRNDM7201 (Ref No : 129, Hmm No : 5)

### *36 जुना वॉर्ड क्र. 51 वाडिया हॉस्पीटल व कोनापुरे चाळ येथे रस्तो डांबरीकरण करणे या कामातील अनियमिततेबाबत........*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 5**

*लेखा शीर्ष : सार्वजनिक आरोग्य अभि मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 1925338.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 1000.00/-

***मुद्रांक शुल्काची रक्कम रु.1000/- वसूल करून त्याचा भरणा शासनास करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र शासन***

***सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडील परिपत्रक क्र.सीएसटी-1087/सीआर-196/बी-2 दि.04/05/1988 नुसार अंदाजपत्रकिय रक्कमेच्या 5% पेक्षा जास्त दराची निविदा मंजूर करू नये, अशी तरतूद असताना सदर कामाची निविदा 8% जास्त दराने मंजूर करण्यात आली, हे नियमबाह्य आहे. करारनामा अटी व शर्ती नुसार दंडाची कार्यवाही करणे आवश्यदक असताना अशी कार्यवाही झाली नाही. सदरचे काम केव्हा पुर्ण झाले याची (Completion Certificate) पुर्णत्वाचा दाखला नस्तीत नाही. करारनामा अट क्र. 6 नुसार उशिरा केलेल्या कामाच्या) रकमेच्या 10% रक्कम नुकसान भरपाई रक्कम म्हणुन वसुल करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही केली नाही. करारनामा अट क्र.18 नुसार सदर कामाचे त्रयस्थ संस्थेकडुन तपासणी करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही झाल्याचे तपासणी अहवाल लेखापरीक्षणास नस्तीत आढळुन आला नाही.***

कामाचा तपशील -

1. प्रशासकीय मान्यकता - सावि/9/नपा/आरआर/383/12, दि.06/12/2012
2. पुर्वगणन पत्रक - 19,28,829/-
3. निविदा रक्क्म - 17,82,720/-
4. मंजूर निविदा रक्कम - 8% जास्त (रु.19,25,338/-)
5. मक्तेदार - समर्थ कंन्ट्रक्शन
6. स्थायी मंजूरी - स्थायी समिती ठ.क्र.147, दि.30/07/2013
7. कामाचे आदेश - नअ/गवसु/ता/183, दिनांक 01/06/2013
8. कामाची मुदत - 90 दिवस

सदरच्या जुना वॉर्ड क्र. 51 वाडिया हॉस्पीटल व कोनापुरे चाळ येथे रस्ते डांबरीकरण करणे कामाची नस्ती, मोजमाप नोंदवही यांची तपासणी केली असता खालीलप्रमाणे उणिवा आढळुन आल्या.

1) सदर कामाचा करारनामा दिनांक 27/05/2013 रोजी रु.100/- चे मुंद्राक शुल्का रकमेच्या स्टँम्प पेपरवर करण्यात आला असल्याचे आढळुन आले. मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 मधील कलम 63 व शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-2009/सं.क्र.1794/नवी-20दि.07/12/2009 अन्वये पहिल्या दहा लाख रकमेच्या कार्यकंत्राट रकमेस रु.100/- व पुढील प्रत्येक लाख रकमेस 100/- च्या स्टँम्प पेपरवर कार्यकरार करारपत्र करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे सदर कामाची कार्यकरार रक्कम र.रु.19,25,338/- असल्याने सदर कामाचा करारनामा रु.1100/- चे मुंद्राक शुल्क रकमेवर करणे आवश्यक असताना 100/- च्या रकमेवर केल्याने उर्वरीत रक्करम रु.1000/- चा भरणा शासनास करणे आवश्यक आहे.

2) प्राप्त निविदा पैकी सर्वात कमी दराची निविदा L1 8% जास्त दराने मंजूर करण्यात आली. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडील परिपत्रक क्र.सीएसटी-1087/सीआर-196/बी-2 दि.04/05/1988 नुसार अंदाजपत्रकिय रक्कमेच्या 5% पेक्षा जास्त दराची निविदा मंजूर करू नये, अशी तरतूद असताना सदर कामाची निविदा 8% जास्त दराने मंजूर करण्यात आली, हे नियमबाह्य आहे.

3) निविदा व करारनामा अटी व शर्ती मधील अट क्र.1 नुसार सदर कामाची मुदत कार्यादेश दिनांकापासून 90 दिवस होती म्हणजे दि.01/06/2013 पासुन 90 दिवस म्हणजे दि.31/08/2013

पर्यंत होती, परंतु सदरचे काम मुदतीत पुर्ण झाले नसल्याचे आढळुन आले. करारनामा अट क्र.5 नुसार मुदतवाढीसाठी मक्तेदाराने मुदत संपणेपूर्वी अर्ज करणे आवश्यक असताना नस्तीमध्ये दि.03/03/2016 रोजी मार्च 2016 पर्यंतच्या मुदतवाढ केल्याचे आढळुन आले. परंतु मक्तेदारास मुदतवाढ केव्हापर्यंत मंजूर केली हे लेखापरीक्षणास आढळुन आले नाही. यावरुन सदरचे कामाची दि.31/08/2013 पर्यंत मुदत असताना सदरचे काम 31/03/2016 पर्यंत अपुर्ण असल्याचे आढळुन आले. त्यामुळे करारनामा अटी व शर्ती नुसार दंडाची कार्यवाही करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही झाली नाही. सदरचे काम केव्हा पुर्ण झाले याची (Completion Certificate) पुर्णत्वाचा दाखला नस्तीत नाही.

4) करारनामा अट क्र. 6 नुसार उशिरा केलेल्या कामाच्या रकमेच्या 10% रक्कम नुकसान भरपाई रक्कम म्हणुन वसुल करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही केली नाही.

5) करारनामा अट क्र. 18 नुसार सदर कामाचे त्रयस्थ संस्थेकडुन तपासणी करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही झाल्याचे तपासणी अहवाल लेखापरीक्षणास नस्तीत आढळुन आला नाही.

उपरोक्त मुद्याबाबत अर्धसमास पत्र क्र. 22 दि. 25/07/2017 अन्वये कळविले असता विभागाने अनुपालन सादर केले नाही. त्यामुळे आक्षेप कायम करण्यात येत आहेत.

DATRNDM7201 (Ref No : 130, Hmm No : 22)

## *37 हिप्परगा तलाव दुबार पपिंग करण्यासाठी पंप खरेदी करणे व बसवणे यामधील अनियमितताबाबत..*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 06**

*शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 489503.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 489503.00/-

***कामाची निविदा प्राकलन दराच्या 12 टक्के जास्त दाराची स्विकारली आहे. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.सा.बावि.क्र.CST/1087/CR-196/बी-2 दिनांक 04-05-1988 नुसार कोणत्याही कामाची निविदा मंजूर करताना 5 टक्के किंवा यापेक्षा जास्त दराची निविदा मंजूर करु नये अशी तरतूद असताना कामाची निविदा 12 टक्के जास्त दाराची स्विकारली आहे. साठा रजिष्टर तसेच जडसंग्रह नोंदवहीमध्ये साहित्याची नोंद घेतलेली नाही. कामांची मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणास उपलब्ध झालेली नाही. त्यामुळे विहित मुदतीत काम झाल्याची खात्री करता येत नाही. तांत्रिक अधिकारी यांचेकडून काम पुर्ण झाल्याबाबतचे प्रमाणपत्र घेतलेले नाही. बाजार मुल्य इलेक्ट्रीकल्स साहीत्य खरेदी करताना काढलेले नाही. तसेच बाजारमुल्याचे कोटेशन नस्तीमध्ये दिसुन येत नाही. प्रमाणके लेखापरीक्षणास उपलब्ध झालेली नाहीत. त्यामुळे आयकराची रक्कम कपात केली असल्याची खात्री होत नाही.***

हिप्परगा तलाव दुबार पपिंग करण्यासाठी पंप खरेदी करणेबाबत वित्तीय वर्ष 2013-14 मध्ये पाणीपुरवठा विभागाच्या 5 कामाची निविदा नस्ती व मोजमाप नोंदवही उपलब्ध न केल्याबाबत 5 प्रकरणापैकी अ.क्र.2 वरील प्रकरण हिप्परगा तपाल दुबार पपिंग करण्यासाठी पंप खरेदी करणेबाबत असुन त्याचे अभिलेख उपलब्ध केल्यानंतर प्रकरण तपासण्यांत आलेले आहे. त्याच तपशील पुढील प्रमाणे आहे. दै.सुराज्य ला दिनांक 3/2/13 ला जाहिरात दिलेली होती. दिनांक 26/2/13 दुपारी 4.20 वा निविदा उघडण्यात आली. निविदेची रक्कम रु.4,89,503/- असून त्याकरिता तीन निविदा खालील प्रमाणे प्राप्त झाल्या आहेत.

1) सुरेश इलेक्ट्रीकल्स मक्त्यापेक्षा 31.5 टक्के जास्त दराने

2) श्री दत्त इलेक्ट्रीकल्स मक्त्यापेक्षा 38.5 टक्के जास्त दराने

3) श्री नेरुरकर इलेक्ट्रीकल्स मक्त्यापेक्षा 42.5 टक्के जास्त दराने

मक्तेदार सुरेश इलेक्ट्रीकल्स यांनी निविदेत दिलेले इस्टीमेटपेक्षा 31.5 टक्के जास्त हे दर सर्वात कमीचे असलेने सदर मक्तेदाराशी वाटाघाटी करुन निश्चित केलेले मक्त्यांच्या रक्कमेपेक्षा 12 टक्के जास्त हे दर खर्चाचा करार करणेस , वर्क ऑर्डर देणेस मान्य करुन मुख्य लेखापरिक्षक यांची दिनांक 6/07/2013 मुख्य लेखा परिक्षकांनी तसेच मा. आयुक्त यांनी मान्यता दिनांक 19/01/2013 ला दिलेली आहे. स्थायी समिती ठराव 64 दिनांक 01/06/2013कार्यादेश सार्वजनिक आरोग्य अभियंता सोलापुर यांचे आदेश क्र.साआअ/जल वित्त दिनांक 06/04/2013 मुख्य लेखापाल कार्यालयाचे पत्र क्र.निरंक दिनांक 27/5/2013 नुसार रक्कम रु.14,02,100/- अनुदान उपलब्घ असणेबाबत पत्र आहे. उपरोक्त बाबत खालीप्रमाणे त्रुटी आढळुन येते.

1) कामाची निविदा प्राकलन दराच्या 12 टक्के जास्त दाराची स्विकारली आहे. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.सा.बावि.क्र. CST/1087/CR-196/बी-2 दिनांक 04-05-1988 नुसार कोण्त्याही कामाची निविदा मंजूर करताना 5 टक्के किंवा यापेक्षा जास्त दराची निविदा मंजूर करु नये अशी तरतूद असताना कामाची निविदा 12 टक्के जास्त दाराची स्विकारली आहे.

2) साठा रजिष्टर तसेच जडसंग्रह नोंदवहीमध्ये साहित्याची नोंद घेतलेली नाही.

3) कामांची मोजमाप पुस्तिका उपलब्ध झालेली नाही. त्यामुळे विहित मुदतीत काम झाल्याची खात्री करता येत नाही.

4) तांत्रिक अधिकारी यांचेकडून काम पुर्ण झाल्याबाबतचे प्रमाणपत्र घेतलेले नाही.

5) बाजार मुल्य इलेक्ट्रीकल्स साहीत्य खरेदी करताना काढलेले नाही. तसेच बाजारमुल्याचे कोटेशन नस्तीमध्ये दिसुन येत नाही.

6) प्रमाणके लेखापरीक्षणास उपलब्ध झालेली नाही. त्यामुळे आयकराची व इतर कराच्या रक्कम कपात केली असल्याची खात्री होत नाही.

वरील असलेल्या त्रुटीबाबत विभागाला अर्धसमास ज्ञापन क्र.147 दिनांक 13/06/2018 खुलासा सादर करण्याबाबत कळविले असता विभागाने खुलासा सादर केलेला नाही. त्यामुळे आक्षेप कायम ठेवण्यांत येत आहे.

FDSJRDM6801 (Ref No : 137, Hmm No : 147)

## *38 उजनी येथे इन्टेक चेनलची खोली वाढवणे. (उजनी पंप हाऊस येथील चर मधील गाळ काढणे व चॅनलसाठी भिंत बांधणे)यामधील अनियमितताबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 04**

*लेखा शीर्ष :00 शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 1452579.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1452579.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 29552.00/-

***कामांच्या नस्ती मध्ये करारनामा दिसुन येत नाही. मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 अनुसूची-1 मधील तरतुदी नुसार करारनामा करतांना 10 लाखा पर्यंतच्या कामाकरिता रु.100/- च्या मुद्रांक शुल्का पेपर वर करारनामा करणे आवश्यक आहे. त्यानुसार करारनामा न केल्याने शासनाचे रक्कम रु.500/- चे नुकसान झालेले आहे. तांत्रिक अधिकारी यांचेकडून काम पुर्ण झाल्याबाबतचे प्रमाणपत्र घेतलेले नाही. सदरची रक्कम मक्तेदारकडून वसूल करण्यात यावी. कामगार कल्याण उपकर रक्कम रु. रु14526/- व कामगार विमा 1 टक्केप्रमाणे रक्कम रु14526/- वसुल केलेला नाही. प्रमाणके लेखापरीक्षणास उपलब्ध झालेली नाही.***

निविदा नस्ती व मोजमाप नोंदवही उपलब्ध न केल्याबाबत परिच्छेद होता. तथापि दिनांक 15/5/2018 रोजी वित्तीय वर्ष 2013-14 च्या अंतीमिकरणाच्या वेळी मा.आयुक्त व उप संचालक स्थानिक निधी लेखापरिक्षा रायगड भवन नवी मुंबई यांचेशी झालेल्या चर्चेनुसार अभिलेखे उपलब्ध करुन दिल्याने एकूण 5 प्रकरणापैकी अ.क्र.3 वरील प्रकरण उजनी पंप हाऊस येथील चर मधील गाळ काढणे व चॅनलसाठी भिंत बांधणे बाबत असुन ते तपासण्यांत आलेले आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

उजनी पंप हाऊस येथील चर मधील गाळ काढणे व चॅनलसाठी भिंत बांधणे-

पुर्वगणकपत्राचा क्र.वर्ष निरंक/2012-13

डी.एस.आर.दराचे वर्ष 2011-12 डी.एस.आर.दर

पुर्वगणकपत्राची (एस्टीमेटची) रक्कम रु.4,47,767/- व रु.10,86,704/-

मक्कत्याची रक्कम रु.14,52,579/-

मा.स्थापत्य समिती ठराव क्र.08 दिनांक 9/4/2013

मा.स्थायी समिती ठराव क्र 7/9-4-13

विषयांकित कामाच्या अनुषंगाने उजनी पंप हाऊस येथील चॅनलसाठी भिंत बांधणे या करिता रु.4,47,767/- इतक्या रक्कमेचे पुर्वगणकपत्रक करण्यात आलेले असुन सदर ठिकाणच्या चॅनलमधील गाळ काढणे करिता रु.10,86,704/- इतक्या रक्कमेचे पुर्वगणकपत्रक करण्यांत आलेले आहे. यास मा.स्थापत्य समिती ठराव क्र.7 दिनांक 9-4-13 ला मान्यता आहे.

मुख्य लेखापाल यांचा जा.क्र.मुले.6 अंदाज 3612 दिनांक 1-2-13 अन्वये सन 2012-13 च्या

भांडवली कामाअंतर्गत पाण्याच्या टाक्या बांधणे/पाईप लाईन घालणे या कामासाठी 5 कोटीची तरतुद असुन त्यामधुन रु.3.64 कोटी उपरोक्त नमुद केलेनुसार तरतुद उपलब्ध करुन दिलेली आहे.

दिनांक 10/4/13 रोजी चार निविदा प्राप्त झाल्या आहेत. त्या चार निविदा उघडयात आलेल्या आहेत. त्या खालील प्रमाणे आहे.

1) जयमल्हार मजुर सहकारी संस्था मक्त्यापच्या रक्कमेपेक्षा 5 टक्के जास्त
2) कल्याणी कन्स्ट्रक्शन मक्त्यातच्या रक्कमेपेक्षा 32 टक्के जास्त
3) राऊत कन्स्ट्रक्शन मक्त्यातच्या रक्कमेपेक्षा 25.30 टक्के जास्त
4) शिव कन्स्ट्रक्शन मक्त्यातच्या रक्कमेपेक्षा 32 टक्के जास्त

मक्तेदार जयमल्हार मजुर सहकारी संस्था यांनी निविदेत दिलेले मक्त्याच्या रक्कमेपेक्षा 5 टक्के जास्त यांचे दर सर्वात कमी असल्याने ते स्विकारुन मा. आयुक्त यांनी दिनांक 10-5-13 ला मान्यता आहे.

कार्यादेश सार्वजनीक आरोग्य अभियंता सोलापुर यांचे आदेश क्र.246-अदिनांक 20/5/13 चे असुन आदेशापासुन दोन महिन्यात काम पुर्ण करावयाचे आहे.

उपरोक्त बाबत खालीप्रमाणे त्रुटी आढळुन येते.

1) कामांच्या नस्ती मध्ये करारनामा दिसुन येत नाही. मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 अनुसूची-1 मधील तरतुदी नुसार करारनामा करतांना 10 लाखा पर्यंतच्या कामाकरिता रु.100/- च्या मुद्रांक शुल्का पेपर वर करारनामा करणे आवश्यक आहे. त्यानुसार करारनामा न केल्याने शासनाचे रक्कम रु.500/- चे नुकसान झालेले आहे.
2) तांत्रिक अधिकारी यांचेकडून काम पुर्ण झाल्याबाबतचे प्रमाणपत्र घेतलेले नाही. सदरची रक्कम मक्तेदारकडून वसूल करण्यात यावी.
3) कामगार कल्याण उपकर रक्कम रु. रु14526/- व कामगार विमा 1 टक्केप्रमाणे रक्कम रु14526/- वसुल केलेला नाही.
4) प्रमाणके लेखापरीक्षणास उपलब्ध झालेली नाही.

वरील असलेल्या त्रुटीबाबत विभागाला अर्धसमास ज्ञापन क्र.144 दिनांक 12/06/2018 खुलासा सादर करण्याबाबत कळविले असता, विभागाने खुलासा सादर केलेला नाही. त्यामुळे सदर आक्षेप कायम ठेवण्यांत येत आहेत.

FDSJRDM6801 (Ref No : 138, Hmm No : 144)

## *39 मोठ्या निवासी कराच्या वसुलीबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 04**

*लेखा शीर्ष : कर संकलन मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 2125729.00/-

***मोठ्या निवासी प्रकारणांची नोंदवहीमध्ये नमूद केलेली प्रकरणे तपासणीसाठी सादर केली नाहीत. सोलापूर मनपा वित्तीय वर्ष 2013-14 मध्ये रक्कम रु.1,30,145/- वसुल केलेल्या रकमा शासनास लेखापरिक्षण कालावधीपर्यंत म्हणजे माहे. नोव्हेंबर 2017 अखेर जमा केलेले नाहीत. मोठ्या निवासी इमारत नोंदवहीतील नोंदीवरुन 2013-14 या अर्थिक वर्षाअखेरीस रक्कम रु.21,25,729/- इतकी थकीत असुन ती दंडासहित वसुल करण्यात आलेली नाही. शासनास जमा करुन त्याबाबतचे माहीतीचे विवरणपत्र वर्ष संपल्यानंतर तीन महिन्याच्या आत शासनास सादर करणे आवश्यक आहे. बँक खात्यात दि.31/03/2014 अखेर जमा असलेली रक्कम रु.5,94,575/- ही शासनास जमा न करता बँके खात्यामध्येच ठेवण्यात आलेल्या आहेत.***

मनपाचे कर आकारणी व कर संकलन विभागामार्फत मोठ्या निवासी कराच्या नोंदवहीमधील नोंदीची तपासणी केली असता आढळुन आलेल्या त्रुटीबाबत अर्धसमास पत्र क्र.62 दि.18/11/2017 अन्वये विचारणा केली होती. खात्याने अनुपालन सादर केले नसल्याने लेखापरीक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1)महाराष्ट्र (मोठ्या निवासी जागा असलेल्या) इमारतीवरील कर अधिनियम, 1979 मधील नियम 3 नुसार मनपा क्षेत्रात असणारे 150 चौ.मी. निवासी इमारतीचे करयोग्य मुल्याच्या 10 टक्के रक्कम दरानुसार कराची आकारणी करण्यात यावी अशी तरतूद आहे. त्यानुसार सोलापूर मनपा क्षेत्रात 2013-14 या आर्थिक वर्षामध्ये मोठ्या निवासी इमारत नोंदवहीची तपासणी केली असता त्यामध्ये 261 प्रकारणांची नोंद करण्यात आलेची आढळुन आली आहेत. सदर प्रकरणांची तपासणीसाठी मागणी केली असता लेखा परिक्षणास सादर केली नाहीत. त्यामुळे नोंदवहीमध्ये नमूद केलेली मोठ्या निवासी कराची रक्कम बरोबर असल्याची खात्री करता आली नाही.

2) महाराष्ट्र (मोठ्या निवासी जागा असलेल्या) इमरतीवरील कर अधिनियम, 1979 मधील नियम 14(1) नुसार वसुल केलेल्या कराच्या रकमा ह्या वसुल केल्याच्या दिनांकापासून 30 दिवसांच्या कालावधीत राज्य शासनास जमा करणे आवश्यक आहे. सोलापूर मनपा वित्तीय वर्ष 2013-14 मध्ये रक्कम रु.1,30,145/- वसुल केलेल्या रकमा शासनास लेखापरिक्षण कालावधीपर्यंत म्हणजे माहे. नोव्हेंबर 2017 अखेर जमा केलेले नाहीत.

3) मोठ्या निवासी इमारत नोंदवहीतील नोंदीवरुन 2013-14 या अर्थिक वर्षाअखेरीस रक्कम रु.21,25,729/- इतकी थकीत असुन ती दंडासहित वसुल करण्यात आलेली नाही.

4) वसुल करण्यात आलेल्या रकमा ह्या आयसीआयसीआय बँक खात्यात जमा केल्या आहेत. सदर खात्यामध्ये दि.31/03/2014 अखेर रक्कम रु.5,94,575/- इतकी शिल्लक आहेत. सदरच्या रकमा ह्या महाराष्ट्र (मोठ्या निवासी जागा असलेल्या) इमरतीवरील कर अधिनियम, 1979 मधील नियम 14 नुसार शासनास जमा करुन त्याबाबतचे माहीतीचे विवरणपत्र वर्ष संपल्यानंतर तीन महिन्याच्या आत

शासनास सादर करणे आवश्यक आहे. सदरच्या रक्कमा ह्या शासनास जमा न करता बँके खात्यामध्ये जमा करुन ठेवण्यात आल्या आहेत. याबाबत मनपाने कोणतीच कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही हे नियमबाह्य आहे. तरी प्रलंबित मोठ्या निवासी कराची रक्कम शासनास विवरणपत्रांसह त्वरित अदा करणे आवश्यक आहे.

DGPKVSM6101 (Ref No : 29, Hmm No : 62)

## *40 मालमत्ता कर बसविण्याच्यादृष्टीने करपात्र मुल्यमध्ये सुधारणा केले नसलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 03**

*लेखा शीर्ष : कर संकलन मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9ब*

***महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 कलम 129 स्पष्टीकरणनुसार करपात्र मुल्याच्या दरामध्ये दर पाच वर्षानी सुधारणा करणे आवश्यक होते. परंतु मनपाने 2009 नंतर करपात्र मुल्यामध्ये सुधारणा केलेले नाही. हद्दवाढ भागातील मिळकतदाराना सन 2005 वर्षापुर्वीचे दर लागू करण्यात आल्याबाबतचा मनपाचा ठराव लेखापरीक्षणास सादर केला नाही. मनपाचे करपात्र मुल्य दरामध्ये अधिनियमातील तरतूदीनुसार दर पाच वर्षानी सुधारणा केली नसल्याने मनपाचे उत्पन्नामध्ये वाढ होत नसल्याचे दिसून येत आहे.***

सोलापूर मनपा अंतर्गत असणारे शहर भाग कर संकलन विभागाचे 2013-14 या आर्थिक वर्षातील कर निर्धारण प्रकरणांचे लेखा परीक्षण केले असता आढळुन आलेल्या त्रुटीबाबत अर्धसमास पत्र क्र.65 दि.18/11/2017 अन्वये विचारणा केली होती. खात्याने अनुपालन सादर केले नसल्याने लेखापरीक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1)महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 कलम 129 स्पष्टीकरणनुसार या कलमाच्या प्रयोजनांसाठी मनपाने भांडवली मुल्य हा आधार समजून मालमत्ता कर बसविण्याच्या स्वीकार केल्यानंतर, करयोग्य इमारतीच्या संबंधीतील मालमत्ता करामध्ये प्रत्येक पाच वर्षानंतर सुधारणा करण्यात येईल आणि अशा प्रत्येक सुधारणेनंतर, अशी मालमत्ता कराची रक्कम, कोणत्याही बाबतीत सुधारणा केल्याच्या वर्षाच्या लगत पुर्वीच्या वर्षामध्ये बसविलेल्या व देय असलेल्या मालमत्ता कराच्या रकमेच्या चाळीस टक्क्यांहून अधिक असणार नाही अशी तरतूद आहे. परंतु कर संकलन व कर आकारणी विभागाकडील कार्यालयीन आदेश दि.19/05/2006 मध्ये नमुद केलेला मनपा ठराव क्र.193

दि.20/10/2005 अन्वये सन 2005 - 2009 या वर्षाकरिता निरनिराळ्या बांधकामासाठी मंजुर केलेल्या दरानुसार करपात्र मुल्य ठरविण्यात आलेले आहेत. करपात्र मुल्य हे अधिनियमाचे कलमानुसार दर पाच वर्षानी सुधारणा करणे आवश्यक होते. परंतु मनपाने सदर करपात्र मुल्यामध्ये सुधारणा केलेले नाही.
2) करपात्र मुल्य काढणेसाठी मंजुर केलेले दर हे मनपाचे शहर भागातील मिळकदाराना लागू करणेत आलेले आहेत. हद्द्वाढ भागातील मिळकतदाराना सदरचे लागू करणेत आलेले नाहीत. हद्द्वाढ भागातील मिळकतदाराना सन 2005 वर्षापुर्वीचे दर लागू करण्यात आल्याचे खात्याने सांगितले आहे. हद्द्वाढ भागात लागू करणेत आलेले दराबाबतचा मनपाचा ठराव लेखापरीक्षणास सादर केला नाही.
3) मनपाचे करपात्र मुल्य दरामध्ये अधिनियमातील तरतूदीनुसार दर पाच वर्षानी सुधारणा करणे आवश्यक असताना तशी सुधारणा केली नसल्याने मनपाचे उत्पन्नामध्ये वाढ होत नसल्याचे दिसून येत आहे.

DGPKVSM6101 (Ref No : 30, Hmm No : 65)

## *41 कर संकलन विभागाच्या(शहर व हद्द्वाढ) 2013-14 या वित्तीय वर्षातील कर निर्धारण प्रकरणांतील केलेल्या करांच्या आकारणीमधील उणीवांबाबत...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 08**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 16400.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 16400.00/-

***कर निर्धारण प्रकरणांमध्ये आढळून आलेल्या अनियमितता दूर करणे आवश्यक आहे. ज्या इमारतीचे क्षेत्रफळ 150.00 चौ.मी. पेक्षा अधिक आहे त्या इमारतींना मोठा निवासी कर लागू होत असताना तो लागू केला नाही, तरी अशा इमारतींना 10% निवासी कराची आकारणी करून येणारी रक्कम संबंधित मिळकतदाराकडून वसूल करून शासनास जमा करावी. वसूलपात्र रक्कम रु.16,400/- संबंधितांकडून वसूल करावी.***

कर संकलन विभागाच्या 2013-14 या वित्तीय वर्षातील काही कर निर्धारण प्रकरणांची तपासणी केली असता काही प्रकरणांमध्ये आढळुन आलेल्या अनियमितताबाबत अर्धसमास क्रमांक 66 दि.18/11/2017 अन्वये खुलासा मागविला असता विभागाने कोणतेही अनुपालन सादर केले नसल्याने लेखापरीक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय कायम करण्यात येत आहे..
1) मिळकतदारांचे नाव- श्री. उत्तरेश्वर चन्नाप्पा चांदोडे., दफ्तर हुकुम नं.-90 दि.31/03/2014. पेठ-

प. मंगळवार यांच्या प्रकरणासोबत बांधकाम विभागाचा मंजूर plan नकाशा, परवाना, खरेदी दस्तएवज, मालमत्ता पत्रक जोडले नाही. त्यामुळे निवासी क्षेत्र व बिगरनिवासी क्षेत्र यांच्या योग्यतेबाबत खात्री होत नाही.

2) मिळकतदारांचे नाव- श्री. रेखा, मयूर, अक्षय व शुभम मोहन करवेकर., दफ्तर हुकुम नं.-89 दि.31/03/2014. पेठ- प.मंगळवार यांच्याकडून प्रत्येकी रु.500/- प्रमाणे रु.2000/- विभागणी/वारस फी वसूल केली नसल्याने ती मिळकतदाराकडून वसूल करून मनपा निधीत जमा करावी.

3) मिळकतदारांचे नाव - श्री.विशाल निवृत्ती पाटील., दफ्तर हुकुम नं.-89 पेठ- प.मंगळवार यांनी सादर केलेल्या अभिलेखानुसार (index-2) इमारतीचे क्षेत्रफळ (carpet area) 492.10 चौ.फुट असून कर आकारणीसाठी 459.00 चौ.फुट इतका गृहीत धरला आहे. 33.10 चौ.फुट इतक्या क्षेत्रफळावर कर आकारणी केली आहे. कराच्या फरकाची रक्कम परिगणित करून वसूल करण्यात यावी.

4) मिळकतदारांचे नाव - श्रीम. अंबुबाई श्रीनिवास कंदी व इतर 11, दफ्तर हुकुम नं.-02 दि.17/07/13, पेठ- गुरुवार यांनी हस्तांतरण फी रु.4900, वारस फी रु.6000 व विभागणी फी रु.500 भरल्याची पावती नस्तीत आढळली नसल्याने रक्कम रु.11,400/- संबंधितांकडून वसूल करून मनपा निधीत जमा करावी.

5) मिळकतदारांचे नाव -श्रीम. अंबुबाई श्रीनिवास कंदी व इतर 11, दफ्तर हुकुम नं.-02 दि.17/07/13, पेठ- गुरुवार यांच्या इमारतीचे क्षेत्रफळ 160.40 चौ.मी. (1726 चौ.फुट) असल्याने त्यांना मोठा निवासी कर लागू होत असताना तो वसूल केला नाही. त्यामुळे 10% निवासी कराची दि.01/04/2001 पासून आकारणी करून येणारी रक्कम संबंधित मिळकतदाराकडून वसूल करून शासनास जमा करावी.

6) मिळकतदारांचे नाव -श्री. ईलीआस हाजी तजमल हुसेन उस्ताद , दफ्तर हुकुम नं.- 10 दि.14/11/13, पेठ- गुरुवार यांच्या इमारतीचे क्षेत्रफळ 180.60 चौ.मी. (150 चौ.मी पेक्षा जास्त) असल्याने त्यांना मोठा निवासी कर लागू होत असताना तो वसूल केला नाही. त्यामुळे 10% मोठा निवासी कराची दि.01/04/1911 पासून आकारणी करून येणारी रक्कम संबंधित मिळकतदाराकडून वसूल करून शासनास जमा करावी.

7) मिळकतदारांचे नाव -श्री. सुर्यकांत बाबुराव क्षीरसागर व इतर 06, दफ्तर हुकुम नं.-14 दि.13/12/13, पेठ- गुरुवार यांच्याकडून वारस फी प्रत्येकी रु.500 प्रमाणे 07 जणांसाठी रु.3500 जमा करून घेणे आवश्यक असताना केवळ रु.500 वसूल केल्याने रक्कम रु.3000/- संबंधितानकडून वसूल करावी.

8) मिळकतदारांचे नाव -श्री. काशिनाथ व्यंकोबा आदाने, दफ्तर हुकुम नं.-11 दि.17/07/13, पेठ- गुरुवार यांच्या इमारतीचे क्षेत्रफळ 262.50 चौ.मी. (2824.5 चौ.फुट) असल्याने त्यांना मोठा निवासी कर लागू होत असताना तो वसूल केला नाही. त्यामुळे 10% निवासी कर आकारणी दि.01/04/2001 पासून करून येणारी रक्कम संबंधित मिळकतदाराकडून वसूल करून शासनास जमा करावी.

याप्रकारच्या अनियमितता इतर प्रकरणांमध्ये असण्याची शक्यता असल्याने त्यांची तपासणी करून सदरच्या अनियमितता दूर करण्यात याव्यात.

एकूण वसूलपात्र रक्कम = रु.16,400/-

DGPAGPM8503 (Ref No : 40, Hmm No : 66)

## *42 मोबाईल टॉवरवरील थकीत कराबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 08**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 10740202.00/-

***सोलापूर महानगरपालिकेतील कर संकलन विभागाच्या लेखापरिक्षणामध्ये विभागाने सादर केलेल्या मोबाईल टॉवरच्या थकबाकी दर्शविणाऱ्या विवरणपत्रावरुन असे निदर्शनास आले की, महापालिका हद्दीत असलेल्या वेगवेगळया 12 कंपन्यांच्या टॉवर मालकांकडे मार्च 2014 अखेर पर्यंत रककम रु.1,07,40,202/- एवढी रक्कम थकीत आहे. सदरची मागणी, वसूली, थकबाकीची नोंदवही राष्ट्रीय लेखा संहितेतील नियम 9.13 नुसार विहीत नमुन्यात (FORM GEN-20) नोंदवही ठेवलेली नाही. मोबाईल टॉवर थकबाकी रक्कम रु.10740202/- वर 9 महिन्यासाठी 18% प्रमाणे रक्कम रु.19,33,236/- एवढी शास्ती वसूल करणे आवश्यक असताना सदरची शास्ती वसूल केलेली नाही. रक्कम कोणत्या तारखेला प्राप्त झाली (रोख/ चेकने) यांची नोंद रजिस्टरमध्ये घेण्यात आलेली नाही. रजिस्टरमध्ये सक्षम अधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या करण्यात आलेल्या नाही.***

सोलापूर महानगरपालिकेतील कर संकलन विभागाच्या लेखापरिक्षणामध्ये विभागाने सादर केलेल्या मोबाईल टॉवरच्या थकबाकी दर्शविणाऱ्या विवरणपत्रावरुन असे निदर्शनास आले की, महापालिका हद्दीत असलेल्या खालील वेगवेगळया 12 कंपन्यांच्या टॉवर मालकांकडे मार्च 2014 अखेर रककम रु.1,07,40,202/- रककम थकीत आहे. थकीत असलेली रक्कम व्याजासह वसूल होणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | टॉवर संख्या | मोबाईल कंपनीचे नांव | मागील बाकी रु. | चालू मागणी 2013-14 | एकूण रु. | सन 2013-14 मधील वसूली | थकबाकी रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | 22 | भारत संचार निगम | 2377811 | 697242 | 3037053 | 25192 | 3049861 |
| 2. | 19 | रिलायन्स टॉवर | -- | 2031854 | 2031854 | 1385563 | 646291 |
| 3. | 23 | भारती एअरटेल | 265518 | 1080255 | 1345773 | 905181 | 440593 |
| 4. | 10 | इंडस टॉवर | 263612 | 1279192 | 1542824 | 774246 | 768578 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 5. | 4 | वोडाफोन | 2054 | 618160 | 620214 | 616134 | 4080 |
| 6 | 11 | हचसन एस. आर. | 23983 | 1469486 | 1492669 | 608561 | 884108 |
| 7. | 4 | टाटा टेली सर्व्हिसेस | 117373 | 363265 | 480638 | 307247 | 173391 |
| 8. | 2 | क्विपो टॉवर | 281252 | 122463 | 403715 | 51452 | 352263 |
| 9. | 8 | जी.टी. इन्फो. सर्व्हिसेस | 2434589 | 840024 | 327613 | 0 | 3274613 |
| 10. | 4 | टॉवर व्हिजन इंडीया | 126106 | 489186 | 615192 | 162732 | 452560 |
| 11. | 1 | ATC टेलीकॉम | -- | 223320 | 223320 | 0 | 223320 |
| 12. | 1 | ऐअर सेल | -- | 470544 | 470544 | 0 | 470544 |
| | एकूण बेरीज | | | | | | **10740202** |

1. भारती एअरटेल मोबाईल टॉवर 62 गोल्डफिल्ड येथील मिळकत क्र.21427 श्री. ए. एस.बच्युवार यांचे कडील टॉवर सन 2012-13 च्या रजिस्टरमध्ये बंद असल्याचे दाखविलेले असून, त्याची सन 2012-13 ची थकबाकी रक्कम रु.2,23,443/- दाखविलेली आहे. परंतु सन 2013-14 मध्ये मागील थकबाकी दाखविलेली नाही. याबाबत स्पष्टीकरण करणे आवश्यक असताना याबाबतचे स्पष्टीकरण सादर केले नाही.

2. सदरची मागणी, वसूली, थकबाकीची नोंदवही राष्ट्रीय लेखा संहितेतील नियम 9.13 नुसार विहीत नमुन्यात (FORM GEN-20) नोंदवही ठेवली नाही.

3. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील अनुसूची ड प्रकरण 8 कराधान नियम 41(2)नुसार बिल सादर केल्यानंतर बिलात विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकास देय रक्कम न भरल्यास 2009 च्या सुधारणा अधिनियमानूसार पोट कलम 1 अन्वये प्रति महिन्यासाठी कराच्या 2 टक्के इतकी रककम शास्ती म्हणून वसूल करणे आवश्यक आहे. त्यानुसार मोबाईल टॉवर थकबाकी रक्कम रु.1,07,40,202/- वर 9 महीन्यासाठी 18% प्रमाणे रक्कम रु.19,33,236/- एवढी शास्ती वसूल करणे आवश्यक असताना ती करण्यात आलेली नसल्याने सदर नियमानूसार शास्ती वसूल करण्यात यावी.

4. वसूल करण्यात आलेल्या रक्कमेबाबतची नोंद नोंदवहीत घेण्यात आली आहे. परंतु रक्कम कोणत्या तारखेला प्राप्त झाली (रोख/चेकने) यांची नोंद रजिस्टर मध्ये घेण्यात आलेली नाही.

5. रक्कम वसूल झाल्यानंतर थकबाकी किती आहे. यांची नोंद रजिस्टर मध्ये घेण्यात आलेली नाही.

6. सन 2012-13 या वर्षात थकबाकी रककम रु.57,21,486/- असताना सन 2013-14 या वर्षात मागील थकबाकी रु.58,91,498/- एवढी दाखवीलेली आहे. त्यामूळे रक्कम रु.1,70,012/- एवढया रक्कमेची तफावत असल्याचे रजिस्टरवरील नोंदीवरुन दिसून येते. सदर तफावतीबाबत स्पष्टीकरण

देण्यात आलेले नाही.

7. रजिस्टरमध्ये सक्षम अधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या करण्यात आलेल्या नाही.

8. रजिस्टरमधील माहीती अपूरी असल्याचे लेखापरिक्षणास दिसून आले.

एकत्रित रक्कम रु.12673438/- संबधिताकडून वसूल करण्यात यावी.

उपरोक्त मुद्द्या संदर्भात अर्धसमास पत्र क्रमांक 59 दिनांक 10/11/2017 अन्वये विभागास विचारणा केली असता विभागाने याबाबतचे अनुपालन सादर केलेले नाही. त्यामुळे सदरचे आक्षेप कायम करण्यात आलेले आहेत.

वसूलपात्र रक्कम- 1. थकबाकी रु.107,40,202/-

2. व्याजाची रक्कम रु.19,33,236/-

FDSDKPM7201 (Ref No : 44, Hmm No : 59)

## *43 करमणूक कराची रक्कम वेळीच वसूल केली नसल्याबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 5**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9ब*

***सोलापूर महानगरपालिकेच्या कर संकलन विभागाकडून करमणूक कराची वसुली केली जाते. वित्तीय वर्ष 2013-14 मध्ये सोलापूर शहरातील सिनेमागृहाकडून करमणूक कराची वसुल केलेली रक्कम रु.1,61,800/- एवढी असल्याचे पावती पुस्तक, चलने यांच्यावरुन आढळून आली. करमणूक कराची मागणी नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही. मागणी नोंदवही ठेवली नसल्याने कोणत्या सिनेमागृह, नाट्यगृह, व्हिडीओ सेंटर इ. करमणूक कर देय असणा-या करदात्याकडे किती रक्कम थकीत आहे यांची माहिती लेखापरीक्षणासाठी उपलब्ध झाली नाही. सोलापूर महानगरपालिका हद्दीत एकूण किती सिनेमागृहे आहेत यांची यादी लेखापरीक्षणास उपलब्ध करुण देण्यात आलेली नाही.***

सोलापूर महानगरपालिकेच्या कर संकलन विभागाकडून करमणूक कराची वसुली केली जाते. वित्तीय वर्ष 2013-14 मध्ये सोलापूर शहरातील सिनेमागृहाकडून करमणूक कराची वसुल केलेली रक्कम रु.1,61,800/- एवढी असल्याचे पावती पुस्तक, चलने यांच्यावरुन आढळून आली. करमणूक कराची मागणी नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही.

1) वित्तीय वर्ष 2013-14 करीता अशी मागणी नोंदवही ठेवली नसल्याचे आढळून आले. त्यामुळे कोणत्या सिनेमागृह, नाट्यगृह, व्हिडीओ सेंटर इ. करमणूक कर देय असणा-या करदात्याकडे किती रक्कम थकीत आहे यांची माहीती उपलब्ध नसल्याने, लेखापरीक्षणासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेली पावती पुस्तके व चलने यांच्या आधारे सन 2013-14 या वित्तीय वर्षात खालील सिनेमागृह यांचेकडून करमणूक कराची रककम थकीत असल्याचे निर्दशनास आलेले आहे.

| अ.क्र. | सिनेमा गृहाचे नांव | कालावधी |
|---|---|---|
| 1 | शालीमार चित्र मंदीर | फेब्रुवारी 2012 पासून |
| 2 | आशा | नोंव्हेबर 2013 |
| 3. | प्रभात चित्र मंदीर | फेब्रुवारी 2014 पासून |
| 4. | लक्ष्मी नारायण चित्र | ऑक्टो.2013 ते डिसें.2013 पर्यंत |
| 5 | बीग सिनेमा | फेब्रुवारी 2014 पासून |

2) वसूल केलेल्या कराची तपासणी केली असता फक्त सिनेमागृहाकडील करमणूक कराची वसुली केली जात असल्याचे आढळून आले तर नाट्यगृह, व्हिडीओ सेंटर, सर्कस इ. कडून करमणूक कर वसूल केला जात नसल्याचे आढळून आले. तसेच सिनेमा गृहाकडून वसुल करण्यात आलेल्या करमणूक कर हा वेळीच वसूल न करता खालीलप्रमाणे खूप उशिराने वसूल केला आहे.

| अ.क्र. | सिनेमा गृहाचे नांव | कालावधी | वसूल करण्यात आलेली रक्कम | वसूली दिनांक |
|---|---|---|---|---|
| 1 | शालीमार चित्र मंदीर | 1.7.11 ते 30.9.2011 | 9100 | 28.3.2013 |
| 2 | शालीमार चित्र मंदीर | 1.10.11 ते 30.11.2011 | 6020 | 3.9.2013 |
| 3 | प्रभात चित्र मंदीर | 1.3.2013 ते 31.3.2013 | 3040 | 16.4.2013 |
| 4 | प्रभात चित्र मंदीर | 1.11.2013 ते 30.11.2013 | 2400 | 8.1.2014 |
| 5 | लक्ष्मी नारायण चित्र | 1.4.2013 ते 30.6.2013 | 8200 | 1.9.2013 |
| 6 | लक्ष्मी नारायण चित्र | 1.7.2013 ते 30.9.2013 | 7720 | 6.12.2013 |

3) श्री निवास चित्र मंदीर यांचे कडून दि.01.05.2013 ते 30.05.2013 या कालावधीचे एकूण 112 खेळाचे रक्कम रु.2240/- धनादेश क्र. 66266 दि.6.5.2013 अन्वये वसूल केलेले असून परत दि.01.05.2013 ते 31.05.2013 या कालावधीतील एकूण 93 खेळांचे रक्कम रु.1860/- धनादेश क्र. 66277 दि.05.06.2013 अन्वये वसूल केले असल्याचे दिसून आले. परंतु माहे 01.04.2013 ते

30.04.2013 या कालावधची रक्कम जमा करण्यात आल्याचे लेखापरीक्षणास निदर्शनास आले नाही.
4) सोलापूर महानगरपालिका हद्दीत एकूण किती सिनेमागृहे आहेत? यांची यादी लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही.
5) करमणूक कराची नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.

उपरोक्त मुद्द्या संदर्भात अर्धसमास पत्र क्रमांक 60 दिनांक 10/11/2017 अन्वये विभागास विचारणा केली असता विभागाने याबाबतचे अनुपालन सादर केलेले नाही. त्यामुळे सदरचे आक्षेप कायम करण्यात आलेले आहेत.

FDSDKPM7201 (Ref No : 45, Hmm No : 60)

***44 सोलापूर महानगरपालिकेच्या 2013-14 या आर्थिक वर्षाच्या विना परवाना इमारतींच्या कर निर्धारण प्रकरणांना मालमत्ता कराच्या शास्तीची कमी दराने आकारणी केलेबाबत..***

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 101912.00/-

***सोलापूर मनपा कर निर्धारण प्रकरणांची तपासणी केली असता विना परवाना बांधकाम इमारतींना कराची आकारणी करताना कराच्या रक्कमेवर शास्तीची आकारणी करणे आवश्यक असताना आकारणीच्या वेळी करयोग्य मूल्यामध्ये (ARV) पुन्हा करयोग्य मूल्याइतकी रक्कम समाविष्ट करून येणाऱ्या ARV रक्कमेवर कराची रक्कम आकारणी केली. त्यामुळे कराच्या रक्कमेवर शास्तीची आकारणी केलीच गेली नाही. त्यामुळे निवडक प्रकरणातील मार्च 2018 अखेर वसूलपात्र रक्कम रु.1,01,912/- संबंधितांकडून वसूल करण्यात यावी. त्याप्रमाणेच इतर प्रकरणांची तपासणी करून मुख्य लेखापरीक्षक विभागाकडून कमी आकारणी केलेल्या प्रकरणांची वसुली करून सदरची अनियमितता दूर करावी. तसेच सफाईपट्टी, शिक्षण कर, रोजगार हमी कर, व इतर कराची फरकाच्या रक्कमेची परिगणना करून रक्कम वसूल करावी.***

सोलापूर महानगरपालिकेकडील कर संकलन विभागाच्या वित्तीय वर्ष 2013-14 या आर्थिक वर्षातील कर निर्धारण प्रकरणांची तपासणी केली असता काही अनियमितता आढळुन आल्या. सदरच्या आढळुन आलेल्या अनियमितताबाबत अर्धसमास क्रमांक 70 दि.23/11/2017 व सुधारित अर्धसमास क्रमांक 104 दि.20/01/2018 अन्वये खुलासा मागविला असता विभागाने कोणतेही अनुपालन सादर केले नसल्याने लेखापरीक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय कायम करण्यात येत आहे.

10) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 267 अ नुसार जी बांधकामे अवैध आहेत, अशा बांधकामांना मालमत्ता कर व कराच्या दुप्पट इतकी शास्ती अशी आकारणी करण्यात यावी अशी तरतूद आहे. शास्तीची रक्कम हि मिळकतदाराकडून देय असलेल्या मालमत्ता कराची रक्कम असल्याप्रमाणे अधिनियमाच्या तरतुदीअन्वये निर्धारित करण्यात येवून ती गोळा करण्यात यावी. अशी अवैध बांधकामे हि ज्या कालावधीपर्यंत अवैध आहेत तोपर्यंत शास्तीच्या रक्कमेसह कराची रक्कम वसूल करण्यात यावी अशी तरतूद आहे. त्यानुसार सोलापूर मनपा हदीत्तील कर निर्धारण प्रकरणांची तपासणी केली असता विना परवाना बांधकाम इमारतींना कराची आकारणी करताना कराच्या रक्कमेवर शास्तीची आकारणी करणे आवश्यक असताना आकारणीच्या वेळी करयोग्य मूल्यामध्ये (ARV) पुन्हा करयोग्य मूल्याइतकी रक्कम समाविष्ट करून येणाऱ्या ARV रक्कमेवर कराची रक्कम आकारणी केली. त्यामुळे कराच्या रक्कमेवर शास्तीची आकारणी केलीच गेली नाही. कराची आकारणी हि ज्या तारखेपासून लागू करण्यात आली आहे त्या तारखेपासून ती अवैध बांधकामे ही ज्या कालावधीपर्यंत अवैध आहेत तोपर्यंत शास्तीच्या रकमेची परिगणना करून कराची वसुली करण्यात यावी. खाली नमूद उदाहरणादाखल प्रकरणांमध्ये विना परवाना बांधकाम इमारतींना कराची शास्ती आकारणी केली नसल्याने ती आकारून संबंधित मिळकतराकडून वसुल करणे आवश्यक आहे, त्याप्रमाणेच इतर प्रकरणांची तपासणी करून मुख्य लेखापरीक्षक विभागाकडून कमी आकारणी केलेल्या प्रकरणांची वसुली करून सदरची अनियमितता दूर करावी.

| अ.क्र. | मिळकतदाराचे नाव | कर आकारणी केल्याचा दिनांक | शास्तीसह विना विना विना परवाना बांधकामास वार्षिक कर आकारावयाची रक्कम रु. | शास्तीसह वार्षिक कर आकारणी केलेली रक्कम रु. | वार्षिक वसूलपात्र फरक रक्कम रु. | एकूण वसूलपात्र रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | काशिनाथ व्यंकोबा आदाने. | 28/05/2012 | 3057 | 1019 | 2038 | 10190 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | द.हु.नंबर-11. दि.14/11/14. | | | | | |
| 2. | सुर्यकांत बाबू क्षीरसागर. द.हु.नंबर-14. दि.13/12/13. | 01/04/2013 | 813 | 271 | 542 | 2168 |
| 3. | प्रकाश चंद्रकांत क्षीरसागर. द.हु.नंबर-15. दि.13/12/13. | 01/04/2013 | 843 | 281 | 562 | 2248 |
| 4. | धोंडीराम भरमन्ना वाघमारे. द.हु.नंबर-203.दि.29/03/2014. | 01/02/2014 | 4329 | 3465 | 864 | 3456 |
| 5. | रमाकांत कृष्णा पाच्छापुरकर. द.हु.नंबर-207. दि.29/03/14. | 21/05/2013 | 11049 | 3842 | 7207 | 36035 |
| 6. | उज्ज्वला अम्बंना जेअरे. द.हु.नंबर-209. दि.29/03/14. | 01/10/2013 | 5900 | 4539 | 1331 | 6805 |
| 7. | उज्ज्वला अम्बंना जेअरे. द.हु.नंबर-210. दि.31/03/14. | 01/04/2010 | 2145 | 1489 | 656 | 5248 |
| 8. | नागनाथ भिकाजी होणकासे. द.हु.नंबर-212. दि.31/03/14. | 01/04/2013 | 4603 | 3437 | 1166 | 5830 |
| 9. | श्रीदेवी महादेव डोंबाळे. द.हु.नंबर-213. | 25/09/2012 | 480 | 320 | 160 | 640 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | दि.31/03/14. | | | | | |
| 10. | शिवाजी संभा सुरवसे. द.हु.नंबर-214. दि.31/03/14. | 01/12/2009 | 3047 | 2407 | 640 | 5760 |
| 11. | विमल अशोक बन्ने. द.हु.नंबर-956. दि.31/03/14. | 01/03/2014 | 10557 | 4674 | 5883 | 23532 |

मार्च 2018 अखेर एकूण वसूलपात्र रक्कम रु.1,01,912/- संबंधितांकडून वसूल करण्यात यावी. तसेच सफाईपट्टी, शिक्षण कर, रोजगार हमी कर, व इतर कराची फरकाच्या रक्कमेची परिगणना करून रक्कम वसूल करावी.

DGPAGPM8503 (Ref No : 52, Hmm No : 104)

## *45 अवैध बांधकामावर मालमत्ता कर कमी शास्ती आकारणी केलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष : कर संकलन मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 46108.00/-

***अवैध बांधकामावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 267अ नुसार सामान्य कराचे दुप्पट शास्ती कमी आकारणी केल्यामुळे रक्कम रु.46108/- वसुलपात्र होत आहे. तसेच अवैध मिळकतीवर मालमत्ता करामध्ये सामाविष्ट असणारे पाणीपट्टी, पाणी लाभ कर, मलनिस्सारण कर, मलनिस्सारण लाभ कर, सर्वसाधारण कर, शिक्षण उपकर, पथकर व सुधार आकार इ. बाबीच्या कराचे रकमेच्या दुप्पट दराने शास्ती आकारणी केली नाही.***

सोलापूर मनपा अंतर्गत असणारे शहर भाग कर संकलन विभागाचे 2013-14 या आर्थिक वर्षातील कर निर्धारण प्रकरणांचे लेखा परीक्षण केले असता खालीलप्रमाणे त्रुटी आढळुन आल्या.

1)महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 267अ नुसार जी बांधकामे अवैध आहेत

अशा बाधकामाना मालमत्ता कर व कराचे दुप्पट शास्ती अशी एकूण कराची आकारणी करणेत यावी अशी तरतूद आहे. शास्तीची रक्कम ही मिळकदाराकडून देय असलेल्या मालमत्ता कराची रक्कम असल्याप्रमाणे अधिनियमाच्या तरतूदीअन्वये निर्धारित करण्यात येवून ती गोळा करण्यात यावी. अशी अवैध बांधकामे ही ज्या कालावधीपर्यंत अवैध आहेत तोपर्यंत शास्तीचे रकमेसह कराची रक्कम वसुल करण्यात यावी अशी तरतूद आहे. त्यानुसार सोलापूर मनपाचे हद्दतील शहर भागातील कर निर्धारण प्रकरणांची तपासणी केली असता अवैध बांधकामाना कराची आकारणी ही कराची रक्कम व मलमत्ता कराचे दुप्पट शास्ती आकारणी करणे आवश्यक होती. परंतु मनपाने अवैध बांधकामाना कराची आकारणी ही करयोग्य मुल्याची रक्कम दुप्पट करुन त्यावर कराची आकारणी केली जाते. कराची आकारणी ही ज्या तारखेपासून लागू करण्यात आली आहे त्या तारखेपासून ती अवैध बांधकामे ही ज्या कालावधीपर्यंत अवैध आहेत तोपर्यंत शास्तीच्या रकमेची परिगणना करून कराची वसुल करण्यात यावीत. खाली नमूद केलेल्या उदाहरण दाखल अवैध बांधकामावर शास्तीची रक्कम कमी आकारण्यात आली आहेत. महराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 128अ नुसार मालमत्ता करामध्ये पाणीपट्टी, पाणी लाभ कर, मलनिस्सारण कर, मलनिस्सारण लाभ कर, सर्वसाधारण कर, शिक्षण उपकर, पथकर व सुधार आकार इ. बाबीचा समावेश होत आहे. त्यानुसार खाली नमूद केलेल्या अवैध मालमत्तेचे करयोग्य मुल्याचे रकमेवर मालमत्ता कराचे दुप्पट दराने शास्तीची रक्कम परिगणित करुन संबंधीत मिळकतदाराकडून वसुल करणेत यावे. तरी शहर भागातील अशा इतर प्रकाराणांची मुख्य लेखापरिक्षक विभागाकडून तपासणी करून कमी आकारण्यात आलेल्या रक्कमेची वसुली करणेत यावी.

| अ.क्र. | मिळकदाराचे नाव | कर लागू केल्याचा दिनांक | शास्तीसह वार्षिक सामान्य कर आकारावयाची रक्कम रु. | शास्तीसह वार्षिक सामान्य कर आकारलेली रक्कम रु. | वसुल करावायाची रक्कम रु. | ले.प. चे वर्ष 2016-17 पर्यंतची वसुलपात्र रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | गजानन उत्तम ननावरे, उमानगरी. | 01/10/2010 | 9819/- | 4782/- | 5037/- | 32741/- |
| 2. | सिताराम सदाशिव भांगे, उमानगरी. | 01/10/2010 | 5652/- | 4656/- | 996/- | 6474/- |
| 3. | इस्माईल इकबाल शेख, हजरतखान चळ | 02/11/2012 | 2781/- | 1952/- | 829/- | 3662/- |
| 4. | विष्णु तात्या ढेरे, प्रतिकनगर, | 17/10/2012 | 4784/- | 4066/- | 718/- | 3231/- |
| | एकूण वसुलपात्र रु. | | | | | 46108/- |

## *46 अवैध बांधकामावर मालमत्ता कर कमी शास्ती आकारणी केलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष : कर संकलन मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 24902.00/-

***अवैध बांधकामावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 267अ नुसार सामान्य कराचे दुप्पट शास्ती कमी आकारणी केल्यामुळे रक्कम रु.24902/- वसुलपात्र होत आहे. तसेच अवैध मिळकतीवर मालमत्ता करामध्ये सामाविष्ट असणारे पाणीपट्टी, पाणी लाभ कर, मलनिस्सारण कर, मलनिस्सारण लाभ कर, सर्वसाधारण कर, शिक्षण उपकर, पथकर व सुधार आकार इ. बाबीच्या कराचे रकमेच्या दुप्पट दराने शास्ती आकारणी केली नाही.***

सोलापूर मनपा अंतर्गत असणारे हद्दवाढ भाग कर संकलन विभागाचे 2013-14 या आर्थिक वर्षातील कर निर्धारण प्रकरणांचे लेखा परीक्षण केले असता खालीलप्रमाणे त्रुटी आढळुन आल्या.

1)महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 267अ नुसार जी बांधकामे अवैध आहेत अशा बाधकामाना मालमत्ता कर व कराचे दुप्पट शास्ती अशी एकूण कराची आकारणी करणेत यावी अशी तरतूद आहे. शास्तीची रक्कम ही मिळकदाराकडून देय असलेल्या मालमत्ता कराची रक्कम असल्याप्रमाणे अधिनियमाच्या तरतूदीअन्वये निर्धारित करण्यात येवून ती गोळा करण्यात यावी. अशी अवैध बांधकामे ही ज्या कालावधीपर्यंत अवैध आहेत तोपर्यंत शास्तीचे रकमेसह कराची रक्कम वसुल करण्यात यावी अशी तरतूद आहे. त्यानुसार सोलापूर मनपाचे हद्दतील हद्दवाढ भागातील कर निर्धारण प्रकरणांची तपासणी केली असता अवैध बांधकामाना कराची आकारणी ही कराची रक्कम व मालमत्ता कराचे दुप्पट शास्ती आकारणी करणे आवश्यक होती. परंतु मनपाने अवैध बांधकामाना कराची आकारणी ही करयोग्य मुल्याची रक्कम दुप्पट करुन त्यावर कराची आकारणी केली जाते. कराची आकारणी ही ज्या तारखेपासून लागू करण्यात आली आहे त्या तारखेपासून ती अवैध बांधकामे ही ज्या कालावधीपर्यंत अवैध आहेत तोपर्यंत शास्तीच्या रकमेची परिगणना करून कराची वसुल करण्यात यावीत. खाली नमूद केलेल्या उदाहरण दाखल अवैध बांधकामावर शास्तीची रक्कम कमी आकारण्यात

आली आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 128अ नुसार मालमत्ता करामध्ये पाणीपट्टी, पाणी लाभ कर, मलनिस्सारण कर, मलनिस्सारण लाभ कर, सर्वसाधारण कर, शिक्षण उपकर, पथकर व सुधार आकार इ. बाबीचा समावेश होत आहे. त्यानुसार खाली नमूद केलेल्या अवैध मालमत्तेचे करयोग्य मुल्याचे रकमेवर मालमत्ता कराचे दुप्पट दराने शास्तीची रक्कम परिगणित करुन संबंधीत मिळकतदाराकडून वसुल करणेत यावे. तरी शहर भागातील अशा इतर प्रकराणांची मुख्य लेखापरिक्षक विभागाकडून तपासणी करून कमी आकारण्यात आलेल्या रक्कमेची वसुली करणेत यावी.

| अ.क्र. | मिळकदाराचे नाव | कर लागू केल्याचा दिनांक | शास्तीसह वार्षिक सामान्य कर आकारावयाची रक्कम रु. | शास्तीसह वार्षिक सामान्य कर आकारलेली रक्कम रु. | वसुल करावायाची रक्कम रु. | ले.प. चे वर्ष 2016-17 पर्यंतची वसुलपात्र रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | सुभाष शंकर दोडमनी, मजरेवाडी | 22/08/2008 | 939/- | 626/- | 313/- | 2661/- |
| 2. | शुभम शहाजी कोळी, मजरेवाडी | 08/04/2011 | 1748/- | 1165/- | 583/- | 3498/- |
| 3. | युनुस म. जमादार, मजरेवाडी | 01/03/2014 | 2090/- | 1393/- | 697/- | 2091/- |
| 4. | पार्वती कमलाकर कदम, कसबे सोलापूर. | 20/10/2013 | 1843/- | 1229/- | 614/- | 2149/- |
| 5. | गोपाळ गंगाराम सदाफुले, दहिटणे. | 01/10/2012 | 2682/- | 1788/- | 894/- | 4023/- |
| 6. | नितीन शिवाजी राजपुत, केगांव. | 15/10/2012 | 6988/- | 4659/- | 2329/- | 10480/- |
| | एकूण | | | | | 24902/- |

DGPKVSM6101 (Ref No : 59, Hmm No : 64)

## *47 महाराष्ट्र शिक्षण कर व नौकर शाश्वती कर (रोजगार हमी कर) शासनाकडे उशिरानेजमा केल्याबाबत...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

सोलापूर महानगरपालिका

**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष :00 शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 9395177.00 /-

| |
|---|
| ***महानगरपालिकेने वित्तीय वर्ष 2013-14 मध्ये शहर विभागातील मालमत्ता करदात्याकडून महाराष्ट्र शिक्षण कर रु.46676441/- व नौकर शाश्वती कर रू-5972728/- वसुल केला आहे व हद्दवाढ विभागातील मालमत्ता करदात्याकडून महाराष्ट्र शिक्षण कर रु.36292394/- व नौकर शाश्वती कर रु.3614188/ वसुल केला आहे. परंतु त्याचा भरणा शासन तिजोरीत विलंबाने केला आहे.*** |

सोलापूर महानगरपालिकेतील कर आकारणी व संकलण विभाग प्रमुख ( शहर विभाग/हद्दवाढ विभाग) मालमत्ता करदात्याकडून वित्तीय वर्ष 2013-2014 महाराष्ट्र शिक्षण कर व नौकर शाश्वती कर वसुल केला आहे. शिक्षण व रोजगार हमी उपकर अधिनियम 1962, महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग शासन परीपत्रक क्रमांक- ईडीसी-1097/ प्र.क्र.205/ल-5,मंत्रालय,मुंबई दि. 3 एप्रील 1998 नुसार जमिन व इमारती यावरील कराच्या रककमा ज्या आठवडयात वसूल केल्या जातात अशा रकमांचा शासकीय कोषागारात पुढील आठवडा संपण्याच्या आत भरणा करावयाचा आहे. जी नगरपालिका शासकीय कोषागारापासून आठ कि.मी. पेक्षा जास्त अंतरावर असेल अशा नगरपालिकेने वसूल केलेली रकमा नगरपालिकेचे खाते असेल अशा बॅकेंत भरुन पुढील महीन्याच्या 7 तारखेच्या आत शासकीय कोषागारात भरणा करणे आवश्यक असताना महाराष्ट्र शिक्षण कर व नौकर शाश्वती कर शासन तिजोरीत विलंबाने जमा केला असल्याने अर्धसमास क्रमांक-77 दि.06/12/2017 अन्वये खुलासा मागविला असता विभागाने त्याबाबतचा खुलासा सादर केलेला नसल्याने लेखापरीक्षणाचे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

महानगरपालिकेने वित्तीय वर्ष 2013-14 मध्ये शहर विभागातील मालमत्ता करदात्याकडून महाराष्ट्र शिक्षणकर रु .46676441/- व नौकर शाश्वती कर रू. 5972728 /- वसुल केला आहे. व हद्दवाढ विभागातील मालमत्ता करदात्याकडून महाराष्ट्र शिक्षणकर रु. 36292394/- व नौकर शाश्वती कर रु.3614188/ वसुल केला आहे. परंतु त्याचा भरणा शासन तिजोरीत खालील प्रमाणे विलंबाने केला असल्याचे आढळून आले.

(अ) महाराष्ट्र शिक्षण कर वित्तीय वर्ष-2013-2014.

| अ.क्र. | विभाग | कालावधी | वसूल रक्कम | रीबेट | 2 टक्के रिबेट वजा जाता शासनास जमा केलेली | शासनास रक्कम जमा केल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | रक्कम | |
| 1 | शहर विभाग | एप्रिल-13 ते ऑगस्ट-13 | 10246052 | 204921 | 10041131 | 11/06/2014 |
| 2 | शहर विभाग | जुलै-13 (पैकी) | 8370019 | 167401 | 8202618 | 26/02/2015 |
| 3 | शहर विभाग | ऑगस्ट-13 ते सप्टेंबर-13 | 10779159 | 215583 | 10563576 | 30/06/2014 |
| 4 | शहर विभाग | ऑक्टोंबर-13 ते मार्च-14 | 17281211 | 345625 | 16935586 | 03/12/2014 |
| | एकूण बेरीज | | 46676441 | 933530 | 45742911 | |
| 5 | हददवाढ विभाग | डिसेंम्बर-12 ते जून-13 | 9151358 | 183027 | 8968331 | 29/05/2014 |
| 6 | हददवाढ विभाग | जुलै-13 ते ऑगस्ट-13 | 10738364 | 214767 | 10523597 | 31/07/2014 |
| 7 | हददवाढ विभाग | सप्टेंबर-13 ते डिसेंम्बर-13 | 9830929 | 196619 | 9634310 | 24/11/2014 |
| 8 | हददवाढ विभाग | जानेवारी-14 ते मार्च-14 | 6571743 | 131435 | 6440308 | 04/12/2014 |
| | एकूण बेरीज | | 36292394 | 725848 | 3556646 | |
| | एकूण बेरीज 1+2 | | 82968835 | 1659378 | 81309457 | |

(ब) रोजगार हमी कर वित्तीय वर्ष-2013-2014

| अ.क्र. | विभाग | कालावधी | वसूल रक्कम | रीबेट | 2टक्के रिबेट वजा जाता शासनास जमा केलेली रक्कम | शासनास रक्क जमा केल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | शहर | एप्रिल-13 ते मार्च-14 | 5972728 | 119455 | 5853273 | 16/06/2014 |
| | एकूण बेरीज | | 5972728 | 119455 | 5853273 | |
| 2 | हददवाढ विभाग | डिसेंम्बर-12 ते जून-13 | 632410 | 12648 | 619762 | 29/05/2014 |
| 3 | हददवाढ | जुलै-13 ते | 976003 | 19520 | 956483 | 31/07/2014 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | विभाग | ऑगस्ट-13 | | | | |
| 4 | हददवाढ विभाग | सप्टेंबर-13 ते डिसेंम्बर-13 | 1402044 | 28041 | 1374003 | 24/11/2014 |
| 5 | हददवाढ विभाग | जानेवारी-14 ते मार्च-14 | 603731 | 12075 | 591656 | 04/12/2014 |
| | एकूण बेरीज | | 3614188 | 72284 | 3541904 | |
| | एकूण बेरीज 1+2 | | 9586916 | 191739 | 9395177 | |

महाराष्ट्र शिक्षण कर व नौकर शाश्वहती कर (रोजगार हमी कर) शासनाकडे पुढील महिन्याच्या7 तारखेच्या आत शासनाकडे जमा करणे आवश्यक असताना शासनाकडे रक्कम विलंबाने जमा करण्यात आली आहे.

DATYMKM6601 (Ref No : 70, Hmm No : 77)

## *48 आरोग्य खात्याच्या डी. एस. विभागामार्फत करण्यात आलेल्या फिनेल व जंतुनाशक खरेदीमधील अनियमितताबाबत....*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 09**

*लेखा शीर्ष : औषध खरेदी मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 1335800.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1335800.00/-

***निविदेस व्यापक प्रसिद्धी न दिल्याने स्पर्धात्मक निविदा प्रक्रियेचा फायदा महापालिकेस झाला नाही. श्री. रमेश अग्रो इंडस्ट्रीज. यांचा मुंबई दुकाने अधिनियम नुसार Shop Act परवाना नसताना त्यांची निविदा मंजूर केली आहे. सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्र.मतंसं/नस्ती-2012/प्र.क्र.273/39 दिनांक 16/01/2013 नुसार 3 लाखावरील खरेदीसाठी ई - निविदा काढणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही. निविदामधील न्युनतम दर व बाजारमुल्य यांची तुलना करुन वाटाघाटी केल्या असत्या तर महानगरपलिकेस त्याचा फायदा झाला असता व निधीची बचत झाली असती. Test Report नसताना बिले अदा केल्याने रक्कम रु.13,35,800/- आक्षेपाधीन ठेवण्यांत येत आहे. स्थायी समितीची सदरच्या कामास मान्यता घेतली नाही. मालाचा पुरवठा केल्याबाबतची डिलिव्हरी चलने नस्तीत नसल्याने मालाचा केव्हा पुरवठा केला याची खात्री होत नाही. सदरच्या कामाची खर्चाची प्रमाणके लेखापरिक्षणास उपलब्ध झाली नाही.***

कामाचा तपशील :-

1. प्रशासकीय मान्यता.- मा. आयुक्त यांची जा. क्र.1/आ.अ/भा.1/123 दि.11.07.2013 च्या टिपणीस दि.02/09/13 रोजीची मान्यता.

2. अंदाजित खर्च- रु.11,88,000/-

3. करारनामा- 1) दि.18/12/13, श्री. बसव इंडस्ट्रीज.
2) दि.19/12/13, श्री. रमेश अग्रो इंडस्ट्रीज.

4. कामाचा आदेश- 1) जा.क्र.1/आआ/भां1/340, दि.19/12/13 श्री. बसव इंडस्ट्रीज.
2) जा.क्र.1/आआ/भां1/334, दि.24/12/13 श्री. रमेश अग्रो इंडस्ट्रीज.

5. मागणी- आरोग्याधिकारी यांचे दि.05/07/13 रोजीचे आयुक्तांना पत्र.
a) बायोटेक्स/बेगान- 500 lit. b) काळे फिनेल- R-WC Grade- 1000 Lit.
c) सुगंधी फिनेल- 1000 Lit. d) नुवान - 250 lit.

6. निविदा कालावधी- दि.06/09/13 ते 19/09/13

7. L1/मंजूर मक्तेदारांचा तक्ता-

| अ.क्र. | खरेदीची बाब | प्रमाण (लिटर मध्ये) | L1 मक्तेदाराचे नांव | टेंडर दर | कामाची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | बायोटेक्स/बेगान | 500 | श्री. रमेश अग्रो इंडस्ट्रीज. | 1991.6 | 9,95,800 |
| 2 | काळे फिनेल | 1000 | श्री. बसव इंडस्ट्रीज. | 120 | 1,20,000 |
| 3. | सुगंधी फिनेल | 1000 | श्री. बसव इंडस्ट्रीज. | 90 | 90,000 |
| 4. | नुवान | 200 | श्री. रमेश अग्रो इंडस्ट्रीज. | 650 | 1,30,000 |
| | एकूण खरेदीची रक्कम | | | | 13,35,800 |

महानगरपालिका सोलापुर येथे आरोग्य खात्याच्या डी. एस. विभागामार्फत 2013-14 साठी करण्यात आलेल्या फिनेल व जंतुनाशके खरेदी निविदा प्रक्रिया राबवून केली असून सदरची नस्तीची तपासणी केली असता तपासले असता त्याअनुषंगाने निदर्शनास आलेल्या उणीवाबाबत अर्धसमास क्रमांक 90 दि. 22/12/2017 अन्वये खुलासा मागविला असता विभागाने कोणताही खुलासा सदर केला नसल्याने लेखापरीक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. दैनिक जनमत या स्थानिक व्रुतपत्रात जाहिरात दि.06/09/13 रोजी दिली असून त्याबाबतचे अंक नस्तीत नसल्याने जाहिरात दिल्याची खात्री पटत नाही. सदरच्या कामाचा अंदाजित खर्च 11,88,000/- असल्याने किमान एका जिल्हास्तरीय व एक राज्यस्तरीय वृत्तपत्रात जाहिरात देणे आवश्यक असताना

त्याप्रमाणे कार्यवाही न केल्याने स्पर्धात्मक निविदा प्रक्रियेचा फायदा महापालिकेस झाला नाही.
2. श्री. बसव इंडस्ट्रीज. यांच्या निवीदामध्ये सुगंधी फिनेलसाठी diluted फिनेलचा दर दिला असून ते वापरणेस योग्य नसताना त्यांची निविदा मंजूर केली आहे. तसेच श्री. रमेश अग्रो इंडस्ट्रीज. यांचा मुंबई दुकाने अधिनियम नुसार Shop Act परवाना नसताना त्यांची निविदा मंजूर केली आहे, हे नियमबाह्य आहे.
3. सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्र.मतंसं/नस्ती-2012/प्र.क्र.273/39 दिनांक 16/01/2013 नुसार 3 लाखावरील खरेदीसाठी ई - निविदा काढणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही.
4. निविदा काढण्यापुर्वी (अपसेट प्राईज) बाजारमुल्य दरपत्रके मागवून काढलेले नाही. बाजारमुल्य काढले असते तर त्याप्रमाणे निविदामधील न्युनतम दर व बाजारमुल्य यांची तुलना करुन वाटाघाटी केल्या असत्या तर महानगरपलिकेस त्याचा फायदा झाला असता व निधीची बचत झाली असती.
5. करारनाम्यातील अ.क्र.4 नुसार देयक अदा करण्यापूर्वी मालाचा Test Report तपासुन घेतलेला नाही. त्यामुळे फिनेल्च्या दर्जाची खात्री पटत नाही. Test Report नसताना बिले अदा केल्याने रक्कम रु.13,35,800/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.
6. स्थायी समितीची सदरच्या कामास मान्यता घेतली नाही.
7. मालाचा पुरवठा केल्याबाबतची डिलिव्हरी चलने नस्तीत नसल्याने मालाचा केव्हा पुरवठा केला याची खात्री होत नाही.
8. मक्तेदार श्री. बसव इंडस्ट्रीज. यांचे दि.05/09/14 च्या बिल रक्कम मागणीच्या पत्रानुसार त्यांनी 2000 लिटर फिनेल पैकी 1000 लिटर फिनेलचा पुरवठा केला असून त्याच्या रक्कमेची मागणी केली आहे. त्यानुसार रक्कम वेळेत अदा केलेचे दिसत नसून उर्वरित 1000 लिटर फिनेलचा पुरवठा करणे बाकी असल्याचे दिसत आहे.
9. सदरच्या कामाची खर्चाची प्रमाणके लेखापरिक्षणास उपलब्ध झाली नाही.

DGPAGPM8503 (Ref No : 37, Hmm No : 90)

## *49 बजेट नियत्रंण नोदवहीनुसार वित्तीय वर्ष 2013-14 मधील खालील देयके उपलब्ध न झाल्याबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 07**

*लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 3065035.00/-

| **सोलापूर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामधील बजेट नियत्रंण नोदवहीनुसार वित्तीय वर्ष 2013-14** |
|---|

***मधील देयके व अनुषंगीक नस्ती उपलब्ध करुन देण्याबाबत लेखापरीक्षण पथकाकडून मागणी करण्यात आलेले असता रक्कम रु. 3065035/- चे दस्ताऐवज उपलब्ध करून दिलेली नाहीत.***

सोलापूर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामधील बजेट नियत्रंण नोदवहीनुसार वित्तीय वर्ष 2013-14 मधील खालील देयके व अनुषंगीक नस्ती उपलब्ध करुन देण्याबाबत अर्धसमास पत्र क्र. 96 दि.29/12/2017 अन्वये लेखापरीक्षणास माहिती सादर करणेबाबत कळविलेले असताना खालील देयके व नस्त्या लेखापरीक्षणास उपलब्ध करून दिलेली नाहीत.

| अनु क्र | वित्तीय वर्ष | देयकाचा तपशील | देयक क्र. | देयकाची रक्कम (खर्च) |
|---|---|---|---|---|
| 1 | 2013 -14 | कार्बोलिक पावडर खरेदी | 55 / 6.01.2014 | 262500/- |
| 2 | 2013 -14 | Antirabis इ. खरेदी | 59 / 6.0२.2014 | 189800/- |
| 3 | 2013 -14 | अरोग्य प्रयोगशाळा पाणी तपासणीसाठी रसायणे/उपकरणे खरेदी | 46/ 29.09.2013 | 660000/- |
| 4 | 2013 -14 | सॅनिटरी विभागाकरीता साहीत्य खरेदी | 70/15.03.2014 | 213763/- |
| 5 | 2013 -14 | डी. एस.विभागाकरीता साहीत्य खरेदी | 29/29.03.2014 | 388410/- |
| 6 | 2013 -14 | डी. एस.विभागाकरीता हार्बाडस्ट पावडर खरेदी 2011-12 चे प्रमाणक | 66/12.03.2014 | 560805/- |
| 7 | 2013 -14 | डी. एस.विभागाकरीता साहीत्य खरेदी | 1/12.03.2014 | 789757/- |

सदरच्या देयकांची रक्कम रु.3065035/- अभिलेख उपलब्ध न केल्यामुळे अक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

DATMDSM7101 (Ref No : 53, Hmm No : 96)

## ***50 सोलापूर महानगरपालिकेचे उत्पन्न वाढीच्या दृष्टीकोणातून आरोग्या खात्याचे अन्न परवाना विभागाकडून नविन 83 व्यवसायांचा समावेश करण्याच्या दृष्टीने सादर केलेल्या प्रस्तावाबाबत***

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 02**

*लेखा शीर्ष : अनुज्ञापत्र शुल्क म.न.पा. निधी*
*अनियमितता कलम : 9ब*

***सोलापूर महानगरपालिकेच्या उत्पन्न वाढीच्या दृष्टीकोणातून नविन व्यवसायांच्या समावेशाबाबतचा आरोग्य विभागाचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेकडे दि. 05/06/2012 पासून दि. 11/10/2012 पर्यंत निर्णयास्तव प्रलंबित होता. सदरचा कालावधी हा 90 दिवसापेक्षा जास्त होत आहे. त्यामुळे महाराष्ट्र शासन राजपत्र दि. 21/05/2011 अंतर्गतच्या प्रकरण 4(2) अनुक्रमांक 4 (ख) नुसारच्या तरतुदींचा भंग झाल्याचे दिसून येते. तसेच महाराष्ट्र शासन राजपत्र चार - क अधिसूचना दि 4.08.2011 नुसार राज्यामध्ये अन्न सुरक्षा व मानके कायदा 2006 अंतर्गत नियम 2011 अस्तित्वात आहे. त्यामुळे अन्न परवाना विषयक परवाने देणेचे कामकाज सहाय्यक आयुक्त अन्न व औषध प्रशासन सोलापूर याचेकडे दि. 04.08.2011 पासून सदर काम वर्ग करण्यात आले आहे. तथापि सोलापूर महानगरपालिकेचे 2016-17 चे अंदाजपत्रकानुसार आरोग्य खाते जमा बाजूस उपहारगृहे अनुज्ञापत्र शुल्क या लेखाशीर्ष खाली 2013-14 मध्ये रु.1282433/- व 2014 -15 मध्ये रु.942520/- जमा दिसून येते. सदर रक्कम कोणत्या कारणासाठी वसूल करण्यात आली आहे याचा तपशिल लेखापरीक्षणास सादर केलेला नाही.***

1. उत्पन्न वाढिच्या दृष्टीकोणातून आरोग्याधिकारी यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण 18 चे सुचिमध्ये नविन एकूण 83 व्यवसाय समावेश करणेबाबतचा प्रस्ताव आयुक्त सो.म.पा. यांचे कडे जाक्र. 222 दि. 02/11/2011 अन्वये सादर केलेला होता. दि. 05/11/2011 रोजी सदर प्रस्तावास मा. आयुक्त यांनी मान्यता दिली. त्यानुसार जा.क्र. 225 दि. 11/11/2011 अन्वये विधान सल्लागार यांचे कडे उपविधी व नियमावली तयार करून वैधानिक अभिप्राय मिळणेबाबत प्रस्ताव सादर करण्यात आला. विधान सल्लागार यांनी जाक्र. 455 दि.13/12/2011 अन्वये व्यवसाय परवाण्यासाठी सन 1984 मध्ये उपविधी व नियम तयार केले असून त्यास महाराष्ट्र शासनाने क्रं एस.एम.सी 1089/749/सीआर-64/युडी/08-06-84 मान्यता दिलेली आहे. त्यामुळे पुन्हा उपविधी करण्याची जरूरी नसल्यचे व वरील नियमातील नियम क्रं. 2 ई मध्ये दुरूस्ती करावी लागणार असल्याने त्याकरीता प्रस्ताव मु.प्रा.महा.अधि. 1949 चे कलम 454 नुसार

प्रथम महापालिकेचे सर्व साधारण सभेची मंजुरी घेवून कलम 455(1) (2) नुसार महाराष्ट्र शासनाची मान्यता घ्यावी लागेल असा वैधानिक अभिप्राय दिलेला आहे. विधान सल्लागार यांचे अभिप्रायानंतर आरोग्याधिकारी यांनी जाक्र.278 दि. 11/01/2012 अन्वये पुनश्च सविस्तर प्रस्ताव मा. आयुक्त यांचेकडे सादर करून त्यास आयुक्तांची मान्यता घेऊन नंतर दि. 19/01/2012 रोजी शहरातील दैनिक वर्तमान पत्रामध्ये सर्व व्यवसायिक व नागरीकांच्या माहितीसाठी जाहिर प्रसिद्धीकरण देवून हरकती व सुचना मागविण्यात आल्या होत्या. त्यानुसार एकूण 4 प्राप्त हरकती व सुचनानुसार आरोग्याधिकारी यांनी जा. क्र.298 दि. 02/02/2012 रोजी प्राप्त हरकती व सुचना बाबत आयुक्तांचे मान्यतेने कोणती कार्यवाही ठेवावी या करीता विधान सल्लागार यांचा अभिप्राय विधान सल्लागार यांचेकडे प्रस्ताव सादर केला. विधान सल्लागार यांनी जाक्र.596 दि. 01/03/2012 नुसार हरकतदाराची समक्ष सुनावणी घ्यावी. सुनावणी करीता समिती गठित करावी. समितीस अधिकार बहाल करावेत. सुनावणी एकाच दिवशी घेवून त्याचे प्रोसिडींग करावे. कायदेशीर आधार नसल्यास हरकती फेटाळण्यात याव्यात. त्याप्रमाणे हरकतदारास कळविण्यात यावे असा अभिप्राय दिल्याने प्रस्तुत प्रकरण आरोग्याधिकारी यांनी आयुक्तांचे मान्यतेने आरोग्याधिकारी, मुख्य सफाई अधिक्षक व अन्न व परवाना अधिक्षक यांची समिती गठीत करून हरकत दारांना दि. 16/03/2012 रोजी उपस्थिती बाबत पत्र दिले. परंतु दि.19/03/2012 ची बैठक रद्द करून 26/03/2012 रोजी ठेवण्यात आली. याबाबत संबंधित हरकत दारांना कळविण्यात आले. हरकती व सुचना बाबत जाक्र.345 दि. 26/03/2012 रोजी सुनावणी होवून निर्णय झाला.

"सोमवार दि. 26/03/2012 रोजी हरकती व सुचनांबाबत सुनावणी करीता नेमलेल्या बैठकीस हरकतदार आपले म्हणणे मांडण्याकरीता उपस्थित न राहिल्याने व त्यांनी घेतलेल्या हरकती व सुचनांना कोणताही कायदेशीर आधार नसल्याने त्या हरकती व सुचना समितीने सर्वानुमते फेटाळल्या." सदर बाबत आरोग्याधिकारी यांनी जाक्र.347 दि. 29/03/2012 रोजी मा आयुक्तांना हरकतदारांच्या सुचना फेटाळण्यात आल्याचे संबंधितांना कळवणे व सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समिती मार्फत मा. सर्व साधारण सभेकडे सादर करणेस मान्यता घेवून जा.क्र.6 दि.07/04/2012 नुसार आरोग्याधिकारी हरकतदारांच्या सुचना फेटाळल्याचे संबंधितांना कळविले आहे. वरील मा. आयुक्त यांच्या मान्यतेनुसार सदरचा संपुर्ण प्रस्ताव मु.प्रा.महा.अधि. 1949 अंतर्गतच्या तरतुदीनुसार मान्यतेस्तव मा.स्थायी समिती मार्फत मा. सर्व साधारण सभेकडे सादर करण्यात आला. व प्रस्तावावर मा. स्थायी समिती विषय क्रं.52 ठराव क्रं.52 दि.05/06/2012 रोजी ठराव पारीत करून सर्व साधारण सभेकडे प्रस्ताव शिफारशीसह सादर केला. सर्व साधारण सभेने विषय क्र. 71 ठराव क्रं. 112 दि. 11/10/2012 रोजी समिती गठीत करून त्यानुसार निर्णय घेणेस मान्यता दिली. सर्वसाधारण सभेकडे प्रस्ताव दि.05/06/2012 पासून दि. 11/10/2012 पर्यंत निर्णयास्तव प्रलंबित होता. सदरचा कालावधी हा 90 दिवसापेक्षा जास्त होत आहे. त्यामुळे महाराष्ट्र शासन राजपत्र दि. 21/05/2011 अंतर्गतच्या प्रकरण 4(2) अनुक्रमांक 4 (ख) नुसारच्या तरदुदींचा भंग झाल्यचे दिसून येते. सद्यस्थितीत अन्न व परवाना

विभागाकडून दि.04.09.2013 च्या परवाना फी नुसार वसुली सुरु आहे. त्यामुळे सोलापूर महानगरपालिकेच्या उत्पन्न वाढीच्या दृष्टीकोणातून उपरोक्त नुमुद नविन व्यवसाय समावेशाबाबत चा प्रस्ताव शासनाकडे मान्यतेसाठी सादर करण्यात आलेला नाही.

**2.** महाराष्ट्र शासन राजपत्र चार-क अधिसूचना दि.04.08.2011 नुसार राज्यामध्ये अन्न सुरक्षा व मानदे कायदा 2006 अंतर्गत नियम 2011 अस्तित्वात आहे. त्यामुळे अन्न परवाना विषयक परवाने देणेचे कामकाज सहाय्यक आयुक्त अन्न व औषध प्रशासन सोलापूर याचेकडे दि.04.08.2011 पासून सदर काम वर्ग करण्यात आले आहे. तथापि सोलापूर महानगरपालिकेचे 2016-17 चे अंदाजपत्रकानुसार आरोग्य खाते जमा बाजूस उपहारगृहे अनुज्ञापत्र शुल्क या लेखाशीर्ष खाली 2013-14 मध्ये रु.1282433/- व 2014-15 मध्ये रु.942520/- जमा दिसून येते. सदर रक्कम कोणत्या कारणासाठी वसूल करण्यात आली आहे याचा तपशिल लेखापरीक्षणास सादर केलेला नाही.

सदर बाबत अर्धसमास पत्र क्र. 106 दि. 20.01.2018 अन्वये विचारणा केली असता विभागाने याबाबतचा खुलासा सादर केलेला नाही.

DATMDSM7101 (Ref No : 62, Hmm No : 106)

## *51 डी.एस. विभागाकरिता फॉगिंग माशिन खरेदीतील त्रुटीबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 04**

*लेखा शीर्ष : औषध म.न.पा. निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 743750.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 743750.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 46900.00/-

***प्राप्त निविदेतील मे. साई ट्रेडर्स यांनी निविदेसोबत तांत्रिक लिफाफा जोडलेला नाही. निविदेतील अटी व शर्ती नुसार आयकर विवरणपत्र, अनुभवाचा दाखला, विक्रीकर नोंदणी दाखला जोडलेला नाही. निविदेतील अटी व शर्तीनुसार WORLD HELTH ORGNISATION BY NATIONAL MALERIA ERADICATION PROGRAM (NMEP) यांची मान्यता असलेली प्रमाणपत्र जोडलेली नाहीत. करारनामा अट क्र. 8 नुसार विलंब आकार दंड प्रतिदिन 700/- प्रमाणे रक्कम रुपये 46,900/- ठेकेदाराकडून वसूल करण्यात यावी. पुरवठाधारकास अदा केलेले रक्कम रु.743750/- ची प्रमाणके लेखापरीक्षणास सादर केली नाहीत.***

आरोग्य विभागांतर्गत मध्यवर्ती भांडार विभागातील डी.एस. विभागाकरिता 35 नग फॉगिंग मशिन खरेदी निविदा नस्तीचे पडताळणी केली असता शहरातील डास प्रतिबंधक उपाययोजने अंतर्गत शहरातील विविध भागात डास प्रतिबंधक औषध धुरळणी काणे आवश्यक असल्याने आरोग्य अधिकारी यांनी फेर जाहीर टेंडर नोटीसद्वारे महापालिका संकेतस्थळावर दि.19.9.2013 ते 25.9.2013 या कालावधीत निविदा मागविण्यात आल्या. दि.27.9.2013 रोजी दुपारी 1.00 वाजेपर्यंत 4 निविदा प्राप्त झाल्या. त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे.

| साहित्याचा तपशिल | साई समर्थ एटरप्रायझेस | आरोग्य अक्झीबुटर | आशिष एटरप्रायझेस | साई ट्रेडर्स |
|---|---|---|---|---|
| पोर्टेबल फॉगिंग माशिन, WORLD HELTH ORGNISATION BY NATIONAL MALERIA ERADICATION PROGRAM (NMEP) यांची मान्यता असलेली खालील स्पेससीफीकेशन असलेली फॉगिंग माशिन<br>Size 106 x 29 x 33 cm ,<br>Wight Empty - 7 Kg,<br>Fuel Tank -2 Lit.,<br>Mximum Engin Performance- 24 HP<br>Avarage fuel Consumption - 12.25 Lit/h<br>Ignition - Electronic Ignition ,Battries- 1.5 V = 6V | 22500 | 21250 | 23750 | 25000 |

आरोग्य अक्झीबुटर, शिवाजीनगर, पुणे यांची निविदा मंजूर केलेली आहे. स्थायी समिती ठराव 225

दि. 2.9.2014 अन्वये खर्चास मान्यता आहे.

11) प्राप्त निविदेतील मे. साई ट्रेडर्स यांनी निविदेसोबत तांत्रिक लिफाफा जोडलेला नाही. निविदेतील अटी व शर्ती नुसार आयकर विवरणपत्र, अनुभवाचा दाखला , विक्रीकर नोंदणी दाखला जोडलेला नाही.
12) निविदेतील अटी व शर्तीनुसार WORLD HELTH ORGNISATION BY NATIONAL MALERIA ERADICATION PROGRAM (NMEP) यांची मान्यता असलेली प्रमाणपत्र जोडलेली नाहीत.
13) मंजूर निविदा धारकास जा. क्र. 361 दि. 7.01.2014 अन्वये पुरवठा आदेश दिलेला आहे. निवेदेतील अटी व शर्ती नुसार साहित्य 7.02.2014 पर्यंत पुरवठा करणे आवश्यक असताना प्रत्यक्षात साहित्य डिलिव्हरी चलन क्र.232 दि. 15.04.2014 रोजी 67 दिवस उशिरा प्राप्त झाल्याचे जडग्रह नोंदवहीवरील नोंदीनुसार दिसून येते. करारनामा अट क्र. 8 नुसार प्रतिदिन 700/- प्रमाणे रक्कम रुपये 46,900/- ठेकेदाराकडून वसूल करण्यात यावी.
14) पुरवठाधारकास अदा केलेले रक्कम रु.743750/- ची प्रमाणके लेखापरीक्षणास सादर केली नाहीत.

उपरोक्त अनियमिततांबाबत लेखापरीक्षणाचेवेळी अर्धसमास ज्ञापन क्रमांक 94 दिनांक 29/12/2017 अन्वये खुलासा विचारणा केली असता विभागाने याबाबत खुलासा केलेला नाही, त्यामुळे लेखापरीक्षणाचे अभिप्राय कायम करण्यात आलेले आहेत.

DATMDSM7101 (Ref No : 63, Hmm No : 94)

## *52 एक्सरे फिल्म-केमिकल साहित्य खरेदीतील अनियमितेबाबत......*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 03**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 197357.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 197357.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 9867.00/-

***सोलापूर महानगरपालिका येथे आरोग्य खात्यामार्फत वित्तीय वर्ष 2013-14 साठी एक्सरे फिल्म-केमिकल साहित्य खरेदी करण्यासाठी जा.क्र. आ.अ.भांडार/1/494/ दि.4.3.2014 अन्वये जाहिरात प्रसिध्द करून निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. दिनांक 20.3.2014 रोजी देण्यात आलेल्या कार्यादेशामध्ये रु.100/- च्या स्टॅम्प***

***पेपरवर करारपत्र करुण घेण्याबाबत अट नमूद केलेली असताना याबाबतचे करारपत्र नस्तीत उपलब्ध झाले नाही. रेश्मा उद्योग यांनी माल पुरवठा केल्याचे विवरणपत्र (Tax Invoice) नस्तीत उपलब्ध झाले नाही. मालाचा पुरवठा केल्याबाबतची डिलिव्हरी चलने नस्तीत उपलब्ध झालेली नाहीत. निविदेसोबत विक्रीकर नोंदणी दाखला सादर न केल्याने त्यांना अदा करण्यात आलेल्या रक्कम रु.1,97,357/- च्या देयकामधून 5% प्रमाणे रक्कम रु.9867/- विक्रीकर वसूल करण्यात यावा.***

सोलापूर महानगरपालिका येथे आरोग्य खात्यामार्फत वित्तीय वर्ष 2013-14 साठी एक्सरे फिल्म - केमिकल साहित्य खरेदी करण्यासाठी जा.क्र. आ.अ.भांडार/1/494/ दि.4.3.2014 अन्वये जाहिरात प्रसिध्द करून निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. एक्सरे फिल्म-केमिकल साहित्य खरीदीसाठी खालील तीन निविदा प्राप्त झाल्या.

| अ.क्र. | निविदा धारकाचे नाव |
|---|---|
| 1 | रेश्मा उद्योग |
| 2 | संजीवनी सर्जिकल कंपनी |
| 3 | प्रतिभा मेडीनोक्स |

उपरोक्त प्राप्त तीन निविदाधारकांपैकी रेश्मा उद्योग यांचा दर कमी असल्याने जा.क्र.539 दि.20.3.2014 अन्वये कार्यादेश देण्यात आला. सदर खरेदीची निविदा नस्तीची तपासणी केली असता खालीलप्रमाणे त्रुटी आढळून आल्या आहेत. याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 112 दिनांक 23/01/2018 अन्वये विभागास विचारणा केली असता विभागाकडून याबाबतचा खुलासा सादर झालेला नाही. त्यामुळे खालील आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

1. दिनांक 20.3.2014 रोजी देण्यात आलेल्या कार्यादेशामध्ये रु.100/- च्या स्टंम्प पेपरवर करारपत्र करुण घेण्यात येण्याबाबत अट नमूद केलेली असतांना याबाबतचे करारपत्र नस्तीत उपलब्ध झाले नाही. रेश्मा उद्योग यांनी माल पुरवठा केल्याचे विवरणपत्र (Tax Invoice) नस्तीत उपलब्ध झालेली नसल्यने ती उपलब्ध करुण देण्याबाबत कळविले असता करारपत्र व माल पुरवठा केल्याचे विवरणपत्र (Tax Invoice) उपलब्ध झालेले नाहीत.

2. मालाचा पुरवठा केल्याबाबतची डिलिव्हरी चलने नस्तीत उपलब्ध झालेली नसल्यने ती उपलब्ध करुण देण्याबाबत कळविले असता डिलिव्हरी चलने उपलब्ध झालेली नाहीत.

3. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, परिपत्रक क्र.विकअ/1998/प्र.क्र.43/कराधान. दिनांक 1 मे 1999, कार्यकंत्राट कायदयाचे कलम 6 (ब)(1) तसेच मुल्यवर्धित कर कायदा 2005 प्रमाणे कार्यकंत्राटदाराने विक्रीकर खात्याकडून नोंदणी दाखला घेणे बंधनकारक असून निविदा सोबतच्या सहपत्रात दाखला सादर केला असल्यास अशा कंत्राटदाराकडून 2 टक्के दराने कर कपात करणे आवश्यक आहे. दाखला सादर न केल्यास 5 टक्के कर कपात करणे आवश्यक आहे. उपरोक्त कामाचे ठेकेदार रेश्मा उद्योग यांचे निविदे सोबत विक्रीकर नोंदणी दाखला सादर न केल्याने त्यांना अदा केलेले देयक रक्कम रु.1,97,357/- मधून 5% प्रमाणे रक्कम रु.9867/- विक्रीकर वसूल करणे आवश्यक असताना तो अदा केलेल्या अदा केलेला नाहीत.

वसूलपात्र रक्कम रु.9867/-

## *53 वित्तीय वर्ष 2013-14 या कालावधीत निविदा न काढता केलेल्या साहित्याच्या खरेदी मधील अनियमितताबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 04**

*लेखा शीर्ष : आरोग्य विभाग मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 200176.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 200176.00/-

***महानगरपालिका सोलापुर येथे वित्तीय वर्ष 2013-14 मध्ये निविदा न मागविता डायनॉमिक मार्केटिग प्रा. लि. सोलापुर यांच्याकडून लाईफबॉय साबणाची नियमबाहयरित्या खरेदी केली आहे.***

आरोग्य विभागातील औषध भांडारामधील साठा नोंदवहीची तपासणी केली असता वित्तीय वर्ष 2013-14 या कालावधीत निविदा न काढता खालील लाईफबॉय साबणाची खरेदी केलेली आहे.

| अ.क्र. | मक्तेदारांचे नांव | डिलेव्हरी चलन क्रमांक व दिनांक | खरेदी केलेली लाईफबॉय साबणाची संख्या | प्रती नग प्रमाणे साबणाचा दर रु. | एकूण रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| 1 | डायनॉमिक मार्केटिंगप्रा.लि.सोलापुर | डीवायएन 7889/ दि.5/2/14 | 4800 | 21.29 | 102192 |
| 2 | डायनॉमिक मार्केटिंग प्रा.लि. सोलापुर | डीवायएन 82803/दि.5/2/14 | 4601 | 21.29 | 97984 |
| | एकूण रक्कम | | | | 200176 |

सदरबाबत खालीलप्रमाणे त्रुटी आढळून येते.

1) डायनॉमिक मार्केटिंग प्रा.लि. सोलापुर यांना निविदा न काढता ठेका देण्यात आल्याचे दिसुन येते.

2) सबधित मक्तेदार यांना जुन्याच दराने अथवा ठेक्याला मुदतवाढ दयावयाची असल्यास मा.आयुक्त यांची मान्यता घेणे आवश्यक आहे. तथापि तशी कार्यवाही केली नाही.

3) ठेकेदाराबरोबर वाढीव मुदतीचा मुद्रांकित करारनामा करणे आवश्यक असताना तसा करार न करता साहित्याची खरेदी केली आहे.

4) ठेकेदारास प्रदान करण्यात आलेल्या रक्कमेच्या देयकांची प्रमाणके लेखापरिक्षणास उपलब्ध करणेत आली नाहीत.

वरील असलेल्या त्रुटीबाबत विभागाला अर्धसमास ज्ञापन क्र.107 दिनांक 22/01/2018 खुलासा सादर करण्याबाबत कळविले असता विभागाने खुलासा सादर केलेला नाही. त्यामुळे वरील आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

FDSJRDM6801 (Ref No : 86, Hmm No : 107)

## *54 वित्तीय वर्ष 2013-14 या कालावधीत कुटुंब कल्याण कार्यक्रमाअंतर्गत शासनाकडून मिळणारे वेतन अनुदानामधील अनियमितता*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 06**

*लेखा शीर्ष :आरोग्य विभाग मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 1326431.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1326431.00/-

***कुटुंब कल्याण कार्यक्रमाअंतर्गत शासनाकडून अधिकारी/ कर्मचारी यांच्या वेतनापोटी 100 टक्के अनुदान प्राप्त होते. सन 2004-05 ते 2014 पर्यंत वेतन अनुदान रक्कम रु.13912633/- प्रलंबित आहे. सदर अनुदान शासनाकडुन प्राप्त करुन घेणेत यावेत.***

राष्ट्रीय कुटुंब कल्याण कार्यक्रमा अंतर्गत केंद्र व राज्य शासनाचे मार्गदर्शक सुचनेनुसार कार्यरत नागरी कुटुंब कल्याण केंद्र, नागरी आरोग्य केंद्राना सहाय्यक अनुदान राज्य शासनाकडुन वितरीत करण्यात येते. सदर योजना 100 टक्के केंद्रशासन पुरस्कृत योजना असुन केंद्र व राज्य शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार सहाय्यक अनुदान स्वरुपात सर्व सबधित स्वायत्ता व स्वयंसेवी संस्थाना अनुदान देणेत येते.

अतिरिक्त संचालक,आरोग्य सेवा व कुटुंब कल्याण पुणे यांचे पत्रजा.क्र.461-65/पुणे दिनांक 02/01/2006 चे अ.क्र.7 (फ) नुसार वित्तीय वर्ष संपलेनंतर अनुदानाचे लगेच लेखापरिक्षण करुन घेणे गरजेचे आहे. परंतु त्यानुसार कार्यवाही करणेत आलेली नाही. राज्य कुटुंब कल्याण कार्यालय पुणे यांचे

दिनांक 3/7/2010 चे पत्रान्वये 2004 ते 2012 पर्यंतचे वेतन अनुदान महानगरपालिकेने लेखापरिक्षण करुन त्याचा अहवाल सादर न केल्याने प्रलंबित असलेले वेतनासाठी महानगरपालिका निधीमधुन रक्कम रु.12586202/- खर्च करणेत आलेला आहे. शासनाकडुन अनुदानाची मागणी केली नसल्याने महानगरपालिकेने वेतनावर केलेला खर्च गुंतुन पडलेला आहे.

वित्तीय वर्ष 2013-14 या कालावधीत कुटुंब कल्याण विभागात खालील प्रमाणे अधिकारी/कर्मचारी कार्यरत होते.

| अ.क्र. | तपशील | वार्षिक वेतन | पदाचीसंख्या | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | वैदयकीय अधिकारी | 107160 | 1 | 107160 |
| 2 | साख्यिकी सहाय्यक | 508176 | 1 | 508176 |
| 3 | समन्वयक | 291444 | 1 | 291444 |
| 4 | पी.एच.एन. | -- | 0 | -- |
| 5 | कनिष्ठ श्रेणी लिपिक | 261418 | 2 | 261418 |
| 6 | ए.एन.एम | माहीती सादर करावी. | 4 | -- |
| 7 | शिपाई | 158233 | 1 | 158233 |
| | एकूण | | | 1326431 |

शासनाकडुन रक्कम रु.1326431/- अनुदानाची मागणी केली नसल्याने महानगरपालिकेने वेतनावर केलेला खर्च गुंतुन पडलेला आहे.वित्तीय वर्ष 2004-05 ते 2014 पर्यंत एकून सहाय्यक अनुदान प्राप्त करुन घ्यावे.

अर्धसमास क्र.111दिनांक 22/01/2018 नुसार उपरोक्त बाबत खुलासा सादर करावयास सांगितले असता विभागाने त्याचे पत्र क्र.निरंक आअ/कुकशस दिनांक 08/02/2018 रोजी खुलासा सादर केलेला आहे. खुलासा सयुक्तिक नसल्यामुळे सदर आक्षेप कायम ठेवण्यात आलेला आहे.

FDSJRDM6801 (Ref No : 90, Hmm No : 111)

## *55 वित्तीय वर्ष 2013-14 या कालावधीत वाहनांच्या देखभाल/दुरुस्तीवर करणेत आलेल्या खर्चामधील अनियमितता...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष : आरोग्य विभाग मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 2771764.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 2771764.00/-

***उद्योग उर्जा व कामागार विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र भाखंस10/3/2635/उद्योग-6 दिनांक 16/7/1993 नुसार वर्षिक खरेदी ही रुपये 5000/- पेक्षा जास्त असल्यास निविदा प्रक्रिया राबवुन खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच उद्योग उर्जा व कामागार विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.भाखंस/1088/2512/उद्योग-6 दिनांक 2/01/1992 मधील परिच्छेद क्र.8(3) ई नुसार वर्षामधील आवश्यकतेनुसार वस्तु खरेदी करण्यासाठी दरवर्षी संख्या करारापेक्षा दरकरार करणे आवश्यक असताना अशी पदधत न राबविता एकूण रु. 2771764/- ची खरेदी रु.3000/- चे आत एकूण 76 तुकडे पाडून वाहनाच्या सुटया भागाची खरेदी केलेली आहे.***

सोलापुर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागांतर्गत पथांची झाडलोट व कचरा वाहतुक या लेखाशिर्षातंर्गत वित्तीय वर्ष 2013-14 या कालावधीत झालेल्या खर्चाचे लेखापरिक्षण केले असता खालील बाबी दिसुन आल्या आहेत.

आरोग्य विभागाकडे एकूण 48 वाहने असून वित्तीय वर्ष 2013-14 मध्ये सुटया भागावर झालेल्या खरेदीबाबतच्या नोंदी बजेट कंट्रोल नोंदवहीवरुन तपासणी केली असता तुकडे करुन एकूण 76 प्रमाणकाद्वारे महानगरपालिकेच्या आरोग्य विभागांतर्गत पथांची झाडलोट व कचरा वाहतुक या सदरखाली खाजगी व्यवसायीकाकडुन वाहनाच्या सुटया भागाची तुकडे पाडून खरेदी केलेली आहे. यावर एकूण रक्कम रु.2771764/- खर्च झालेला आहे

उद्योग उर्जा व कामागार विभाग यांचेकडील शासन निर्णय ब--10/3/2635/उद्योग-6 दिनांक 16/7/1993 नुसार वर्षिक खरेदी ही रुपये 50000/- पेक्षा जास्त असल्यास निविदा प्रक्रिया राबवुन खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच उद्योग उर्जा व कामागार विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.भाखंस/1088/2512/उद्योग-6 दिनांक 2/01/1992 मधील परिच्छेद क्र.8(3) ई नुसार वर्षामधील आवश्यकतेनुसार वस्तु खरेदी करण्यासाठी दरवर्षी संख्या करारापेक्षा दरकरार करणे आवश्यक असताना बजेट तरतुद 2013-14 मध्ये रक्कम रु.30 लाख असताना निविदा प्रक्रिया न राबविता एकून रक्कम रु 2771764/- खरेदी असे 76 तुकडे पाडून खाजगी व्यवसायीकाकडुन वाहनाच्या सुटया भागाची खरेदी करण्यांत आलेली आहे.

वरील असलेल्या त्रुटीबाबत विभागाला अर्धसमास ज्ञापन क्र.99 दिनांक 05/01/2018 नुसार खुलासा सादर करण्याबाबत कळविले असता विभागाने खुलासा सादर केलेला नाही. त्यामुळे वरील आक्षेप कायम ठेवण्यांत येत आहे.

FDSJRDM6801 (Ref No : 96, Hmm No : 99)

## *56 वित्तीय वर्ष 2013-14 या कालावधीत मेडी फॉर्मा यांच्याकडून औषध खरेदी मधील अनियमितताबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 7**

*लेखा शीर्ष : आरोगय विभाग मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 2500000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 2500000.00/-

***जाहीरातीस वृत्तपत्रामध्ये प्रसिध्दी देण्यात आलेली नाही. तसेच नियमानुसार ई निविदा प्रक्रिया राबविली नाही. औषधी व उपकरणे खरेदी करण्यापुर्वी मेडीकल बोर्डाकडून दर, दर्जा आणि उत्पादनाबाबत खात्री करुन प्रमाणपत्र घेतल्याचे दिसुन येत नाही. मेडी फॉर्मा यांचेसोबत करारनामा केल्याचे दिसुन येत नाही. सर्व औषधे आ पी/ बीपी/ सुएसपी प्रमाणे असावीत. तसेच माल आयएसआय मार्कप्रमाणे असावेत. त्याप्रमाणे डी एस भांडार शाखा यांनी किती औषधी खरेदी केली. त्याचा दर काय होता, तसेच सदरचा माल कधी भांडारात प्राप्त झाला, याची माहिती उपलब्ध केली नाही. तसेच सदर मालाचे डिलीव्हरी चलने निविदा नस्तीमध्ये दिसुन आली नाही. शासन दरकरारानुसार औषधे खरेदी केल्याचे दिसुन येत नाही.***

आरोग्य विभागातील डी.एस.भांडारामधील वित्तीय वर्ष 2013-14 या कालावधीत सोलापुर महानगरपालिकाचे दवाखाने, प्रसुतीगृह व नागरी आरोग्य कैंद्र, आरसीएच कैंद्राकरीता औषधे खरेदीबाबत निविदा खालीलप्रमाणे मागविण्यांत आल्या आहेत.

औषध खरेदी अंदाजित किमंत रु. 25 लाख

बयाना रक्कम रु.25000/-

सुरक्षित अनामत रक्कम मंजुर दराच्या 4 टक्के प्रमाणे

निविदा फॉर्म फी रु.2500/-

जाहीरात संकेतस्थळावरुन प्रसिध्दी केली, तथापी 29-09-2013 पर्यंत एकही निविदा प्राप्त झालेली नाही.

फेर निविदा दिनांक 12-10-2013 रोजी प्राप्त झाली असुन ती दिनांक 28-10-2013 ला उघडली. त्यामध्ये एक निविदा प्राप्त झाली आहे.

मुख्य लेखापरिक्षक यांचे 1043 दिनांक 11-11-2013 नुसार खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेले आहेत.

मेडी फॉर्मा यांची एकच निविदा प्राप्त झाल्यामुळे मेडीकल बोर्डाची शिफारस प्राप्त करुन घेवून मगच खरेदी करण्यात यावी. एकही निविदा प्राप्त न झाल्यामुळे तीनवेळा फेर निविदा काढण्यात आल्या आहे. त्यानुसार निविदाकार मेडी फार्मा याची निविदा प्राप्त झाली. यांच्याकडून औषधी व उपकरणे खरेदी करण्यापुर्वी मेडीकल बोर्डाकडून दर, दर्जा आणि उत्पादनाबाबत शिफारस करणे सध्याच्या बाजारभावानुसार मक्तेदार याच्या समक्ष दराबाबत वाटाघाटी अंती निश्चित होणा-या दरकरार करणेस रक्कम रु.25 लाख खर्चाच्या मर्यादेत असल्याने मुंबई प्रातिक अधिनियम 1949 कलम 73 अन्वये तसेच उक्त अधिनियम 73 (5) अन्वये वर्क ऑर्डर देण्यास मुख्य लेखापरिक्षक तसेच मा.आयुक्त यांनी 11/11/2013 रोजी मान्यता दिलेली आहे.

उपरोक्त कामाबाबत खालील प्रमाणे त्रुटी आढळून येत आहे.

1) जाहीरातीस वृत्तपत्रामध्ये प्रसिध्दी देण्यांत आलेली नाही. तसेच नियमानुसार ई निविदा प्रक्रिया राबविली नाही.

2) जर निविदा प्रक्रियामध्ये योग्य प्रमाणात तीन किवा त्यापेक्षा जास्त निविदा प्राप्त होत नसेल तर पुर्वीच्या मक्तेदाराकडून जून्याच दराने औषधीचा पुरवठा प्राप्त करुन घेणे आवश्यक होते.

3) आरोग्य अधिकारी सोलापुर यांनी सादर केलेली औषधे व उपकरणाची तसेच औषधनिहाय मेडी फॉर्मा यांना मंजुर करण्यांत आलेले दर याचा तपशील निरीक्षण पथकास सादर केलेला नाही. त्यामुळे खरेदीच्या दराच्या रक्कमेबाबत खात्री होत नाहीत.

4) औषधी व उपकरणे खरेदी करण्यापुर्वी मेडीकल बोर्डाकडून दर, दर्जा आणि उत्पादनाबाबत खात्री करुन प्रमाणपत्र घेतल्याचे दिसुन येत नाही.

5) मेडी फॉर्मा यांचेसोबत करारनामा केला नाही.

6) सर्व औषधे आ पी/बीपी/सुएसपी प्रमाणे असावीत. तसेच माल आयएसआय मार्कप्रमाणे असावेत. त्याप्रमाणे डी एस भांडार शाखा यांनी किती औषधी खरेदी केली? त्याचा दर काय होता तसेच सदरचा माल कधी भांडारात प्राप्त झाला. याची माहिती उपलब्ध केली नाही. तसेच सदर मालाचे डिलीव्हरी चलने निविदा नस्तीमध्ये दिसुन आली नाही.

7) शासन दरकरारानुसार औषधे खरेदी केल्याचे दिसुन येत नाही. शासन दरकरारास प्राधान्य देणे आवश्यक होते.

अर्धसमास क्र. 130 दिनांक 20/02/2018 नुसार उपरोक्त बाबत खुलासा सादर करावयास सांगितले असता विभागाने खुलासा सादर केलेला नाही. त्यामुळे सदर आक्षेप कायम ठेवण्यात

आलेला आहे.

FDSJRDM6801 (Ref No : 97, Hmm No : 130)

## *57 डी.एस.विभागातील जंतुनाशके पावडर खरेदी नस्तीमधील (बील क्र.66/12-03-14) अनियमितताबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 3**

*मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 226380.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 226380.00/-

***उद्योग उर्जा व कामागार विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.10/3/2635/उद्योग-6 दिनांक 16/7/1993 नुसार वार्षिक खरेदी ही रुपये 50000/- पेक्षा जास्त असल्यास निविदा प्रक्रिया राबवुन खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच उद्योग उर्जा व कामागार विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.भाखंस/1088/2512/उद्योग-6 दिनांक 2/01/1992 मधील परिच्छेद क्र.8(3) ई नुसार वर्षामधील आवश्यकतेनुसार वस्तु खरेदी करण्यासाठी दरवर्षी संख्या करारापेक्षा दरकरार करणे आवश्यक असताना अशी पध्दत न राबविता एकूण रु.2,26,380/- जंतुनाशक पावडर खरेदी रु. 25000/- चे आत असे 11 तुकडे पाडून केलेली आहे. प्रमाणके लेखापरीक्षणास उपलब्ध झालेली नाही. त्यामुळे आयकराची रक्कम वसुल झाल्याची खात्री होत नाही. पावडर प्राप्त झाल्याची नोंद साठा रजिष्टरमध्ये घेतल्याचे दिसून येत नाही. वित्तीय वर्ष 2013-14 मध्ये पावडरचा किती साठा प्राप्त झाला. तसेच किती खर्च केला व मार्च 2014 अखेर किती साठा शिल्लक होता. याची विवरणपत्रामध्ये माहिती सादर करण्यांत आलेली नाही.***

दिनांक 15/5/2018 रोजी वित्तीय वर्ष 2013-14 च्या अंतीमिकरणाच्या वेळी मा.आयुक्त व उप संचालक स्थानिक निधी लेखापरिक्षा रायगड भवन नवी मुंबई यांचेशी झालेल्या चर्चेनुसार अभिलेखे उपलब्ध न करुन दिलेल्या परिच्छेदाच्या अनुषंगाने आता अभिलेख उपलब्ध केल्या नुसार डी.एस.विभागातील जंतुनाशके पावडर खरेदी नस्ती (बील क्र.66/12-03-14) तपासण्यासाठी उपलब्ध झालेली असुन त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

पावसाळयात शहरात बरेच ठिकाणी दलदलीमुळे दुर्गंधी व घाण होते. त्यामुळे नागरिकाच्या जिवितास धोका होण्याची संभावणा असल्याने तेथील परिसर स्वच्छ व दुर्गंधी नाशक ठेवणेकरीता जंतुनाशक टाकणे आवश्यक

असल्याने त्याकरीता डी.एस.विभागाचे मागणीप्रमाणे जंतुशानक पावडर खरेदी करणे तातडीचे गरजेचे होते. पावडर एस.आर.बी. इंडस्ट्रीज यांचेकडून खरेदी करणेत येते. सदर इंडस्ट्रीजची नोंदणी महाराष्ट्र शासन उद्योग संचालनालय यांचे मध्यवर्ती औषध भांडार खरेदी संघटनेकडे नोंदणी केलेली आहे.

जंतुनाशक पावडर ही हर्बल असुन त्यामुळे मानवी जीवणास व पर्यावरणास धोका नाही. जंतुनाशक पावडर 200 किलो खरेदी करावयाची असुन प्रती किलो दर 102.90 असुन रु.20580/- इतका खर्च होणार आहे. मा. उप आयुक्त यांची दिनांक 01-01-14 ला मान्यता आहे. तसेच आरोग्य अधिकारी यांची स्वाक्षरी आहे. सदरचा खर्च हा रु. 25000/- च्या आत व ताडतीचा असल्याने 5.2.2 खाली खरेदी करावयाचा असल्याने जाहिर प्रसिध्दीकरणाची अट शिथिल करण्यात आली आहे.

वर्ष 2013-14 मध्ये असे एकूण 11 प्रकरणामध्ये पावडर 200 किलो प्रमाणे एकूण रक्कम रु.2,26,380/- चा झालेला आहे.

उपरोक्त बाबत खालील प्रमाणे त्रुटी आढळून येते.

1) उद्योग उर्जा व कामागार विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.10/3/2635/उद्योग-6 दिनांक 16/7/1993 नुसार वर्षिक खरेदी ही रुपये 50000/- पेक्षा जास्त असल्यास निविदा प्रक्रिया राबवुन खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच उद्योग उर्जा व कामागार विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.भाखंस/1088/2512/उद्योग-6 दिनांक 2/01/1992 मधील परिच्छेद क्र.8(3) ई नुसार वर्षामधील आवश्यकतेनुसार वस्तु खरेदी करण्यासाठी दरवर्षी संख्या करारापेक्षा दरकरार करणे आवश्यक असताना अशी पध्दत न राबविता एकूण रु. 2,26,380/- जंतुनाशक पावडर खरेदी रु. 25000/- चे आत असे 11 तुकडे पाडून केलेली आहे.

2) प्रमाणके उपलब्ध झालेली नाही. त्यामुळे आयकराची रक्कम वसुल झाल्याची खात्री होत नाही.

3) पावडर प्राप्त झाल्याची नोंद साठा रजिष्टरमध्ये घेतल्याचे दिसन येत नाही. वित्तीय वर्ष 2013-14 मध्ये पावडरचा किती साठा प्राप्त झाला. तसेच किती खर्च केला व मार्च 2014 अखेर किती साठा शिल्लक होता. याची विवरणपत्रामध्ये माहिती सादर करण्यांत आलेली नाही.

वरील असलेल्या त्रुटीबाबत विभागाला अर्धसमास ज्ञापन क्र.146 दिनांक 13/06/2018 खुलासा सादर करण्याबाबत कळविले असता विभागाने खुलासा सादर केलेला नाही. त्यामुळे आक्षेप कायम ठेवण्यांत येत आहे. तसेच अर्धसमास ज्ञापन क्र. 134 दिनांक 20/02/2018 नुसार अॅटी रॅबीझं इंजेक्षण रक्कम रू.6,60,000/-खरेदी निविदा नस्ती (बिल क्रमांक 46/27-09-13) तसेच डी.एस.विभागामार्फत आरोग्य प्रयोगशाळा,पाणी तपासणीसाठी रसायन उपकरणं खरेदी रक्कम रू.2,13,763/- निविदा नस्ती (बिल क्रमांक 70 दिनांक 15.03.2014) लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आले नाही.

## *58 कर आकारणी व कर संकलन विभाग, नागरी सुविधा केंद्र, लेखा विभाग व इतर विभागांकरिता विकसित केलेल्या संगणक आज्ञावलीबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 12**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9ब*

***System requirement specification(SRS) ची प्रत लेखा परीक्षणास उपलब्ध करणे आवश्यक असताना ती केली नाही. IT auditor ने केलेल्या तपासणी (testing) ची प्रत लेखा परीक्षणास उपलब्ध उपलब्ध करण्यास कळवूनही माहिती उपलब्ध केली नाही. विभागाने कोणत्या कंपनीसोबत Legal Service Agreement केले असल्यास त्याची माहिती लेखा परीक्षणास उपलब्ध करण्यास कळवूनही माहिती उपलब्ध केली नाही. नवीन मालमत्तेची नोंदणी करताना Draft Module व Approval Module ठेवणे आवश्यक आहे. तशी कार्यवाही होत असल्याची खात्री लेखापरीक्षणास केली गेली नाही. बांधकाम परवाना विभागाकडील संगणक प्रणाली व मालमत्ता विभागाकडील संगणक प्रणाली यांची सांगड घालून वाढ होणाऱ्या मालमत्तांची नोंद घेणेची कार्यपद्धतीबाबत विकसित केली असल्यास ती लेखापरीक्षणास तपशील सादर करण्यास कळवूनही तो केला नाही. माहिती बदलाबाबत (change statement) ची नियमित तपासणी होवून त्यास सक्षम प्राधीकाऱ्याची मान्यता घेणे आवश्यक आहे. सदर कार्यवाही कशा पद्धतीने होते? याचा तपशील सादर केला नाही. सदर संगणक प्रणाली विकसित करणेसाठी केलेल्या खर्चाची नस्ती, त्याकरिता विविध कंपन्यांकडून घेतलेल्या लायसेन्सकरिता केलेला खर्च, तसेच संगणक प्रणालीच्या देखभाल दुरुस्तीकरिता नेमलेली अभिकरण (agency) संस्था व त्याकरिता केलेल्या खर्चाची नस्ती, ई. कागदपत्रे लेखापरीक्षणास उपलब्ध केली नाही. सदर संगणक आज्ञावली महाराष्ट्र शासन माहिती तंत्रज्ञान विभागाकडील मार्गदर्शक सूचना पत्रक DIT, GAD-मातंस 075/7/2013-DIR-DIT(MH) दि. 30/09/2013 व मार्गदर्शक सूचना पत्रक DIT-13/ FILE/ 08/55/39 दि. 29/11/2013 नुसार विकसित करणे आवश्यक आहे. परंतु त्याप्रमाणे कार्यवाही केली असल्याचे दिसून येत नाही. empanelled security agency(CERT-In) नेमणुकीची कागदपत्रे व agency द्वारे केलेल्या system audit report ची प्रत लेखापरीक्षणास उपलब्ध केली नाही.***

सोलापूर महानगरपालिकेच्या कर निर्धारण व कर संकलन विभाग, नागरी सुविधा केंद्र, लेखा विभाग व इतर विभागांकरिता संगणक विभागाने मनपा क्षेत्रातील मिळकतींवर कर आकारणी करणे व कर संकलन करणे, संगणीकृत पावत्यांद्वारे रक्कम जमा करणे व इतर कामांकरिता संगणक आज्ञावली विकसित केल्या आहेत. सदरच्या संगणक आज्ञावलीबाबत खालील बाबींची माहिती

लेखापरीक्षणास उपलब्ध करण्याबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.93 दि.28/12/2017 अन्वये कळवले असतानाही माहिती उपलब्ध केली नाही. त्यामुळे लेखापरीक्षणाचे खालीलप्रमाणे आक्षेप कायम करण्यात येत आहेत.

1. विभागाने System requirement specification (SRS) दिल्यानंतर document तयार करून संगणक आज्ञावली विकसित करावयाची आहे. त्यानुसार System requirement specification(SRS) ची प्रत लेखा परीक्षणास उपलब्ध करणे आवश्यक असताना ती केली नाही.

2. प्रत्येक टप्प्याचे module तयार करून माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील लेखापरीक्षकाकडून तपासणी (testing) करावयाची आहे. अशा प्रकारे तपासणी केली नसल्यास संगणक प्रणालीत फेरफार होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे IT auditor ने तपासणी केली असल्यास तपासणी (testing) ची प्रत लेखा परीक्षणास उपलब्ध उपलब्ध करण्यास कळवूनही माहिती उपलब्ध केली नाही.

3. संगणक आज्ञावली विकसित केल्यानंतर त्याचे Legal Service Agreement करणे आवश्यक आहे. तरी विभागाने कोणत्या कंपनीसोबत Legal Service Agreement केले असल्यास त्याची माहिती लेखा परीक्षणास उपलब्ध करण्यास कळवूनही माहिती उपलब्ध केली नाही.

4. सदर संगणक आज्ञावलीकरिता विविध टप्प्यावर किती वापरकर्ते निश्चित करण्यात आले, त्यांना कोणत्या स्वरूपाचे अधिकार देण्यात आले? याची माहिती लेखा परीक्षणास उपलब्ध केली नाही.

5. नवीन मालमत्तेची नोंदणी करताना Draft Module व Approval Module ठेवणे आवश्यक आहे. तशी कार्यवाही होत असल्याची खात्री लेखापरीक्षणास केली गेली नाही. सदर संगणक प्रणाली माहिती तंत्रज्ञान/संगणक विभागाच्या ताब्यात आहे की करनिर्धारण व संकलन प्रमुखाच्या ताब्यात आहे? याचा तपशील सादर केला नाही.

6. बांधकाम परवाना विभागाकडील संगणक प्रणाली व मालमत्ता विभागाकडील संगणक प्रणाली यांची सांगड घालून वाढ होणाऱ्या मालमत्तांची नोंद घेणेची कार्यपद्धतीबाबत विकसित केली असल्यास ती लेखापरीक्षणास तपशील सादर करण्यास कळवूनही तो केला नाही.

8. माहिती बदलाबाबत (change statement) ची नियमित तपासणी होवून त्यास सक्षम प्राधीकाऱ्याची मान्यता घेणे आवश्यक आहे. सदर कार्यवाही कशा पद्धतीने होते? याचा तपशील सादर केला नाही.

9. संशयास्पद (login trails) रीतीने माहितीची हाताळणी होते अथवा नाही याविषयी नियमित तपासणी करणे आवश्यक आहे. त्याकरिता अभियंत्यांची नेमणूक केली आहे का ? त्यांच्या सेवाशर्ती निश्चित केल्या आहेत काय? त्याचा तपशील सादर केला नाही.

10. सदर संगणक प्रणाली विकसित करणेसाठी केलेल्या खर्चाची नस्ती, त्याकरिता विविध कंपन्यांकडून घेतलेल्या लायसेन्सकरिता केलेला खर्च, तसेच संगणक प्रणालीच्या देखभाल दुरुस्तीकरिता नेमलेली अभिकरण (agency) संस्था व त्याकरिता केलेल्या खर्चाची नस्ती, ई. कागदपत्रे लेखापरीक्षणास उपलब्ध केली नाही.

11. सदर संगणक आज्ञावली महाराष्ट्र शासन माहिती तंत्रज्ञान विभागाकडील मार्गदर्शक सूचना पत्रक DIT, GAD-मातंस 075/7/2013-DIR-DIT(MH) दि. 30/09/2013 व मार्गदर्शक सूचना पत्रक DIT-13/ FILE/ 08/55/39 दि. 29/11/2013 नुसार विकसित करणे आवश्यक आहे. त्यानुसार सदर संगणक आज्ञावली महाराष्ट्र शासन माहिती तंत्रज्ञान विभागाच्या मान्यतेने विकसित व कार्यान्वित केल्याची कागदपत्रे, त्यास घेतलेली मनपाची मान्यताविषयक कागदपत्रे लेखा परीक्षणास उपलब्ध केली नाहीत. परंतु शासन मार्गदर्शक सूचना पत्रकाप्रमाणे कार्यवाही केली असल्याचे दिसून येत नाही.
12. सदर संगणक आज्ञावली विकसित केल्यानंतर महाराष्ट्र शासन माहिती तंत्रज्ञान विभागाकडील मार्गदर्शक सूचना पत्रक DIT-2012/CR188/39 दि.05/07/2012 नुसार empanelled security agency (CERT-In) नेमून तिच्या मार्फत नियमित security audit करणे अनिवार्य केले आहे. त्यानुसार empanelled security agency(CERT-In) नेमणुकीची कागदपत्रे व agency द्वारे केलेल्या system audit report ची प्रत लेखापरीक्षणास उपलब्ध केली नाही.

DGPAGPM8503 (Ref No : 38, Hmm No : 93)

## *59 आयकराच्या रक्कमा विलंबाने भरणा केल्याबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 334072.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 334072.00/-

***आयकर अधिनियम 1961 कलम (A) (1) 201 नूसार वसूल केलेली रक्कम पुढील महीन्याच्या 7 तारखेपर्यंत आयकर विभागाकडे जमा करणे आवश्यक आहे. 2013-14 या आर्थिक वर्षात संबधितांकडून वसूल करण्यात आलेल्या आयकराच्या रक्कमा आयकर विभागाकडे विलंबाने जमा करण्यात आल्या असल्याचे निर्दशनास आलेले आहे. विलंबाने भरणा केलेल्या रक्कमेवर प्रतीमहा दिड टक्के दराप्रमाणे दंडाची तरतुद असल्याने दिड टक्के प्रमाणे रु.3,34,072/- दंडाची रक्कम आयकर विभागाकडे भरणे आवश्यक आहे.***

आयकर अधिनियम 1961 कलम (A) (1) 201 नूसार वसूल केलेली रक्कम पुढील महीन्याच्या 7 तारखेपर्यंत आयकर विभागाकडे जमा करणे आवश्यक आहे. **2013-14** या आर्थिक वर्षात संबधितांकडून वसूल करण्यात आलेल्या आयकराच्या रक्कमा आयकर विभागाकडे विलंबाने जमा करण्यात आल्या आहेत. विलंबाने भरणा केलेल्या रक्कमेवर प्रतीमहा दिड टक्के दराप्रमाणे दंडाची तरतुद आहे. आयकर भरणा

करण्यास झालेला विलंब व आकारण्यात येणाऱ्या दंडाच्या रक्कमेबाबतचे विवरणपत्र पुढीलप्रमाणे आहे.

| आयकर वसूलीचा महिना | वसूल केलेल्या आयकराची रक्कम | आयकर भरणा दिनांक | विलंब कालावधीचे दिवस | दंडाची रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| एप्रिल 2013 | 43017 | 25.5.2013 | 18 | 387 |
| | 678081 | 4.10.2013 | 150 | 50856 |
| | 47397 | 16.9.2014 | 132 | 3128 |
| मे 2013 | 1873208 | 2.7.2013 | 25 | 23415 |
| | 40400 | 16.6.2013 | 9 | 182 |
| | 158933 | 26.11.2013 | 172 | 13668 |
| | 26125 | 15.1.2014 | 222 | 29000 |
| | 50045 | 19.3.2014 | 286 | 7156 |
| जून 2013 | 256332 | 15.1.2014 | 192 | 24608 |
| जुलै 2013 | 175900 | 6.2.2014 | 183 | 16095 |
| | 29605 | 16.6.2014 | 314 | 4648 |
| ऑगस्ट 2013 | 31587 | 19.3.2014 | 194 | 3064 |
| सप्टेबर 2013 | 53584 | 23.1.2014 | 108 | 2894 |
| ऑक्टो. 2013 | 1400 | 23.1.2014 | 77 | 54 |
| डिसेंबर 2013 | 56755 | 16.6.2014 | 161 | 4569 |
| मार्च 2014 | 516337 | 31.7.2014 | 115 | 29689 |
| | 304506 | 13.9.2014 | 159 | 24208 |
| | 451041 | 30.9.2014 | 176 | 39692 |
| | 395486 | 9.10.2014 | 185 | 36582 |
| | 128129 | 17.11.2014 | 224 | 14350 |
| | 742469 | 2.7.2014 | 86 | 31926 |
| | एकूण | | | **334072** |

वरील प्रमाणे विलंबाने भरणा केलेल्या आयकर रक्कमेवर दंडाची रक्कम वसूल करुन आयकर विभागाकडे भरणा करण्याबाबत अर्धसमास क्र.42 दिनांक 26/09/2017 अन्वये विचारणा करण्यात आली असता विभागाने दि.17/11/2017 च्या पत्रान्वये खुलासा सादर केलेला आहे. सदर खुलासा संयुक्तिक नसल्याने रक्कम रु.3,34,072/- वसुलपात्र ठेवण्यात येत आहे.

FDSDKPM7201 (Ref No : 41, Hmm No : 41)

## *60 गौण खनिजावरील स्वामित्वधनाची वसूल करण्यात आलेली रक्कम विलंबाने जमा करण्यात आल्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 5**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

***. महानगरपालिकेतील विविध कामावर वापर करण्यात आलेल्या गौण खनिजाच्या स्वामित्वधनाची रक्कम संबधीत ठेकेदाराच्या देयकातुन कपात करण्यात येते. मक्तेदारास प्रदान करण्यात आलेल्या देयकामधून गौण खनिजाच्या स्वामित्वधनाची रक्कम कपातकरुन देना बॅंकेच्या खाते क्र.04141003490 मध्ये धनादेशाव्दारे जमा करण्यात येते त्या जमा करण्यात आलेल्या रक्कमांची देयक निहाय कपातीच्या स्वतंत्र नोंदी नोंदवही मध्ये ठेवण्यात आलेल्या नाहीत. नोंदवहीमध्ये दि.3.1.2012 ते दि.31.10.2014 या कालावधीतील एकूण रु.3,11,03,862/- ऐवढी रक्कम दि.28.11.2014 रोजी शासनास प्रदान करण्यात आल्याचें दिसून येत असून देना बॅंकेच्या खाते क्र.04141003490 चे विवरणपत्रात धनादेश क्र.355441 दि.2.12.2014 वटलेला असल्याचे दिसून येते. सदर रकमेमध्ये दि.1.4.2013 ते दि.31.3.2014 या कालावधीत गौण खनिजापोटी मक्तेदारांच्या देयकातून वजावट करण्यात आलेल्या रक्कमेची देयकनिहाय नोंदवही सादर करण्यात आलेली नसल्याने प्रत्यक्षात गौण खनिजापोटी दरमहा किती रक्कमेची कपात करण्यात आलेली आहे हे लक्षात येत नाही. रोख शाखेतील दैनंदीन नोंदवहीवरुन माहे मार्च-2014 मध्ये गौण खनिजापोटी मक्तेदाराकडून रोख स्वरुपात रु.4,813/- एवढी रक्कम प्राप्त झालेली असल्याचे दिसून येत आहे.***

महानगरपालिकेतील विविध कामावर वापर करण्यात आलेल्या गौण खनिजाच्या स्वामित्वधनाची वसूली संबधीत ठेकेदाराच्या देयकातुन कपात करण्यात येते. वित्तीय वर्ष 2013-14 मध्ये गौण खनिज स्वामीत्वधन या शिर्षखाली वसूल करण्यात आलेल्या रक्कमांबाबतची नोंदवही तसेच गौण खनिजाच्या स्वामित्वधनाची रक्कम देना बॅंकेच्या खाते क्र.04141003490 मध्ये जमा करण्यात येतअसून सदर बॅंकेचे दि.1.4.2014 ते मार्च 2015 पर्यंतचे विवरणपत्र दि.6.10.2017 रोजी प्राप्त झाले. विभागाने सादर केलेल्या अभिलेखानुसार गौण खनिजाच्या स्वामित्वधनाच्या शासनास जमा करण्याबाबत लेखापरीक्षणाचे खालील प्रमाणे अभिप्राय कायम करणयात येत आहे.

**1.** सदर नोंदवहीची तपासणी केली असता तपासणीत असे आढळून आले की, मकत्तेदारास प्रदान करण्यात आलेल्या देयकामधून गौण खनिजाच्या स्वामित्वधनाची रक्कम कमी करुन देना बॅंकेच्या खाते क्र.04141003490 मध्ये धनादेशाव्दारे जमा करण्यात येते, त्या जमा करण्यात आलेल्या रक्कमांची देयक निहाय कपातीच्या स्वतंत्र नोंदी नोंदवहीमध्ये ठेवण्यात आलेल्या नाहीत.

सादर करण्यात आलेल्या नोंदवहीमध्ये केवळ शासनाकडे एकत्रिक जमा करण्यात आलेल्या रक्कमेबाबतच्या नोंदी त्या नोंदवहीत घेण्यात आलेल्या आहेत.

2. सदर नोंदवहीमध्ये दि.3.1.2012 ते दि.31.10.2014 या कालावधीतील एकूण रु.3,11,03,862/- ऐवढी रक्कम दि.28.11.2014 रोजी शासनास प्रदान करण्यात आल्याचें दिसून येत असून देना बॅकेच्या खाते क्र.04141003490 चे विवरणपत्रात धनादेश क्र.355441 दि.2.12.2014 वटलेला असल्याचे दिसून येते.

3. सदर रककमेमध्ये दि.1.4.2013 ते दि.31.3.2014 या कालावधीत गोण खनिजापोटी मक्तेदारांच्या देयकातून वजावट करण्यात आलेल्या रक्कमेची देयकनिहाय नोंदवही सादर करण्यात आलेली नसल्याने प्रत्यक्षात गौण खनिजापोटी दरमहा किती रक्कमेची कपात करण्यात आलेली आहे, हे दिसून येत नसल्याने महिनानिहाय व देयकनिहाय मक्तेदाराकडून किती कपात करण्यात आलेली आहे. याबाबतची माहिती विभागाकडून मागविण्यात आलेली होती परंतु माहिती सादर केलेली नाही.

4. शासनाकडे जमा केलेल्या रक्कमांची चलने लेखापरीक्षणास उपलब्ध करण्यात आली नाही, त्यामूळे सदरची रक्कम शासनास प्रत्यक्ष प्राप्त झाल्याची खात्री झाली नाही.

5. रोख शाखेतील दैनंदीन जमा करण्यात आलेल्या रक्कमाच्या नोंदवहीची तपासणी केली असता माहे मार्च-2014 मध्ये गौण खनिजापोटी मक्तेदारांकडून खालील रककमा रोख स्विकारण्यात आलेल्या असल्याचे दिसून आले.

| अ.क्र. | मक्कतेदाराचे नांव | रक्कम जमा केल्याची तारीख | रोख रक्कम |
|---|---|---|---|
| 1 | श्री. प्रदिप खियाणी | 1.3.2014 | 310 |
| 2 | गोविंदराज कंन्स्ट्रक्शन | 15.3.2014 | 3463 |
| 3 | एस. एन. क्षत्रिय | 24.3.2014 | 740 |
| 4 | एस. एन. कंन्स्ट्रक्शन | 29.3.2014 | 300 |

मकत्तेदाराकडून गौण खनिजापोटी रोखीने काही रक्कम प्राप्त होत असल्याने दि.1.4.2013 ते दि.31.3.2014 या कालावध्रीत गौण खनिजापोटी रोखीने किती रक्कम रोखपालाकडे प्राप्त झालेली आहे व ती रककम शासनास जमा करण्यात आलेली आहे. याची माहिती सादर केलेली नाही.

उपरोक्त मुद्द्या संदर्भात अर्धसमास पत्र क्रमांक 50 दिनांक 12/10/2017 अन्वये विभागास विचारणा केली असता विभागाने याबाबतचे अनुपालन सादर केलेले नाही.

FDSDKPM7201 (Ref No : 43, Hmm No : 50)

## *61 शासकीय निधीचे रोख नोंदवहीतील नोंदीच्या अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**अनियमितता संख्या : 04**

*मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

***रमाई आवास योजनेचे रोख वहीमध्ये जमा केलेली 2012-13, 2013-14, 2014-15 या अर्थिक वर्षात प्राप्त निधी रक्कम रु.32.97 कोटी मार्च 2015 पर्यंत खर्च केल्याचे दिसून येत नाही. रमाई आवास योजनेचे रोख वहीमध्ये बँक ताळमेळपत्रक पुर्ण केलेले नाही. बँक ताळमेळपत्रकामध्ये बँकेत लिंक डिपाँझिटपोटी किती रक्कम गुंतवणुक केली आहे ते नमुद करण्यात आले नाही. रोखवहीमध्ये रक्कम रु.2,64,325/- जमा केल्याचे दिसुन येत नाही. दि.30/12/2013 रोजी रक्कम रु.17,00,60,124/- इतकी 91 दिवसासाठी मुदत ठेव स्वरुपात बँकेत गुंतवणुक केली होती. त्याची मुदत दि.31/03/2014 रोजी संपत असल्याने ती रक्कम रोखवहीमध्ये जमा केली किंवा पुनर्गुंतवणुक केली आहे याच्या नोंदी दिसून आले नाही.***

शासकीय निधीचे रोख नोंदवहीतील नोंदीची तपासणी केली असता आढळुन आलेल्या त्रुटीबाबत अर्धसमास पत्र क्र.56 दि.02/11/2017 अन्वये विचारणा केली होती. खात्याने त्यांचेकडील पत्र क्र.मुले6/लेखा परिक्षण/56/2017 दि.26/12/2017 अन्वये अनुपालन सादर केले आहे. खात्याने सादर केलेल्या अनुपालनाचा विचार करता लेखापरीक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1)रमाई आवास योजनेचे रोख वहीमध्ये जमा केलेली 2012-13, 2013-14, 2014-15 या अर्थिक वर्षात प्राप्त निधी रक्कम रु.32.97 कोटी मार्च 2015 पर्यंत खर्च केल्याचे दिसून येत नाही.

सन 2013-14 मधील अखर्चित निधी पुढील वर्षी खर्च करण्यात आलेली आहे असे खात्याने कळविले आहे.

आक्षेपात नमूद केलेनुसार प्राप्त झालेला निधी किती व कधी खर्च करण्यात आला आहे व किती शिल्लक राहिलेला याबाबत स्पष्टीकरण केले नसल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

2) रमाई आवास योजनेचे रोख वहीमध्ये बँक ताळमेळपत्रक पुर्ण केलेले नाही.

बँक ताळमेळपत्रक पुर्ण केले आहे असे खात्याने अनुपालन सादर केले आहे.

खात्याने सादर केलेले बँक ताळमेळपत्रक पहाता त्यामध्ये लिंक डिपाँझिटपोटी किती रक्कम गुंतवणुक केली आहे ते नमुद करण्यात आले नाही. त्यामुळे बँक ताळमेळपत्रक अपुर्ण असल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

3) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान रस्ते अनुदानचे रोख वहीतील नोंदीची तपासणी केली असता माहे मार्च 2014 पर्यंत बँक ताळमेळपत्रक तयार केले आहे. परंतु त्यामध्ये बँकेत लिंक डिपाँझिटपोटी किती रक्कम गुंतवणुक केली आहे ते नमुद करण्यात आले नाही. त्यामुळे बँकेत लिंक डिपाँझिटपोटी किती रक्कम आहे याची खात्री करता आली नाही.

बँक ताळमेळपत्रक पहाता त्यामध्ये लिंक डिपाँझिटपोटी किती रक्कम गुंतवणुक केली आहे ते नमुद करण्यात आले नाही. त्यामुळे बँक ताळमेळपत्रक अपुर्ण असल्याने आक्षेप कायम करणेत येत

आहे.

4) मलनि:सारण योजनेचे सिंडिकेट बँकेत खाते क्र.54302140000013 असुन रोखवहीतील नोंदीची तपासणी केली असता खालीलप्रमाणे उणिवा आढळुन आल्या.

अ) खाली नमुद केलेल्या तारखाना रोखवहीमध्ये कमी रकमा जमा केल्याचे दिसुन आले.

| अ.क्र. | दिनांक | बँक खात्यात जमा रक्कम रु. | रोखवहीत जमा रक्कम रु. | कमी जमा रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| 1. | 19/06/2013 | 10,70,440/- | 10,44,520/- | 25,920/- |
| 2. | 16/01/2014 | 13,74,493/- | 12,01,753/- | 1,72,740/- |
| 3. | 03/02/2014 | 12,47,809/- | 11,83,144/- | 64,665/- |
| 4. | 29/03/2014 | 50,28,856/- | 50,27,856/- | 1,000/- |
| | एकूण | | | 2,64,325/- |

ब) दि.30/12/2013 रोजी रक्कम रु.17,00,60,124/- इतकी 91 दिवसासाठी मुदत ठेव स्वरुपात बँकेत गुंतवणुक केली होती. त्याची मुदत दि.31/03/2014 रोजी संपत असल्याने ती रक्कम रोखवहीमध्ये जमा केली किंवा पुनर्गुंतवणुक केली आहे याची खात्री पटवावे.

क) बँकेत लिंक डिपॉझिटपोटी किती रक्कम गुंतवणुक केली आहे ते बँक तळमेळ पत्रकात नमुद करण्यात आले नाही. त्यामुळे बँकेत लिंक डिपॉझिटपोटी किती रक्कम आहे याची खात्री करता आली नाही.

आक्षेपाची पुर्तता केल्याचे अभिलेखे सादर केले नसल्याने आक्षेप कायम कारणेत येत आहे.

DGPKVSM6101 (Ref No : 56, Hmm No : 56)

## *62 वित्तीय वर्ष 2013-2014 या आर्थिक वर्षातील मूल्यवर्धित कराच्या जमा रक्कमेबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष : मूल्यवर्धित कर मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 693373.00/-

***सोलापूर महानगरपालिकेमध्ये लेखा विभागाची वित्तीय वर्ष 2013-2014 ची विक्रीकर जमा रक्कमेच्या नस्तीची/नोंदवहीची तपासणी केली असता शासन खात्यात कमी रक्कम रु.693373/- जमा केल्यामुळे शासनास कमी महसूल प्राप्त झालेला आहे.***

सोलापूर महानगरपालिकेमध्ये लेखा विभागाची वित्तीय वर्ष 2013-2014 ची विक्रीकर जमा रक्कमेच्या नस्तीची/नोंदवहीची तपासणी केली असता त्याअनुषंगाने निदर्शनास आलेल्या उणीवाबाबत अर्धसमास क्रमांक-38 दि.20/09/2017 अन्वये खुलासा मागविला असता विभागाने पत्र क्र.01 दि.17/11/2017 अन्वये सादर केलेला खुलासा विचारात घेवून लेखापरीक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. वित्तीय वर्ष 2013-2014 या आर्थिक वर्षातील विक्रीकर नस्तीची पडताळणी केली असता विक्री कर आयुक्त मुंबई महारष्ट्र राज्य यांचेकडील अधिसुचना दि 04 एप्रील 2012 नुसार दिनांक 01/04/2012 पासून अनोंदणीकृत मक्तेदाराकडून मूल्यवर्धित कराची रक्कम 4 % ऐवजी 5 % दराने वसूल करण्याबाबत तरतूद करण्यात आलेली आहे. सोलापूर महानगरपालिकेतील लेखा विभागात ठेवण्यात आलेल्या मूल्यवर्धित कराच्या नस्तीची तपासणी केली असता 2013-2014 या आर्थिक वर्षात अनोंदणीकृत मक्तेदारांना दिलेल्या देयाकातून मूल्यवर्धित कराची रक्कम 5 % ऐवजी 4 % दराने वसूल करुन शासन खाती भरणा केल्याचे आढळून येते, त्यामुळे शासनास खालीलप्रमाणे कमी महसुल प्राप्त झालेला आहे.

वित्तीय वर्ष 2013-2014 या आर्थिक वर्षातील मूल्यवर्धित कराच्या जमेबाबत विवरणपत्र

| अ.क्र. | महिना | एकूण झालेले प्रदान | वसूल करावयाची व्हॅटची रक्कम 5% | वसूल केलेली व्हॅटची रक्कम 4% | कमी वसूल केलेली व्हॅटची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | एप्रिल-2013 | 17121975 | 856099 | 684879 | 171220 |
| 2 | मे-2013 | 2939300 | 146965 | 117572 | 29393 |
| 3 | जून-2013 | 2785175 | 139259 | 111407 | 27852 |
| 4 | जुर्ले-2013 | 527675 | 26384 | 21107 | 5277 |
| 5 | ऑगस्ट-2013 | 1435825 | 71791 | 57433 | 14358 |
| 6 | सप्टेरबर-2013 | ---------- | -------- | -------- | -------- |
| 7 | ऑक्टोबर-2013 | ---------- | -------- | -------- | ------- |
| 8 | नोव्हेबर-2013 | 8831510 | 441576 | 353260 | 88316 |
| 9 | डिसेंबर-2013 | ---------- | --------- | -------- | ------- |
| 10 | जानेवारी- | 1201525 | 60076 | 48061 | 12015 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | 2014 | | | | |
| 11 | फेबवारी-2014 | 25748375 | 1287419 | 1029935 | 257484 |
| 12 | मार्च-2014 | 8745725 | 437287 | 349829 | 87458 |
| | एकूण जमा | 69337085 | 3466856 | 2773483 | 693373 |

त्यामुळे शासनास रक्कम रु. 693373/- कमी महसुल प्राप्त झालेला आहे.

वसूलपात्र रक्कम रु.693373 /-

DATYMKM6601 (Ref No : 66, Hmm No : 38)

### *63 जनरल फंड (मनपा निधी) च्या रोखवहीतील अनियमितताबाबत..*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 12**

सोलापूर महानगरपालिका

*लेखा शीर्ष : सर्वसाधारण रोखवही  मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

***रोजकिर्द (डे बुक) राष्ट्रीय महानगरपालिका लेखा संहिता 2005 अथवा नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियमानुसार विहीत नमुन्यात ठेवली नाही. डे बुकास जमा बाजूची नोंद रोजचे रोज घेतली नसून मासिक गोषवा-यामध्ये रक्कम जमा दाखविली आहे. डे बुक मध्ये दैनंदिन आरंभीची शिल्लक नमुद केली नसुन दिवस अखेर शिल्लक काढली नाही. डे बुकास शिल्लक काढली जात नाही. दरमहा ताळमेळ घेतला नाही. डे बुकामध्ये पुढील तारखेच्या व्यवहारानंतर मागील तारखेचे व्यवहार नोंदवले आहेत.***

सोलापूर महानगरपालिकेच्यां लेखा विभागाकडील जनरल फंडाच्या (मनपा निधी) रोजकिर्द (डे बुक) ची माहे मार्च 14 करीता व रोखही (कॅशबुक) ची माहे मार्च 2015 करीता प्रमाणकांशी ताळमेळ घेताना तपासणी केली असता खालीलप्रमाणे उणिवा आढळुन आल्या. यासंदर्भात अर्धसमास पत्र क्रमांक 11 दिनांक 29/05/2017 अन्वये विभागास विचारणा केली असता विभागाने याबाबतचा खुलासा सादर केलेला नाही. त्यामुळे खालीलप्रमाणे आक्षेप कायम करण्यात आलेले आहेत. 1) मार्च 2014 मधील रोजकिर्द (डे बुक) राष्ट्रीय महानगरपालिका लेखा संहिता 2005 अथवा नगरपालिका लेखा संहिता 1971 च्या नियमानुसार विहीत नमुन्यालत ठेवली नाही.

2) सदर डे बुकास जमा बाजूची नोंद रोजचे रोज घेतली नसून मासिक गोषवा-यामध्ये रक्कम एकत्र जमा दाखविली आहे.

3) डे बुक मध्ये दैनंदिन आरंभीची शिल्लक नमुद केली नसुन दिवस अखेर शिल्लक काढली नाही. डे बुकास शिल्लक काढली जात नाही. डे बुकास शिल्लक काढली जात नसल्याने सदर निधीमधील शिल्लकीबाबत लेखापरीक्षणास खात्री करता आली नाही.

4) डे बुक मध्ये जमा खर्चाचे व्यवहार ज्या बँकामध्ये केले जातात त्या बँक खात्यातील शिलल‍क रकमेशी दरमहा ताळमेळ घेतला नाही. रा.ले.ख नि 2005 मधील परिच्छेद 30.5 ते 30.8 मधील कार्यपध्दतीनुसार महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियम 51 (3) नुसार प्रत्येक महिनाअखेर रोखवहीतील जमा खर्चाच्या नोंदीची बँक पासबुक/विविध नोंदीशी तुलना करुन ताळमेळ घेणे आवश्यक आहे. परंतु त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही.

5) डे बुक मध्ये मासिक गोषवा-यावर सक्षम अधिका-याचे सही शिक्के नाहीत.

6) डे बुकामध्ये प्रत्येक दिवशीच्या व्यवहारानंतर शिल्लक काढली नसुन प्रत्येक दिवशीच्या व्यवहारावर सक्षम अधिका-यांच्या स्वाक्ष-या आढळून आल्या नाहीत.

7) डे बुक मध्ये पृष्ठांकन प्रमाणपत्रे आढळुन आली नाहीत.

8) डे बुक मध्ये प्रत्येक दिवशीच्या व्यपवहारानंतर मोठया प्रमाणात कोरी पाने सोडली आहेत, हे नियमबाह्य आहे.

9) डे-बुकामध्ये पुढील तारखेच्या व्यवहारानंतर मागील तारखेचे व्यवहार नोंदवले आहेत, हे नियमबाह्य आहे.

10) एकाच बिलातील निव्वळ रक्कम व वजाती रक्कमा यांसाठी स्वतंत्र प्रमाणक क्र. नोंदविले आहेत. उदा. वैष्णवी एन्टरप्राईज यांचे रक्कम रु.28,846/- रक्कमेचे बिलासाठी निव्वळ रक्कम व वजातीची रक्कम यांसाठी

प्रमाणाक क्र. 22229 व 20232 असे स्वतंत्र क्रमांक दिले आहेत. त्यामुळे एका बिलासाठी 1 प्रमाणकाएवजी अधिक प्रमाणके दिसून येतात, यासारख्या इतर अनियमितता रोखवह्या तपासून दूर करण्यात याव्यात.

11) एका प्रमाणकावर एकापेक्षा जास्त प्रमाणक क्रमांक नोंदविले आहेत.

12) रोखवहीमध्ये वार्षिक गोषवारा काढला जात नाही.

DATRNDM7201 (Ref No : 77, Hmm No : 11)

## *64 शासकीय निधीच्या7रोखवहीमधील रेखांकन करताना आढळुन आलेल्या अनियमिततेबाबत...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 07**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

***रोकडवहीस अखेर शिल्लक काढुन त्यावर सक्षम अधिका-यांच्या स्वाक्ष-या घेणे आवश्यक असताना अशी कार्यवाही होत नसल्याचे आढळुन आले. मासिक गोषवारे, वार्षिक गोषवारा, बँक ताळमेळ रोकडवहीस नोंदवला नाही. परिच्छेदात नमूद प्रमाणकांद्वारे रोखवहीस खर्च नोंदवला आहे. परंतु सदरची प्रमाणके लेखापरीक्षणास रेखांकनासाठी उपलब्ध झाली नाहीत.***

सोलापूर महानगरपालिकेकडील शासकीय निधीच्यान रोखवही व प्रमाणके यांची रेखांकन तपासणी केली असता खालीलप्रमाणे उणिवा आढळुन आल्याः

1. खालील प्रमाणकेव्दारे रोखवहीस खर्च नोंदवला आहे. परंतु सदरची प्रमाणके लेखापरीक्षणास रेखांकनासाठी उपलब्ध झाली नाहीत.

| अक्र. | निधीचे नाव | प्रमाणक क्र. | दिनांक | रक्कंम | तपशिल |
|---|---|---|---|---|---|
| 1 | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नागरोत्थान (जिल्हास्तर) | 33 | 29/03/2014 | 7,83,312/ | कल्याणी कंन्ट्र. (अलकुंटे चौक ते सार्व. नाला ड्रेनेज लाईन घालणे.) |
| 2 | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नागरोत्थान | 2 | 21/05/2013 | 8,61,122/ | श्रीकांत सोनी (थोबडे वस्ती देशमुख पाटील |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | (1 ते 10 कामे) | | | | वस्तीत पिण्या ची पाईप लाईन घालणे.) |
| 3 | टंचाई कालावधीत पाणी पुरवठा करणे | 4 | 21/06/2013 | 8,03,311/ | लक्ष्मीनारायण एंटरप्रायझेस (150 व्यासाचे विंधन विहीर घेणे व त्यावर हातपंप बसविणे.) |
| 4 | 13 वे वित्त आयोग | 27 | 08/07/2014 | 5,61,58,883/ | आयुक्त सोमनपा (म.सु.ज.न.अ. (रस्ते) च्या मनपा हिश्यासाठी रक्कीम वर्ग) |
| 5 | 13 वे वित्त आयोग | 63 | 30/10/2014 | 4,72,61,595/ | आयुक्त सोमपा (म.सु.ज.न.अ. (रस्ते) च्या मनपा हिश्यासाठी रक्कम वर्ग) |
| 6 | 13 वे वित्त. आयोग | 71 | 08/12/2014 | 1,22,28,787/ | आयुक्त सोमनपा (म.सु.ज. (मलनित्सारण योजनेकामी वर्ग) |
| 7 | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नागरोत्थान (जिल्हास्तर) | 20 | 18/02/2015 | 9,82,088/ | वैष्णवी कंन्ट्रक्शन (मोदी स्म्शानभुमी सुधारणा) |
| 8 | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नागरोत्थान (जिल्हास्तर) | 22 | 03/03/2015 | 11,88,522/ | वैष्णवी कंन्ट्रक्शन (पद्मशाली स्मशानभुमी सुधारणा) |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 9 | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नागरोत्थान (जिल्हास्तर) | 26 | 09/03/2015 | 33,55,426/ | श्रीकृष्णा कंन्ट्रक्शन. (बाळीवेस ते टिळक चौक ड्रेनेज लाईन घालणे) |
| 10 | OBC | 9 | | 1,67,870/ | शिवगंगा वॉटर स्लांगा यर |
| 11 | OBC | 13 | 13/06/2013 | 3,00,00,000/ | रक्कम वर्ग पेन्सिलने लिहिले आहे. |
| 12 | OBC | 14 | 13/06/2013 | 50,00,000/ | रक्क0म वर्ग पेन्सिलने लिहिले आहे. |
| 13 | OBC | 15 | 21/06/2013 | 2,12,260/ | अ. रफीक बागवान (पाणी पुरवठा) |
| 14 | OBC | 16 | 21/06/2013 | 2,50,610/ | अ. रफीक बागवान (पाणी पुरवठा) |
| 15 | OBC | 18 | 21/06/2013 | 2,06,145/ | अ. रफीक बागवान (पाणी पुरवठा) |
| 16 | OBC | 19 | | 1,07,900/ | अ. रफीक बागवान (पाणी पुरवठा) |
| 17 | OBC | 20 | 24/06/2013 | 9,62,806/ | एस. एस. के. बोअरवेल |
| 18 | OBC | 27 | 02/07/2013 | 9,19,647/ | 6.40v साठी साहित्य7 खरेदी |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 19 | OBC | 51 | 17/08/2013 | 4,89,040/ | लक्ष्मी0 नारायण सेल्सम बोअरवेल दुरुस्ती |

2. वित्त आयोग या शासकीय निधीच्या रोकडवही मध्ये दि.11/06/2014 रोजी प्रमाणक क्र.18 व 19 मधील कामगार कल्याण उपकर (रोख) ची एकूण रक्कम118,814/- ऐवजी धनादेश क्रमांक 19034 ने रु.28,361/- ने रक्कम काढली त्यामुळे रक्कम रु.9547/- चा खर्च जादा नोंदवला व जादा रक्कम आहरित कलो असल्याचे आढळुन आले. तसेच प्रमाणक क्र.54, दि.07/10/14 मध्ये सेसची रक्कम 1747/- असताना रोकडवहीत 1,047/- नमुद करुन धनादेश काढल्याने रु.700/- ने रक्कम कमी अदा केली.

3. 13 वा वित्त आयोग प्रमाणक क्र.84 दिनांक 01/01/2015 ची एकुण रक्कम रु.7,18,773/- असताना रोकडवहीस सदर प्रमाणकाचा खर्च रक्कम रु.10,18,773/- असा नोंदविला आहे.

4. ओबीसी प्रमाणक क्र.2 ने संजय बिल्डार्स यांना भोजराव जाधव प्रशाला ते निमिर्ती विहार रस्ता करणे या कामासाठी रक्कम रु.34,60,398/- दिल्याचे प्रमाणकावर नमुद आहे, तथापी रोकडवहीस पृष्ठ क्र.153 वर सदर प्रमाणकाव्दारे रक्कम रु.44,64,298/- चा खर्च नोंदविला आहे.

5. ओबीसी प्रमाणक क्र.3 ने VA Tech बँग लि. यांना र.रु.78,16,416/- दिल्याचे नमुद आहे. तथापि रोकडवहीस रक्कम रु.65,43,338/- असा खर्च नोंदवला असल्याचे आढळुन आले.

6. ओबीसी प्रमाणक क्र.11 संजय बिल्डर्स यांना रक्कम रु.11,41,446/- रक्कम दिली असताना रोकडवहीस सदर प्रमाणकाचा खर्च रक्कम रु.11,20,503/- असा नोंदवला आहे. कपातीची रक्कम प्रमाणकावर रक्कम रु.2,56,896/- असताना रोकडवहीत रक्कम रु.2,35,953/- अशी नोंदवली आहे. रक्कम रु.20,943/- ची तफावत रोकडवहीस अखेर शिल्लक काढुन त्यावर सक्षम अधिका-यांच्या स्वाक्ष-या घेणे आवश्यक असताना अशी कार्यवाही होत नाही.

7. मासिक गोषवारे, वार्षिक गोषवारा व महिनानिहाय बँक ताळमेळ रोकडवहीस नोंदवला नाही.

उपरोक्त मुद्यांबाबत अर्धसमास पत्र क्र. 21 दि. 25/07/2017 अन्वये कळविले असता विभागाने अनुपालन सादर केले नाही. त्यामुळे आक्षेप कायम करण्यात आलेले आहेत.

DATRNDM7201 (Ref No : 80, Hmm No : 21)

## *65 विभागीय कार्यालय क्र. 7 यांच्याकडील वर्ग- 4 कर्मचाऱ्याच्या सेवापुस्तकातील अनियमिततेबाबत...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**अनियमितता संख्या : 07**

*लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

***सोलापूर महानगरपालिकेच्या विभागीय कार्यालय क्र. 7 यांच्याकडील वर्ग -4 कर्मचाऱ्याच्या सेवापुस्तकाचे लेखापरीक्षण केले असता श्री.रामलू ग. मंदापुरे, सफाई कामगार यांना 01/07/2013 एका वर्षात एकदाच वेतनवाढ देणे क्रमप्राप्त असताना दोन वेळा वेतनवाढ देण्यांत आलेली असल्याचे सेवापुस्तकातील नोंदीवरून दिसून येते. त्यामुळे अतिप्रदानाची रक्कम वसूल करणे आवश्यक आहे.तसेच श्रीमती शारदाबाई भिमराव काकडे, सफाई कामगार यांचा नियुक्ती दिनांक 01/05/1995 असून त्यांना दिनांक 01/05/2007 रोजी आश्वासित प्रगती योजनेचा लाभ अनुज्ञेय करताना दि. 01/05/2007 रोजी रु.1800/- ग्रेड वेतन अनुज्ञेय केलेले आहे. शासन अधिसूचना दि. 22/04/2009 मधील नियम 14(2) व शासन निर्णय दि.31/08/2009 नुसार दि. 1/1/2006 पुर्वी आश्वासित प्रगती योजनेचा लाभ दिला असल्यास दि.31/08/2009 पर्यंत किंवा नियमित पदोन्नतीच्या दिनांकापर्यत यापैकी जो अगोदर असेल तो पर्यत हाफ ग्रेड पे नुसार आश्वासित प्रगती योजनेच्या दिनांकापासून दि.31/08/2009 पर्यंत हाफ ग्रेड वेतन प्रदान करण्याऐवजी पुर्ण ग्रेड वेतन प्रदान केलेला आहे. त्यामुळे अतिप्रदानाची रक्कम वसूल करणे आवश्यक आहे.***

सोलापूर महानगरपालिकेच्या विभागीय कार्यालय क्र. 7 यांच्याकडील वर्ग -4 कर्मचाऱ्याच्या सेवापुस्तकाचे लेखापरीक्षण केले असता खालील अनियमितता आढळून आल्या आहेत. याबाबत अर्धसमास पत्र क्र.116 दि. 02/02/ 2018 अन्वये खुलासा विचारला असता विभागाने कोणताही खुलासा सादर केला नाही. त्यामुळे आक्षेप कायम करण्यात येत आहे.

15) श्री.रामलू ग. मंदापुरे, सफाई कामगार यांना पुढील प्रमाने वेतनवाढ देण्यात आलेली आहे.

| वेतन वाढीचा दिनांक | मुळ वेतन | 3 % वेतनवाढ | वेतनवाढी नंतरचे मुळवेतन | ग्रेड वेतन | एकूण वेतन |
|---|---|---|---|---|---|
| 1/7/2012 | 6970 | 270 | 7240 | 1800 | 9040 |
| 1/7/2013 | 7240 | 280 | 7520 | 1800 | 9320 |
| 1/7/2013 | 7520 | 280 | 7800 | 1800 | 9600 |

श्री.रामलू ग.मंदापुरे, सफाई कामगार यांना दि.01.07.2013 रोजी एका वर्षात दोन वेळा वेतनवाढ देण्यांत आलेली असल्याचे सेवापुस्तकातील नोंदीवरून दिसून येते. याबाबतची प्रत्यक्ष वेतन देयकावरुन अदा केलेल्या वेतनवाढीची खात्री करून अतिप्रदान झाले असल्यास अतिप्रदान रक्कमेची परिगणना करुन अतिप्रदान रक्कम वसूल करुन केलेल्या कार्यवाहीचे अनुपालन लेखापरीक्षणास सादर करण्यात यावे.

2. श्रीमती शारदाबाई भिमराव काकडे, सफाई कामगार यांचा नियुक्ती दिनांक 01/05/1995 असून

त्यांना दिनांक 01/05/2007 रोजी आश्वासित प्रगती योजनेचा लाभ अनुज्ञेय करताना दि. 01/05/2007 रोजी रु.1800/- ग्रेड वेतन अनुज्ञेय केलेले आहे. शासन अधिसूचना दि. 22/04/2009 मधील नीयम 14(2) व शासन निर्णय दि.31/08/2009 नुसार दि. 1/1/2006 पुर्वी आश्वासित प्रगती योजनेचा लाभ दिला असल्यास दि.31/08/2009 पर्यंत किंवा नियमित पदोन्नतीच्या दिनांकापर्यत यापैकी जो अगोदर असेल तो पर्यत हाप ग्रेड पे नुसार आश्वासित प्रगती योजनेच्या दिनांकापासून दि. 31/08/2009 पर्यंत ग्रेड वेतन प्रदान करण्याऐवजी पुर्ण ग्रेड वेतन प्रदान केलेला आहे. शासन अधिसूचना दि.22/04/2009 मधील नियम 14(2) व शासन निर्णय दि. 31/08/2009 नुसार हाप ग्रेड पे नुसार वेतन अदा करुन अतिप्रदान रक्कमेची परिगणना करुन अतिप्रदान रक्कम वसूल करुन केलेल्या कार्यवाहीचे अनुपालन लेखापरीक्षणास सादर करण्यात यावे. सदरच्या अनियमितता इतर कर्मचाऱ्याच्या सेवापुस्तकात असल्यास त्या उपरोक्त प्रमाणे दुरुस्त करण्यात याव्यात.

DATMDSM7101 (Ref No : 54, Hmm No : 116)

## *66 प्रभाग क्र.1 मधील हजरतबाग चाळ येथे ड्रेनेज लाइन टाकणे कामातील अनियमिततेबाबत..*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 03**

*लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 183039.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 183039.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 42513.00/-

***सदरच्या कामाच्या प्राप्त तीन निविदापैकी vinita construction ने कागदपत्रे सादर केली नसताना त्यांची निविदा ग्राह्य धरली आहे. नळ कनेक्शन दुरुस्त करणेचे 10 नगाचे काम मोजमाप पुस्तिकेत नमूद आहे. तसेच नवीन नळ कनेक्शन जोडणे 10 नगाचे काम मोजमाप पुस्तिकेत नमूद असून रु.4103/- प्रति कनेक्शन या दराने रक्कम रु. 41,030/- चे प्रदान केले आहे. रु.4103/- प्रति कनेक्शन हा दर कशाच्या आधारे निश्चित केला त्याची माहिती लेखापरीक्षणास उपलब्ध करून दिलेली नाही. नवीन नळ कनेक्शन जोडणे 10 नग कामाची अभिलेखे न जोडल्याने सदरची रक्कम रु.41,030/- ठेकेदाराकडून वसूल करावी. तसेच देयकातून कामगार कल्याण उपकर वसूल केलेला नाही. त्यामुळे रक्कम रु.1483/- वसूलपात्र आहे.***

कामाचे नांव: प्रभाग क्र.1 मधील हजरतबाग चाळ येथे ड्रेनेज लाइन टाकणे
ठेकेदाराचे नाव :- आर के दुधाळ
निविदा मान्यता :प्रभाग समिती
प्राकलन :- रु.197960/- निविदा मंजूर दर :- 1.00% कमी दराने.
निविदा रक्कम- रु.183,039/-
कामाचा आदेश :- जा. क्र. नअ1 दि.10/01/2014.
कामाचा कालावधी- 30 दिवस.
मोजमाप पुस्तिका क्र.101 पृ. क्र.65

सदरच्या हजरतबाग चाळ येथे ड्रेनेज लाइन टाकणे या कामाची नस्ती, मोजमाप पुस्तिका व प्रमाणक तपासले असता खालीलप्रमाणे त्रुटी आढळुन आल्या. लेखा परीक्षणामध्ये आढळून आलेल्या अनियमिततांबाबत लेखापरीक्षणाचे वेळी अर्धसमास ज्ञापन क्रमांक 138 दिनांक 23/02/2018 अन्वये खुलासा विचारला असता विभागाने याबाबत खुलासा केलेला नाही.

2) सदरच्या कामाच्या प्राप्त तीन निविदापैकी vinita construction ने कागदपत्रे सादर केली नसताना त्यांची निविदा ग्राह्य धरली आहे.
3) नळ कनेक्शन दुरुस्त करणेचे 10 नगाचे काम मोजमाप पुस्तिकेत नमूद आहे. तसेन नवीन नळ कनेक्शन जोडणे 10 नगाचे काम मोजमाप पुस्तिकेत नमूद असून रु.4103/- प्रती कनेक्शन या दराने रक्कम रु. 41,030/- चे प्रदान केले आहे. रु.4103/- प्रती कनेक्शन हा दर कशाच्या आधारे निश्चित केला त्याची माहिती लेखापरीक्षणास उपलब्ध करून दिलेली नाही. तसेच नागरिकांनी महानगरपालिकेकडे नळ कनेक्शनसाठी अर्ज करून पाणीपुरवठा विभागाकडे कनेक्शन फी भरल्यानंतर विभागाने नळ कनेक्शन जोडणे अपेक्षित असताना सदरच्या कामाची अंदाजपत्रकात कशाच्या आधारे समाविष्ट केले? याबाबत खुलासाही लेखापरीक्षणास उपलब्ध करून दिलेला नाही. त्यामुळे नवीन नळ कनेक्शन जोडणे 10 नग कामाची अभिलेखे न जोडल्याने सदरची रक्कम रु.41,030/- ठेकेदाराकडून वसूल करावी.
4) देयकातून कामगार कल्याण उपकर वसूल केलेला नाही. त्यामुळे रक्कम रु.1483/- वसूलपात्र आहे.

DATMDSM7101 (Ref No : 128, Hmm No : 138)

## *67 स्थानिक संस्था कर विभागाच्या 2013-14 या वित्तीय वर्षातील कर निर्धारण प्रकरणांतील केलेल्या करांच्या आकारणीमधील उणीवांबाबत...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 05**

*लेखा शीर्ष : स्थानिक संस्था कर मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 5663650.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 167312.00/-

| |
|---|
| ***दावत रेस्टॉरंटकडून रक्कम रु.7015/- स्थानिक संस्था कर संबंधित व्यापा-याकडून वसूल करणे आवश्यक आहे. सूर्या टेक्सटाईलने स्थानिक संस्था कर अधिनियम मधील कलम 152 थ अन्वये सूट मिळालेली रक्कम रु.12,31,00,800/- इतकी रक्कम दर्शवली आहे. तथापि, सुट मिळालेल्या मालाच्या प्रकार, सूट रजिस्टर व मालाच्या खरेदीची प्रमाणके लेखापरीक्षणास सादर केली नाहीत. त्यामुळे स्थानिक संस्था कर भरणा रक्कम रु.56,46,615/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे. चंद्रा इंटरप्राइजेसचे शहराबाहेरील विक्री रु.5,18,793/- चे अभिलेख नस्तीत नसल्याने कर निर्धारणाच्या रक्कमेची योग्यतेबाबत खात्री होत नाही. N.C. D.T सोनावणे यांचेकडून कर निर्धारणानुसार देय थकीत व्याज, विलंब आकार इत्यादीची रक्कम रु.1,10,846/- व्यापा-याकडून वसूल करणे आवश्यक आहे. व्यापाऱ्यांनी धनादेशाद्वारे रक्कम जमा केली असून धनादेश वटलेबाबत बँक ताळमेळ घेतलेला नाही. त्यामुळे सर्व रक्कम प्रत्यक्षात लेख्यात जमा झाल्याची खात्री होत नाही.*** |

स्थानिक संस्था कर विभागाच्या या वित्तीय वर्षातील काही कर निर्धारण प्रकरणांची 14-2013 तपासणी केली असता काही त्रुटी आढळुन आल्या. त्याअनुषंगाने निदर्शनास आलेल्या उणीवाबाबत अर्धसमास क्रमांक 97 दि.03/01/2018 अन्वये खुलासा मागविला असून विभागाने अद्यापपर्यंत कोणताही खुलासा सादर केला नसल्याने लेखापरीक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

16) व्यापाऱ्याचे नाव - दावत रेस्टॉरंट.

5) सदर व्यापाऱ्याने वार्षिक उलाढालीचे विवरणपत्र “ड- दोन” दिनांक 29/12/14 रोजी सादर केले असून त्यानुसार खरेदीचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशील | खरेदीची रक्कम रु. |
|---|---|---|
| 1 | विवरणपत्र ड-दोन नुसार | 5856930.00 |
| 2 | विक्रीकर विभागाच्या विवरणपत्रानुसार | 5927081.00 |
| 3 | खरेदी नोंदवहीनुसार | 5872024.00 |

सबब तफावतीचे रक्कम रु.70,151/- (5927081.00 - 5856930.00) वर 10% प्रमाणे रु.7015/- स्थानिक संस्था कर संबंधित व्यापा-याकडून वसूल करणे आवश्यक आहे.

6) व्यापाऱ्यांनी धनादेशाद्वारे रक्कम जमा केली असून धनादेश वटलेबाबत बँक ताळमेळ घेतलेला नाही. त्यामुळे सर्व रक्कम प्रत्यक्ष्यात लेख्यात जमा झाल्याची खात्री होत नाही.

17) व्यापाऱ्याचे नाव - पटेल आणि कंपनी. ( श्री. प्रफुल्ल छगनलाल कंपनी )

व्यवसायाचे स्वरूप - किराणा माल.

2) सदर व्यापाऱ्याने वार्षिक उलाढालीचे विवरणपत्र “ड- दोन” नुसार खरेदीची रक्कम रु 7.55,29,487/- इतकी दर्शवली असून स्थानिक खरेदी रक्कम रु.42,36,571/- इतकी दर्शवली असून स्थानिक खरेदी प्रमाणित नोंदवही व खरेदीची प्रमाणके सादर केली नाहीत.त्यामुळे रक्कम रु.42,36,571/- ची सूट मिळण्यास व्यापारी पात्र असल्याची खात्री झाली नाही.

3) व्यापाऱ्यांनी धनादेशाद्वारे रक्कम जमा केली असून धनादेश वटलेबाबत बँक ताळमेळ घेतलेला नाही. त्यामुळे सर्व रक्कम प्रत्यक्ष्यात लेख्यात जमा झाल्याची खात्री होत नाही.

18) व्यापाऱ्याचे नाव - सूर्या टेक्सटाईल

व्यवसायाचे स्वरूप - सुत खरेदी व विक्री.

1) सदर व्यापाऱ्याने वार्षिक उलाढालीचे विवरणपत्र “ड- दोन” नुसार खरेदीची रक्कम रु 38,28,48,296/- इतकी दर्शवली असून स्थानिक खरेदी रक्कम रु.निरंक दर्शवली असून स्थानिक संस्था कर अधिनियम मधील कलम 152 थ अन्वये सूट(Discount) मिळालेली रक्कम रु. 12,31,00,800/- इतकी रक्कम दर्शवली आहे. करपात्र रक्कम रु. 25,97,46,496/- वर 2% प्रमाणे 51,94,950/- इतकी होत असून कर निर्धारणामध्ये रु.56,46,615/- स्थानिक संस्था कर भरणा केल्याचे नोंदवले आहे. तथापि, सुट मिळालेल्या मालाच्या प्रकार, सूट रजिस्टर व मालाच्या खरेदीची प्रमाणके लेखापरीक्षणास सादर केली नाहीत. त्यामुळे स्थानिक संस्था कर भरणा रक्कम रु.56,46,615/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.
2) खरेदी नोंदवही (Purchase Register), Profit & Loss A/c, ताळमेळ पत्रक इ. लेखे प्रकरणी समाविष्ट नसल्याचे दिसून आले.
3) व्यापाऱ्यांनी धनादेशाद्वारे रक्कम जमा केली असून धनादेश वटलेबाबत बँक ताळमेळ घेतलेला नाही. त्यामुळे सर्व रक्कम प्रत्यक्ष्यात लेख्यात जमा झाल्याची खात्री होत नाही.

19) व्यापाऱ्याचे नाव - चंद्रा इंटरप्राइजेस.

व्यवसायाचे स्वरूप - खाद्य पदार्थ, उदा.चिप्स

2) सदर व्यापाऱ्याने वार्षिक उलाढालीचे विवरणपत्र “ड- दोन” नुसार खरेदीची रक्कम रु 09,08,789/- इतकी दर्शवली असून स्थानिक खरेदी रक्कम रु.निरंक दर्शवली असून शहराबाहेरील विक्री रु.5,18,793/- इतकी आहे. तथापि, विक्रीकर विभागाच्या विवरणपत्रानुसार (E Return Form 231) नुसार खरेदीची रक्कम रु.10,79,778/- इतकी आहे. शहराबाहेरील विक्री रु.5,18,793/- चे अभिलेख नस्तीत नसल्याने कर निर्धारणाच्या रक्कमेची योग्यतेबाबत खात्री होत नाही. त्यामुळे स्थानिक संस्था कर भरणा रक्कम रु.17,035/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे. तसेच कर निर्धारणानुसार देय थकीत रक्कम, व्याज, विलंब आकार इ. ची रक्कम रु.49,451/- व्यापा-याकडून वसूल करणे आवश्यक आहे.
3) व्यापाऱ्यांनी धनादेशाद्वारे रक्कम जमा केली असून धनादेश वटलेबाबत बँक ताळमेळ घेतलेला नाही. त्यामुळे सर्व रक्कम प्रत्यक्ष्यात लेख्यात जमा झाल्याची खात्री होत नाही.

20) व्यापाऱ्याचे नाव -N.C. & D.T सोनावणे.

व्यवसायाचे स्वरूप - देशी दारू.

5) सदर व्यापाऱ्याने वार्षिक उलाढालीचे विवरणपत्र “ड- दोन” नुसार खरेदीची रक्कम रु. 09,08,789/- इतकी दर्शवली असून स्थानिक खरेदी रक्कम रु.निरंक दर्शवली आहे. तथापि कर निर्धारणामध्ये स्थानिक खरेदी रक्कम रु.3,45,600/- इतकी दर्शवली आहे. परंतु,त्याचे अभिलेख नस्तीत नाहीत. कर निर्धारणामध्ये रु.4,56,986/- इतकी कराची रक्कम भरणा केल्याचे दर्शवले आहे, तथापि बँक स्टेटमेंट नुसार ती भरल्याचे दिसत नाही, खुलासा करावा.
6) कर निर्धारणानुसार देय थकीत व्याज, विलंब आकार इ. ची रक्कम रु.1,10,846/- व्यापा-याकडून वसूल करणे आवश्यक आहे.

व्यापा-यांनी सादर केलेल्या खरेदी नोंदवही (Purchase Register), Profit & Loss A/c, ताळमेळ पत्रक इ. वर सनदी लेखापाल व व्यावसायिकदार यांच्या स्वाक्षरी

नसून सदरचे लेखे प्रमाणित केले नाहीत. त्यामुळे खरेदी मालाच्या योग्य किमतीची खात्री होत नाही.

DGPAGPM8503 (Ref No : 55, Hmm No : 97)

## *68 सोलापूर महानगरपालिका जकात कर विभागातील जकात व एसकॉर्ट पावती पुस्तकांचे वापराबाबत...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 07**

*लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

***2012-13 या वित्तिय वर्षाअखेरची शिल्लक पावती पुस्तकांची व व पावत्यांची संख्या साठा नोंदवहीसह उपलब्ध करून दिलेली नाही. 2013-14 या वित्तीय वर्षात प्राप्त एकूण पावती पुस्तकांची संख्या व सदरच्या पावत्या उपलब्ध करून दिलेल्या नाहीत. शिल्लक पावती पुस्तकांची पुनश्च वापर केला की रदद करण्यात आली? याबाबची माहीती उपलब्ध करून दिलेली नाही. 2013-14 या वित्तीय वर्षातील पावती पुस्तकांची साठा नोंदवही उपलब्ध करून दिलेली नाही. पावती पुस्तकांची छपाईची देयके उपलब्ध करून दिलेली नाही.***

सोलापूर महानगरपालिका अधिनस्त जकात विभागातील जकातीकडील बुकाचे रजिस्टर मधील सन 2013-14 जकात व एसकॉर्ट पावती पुस्तकांचे वापराबाबतच्या लेख्यांची तपासणी केली असता 2014-15 या वित्तीय वर्षात दि.31.03.2014 मध्ये जकात विभागाकडे एकूण 18500 पुस्तके प्राप्त झाली होती. त्यापैकी 17459 पुस्तके वापरण्यात आलेली आहेत व 905 पावती पुस्तके शिल्लक असलेली दिसून आली. सदर बाबतची माहिती लेखापरिक्षणास उपलब्ध करून देणेबाबत अर्धसमास पत्र क्र. 88 दि.22.12.2017 अन्वये कळविले होते. तथापि विभागाने कोणतीही माहिती लेखापरिक्षणास उपलब्ध करून दिलेली नाही.

1. 2012-13 या वित्तिय वर्षा अखेरची शिल्लक पावती पुस्तकांची व व पावत्यांची संख्या साठा नोंदवहीसह उपलब्ध करून दिलेली नाही.
2. 2013-14 या वित्तीय वर्षात प्राप्त एकूण पावती पुस्तकांची संख्या व सदरच्या पावत्या उपलब्ध करून दिलेल्या नाहीत.
3. 2013-14 या वित्तीय वर्षात वापरलेल्या/रद्द केलेल्या एकूण पावती पुस्तकांची व पावत्यांची संख्या तसेच शिल्लक पावती पुस्तकांची पुनश्च वापर केला की रदद करण्यात आली? याबाबची माहीती

उपलब्ध करून दिलेली नाही.

4. 2013-14 या वित्तीय वर्षात दि 31.03.2014 पर्यंत वापरलेल्या पावती बुकांच्या संख्येनुसार व पावत्या नुसार जमा रक्कम व बँकेत जमा असलेल्या रक्कमेनुसार ताळमेळ घेण्यात आलेला आहे किंवा कसे? याबाबत माहीती व अभिलेख उपलब्ध करून दिलेली नाही.

5. 2013-14 या वित्तीय वर्षातील पावती पुस्तकांची साठा नोंदवही उपलब्ध करून दिलेली नाही.

6. 31/03/2014 अखेर अखेर नाकानिहाय वापरलेली पावती पुस्तके पडताळणीसाठी लेखापरिक्षणास उपलब्ध करून दिलेली नाहीत, तसेच पावती पुस्तकांची छपाईची देयके उपलब्ध करून दिलेली नाही.

7. भांडार विभागाकडून पावती पुस्तके प्राप्त झाली असल्यास त्या विभागाची साठा नोंदवही उपलब्ध करून दिलेली नाही.

उपरोक्त अनियमिततांबाबत लेखापरीक्षणाचेवेळी अर्धसमास ज्ञापन क्रमांक 88 दिनांक 22/12/2017 अन्वये खुलासा विचारणा केली असता विभागाने याबाबत खुलासा केलेला नाही, त्यामुळे लेखापरीक्षणाचे अभिप्राय कायम करण्यात आलेले आहेत.

DATMDSM7101 (Ref No : 64, Hmm No : 88)

## *69 वित्तीय वर्ष 2013-14 मधील स्थानिक संस्था कर वसूलीबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**अनियमितता संख्या : 04**

*लेखा शीर्ष : स्थानिक संस्था कर म.न.पा. निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 743750.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 46900.00/-

***विक्रीकर विभाग ई रिर्टन नुमाना 231 व नमुना ड वार्षिक विवरणपत्रानुसार स्थानिक संस्था करापोटी नोंदणीकृत व्यापा-या कडून प्राप्त धनादेश, न वटलेल्या धनादेशाची माहीती परिच्छेदातील नमुन्यात भरुन लेखापरीक्षणास सादर करणेबाबत कळविलेले असताना माहिती लेखापरीक्षणास उपलब्ध करून दिलेली नाही. त्यामुळे रक्कम विहित कालावधीत प्राप्त झाल्याची व अभय योजनेस व्यापारी पात्र असल्याची खात्री करता आली नाही.***

नगर विकास विभाग शासन अधिसूचना दिनांक 25/6/2010 अन्वये मुंबई महानगरपालीका वगळता राज्यातील उर्वरीत 25 महानगरपालिकेत जकाती ऐवजी दि.01/04/2011 पासून स्थानिक संस्था कराची अंमलबजावणी करण्यात आलेली आहे. त्यानुसार व्यापा-यांना स्थानिक संस्था कराची रक्कम महानगरपालिकेत भरना करणेसाठी नगरविकास विभाग शासन अधिसूचना दिनांक 30/6/2015 अन्वये स्थानिक संस्था कर अभय योजना दि.30/6/2015 ते दि.31/6/2015 या कालावधीत लागू केली होती. अधिसूचनेतील नियम 9 (4) व (6) नुसार व्यापा-यांनी सभासद नोंदनी प्रमाणपत्र महानगरपालिकेकडून प्राप्त करुन घेउन अधिसूचनेतीलनियम 29 (2) (ख)नुसार व्यापाऱ्याने नमुना ड-2 मध्ये वार्षीक विवरणत्र महानगरपालिकेस सादर करावयाचे आहे. नोंदणीकृत व्यापा-यांनी सादर केलेल्या वार्षिक विवरणपत्रानुसार करपात्र रक्कमेवर मालाच्या प्रकारानुसार स्थानिक संस्थाकराची रक्कम आयुक्त महानगरपालिका, सोलापूर बँक खाते क्रमांक 60069413266 वर दिनांक 31/8/2015 पुर्वी भरणा करावयाची होती. विक्रीकर विभाग ई रिर्टन नमुना 231 व नमुना ड वार्षिक विवरणपत्रानुसार स्थानिक संस्था करापोटी नोंदणीकृत व्यापा-या कडून प्राप्त धनादेश, न वटलेल्या धनादेशाची माहीती खालील नमुन्यात भरुन लेखापरीक्षणास सादर करणेबाबत अर्धसमास पत्र क्र. 75 दि.24/11/2017 अन्वये माहिती मागविण्यात आलेली होती. परंतु ती उपलब्ध करण्यात आली नाही. त्यामुळे रक्कम विहित कालावधीत प्राप्त झाल्याची व अभय योजनेस व्यापारी पात्र असल्याची खात्री करता आली नाही.

| अ.क्र. | फर्म / व्यापारी संस्थेचे नांव | नमुना ड नुसार स्थानिक संस्था कराची रक्कम | कर निधार्रन आदेशा नुसार स्थानिक संस्था कराची रक्कम | जमा केलेली धनादेशाची एकूण रक्कम | दि. 31/8/2015 पुर्वी जमा केलेल्या परंतु न वटलेल्या धनादेशाचा तपशील |
|---|---|---|---|---|---|
| 1 | | | | | |
| 2 | | | | | |

DATMDSM7101 (Ref No : 65, Hmm No : 75)

## *70 महानगरपालिकेने दिलेल्या वकील फी प्रदानामधून आयकर कपात केली नसलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**अनियमितता संख्या : 04**

*लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 22175.00/-

***सोलापूर महानगरपालिका विधी व न्याय विभागाकडून दाखल केलेल्या याचिकांबाबत, दावे/ खटले निकाली काढण्यासाठी पॅनेलवर वकीलांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. पॅनेलवरील वकीलांचे नियुक्ती आदेश लेखापरीक्षणात दाखविलेले नाही. आयकर कायदा 1961 नुसार अदा केलेल्या वकील फी च्या रकमेतून प्रत्येकी 10% आयकर कपात करणे आवश्यक आहे. त्यानुसार संबंधित वकीलांच्या देयक रकमेतून 10% आयकर रक्कम त्यांच्या देय वकील फी च्या रकमेतून वसूल करुन एकूण आयकर रक्कम रू22,175/- शासन खाती भरणा करावी.***

सोलापुरातील निरनिराळ्या कोर्टात महानगरपालिके विरुद्ध दाखल झालेले विविध खटले, दावे, अपील, निकाली काढण्यासाठी महानगरपालिकेचे पॅनेलवर विधान सल्लागार विभागाकडून वकीलांची नियुक्ती करण्यात येते. आयकर कायदा 1961 सेक्शन 194 जे (J) नुसार व्यावसाईक सेवा / तांत्रिक सेवेसाठी वित्तीय वर्षात रु.30000/- पेक्षा जास्त फी/मानधन अदा केले असल्यास त्या रकमेतून 10% आयकर कपातीची तरतूद आहे. तथापि विधी व न्याय विभागाकडून पॅनेल वरील नियुक्त वकीलांना अदा केलेल्या वकील फी/मानधनातून वित्तीय वर्ष 2013-14 मध्ये 10% आयकराची रक्कम कपात केलेली दिसून येत नाही.लेखा परीक्षणामध्ये आढळून आलेल्या अनियमिततांबाबत लेखापरीक्षणाचेवेळी अर्धसमास ज्ञापन क्रमांक 105 दिनांक 20/01/2018 अन्वये खुलासा विचारणा केली असता विधी व न्याय विभागाने याबाबत खुलासा केलेला नाही, त्यामुळे लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत. वसूलपात्र रककमेचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | **वकीलाचे नाव** | वित्तीय वर्ष 2013-14 मध्ये अदा केलेली फी/मानधन रक्कम रु. | 10% आयकर कपातीची रक्कम रु. |
|---|---|---|---|
| 1 | **ॲडव्होकेट गोडबोले जी.आर.** | 58750/- | 5875/- |
| 2 | **ॲडव्होकेट खैरादी आय.एम.** | 73000/- | 7300/- |
| 3 | **ॲडव्होकेट बापट के.एस.** | 90000/- | 9000/- |
| | | एकूण | 22175/- |

संबंधित वकीलांना उपरोक्तप्रमाणे वकील फी अदा केली आहे. परंतु सदर वकील फी देयकातुन आयकर कपात केलेली नाही. आयकर कायदा 1961 नुसार अदा केलेल्या वकील फी च्या रकमेतून प्रत्येकी 10% आयकर कपात करणे आवश्यक आहे. त्यानुसार उपरोक्त वकीलांची देय वकील फी च्या रकमेतून उपरोक्त प्रमाणे आयकर वसूल करुन एकूण आयकर रक्कम रू. 22175/- शासन खाती

भरणा करावी.

वसूलपात्र रक्कम रु. 22175/-

DATMDSM7101 (Ref No : 61, Hmm No : 105)

## *71 सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये अतिक्रमण करून टाकलेल्या टपरीधारकावर दंडात्मक कारवाईबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 03**

*लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी*
*अनियमितता कलम : 9ब*

***सोलापूर महानगरपालिकेच्या भूमी मालमत्ता कार्यालयातील खोके/ अनधिकृत टपरी धारकांची नोंदवही तपासली असता सोलापूर म.न,पा. कार्यक्षेत्रात एकूण 169 अधिकृत खोके/टपरीधारक असून सन 2009 सालापासून 1640 अनधिकृत टपरी धारकांची संख्या आहे. अनधिकृत टपरी/ खोके धारकांवर सहय्यक संचालक नगर रचना यांचेकडून दर निश्चित करून म.न.पा.च्या प्रत्येक विभागवार बदलत्या दाराच्या व विविध रस्त्यांप्रमाणे बदलत्या सहय्यक संचालक नगर रचना च्या दराप्रमाणे 5 पट दराप्रमाणे येणारी किंवा 25 चौ.फुटापेक्षा जास्त व 50 फुटांपर्यंत येणाऱ्या दाराच्या 5 पट किंवा कमीत कमी 300/-रुपये वसुलीचा दर दि.01.04.2011 पासून वसूल करणेस मान्यता दिलेली आहे. प्रत्यक्षात वसुली पावती व एकवट चलनाची तपासणी केली असता सरसकट सर्व अनधिकृत टपरीधारकाकडून रु.300/- प्रमाणे दि.1.04.2011 पासून वसुली केल्याचे दिसून येते.***

सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या भूमी मालमत्ता कार्यालयातील खोके/ अनधिकृत टपरी धारकांची नोंदवही तपासली असता सोलापूर म.न,पा. कार्यक्षेत्रात एकूण 169 अधिकृत खोके/टपरीधारक असून 2009 सालापासून 1640 अनधिकृत टपरी धारकांची संख्या आहे. अधीक्षक भूमी मालमत्ता यांचे टिप्पणी क्र.11/36 दि.14.11.2011 सरसकट 25 चौ.फुटापर्यंत रु.300/- प्रमाणे, 50 चौ.फुटापर्यंत रु.600/- व 75 चौ. फुटापर्यंत रु.900/- प्रमाणे दिनांक 01.04.2011 पासून दंडात्मक रक्कम वसूल करणेबाबत प्रस्तावित केले होते. सदर प्रस्तावास मा. आयुक्त यांची दि. 10.05.2011 नुसार मान्यता आहे. तथापी विधान सल्लागार यांचे वैधानिक अभिप्रायानुसार व बी.पी.एम.सी. ॲक्ट नुसार अनधिकृत टपरी/खोके धारकांवर दंडात्मक कारवाईबाबत तरतूद नसलेने अनधिकृत टपरी/खोके धारकांवर दंडात्मक कारवाई करताना त्यांना निष्कासित करणेची कारवाई जरुरी असल्याचे नमूद केले आहे. तसेच अनधिकृत टपरी/खोके धारकांवर सहय्यक संचालक नगर रचना यांचेकडून दर निश्चित करून म.न.पा.च्या प्रत्येक विभागवार बदलत्या दाराच्या व विविध रस्त्यांप्रमाणे बदलत्या सहय्यक संचालक नगर रचनाच्या दराप्रमाणे 5 पट दराप्रमाणे येणारी किंवा 25 चौ. फुटापेक्षा जास्त व 50 फुटांपर्यंत येणाऱ्या दाराच्या 5 पट किंवा कमीत कमी 300/- रुपये वसुलीचा दर दि. 01.04.2011 पासून वसूल करणेस मान्यता दिलेली आहे. प्रत्यक्षात वसुली पावती व एकवट चलनाची तपासणी केली असता सरसकट सर्व अनधिकृत टपरीधारकाकडून रु.300/- प्रमाणे दि.01.04.2011 पासून वसुली केल्याचे दिसून येते. सदर बाबत अर्धसमास पत्र क्र.128 दि. 20.02.2018 अन्वये विचारणा केली असता विभागाने याबाबतचा खुलासा सादर केलेला नाही. त्यामुळे खालीलप्रमाणे आक्षेप कायम करण्यात आले आहे.

1. दि.14.11.2011 च्या मंजुर ठरावातील तरतुदीनुसार अनधिकृत टपरी/खोके धारकांवर सहय्यक संचालक नगर रचना कडून दर निश्चित करून म.न.पा.च्या प्रत्येक विभागवार बदलत्या दाराच्या व विविध रस्त्यांप्रमाणे बदलत्या सहय्यक संचालक, नगर रचना यांच्या बदलना-या दराप्रमाणे 5 पट दराप्रमाणे येणारी किंवा 25 चौ.फुटापेक्षा जास्त व 50 फुटांपर्यंत येणाऱ्या दाराच्या 5 पट किंवा कमीत कमी 300/- रुपये दंडवसुलीचा दर दि.01.04.2011 पासून वसूल करणेस मान्यता दिलेली असताना सरसकट सर्व अनधिकृत टपरीधारकाकडून रु.300/- प्रमाणे दि.01.04.2011 पासून वसुली करणेबाबतचे म.न.पा. ठरावाची प्रत त्याचप्रमाणे सहाय्यक संचालक नगर रचना यांचे प्रत्येक विभागवार बदलत्या दराची व विविध रस्त्यांप्रमाणे बदलत्या दाराची प्रत लेखापरीक्षणास सादर केलेली नाही.

2. सन 2011पासून सोलापूर महानगरपालिका हद्दीत प्रत्यक्ष अनधिकृत टपरी/खोके धारकांची संख्या किती याबाबत सर्वेक्षण झालेची प्रत लेखापरीक्षणास उपलब्ध करून दिलेली नाही.

3. महानगरपालिका अधिनियम 1949 मधील 79 नुसार महानगरपालिकेची जागा खरेदी अथवा भाड्याने देताना बाजारमूल्यापेक्षा कमी दराने देता येणार नाही अशी स्पष्ट तरतूद असताना अनधिकृत टपरी/खोके धारकांकडून कमीतकमी दर रु.300/- प्रमाणे सरसकट भाडे कशाचे आधारवर वसूल केले जाते. याबाबत खुलासा लेखापरीक्षणास केला नाही.

DATMDSM7101 (Ref No : 126, Hmm No : 128)

## *72 आर्थिक वर्ष 2013-14 मध्ये मेजर शॉपींग सेंटर कडून गाळेधारकाकडून गाळाभाडे रक्कमेची वसूली करण्यात आलेली नसल्याबाबत....*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 06**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 6983112.00/-

***सोलापूर महानगरपालिकेच्या भूमी व मालमत्त्ता विभागाकडील आर्थिक वर्ष 2013-14 चे मेजर शॉपींग सेंटरच्या डिमांड रजिष्टरचे लेखापरीक्षण केले असता 2013-14 या वर्षात 5 मेजर शॉपिंग सेंटरमधील गाळे भाडेधारकाकडील रु..60,72,271/- एवढी रककम वसूली केलेली नाही. चालू मागणीची रक्कम रु.13,62,960/- असून मागील थकबाकीची रक्कम रु.47,07,641/- एवढी आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, 1949 कलम 81 (क) (1) नुसार गाळेधारकास भाडे देण्याबाबत नोटीस बजावणे आवश्यक असताना याबाबतची कार्यवाही करण्यात आलेली नाही. भाडे करारनाम्यातील अट क्र. 5 नुसार अट क्र.4 प्रमाणे मुदतीत भाडे न भरल्यास सदरच्या भाडयाची रक्कम भरेपर्यंत द.सा. द.शे. 15% प्रमाणे रु.910841/- रक्कमेच्या व्याजाची आकारणी संबधित गाळे भाडेधारकाकडून करणे आवश्यक आहे. मागील वर्षाच्या थकबाकी रकमेवर द.सा.शे. 15% प्रमाणे व्याजाची आकारणी करून रक्कम मागील वर्षातील थकबाकी मध्ये दाखविणे आवश्यक असताना तशी नोंद मागणी रजिष्टरमध्ये घेण्यात आलेली नाही. सोलापूर महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती बिकट असताना वसुली निरीक्षकामार्फत संबधित गाळे भाडेधारकाकडून काहीच रक्कम वसूल करण्यात आलेली नाही.***

सोलापूर महानगरपालिकेच्या भूमी व मालमत्त्ता विभागाकडून आर्थिक वर्ष 2013-14 चे मेजर शॉपिंग सेंटरचे डिमांड रजिष्टर लेखापरीक्षणाकरीता प्राप्त झाले असून, सदर मेजर मेजर शॉपींग सेंटरच्या डिमांड रजिष्टरचे लेखापरीक्षण केले असता 2013-14 या वर्षात खालील शॉपींग सेंटर मधील गाळे भाडेधारकाकडून गाळेभाडयाची रक्कम वसूली केलेली नाही.

**(A) लाल बहादूर शॉर्पींग सेंटर.**

| अ. क्र. | गाळे धारकाचे नांव | मागील बाकी | चालू मागणी | एकूण मागणी | वसूली | एकूण थकबाकी |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | श्री.गिरीष ओमप्रकाश लहेजा | 29937 | 12576 | 42513 | 0 | 42513 |
| 2 | श्री.प्रिती इरेश आहूजा | 113590 | 42168 | 155758 | 0 | 155758 |
| 3 | श्री.कुमार चोईथराम ग्यामलानी | 46482 | 41952 | 88434 | 0 | 88434 |
| 4 | सौ.सुनंदा गंगाधर शेटे | 81223 | 47568 | 128791 | 0 | 128791 |
| 5 | श्री.अशोक पिराजी पवार | 50442 | 17040 | 67482 | 0 | 67482 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 6 | सौ.सुनंदा गंगाधर शेटे | 190562 | 65052 | 255614 | 0 | 255614 |
| | एकूण | 512236 | 226356 | 738592 | 0 | 738592 |

**(B) जुना बैल गोटा शॉर्पीग सेंटर.**

| अ. क्र. | गाळे धारकाचे नांव | मागील बाकी | चालू मागणी | एकूण मागणी | वसूली | एकूण थकबाकी |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | श्री.रुपकुमार गोपाळ पवार | 0 | 7116 | 7116 | 0 | 7116 |
| 2 | श्री.दिलीप धनराज गोयल | 0 | 7116 | 7116 | 0 | 7116 |
| 3 | श्रीमती फातीमा अ. करीम | 0 | 7116 | 7116 | 0 | 7116 |
| 4 | श्री.रमेश मारुतीराव जोशी | 0 | 7116 | 7116 | 0 | 7116 |
| | एकूण | 0 | 28464 | 28464 | 0 | 28464 |

**(C) जनता शॉर्पीग सेंटर.**

| अ. क्र. | गाळे धारकाचे नांव | मागील बाकी | चालू मागणी | एकूण मागणी | वसूली | एकूण थकबाकी |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | श्री चंद्रकांत व्यं. रंपुरे | 85826 | 31356 | 117182 | 0 | 117182 |
| 2 | महिला आर्थिक विकास महामंडळ | 74164 | 31356 | 105520 | 0 | 105520 |
| 3 | श्री.मल्लीनाथ कल्ल्यागप्पा पाटील | 99186 | 31356 | 130542 | 0 | 130542 |
| 4 | श्री.अण्णासो निवृत्ती माकणे | 96249 | 31356 | 107605 | 0 | 107605 |
| 5 | सौ.सुनंदा गंगाधर शेटे | 80046 | 31116 | 111162 | 0 | 111162 |
| 6 | श्री.अंबाजी नरसप्पा पेगडपाल | 85532 | 31500 | 117032 | 0 | 117032 |
| 7 | श्री. अविनाश श्रीपाद भावे | 89438 | 31356 | 120794 | 0 | 120794 |
| 8 | श्री.पांडूरंग महादेव हर्षे | 32592 | 31356 | 63948 | 0 | 63948 |
| 9 | सौ.रत्ना मनोहर जानी | 614719 | 197532 | 812251 | 0 | 812251 |
| 10 | श्री.अण्णासो निवृत्ती माकणे | 67801 | 31320 | 99121 | 0 | 99121 |
| 11 | श्री.अंबाजी नरसप्पा कोडयांल | 34010 | 2616 | 44306 | 0 | 44306 |
| 12 | श्री.अण्णासो निवृत्ती माकणे | 92122 | 21552 | 113674 | 0 | 113674 |
| 13 | श्री.अ.रहेमान अकबर शेख | 52233 | 16032 | 68265 | 0 | 68265 |
| 14 | श्री.लक्ष्मण भीमराव चव्हाण | 68059 | 22632 | 90691 | 0 | 90691 |
| 15 | श्री.मलप्पा बाबूराव कत्ते | 84915 | 25644 | 110559 | 0 | 110559 |
| 16 | श्री.राजू मोहन आहूजा | 135189 | 30948 | 166137 | 0 | 166137 |
| | एकूण | 1792081 | 599028 | 2398789 | 0 | 2398789 |

**(D) अंबोळीकर शॉर्पीग सेंटर.**

| अ. क्र. | गाळे धारकाचे नांव | मागील बाकी | चालू मागणी | एकूण मागणी | वसूली | एकूण थकबाकी |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | सौ. कांचन रवी वाकडे | 35611 | 32988 | 68599 | 0 | 68599 |
| 2 | श्री. नरेश मनोहर हिंदूजा | 121829 | 21660 | 143489 | 0 | 143489 |
| 3 | श्री. सुनिल मनोहर हिंदूजा | 137035 | 32988 | 170023 | 0 | 170023 |
| 4 | श्री. राजेश केशवदास कुकरेजा | 47508 | 31584 | 79092 | 0 | 79092 |
| 5 | श्री. आश्पाक म. रफीक बागवान | 75905 | 28464 | 104369 | 0 | 104369 |
| 6 | श्री.रंगनाथ मुकताजी घोडके | 833 | 19548 | 20381 | 0 | 20381 |
| 7 | श्री. रवी रामनांथ बाकडे | 148630 | 25476 | 174106 | 0 | 174106 |
| 8 | श्री. अमीत अंकुशराव गायकवाड | 106986 | 11880 | 118866 | 0 | 118866 |
| 9 | श्री. रमेश महादेव मोहीते | 100912 | 11880 | 112792 | 0 | 112792 |
| 10 | श्री. रवी रामनांथ बाकडे | 151047 | 24708 | 175755 | 0 | 175755 |
| 11 | श्री. प्रविण मधूकर जैन | 114951 | 25452 | 140403 | 0 | 140403 |
| 12 | श्री.अमोल दिरालाल कोठारी | 49638 | 11520 | 61158 | 0 | 61158 |
| 13 | श्री. चंद्रशेखर नागनाथ दासरी | 77452 | 11520 | 88972 | 0 | 88972 |
| 14 | श्री. उपेद्र नागनाथ दासरी | 56870 | 11520 | 68390 | 0 | 68390 |
| 15 | श्री. विनायक कृष्णराव बेरुट | 52161 | 11520 | 63681 | 0 | 63681 |
| | एकूण | 1277368 | 312708 | 1590076 | 0 | 1590076 |

**(E) साखर पेठ शॉपींगसेंटर.**

| अ. क्र. | गाळे धारकाचे नांव | मागील बाकी | चालू मागणी | एकूण मागणी | वसूली | एकूण थकबाकी |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | श्री. शेख जाकीर अ.सत्तार | 116945 | 25716 | 142661 | 00 | 142661 |
| 2 | सौ. महादेवी रेवणसिध्द नंदी | 380950 | 51444 | 432394 | 0 | 432394 |
| 3 | श्री.दिपक रंजन श्रीवास्तव | 191091 | 24192 | 215283 | 0 | 215283 |
| 4 | श्री. रवी नंदलाल खानचंदनी | 160072 | 25080 | 185152 | 0 | 185152 |
| 5 | श्री. अनिल नंदलाल खानचंदानी | 205104 | 27888 | 232992 | 0 | 232992 |
| 6 | श्री. संगमेश्वर महादेवप्पा बाले | 65518 | 17148 | 82666 | 0 | 82666 |
| 7 | श्री. संगमेश्वर महादेवप्पा बाले | 6266 | 18636 | 25202 | 0 | 25202 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | एकूण | 1125956 | 196404 | 1316350 | 0 | 1924305 |

**एकत्रित गोषवारा**

| अ. क्र. | शॉर्पिगसेंटर चे नांव | मागील थकबाकी | चालू मागणी | एकूण मागणी | वित्तीय वर् 2013-14 मधील वसूली | एकूण थकबाकी | एकूण थकबाकी रक्कमेवर व्याजाची आकारणी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | **लाल बहादूर शॉर्पिग सेंटर.** | 512236 | 226356 | 738592 | 0 | 738592 | 110789 |
| 2 | **जुना बैल गोटा शॉर्पिग सेंटर.** | 0 | 28464 | 28464 | 0 | 28464 | 4269 |
| 3 | **जनता शॉर्पिग सेंटर.** | 1792081 | 599028 | 2398789 | 0 | 2398789 | 359818 |
| 4 | **अंबोळीकर शॉर्पिग सेंटर.** | 1277368 | 312708 | 1590076 | 0 | 1590076 | 238511 |
| 5 | **साखर पेठ शॉर्पिग सेंटर.** | 1125956 | 196404 | 1316350 | 0 | 1924305 | 288646 |
| | **एकूण** | **4707641** | **1362960** | **6072271** | **0** | **6072271** | **910841** |

या संदर्भात अर्धसमास पत्र क्रमांक 119 दिनांक 02/02/2018 अन्वये खालील मद्यांचा खुलासा सादर करण्याबाबत विभागास विचारणा केली असता विभागाने याबाबतचे अनुपालन सादर केलेले नसल्याने खालील आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

7) उपरोक्त एकत्रीत गोषवाऱ्यावरुन 5 मेजर शॉपिंग सेंटरमधील गाळे भाडेधारकाकडील रु.60,72,271/- एवढी थकबाकीची रक्कम संबधित गाळे भाडेधारकाकडून वसूल करण्यात यावी.

8) चालू मागणीची रक्कम रु.13,62,960/- असून मागील थकबाकीची रक्कम रु.47,07,641/- एवढी आहे. चालू मागणीपेक्षा मागील थकबाकीचे प्रमाण जास्त असताना 2013-14 मध्ये संबधित गाळे भाडेधारकाकडून काहिच रक्कम वसूल करण्यात आलेली नसल्यामूळे थकबाकीच्या रक्कमेत रु.60,72,271/- ने वाढ झालेली आहे.

9) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम,1949 कलम 81 (क) (1) नुसार गाळेधारकास भाडे देण्याबाबत नोटीस बजावने आवश्यक असतांना या बाबतची कार्यवाही करण्यात यावी.

10) सोलापूर महानगरपालिकेच्या मालकीचे गाळयाचे भाडे करारनाम्यातील अट क्र. 5 नुसार अट क्र.4 प्रमाणे मुदतीत भाडे न भरल्यास सदरच्या भाडयाची रक्कम भरेपर्यंत द.सा..शे. 15% प्रमाणे थकबाकी रक्कमेवर रु.**910841**/- व्याज संबधित गाळे भाडेधारकाकडून वसुल करण्यात यावा.

11) मागील वर्षाच्या थकबाकी रकमेवर द.सा..शे. 15% प्रमाणे व्याजाची आकारणी करून रक्कम मागील वर्षातील थकबाकी मध्ये दाखविणे आवश्यक असताना तशी नोंद मागणी रजिष्टरमध्ये घेण्यात आलेली नसल्याने तसी नोंद रजिष्टरमध्ये घेण्यात यावी.

12) सोलापूर महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती बिकट असताना वसुली निरीक्षकामार्फत संबधित गाळे भाडेधारकाकडून काहीच रक्कम वसूल करण्यात आलेली नाही.

वसूलपात्र रक्कम रु.6983112/-

FDSDKPM7201 (Ref No : 82, Hmm No : 119)

## *73 आर्थिक वर्ष 2013-14 मेजर शॉपिंग सेंटर कडून सेवा कराची वसूली करण्यात आलेली नसल्याबाबत...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 05**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 1200017.00/-

***सोलापूर महानगरपालिकेच्या भूमी व मालमत्त्ता विभागाकडील आर्थिक वर्ष 2013-14 चे मेजर शॉपींग सेंटर डिमांड (मागणी,वसूली,थकबाकी) रजिष्टर चे लेखापरीक्षण केले असता गाळे भाडेधारकाकडून वसूल करण्यात आलेल्या रकमेवर केंद्र शासनाकडील दि.22/5/2007 च्या अधिनियमानुसार ज्या मिळकती व्यापारी तत्वावर भाड्याने दिल्या जातात त्या भाडे रक्कमेवर 12.36 टक्के दराने सेवा कर वसूल करुन ती रक्कम शासनाकडे जमा करणे आवश्यक असताना 7 (सात) शॉपिंग सेंटर मधील गाळे भाडेधारकाकडून वसूल करण्यात आलेल्या रककम रु.97,08,891/- वर रु.12,00,017/- एवढा सेवा कर आकारण्यात आलेला नाही.***

सोलापूर महानगरपालिकेच्या भूमी व मालमत्त्ता विभागाकडून आर्थिक वर्ष 2013-14 चे मेजर शॉपिंग सेंटर डिमांड रजिष्टर लेखापरीक्षणाकरीता प्राप्त झाले असून सदर मेजर शॉपींग सेंटर डिमांड (मागणी,वसूली,थकबाकी) रजिष्टर चे लेखापरीक्षण केले असता 2013-14 या वर्षात खालील शॉपिंग सेंटर मधील गाळे भाडेधारकाकडून कडून वसूल करण्यात आलेल्या रकमेवर केंद्र शासनाकडील दि.22/5/2007 च्या अधिनियमानुसार ज्या मिळकती व्यापारी तत्वावर भाड्याने दिल्या जातात त्या भाडे रक्कमेवर 12.36 टक्के दराने सेवा कर वसूल करुन ती रक्कम शासनाकडे जमा करणे आवश्यक असताना खालील शॉपिंग सेंटर मधील गाळे भाडेधारकाकडून वसूल करण्यात आलेल्या रक्कमेवर सेवा कर आकारण्यात आलेला नाही.

| अ. क्र. | शॉपिंग सेंटर चे नांव | वसूल केलेली रक्कम | वसूल केलेल्या रक्कमेवर सेवा कर | वसूल न केलेला सेवा कर |
|---|---|---|---|---|
| 1. | लाल बहादूर शॉर्पिग सेंटर. | 3838646 | 474456 | 474456 |
| 2 | जुना बैल गोटा शॉपिंग सेंटर. | 1377104 | 170210 | 170210 |
| 3 | जनता शॉपिंग सेंटर (जुनी जनता इमारत ) | 450268 | 55653 | 55653 |
| 4 | कुंभार वेस शॉपिंग सेंटर | 1208200 | 149334 | 149334 |
| 5 | जनता शॉपिंग सेंटर. | 1734732 | 214412 | 214412 |
| 6 | अंबोळीकर शॉपिंग सेंटर. | 720441 | 89046 | 89046 |
| 7 | नवीन सुंदरम नगर शॉपिंग सेंटर (नवीन) | 379500 | 46906 | 46906 |
| | एकूण | 9708891 | 1200017 | 1200017 |

या संदर्भात अर्धसमास पत्र क्रमांक 115 दिनांक 01/02/2018 अन्वये खालील मद्यांचा खुलासा सादर करण्याबाबत विभागास विचारणा केली असता विभागाने याबाबतचे अनुपालन सादर केलेले नसल्याने आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

1. आर्थिक वर्ष 2013-14 मध्ये उपरोक्त 7 (सात) शॉपिंग सेंटर मधील गाळे भाडेधारकाकडून वसूल करण्यात आलेल्या रकक्म रु.97,08,891/- वर रु.12,00,017/- एवढा सेवा कर आकारण्यात आलेला नाही. वरील 7 (सात) शॉपिंग सेंटर मधील गाळे भाडेधारकाकडून सेवाकराची रु.12,00,017/- एवढी रक्कम वसूल करून ती शासनखाती जमा करण्यात यावी.

2. त्याच प्रमाणे इतर शॉपिंग सेंटर मधील गाळे भाडेधारकाकडून सेवा कर आकारण्यात आलेला नसल्यास त्यांच्याकडून 12.36 टक्के दराने सेवाकर वसूल करण्यात यावा.

3.आर्थिक वर्ष 2013-14 मध्ये गाळे भाडेधारकाकडून एकूण किती भाडे वसूल करण्यात आले असून त्या रक्कमेवर एकूण किती सेवा कर वसूल करण्यात आलेला आहे. याची माहीती विवरणपत्रामध्ये सादर करण्यात यावी.

4. आर्थिक वर्ष 2013-14 मध्ये गाळे भाडेधारकाकडून भाडे रकमेसह वसूल करण्यात आलेला सेवा कर कोणत्या बँक खात्यात जमा करण्यात आलेला आहे. त्या बॅकेचे स्टेटमेंटस लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात यावे.

5. आर्थिक वर्ष 2013-14 मध्ये गाळे भाडेधारकाकडून वसूल करण्यात आलेला सेवा कर शासनाकडे

कोण-कोणत्या तारखेस, किती सेवा कर शासनाकडे जमा करण्यात आलेला आहेत त्याबाबतची चलने सादर करण्यात यावी.

वसूलपात्र रक्कम रु.12,00,017/-

FDSDKPM7201 (Ref No : 83, Hmm No : 115)

## *74 श्री. सिद्धेश्वर बहुउद्देशीय महिला विकास संस्थेस झुणका भाकर सुरू करणेस दिलेल्या मोकळ्या जागेबाबत...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 08**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 192763.00/-

***श्री. सिद्धेश्वर बहुउद्देशीय महिला विकास संस्थेस 200 चौ.फु. जागा 11 महिन्याच्या भाडेकरारावर झुणका भाकर सुरू करणेस मान्यता देण्यात आलेली होती. याबाबत दि:3/3/1997 ते दि:2/2/1998 पर्यंत भाडे करार करण्यात आला. दि:3/2/1998 ते दि:2/1/1999 या कालावधीचा करारनामा केलेला नसल्याने नियमानुसार सदर जागा ताब्यात घेणे आवश्यक असताना तशी कार्यवाही करण्यात आली नाही. अनधिकृतपणे जागेचा वापर चालू असल्याने अनधिकृत वापराची थकबाकी रक्कम रु.16800/- त्यावरील दंडव्याज रु.2520/- असे एकूण रु.19,320/- सात दिवसाच्या आंत न भरल्यास जागा सक्तीने ताब्यात घेण्यात येईल अशा सुचना दिलेल्या असतांना संपूर्ण रक्कम जमा न करता दिनांक 23/2/2000 रोजी रक्कम रु.7000/- जमा करण्यात आली. थकबाकी रक्कम सात दिवसाच्या आत भरली नसल्याने त्याच्यावर कोणती कार्यवाही करण्यात आली. महानगरपालिका प्रशासनाने जागेचे थकीत भाडे वसुली करिता दि:20/3/2003 नंतर कोणतीही कार्यवाही केलेली नाही. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 81 ब (1) (अ) (एक) नुसार भोगवटा करणा-या व्यक्तीने त्याच्याकडून कायदेशीररित्या येणे असलेले भाडे किंवा कर दोन महिन्याच्या अधिकच्या मुदतीत दिलेली नसल्यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 81 ब (2) अन्वये काढून टाकण्याबाबत नोटीस देणे आवश्यक असून, पोटनियम 3 अन्वये नोटीशीचे पालन करण्यास कसूर करणा-या व्यक्तीस काढून टाकण्याचा अधिकार असताना त्या प्रमाणे कार्यवाही न करता जागा नियमबाह्यरित्या भोगवटादाराच्या ताब्यात ठेवण्यात आली. अनधिकृतपणे जागेचा वापर चालू असल्याने थकबाकी रक्कम रु.167620/- अधिक 15% व्याजाची रक्कम रु.25153/-असे एकूण रक्कम रु.192763/- वसुल करणे आवश्यक***

| ***आहे.*** |
|---|

अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर पत्र क्र.पीए/आरआर/326 दि.2/8/1996 आदेशानुसार श्री. सिद्धेश्वर बहुउद्देशीय महिला विकास संस्थेस झुणका भाकर सुरू करणेस मान्यता देण्यात आलेली होती. त्यानुसार सदर जागेकरिता श्री. सिद्धेश्वर बहुउद्देशीय महिला विकास संस्थेने दि.2/8/1996 रोजी अर्ज केलेला असल्याने , भूमी व मालमत्ता यांचे पत्र क्र.11/3/1362 दि.16/11/1996 अन्वये 200 चौ.फु. जागा श्री.सिद्धेश्वर बहुउद्देशीय महिला विकास संस्थेस 11 महिन्याचे भाडे रक्कम रु.5280/- भाडे अगाऊ भरून 11 महिन्याच्या भाडेकरारावर देण्यात आली. याबाबतचा भाडेकरार दि.3/3/1997 ते दि.2/2/1998 या कालावधीकरिता करण्यात आला व जागेचा कब्जा दि.1/3/1997 रोजी घेण्यात आला. याबाबतच्या नस्तीचे लेखापरीक्षण केले असता नस्तीमध्ये त्रृटी आढळून आलेल्या असल्याने अर्धसमास पत्र क्रमांक 123 दिनांक 15/02/2018 अन्वये खालील मद्यांचा खुलासा सादर करण्याबाबत विभागास विचारणा केली असता विभागाने याबाबतचे अनुपालन सादर केलेले नसल्याने आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

1. श्री. सिद्धेश्वर बहुउद्देशीय महिला विकास संस्थेचा मुदतवाढीचा अर्ज दि.27/7/1998 केलेला असल्यामुळे भूमी व मालमत्ता विभागाकडून मुदतवाढीचे दि.13/8/1998 दि. 12/11/1998 तसेच दि.5/10/1999 अशी तीन पत्रे देऊन सुध्दा श्री. सिद्धेश्वर बहुउद्देशीय महिला विकास संस्थने रक्कम रु.7920/- व रु.2400/- असे एकूण रु.10,320/- महानगरपालिकेत जमा केलेले नाहीत. व दि.3/2/1998 ते दि.2/1/1999 या कालावधीचा करारनामा केलेला नसल्याने नियमानुसार सदर जागा ताब्यात घेणे आवश्यक असताना तशी कार्यवाही करण्यात आली नाही.

2. वाढवून दिलेली मुदत हि दि. 2/1/1999 रोजी संपलेली असून दि. 2/1/1999 पासून दि.2/11/1999 अखेर 9 महीने अनधिकृतपणे जागेचा वापर चालू असल्याने अनधिकृत वापराची आकारणी रु.6480/- भरणे बंधनकारक असून संपूर्ण् थकबाकी रक्कम रु.16800/- त्यावरील दंडव्याज रु.2520/- असे एकूण रु.19,320/- सात दिवसाच्या आत न भरल्यास जागा सक्तीने ताब्यात घेण्यात येईल अशा सुचना दिलेल्या असतांना संपूर्ण रक्कम जमा न करता दिनांक 23/2/2000 रोजी रक्कम रु.7000/- जमा करण्यात आल्यामुळे रक्कम रु.12320/- एवढी थकबाकी शिल्लक राहिली.

3. भूमी व मालमत्ता जा.क्र.11/3/1937 दि.1/2/2000 च्या पत्रान्वये दि.3/2/1998 ते दि.2/1/199 हया 11 महीन्याच्या कालावधीत अनधिकृत वापर दंड रु.720/- प्रतीमहा प्रमाणे रु.10,320/- व दि.3/1/199 ते दि.31/12/199 हया 9 महीन्याच्या कालावधी करिता रु.8640/- व त्यावरील दंड रु.2844/- थकबाकी रक्कम सात दिवसातच्या आत भरली नसल्याने त्याच्यावर कोणतीही कार्यवाही करण्यात आली.

4. सदर संस्थेने आजतागायत मुदतवाढी करिता जिल्हाधिकारी कार्यालयाकडील परवानगी व नुतनीकरणाचे आदेश सादर केलेले नाहीत. महानगरपालिका प्रशासनाने सदरच्या जागेचे थकीत भाडे

वसुली करिता जा.क्र.11/3/2204 दि.20/3/2003 नंतर प्रयत्न केल्याचे नस्ती वरून दिसून येत नाही.
5. दि 20/3/2013 च्या पत्रान्वये लॅड फी चे नियमाप्रमाणे रु.880/- इतके भाडे दरमहा होत असल्याने मार्च 2003 अखेर पर्यंत रु.40,900/- इतकी रक्कम पत्र मिळालेपासून 3 दिवसाचे आत रोखीने भरण्यात यावी अन्यथा जागा जाब्यात घेण्यात येईल अशी सुचना देऊन सुद्धा संबधीत संस्थेकडून प्रलंबीत असलेली रक्कम भरलेली नसल्याने कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही.
6. मार्च 2003 अखेर पर्यतचे भाडे रु.40,900/- व दि.1/4/2003 ते मार्च -2014 पर्यंत एकूण 12 वर्ष कालावधीचे प्रतीमहा भाडे रु.880/- प्रमाणे रु.126720/- संबंधीत संस्थेकडे अनधिकृत वापराबाबत दंड व्याजापोटी रक्कम रु.167620/- अधिक 15% व्याजाची रक्कम दि.31/3/2014 अखेर वसुल करणे शिल्लक आहे.
7. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 81 ब (1) (अ) (एक) नुसार भोगवटा करणा-या व्यक्तीने त्याच्याकडून कायदेशीररित्या येणे असलेले भाडे किंवा कर दोन महिन्याच्या अधिकच्या मुदतीत दिलेली नसल्यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 81 ब (2) अन्वये काढून टाकण्याबाबत नोटीस देणे आवश्यक असून , पोटनियम 3 अन्वये नोटीशीचे पालन करण्यास कसूर करणा-या व्यक्तीस काढून टाकण्याचा अधिकार असताना त्या प्रमाणे कार्यवाही न करता जागा नियमबाह्यरित्या भोगवटादाराच्या ताब्यात ठेवली आहे.
8. वसुलपात्र रक्कम रु.1 ,67,620/- अधिक 15% व्याजाची रक्कम रु.25153/- असे एकूण रक्कम रु.1,92,763/- वसुल करण्यात आलेली नाही.

FDSDKPM7201 (Ref No : 104, Hmm No : 123)

## *75 2013-2014 स्टेशनरी साहीत्य खरेदीमधील अनियमितता*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 06**

*लेखा शीर्ष : सामान्य प्रशासन विभा मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 268659.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 268659.00/-

***उद्योग उर्जा व कामागार विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र भाखंस10/3/2635/उद्योग-6 दिनांक 16/7/1993 नुसार वर्षिक खरेदी ही रुपये 50,000/- पेक्षा जास्त असल्यास निविदा प्रक्रिया राबवुन खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच उद्योग उर्जा व कामागार विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.भाखंस/1088/2512/उद्योग-6 दिनांक 2/01/1992 मधील परिच्छेद क्र.8(3) ई नुसार वर्षामधील आवश्यकतेनुसार वस्तु खरेदी करण्यासाठी***

***दरवर्षी संख्या करारापेक्षा दरकरार करणे आवश्यक असताना अशी पध्दत न राबविता एकूण रु.2,68,659/- ची खरेदी रु.3000/- चे आत असे 101 तुकडे पाडून केलेली आहे.***

सोलापुर महानगरपालिकेच्या सामान्य प्रशासन विभागामार्फत खरेदी करण्यांत आलेल्या स्टेशरी साहित्य,संगणक फॅक्स,झेरॉक्स,मशिन प्रिन्ट्रर,टोनर इत्यादिची दुरुस्ती सुटेभागया बाबीवर सन 2013-14 या वित्तीय वर्षामध्ये 101 प्रमाणकाद्वारे रक्कम रु.2,68,659/- खरेदी करण्यांत आली असल्याचे आढळून आले आहेत. सदर खर्चाचे लेखापरिक्षणामध्ये आढळून आलेल्या अनियमितता बाबत अर्धसमास पत्र क्र.68/दिनांक 22/11/2017 अन्वये कळविले असता विभागाने त्यांचे अनुपालन दिनांक 09/02/2018 रोजी सादर केले आहे. अनुपालन सयुक्तिक नसल्यामुळे पुढील आक्षेप कायम ठेवण्यांत येत आहे.

सदर साहित्य कोणत्या दुकानदाराकडून खरेदी केले त्याचा तपशील व उपप्रमाणके उपलब्ध करुन दिलेले नाही.

उद्योग उर्जा व कामागार विभाग यांचेकडील शासन निर्णय ब्-10/3/2635/उद्योग-6 दिनांक 16/07/1993 नुसार वर्षिक खरेदी ही रुपये 50,000/- पेक्षा जास्त असल्यास निविदा प्रक्रिया राबवुन खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच उद्योग उर्जा व कामागार विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.भाखंस/1088/2512/उद्योग-6 दिनांक 2/01/1992 मधील परिच्छेद क्र.8(3) ई नुसार वर्षामधील आवश्यकतेनुसार वस्तु खरेदी करण्यासाठी दरवर्षी संख्या करारापेक्षा दरकरार करणे आवश्यक असताना अशी पदधत न राबविता एकूण रु.2,68,659/- खरेदी रु.3000/- चे आत असे 101 तुकडे पाडून संगणक साहित्य व स्टेशनरी साहित्याची खरेदी केलेली आहे.

FDSJRDM6801 (Ref No : 87, Hmm No : 68)

## *76 2013-2014 स्टेशनरी खरेदीमधील अनियमितता (निविदा मागवून केलेली खरेदी)*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 06**

*लेखा शीर्ष : सामान्य प्रशासन विभा मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 347606.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 347606.00/-

***सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्र.मतंसं/नस्ती-2012/प्र.क्र.273/39 दिनांक 16/01/2013 नुसार ई निविदा काढलेली नाही. निविदेसोबत तांत्रिक लिफाफा जोडण्यास मनपाने जाहीर निविदा काढताना नमुद करणे आवश्यक होते. त्यामध्ये मक्तेदाराचे महानगरपालिकेकडून मुंबई दुकान कायदा 1948 नुसार दुकानाचे नोंदणी***

***केलेली नाही. तसेच व्हॅट रजिष्टेशन व नंबर प्राप्त करुन घेणे आवश्यक होते. तसेच आयकर विवरणपत्र आवश्यक होते. परंतु ती घेण्यात आलेली नाही. उद्योग उर्जा व कामागार विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.भाखंस /1088/2512/उद्योग-6 दिनांक 2/01/01992 मधील परिच्छेद क्र.8(3) ई नुसार वर्षामध्ये आवश्यकतेनुसार वस्तु खरेदी करण्यासाठी दरवर्षी संख्या करारापेक्षा दरकरार करणे आवश्यक आहे, त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही. निविदा प्रक्रिया अटी व शर्तीनुसार राबविण्यांत आलेली नाही.***

वित्तीय वर्ष 2013-14 करीता महानगरपालिका सोलापुर येथे जाहीर निविदा मागवून दिनांक 30/3/13 ला दुपारी 3.50 वाजता तीन निविदा मुख्य लेखारिक्षक यांचे समक्ष उघडण्यात आल्या आहेत. त्या खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | मक्तेदाराचे नांव |
|---|---|
| १ | श्रीलक्ष्मी एटंरप्राईजेस |
| २. | रमन एजन्सीज |
| ३ | सुप्रिया ट्रेडींग कपंनी |

श्रीलक्ष्मी एटंरप्राईजेस (स्टेशनरी साहित्य 1 ते 17) रक्कम रु.174979/- व सुप्रिया ट्रेडींग कपंनी रक्कम रु.347606/- (स्टेशनरी साहित्य 1 ते 16) यांची न्युनतम दराची निविदा अनुक्रमे मंजुर करण्यांत आलेली आहे.

सदरबाबत खरेदीची नस्तीची तपासणी केली व आढळून आलेल्या अर्धसमास ज्ञापन क्र.69 दिनांक 22/11/2017 अन्वये कळविले असता विभागाने त्यांचे पत्र क्र.सआस/साप्र-1/602 दि.9/02/2018 अन्वये अनुपालन सादर केले आहे. अनुपालन सयुक्तिक नसल्यामुळे पुढील आक्षेप कायम ठेवण्यांत येत आहे.

1) सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्र.मतंसं/नस्ती-2012/प्र.क्र.273/39 दिनांक 16/01/2013 नुसार ई निवीदा काढलेली नाही. निविदेसोबत तांत्रिक लिफाफा जोडण्यास मनपाने जाहीर निविदा काढताना नमुद करणे आवश्यक होते. त्यामध्ये मक्तेदाराचे महानगरपालिकेकडून मुंबई दुकान कायदा 1948 नुसार दुकानाचे नोंदणी केलेली नाही. तसेच व्हॅट रजिष्टेशन व नंबर प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे तसेच आयकर विवरणपत्र आवश्यक आहे. परंतु ती घेण्यात आलेली नाही.

2) निविदा मंजुर करणेपुर्वी बाजारभावानुसार वस्तु/मालाची किमंत काढणे आवश्यक होती.

3) मक्तेदारांचा अनुभवाचा दाखला निविदेसोबत नाही.

4) तुलनात्मक तक्ता जोडला आहे. तथापी त्यावर सहाय्यक आयुक्त (स) यांची स्वाक्षरी नाही

5) उद्योग उर्जा व कामागार विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.भाखंस /1088/ 2512/उद्योग-6 दिनांक2/01/01992 मधील परिच्छेद क्र.8(3) ई नुसार वर्षामधील आवश्यकतेनुसार वस्तु खरेदी करण्यासाठी दरवर्षी संख्या करारापेक्षा दरकरार करणे आवश्यक आहे त्याप्रमाणे कार्यवाही झाल्याचे दिसुन येत नाही

6) सामान्य प्रशासनविभाग भांडार शाखा येथे साठा रजिष्टर स्टेशनरीबाबत ठेवणे आवश्यक आहे. तथापि साठा रजिष्टर ठेवलेले नाही. फक्त वाटप रजिष्टर आहे. त्यावर सुदधा वरिष्ट अधिकारी कार्यालयीन अधिक्षक यांची स्वाक्षरी नाही. साठा रजिष्टर नसल्यामुळे स्टेशनरी खरेदीपुर्वी

तथा टेंडर काढयापुर्वी भांडारामध्ये किती स्टेशरी साठा शिल्लक होता हे समजुन येत नाही.

7) खरेदी तुकडे तुकडयाने केली आहे.

8) मुल्यवर्धीत कर प्रमाणपत्र नसल्यामुळे देयकातुन 5% व्हॅट कपात करणे आवश्यक असताना 2% दराने कपात केलेला आहे. त्यामुळे उर्वरीत रक्कम रु.5249/- संबधीत ठेकेदार यांचेकडून वसुल करावी.

9) सुप्रिया ट्रेडींग कपंनी यांचे रक्कम रु.347606/- चे प्रमाणके उपलब्ध झाली नाहीत.

FDSJRDM6801 (Ref No : 88, Hmm No : 69)

## *77 वित्तीय वर्ष 2013-14 या कालावधीत नागरी हिवताप योजनेच्या अंमलबजावणीतील अनियमिततेबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**अनियमितता संख्या : 3**

*लेखा शीर्ष : आरोग्य विभाग मनपानिधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 2455000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 2455000.00/-

***मलेरिया विभागातील शासनमान्य एकूण 8 वरिष्ठ क्षेत्र कार्यकर्ता झोन ऑफीसकडे कार्यरत असल्याचे हजेरीपत्रकातील नोंदीवरुन तसेच विभागाने दिलेल्या माहीतीवरुन दिसुन येते. वरिष्ठ क्षेत्र कार्यकर्ताकडे तीन फवारणी सेवकावर देखरेख व नियंत्रण करण्याचे काम आहे. सदर कर्मचारी वित्तीय वर्ष 2013-14 या कालावधीत मलेरिया विभागातील काम न करता झोन ऑफीसमध्ये काम करतात. सदर बाबत शासन अनुदान मलेरिया विभाग व अळीनाशक फवारणी कार्यक्रमावर देखरेखसाठी शासनकडून सहाय्यक अनुदानाची प्रतीपुर्ती होत असल्याने त्यांचा वापर शासनाची मान्यता न घेता अन्य विभागासाठी नियमबाहयरित्या करीत असल्याचे स्पष्ट होते तसेच वरील नियमबाहयतेबाबत सदर कर्मचा-यावर 2013-14 मध्ये वेतनावर करणेत आलेल्या एकूण रक्कम रु.2455000/- शासनास भरणा करणे आवश्यक आहे.***

**नागरी हिवताप योजनेकरीता शासनाने एकूण 44 पदे मंजूर केली असून, त्यापैकी 6 पदे रिक्त आहेत त्यापैकी जीवशास्त्राज्ञ 01 पद मार्च 2011 पासुन रिक्त आहे. तसेच क्षेत्र कार्यकर्ता 5 पदे रिक्त असुन सदर पदांना शासनाकडून 100 टक्के अनुदान मंजूर असताना ती पदे वित्तीय वर्ष 2013-14 या कालावधीत भरणेत आलेली नाहीत.**

**मलेरिया विभागातील शासनमान्य एकूण 8 वरिष्ठ क्षेत्र कार्यकर्ता झोन ऑफीसकडे कार्यरत असल्याचे हजेरीपत्रकातील नोंदीवरुन तसेच विभागाने दिलेल्या माहीतीवरुन दिसुन येते. वरिष्ठ क्षेत्र**

**कार्यकर्ताकडे तीन फवारणी सेवकावर देखरेख व नियंत्रण करण्याचे काम आहे. सदर कर्मचारी वित्तीय वर्ष 2013-14 या कालावधीत मलेरिया विभागातील काम न करता झोन ऑफीसमध्ये काम करतात. सदर बाबत शासन अनुदान मलेरिया विभाग व अळीनाशक फवारणी कार्यक्रमावर देखरेखसाठी शासनकडून सहाय्यक अनुदानाची प्रतीपुर्ती होत असल्याने त्यांचा वापर शासनाची मान्यता न घेता अन्य विभागासाठी नियमबाहयरित्या करीत असल्याचे स्पष्ट होते तसेच वरील नियमबाहयतेबाबत सदर कर्मचा-यावर 2013-14 मध्ये वेतनावर करणेत आलेल्या एकूण रक्कम रु.2455000/- शासनास भरणा करणेत यावी.**

**वरीष्ठ क्षेत्र कार्यकर्ता व क्षेकत्रा कार्यकर्ता ही भागामध्ये फिरतीची पदे असलेने त्यांनी केलेल्या कामाची दैनंदिनी ठेवणे आवश्यक असता ती ठेवण्यात आली नाही. वरील असलेल्या त्रुटीबाबत विभागाला अर्धसमास ज्ञापन क्र.108 दिनांक 22-01-2018 खुलासा सादर करण्याबाबत कळविले असता विभागाने त्यांचे पत्र क्र.नाहियो जा.क्र. 541 दिनांक 08/02/2018 रोजी खुलासा सादर केलेला आहे. खुलासा सयुक्तिक नसल्यामुळे वरील आक्षेप कायम ठेवण्यांत येत आहे.**

FDSJRDM6801 (Ref No : 93, Hmm No : 108)

## *78 2013-2014 मध्ये पुरुष सेवकांसाठी गणवेश खरेदीमधील अनियमितताबाबत..*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 06**

*लेखा शीर्ष : भांडार विभाग मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 1739106.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1739106.00/-

***वित्तीय वर्ष 2013-14 पुरुष सेवकांसाठी गणवेश खरेदीबाबत सामान्य प्रशासन विभाग (भांडार शाखा) येथील अभिलेख्याची तपासणी केली असता शासन निर्णय दिनांक 2/01/1992 नुसार पुरुष गणवेश महाराष्ट राज्य वस्त्र उदयोग महामंडळ यांचेकडून खरेदी करणे आवश्यक असताना जाहीर निविदा मागवून खाजगी पुरवठाधारकांकडून खरेदी करण्यांत आलेली आहे. हे नियमबाहय आहे. एकाच गुणवत्तेच्या कापडाच्या दरकराची तुलना न होता वेगवेगळया Qualities च्या कापडाच्या दरांची तुलना केली व त्याची गुणवत्ता व दर नेहमी भिन्नअसल्यामुळे कापडाची किंमत देखील भिन्य ठरते, त्यामुळे निविदा प्रक्रिया सदोष ठरली आहे. नवीन निविदा मागविण्यापुर्वी वित्तीय वर्ष 2012-13 चा पुरुष गणवेश शिल्लक साठा वजा करुन नवीन खरेदी करणे आवश्यक होते. तथापि तसे न करता नवीन संपुर्ण गणवेश खरेदी केलेला आहे. त्यामुळे महानगरपालिकेचा रक्कम रु.112143/- चा निधी निष्फळ ठरला आहे. Test Report नसतांना बिले अदा केल्याने रक्कम रु.1739106/- आक्षेपित ठेवण्यांत येत आहे.प्रशासकिय मान्यता रु.1670000/- असुन खरेदी***

***रक्कम रु.1739106/- ची केलेली आहे. त्यामुळे प्रशासकिय मान्यतेपेक्षा रु.69106/- ची जादा खरेदी केली आहे. खर्चाची प्रमाणके लेखापरिक्षणास उपलब्ध झाली नाही.***

महानगरपालिका सोलापुर येथे सन 2013-14 मध्ये जाहीर निविदा मागवून पुरुष सेवकांसाठी गणवेश खरेदीसाठी तीन निविदा प्राप्त झालेल्या आहेत. अनुक्रमे फर्निसिंग, धनलक्ष्मी एंटरप्रायजेस व संपत कुमार सोमाणी होते. त्यापैकी न्युनतम दर निविदाकार संपतकुमार सोमाणी यांची खालीलप्रमाणे निविदा दिनांक 12/08/2013 .ला मंजूर केली आहे

| अ.क्र. | तपशील | संख्या (मीटर) | टेंडर दर | वाटाघाटीचे दर | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| 1 | किरमीजी टेरीकॉट सुटींग | 9900 | 119 | 117 | 1158300 |
| 2 | पांढरा टेरीकॉट सुटींग | 1336 | 119 | 117 | 156312 |
| 3 | खॉकी टेरीकॉट सुटींग | 1802 | 119 | 117 | 210834 |
| 4 | नीळा टेरीकॉट शर्टिंग | 630 | 55 | 55 | 34650 |
| 5 | नीळा टेरीकॉट सुटींग | 1530 | 119 | 117 | 179010 |
| | मुल्य निविदेतील स्पेसिफिकेशन प्रमाणे | | | | 1739106 |

सदरबाबत खरेदीची नस्तीची तपासणी केली असता आढळून आलेल्या अनियमिततेबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.67 दिनांक 22/11/2017 अन्वये कळविले असता विभागाने त्यांचे पत्र क्र.सआस/साप्र-1/600 दिनांक 09/02/2018 रोजी अनुपालन सादर केले आहे. अनुपालन सयुक्तिक नसल्यामुळे पुढील आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

1) वित्तीय वर्ष 2013-14 पुरुष सेवकांसाठी गणवेश खरेदीबाबत सामान्य प्रशासन विभाग (भांडार शाखा) येथील अभिलेख्याची तपासणी केली असता शासन निर्णय दिनांक 2/01/1992 नुसार पुरुष गणवेश महाराष्ट राज्य वस्त्र उदयोंग महामंडळ यांचेकडून खरेदी करणे आवश्यक असताना जाहीर निविदा मागवून खाजगी पुरवठाधारकांकडून खरेदी करण्यांत आलेली आहे. हे नियमबाहय आहे.

2) सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्र.मतंसं/नस्ती-2012/प्र.क्र.273/39दिनांक 16/01/2013 नुसार 3 लाखावरील खरेदीसाठी ई निवीदा काढलेली नाही. निविदा काढण्यापुर्वी (अपसेट प्राईज) बाजार मुल्य काढलेले नाही. बाजार मुल्य काढले असते तर त्याप्रमाणे निविदा मधील न्युनतम दर व बाजार मुल्य यांचेशी तुलना करुन वाटाघाटी केल्या असत्या तर महनगरपलिका निधीची बचत झाली असती.

3) मनपाने कापडाच्या गुणवत्तेबाबत निविदेत उल्लेख (उदा) जाडी, लांबी, Strenth वैगेरे करुन निविदा मागविणे आवश्यक होते. परंतु त्याप्रमाणे कार्यवाही न केल्याने निविदा प्रसिध्दी करतांना मक्तेदारानी कापड प्रकार वेगवेगळा न दर्शविता तो एकाच कंपनीचा नमुद करणे आवश्यक होते. तथापी निविदाकारांनी रेमंड विमल, बॉम्बे डाईंग, टुलाईन ॲक्टीवा, रॉयल्टी या वेगवेगळया प्रकारचे कापड निविदामध्ये नमुद केला. त्यामुळे एकाच गुणवत्तेच्या कापडाच्या दरकराची तुलना न होता

वेगवेगळया Qualities च्या कापडाच्या दरांची तुलना केली व त्याची गुणवत्ता व दर नेहमी भिन्य असल्यामुळे कापडाची किंमत देखील भिन्य ठरते, त्यामुळे निविदा प्रक्रिया सदोष ठरली आहे.

4) मंजूर निविदाकार संपतकुमार सोमाणी यांचे सेलटॅक्स सर्टिफिकेट व पॅनकार्डवरील नावामध्ये बदल आहे. तरीही त्यांना पात्र ठरवले आहे.

5) निविदा मंजुरीचा प्रस्ताव स्थायी समितीकडे पाठविला नाही.

6) निविदेतील अट क्र. 25 नुसार मंजुर निविदाकार यांचा पुरुष गणवेशाचा कापड टेक्स्टाईल युनीटकडून (Test Report) तपासुन कापडाचा दर्जा कसा आहे तो प्राप्त करुन घेतलेला नाही. त्यामुळे कापडाच्या योग्यतेची खात्री पटत नाही. Test Report नसतांना बिले अदा केल्याने रक्कम रु.1739106/- आक्षेपित ठेवण्यांत येत आहे. पुरुष गणवेशबाबतचा साठ रजिष्टर भांडार शाखा सा.प्र विभाग कडील तपासला असता मार्च 2013 ला पुरुष गणवेश शिल्लक साठा खालीलप्रमाणे दिसुन येते.

| अ.क्र. | तपशील | शील्लक साठा (नग) | दर प्रती) (नगाप्रमाणे | रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | खाकी टेरीकॉट शुटींग मी 7.5 | 22 | 117 | 2574 |
| 2 | खाकी टेरीकॉट शुटींग .मी 6 | 4 | 117 | 68 |
| 3 | किरमीजी टेरीकॉट सुटिंग मी 7.5 | 716 | 117 | 83772 |
| 4. | किरमीज टेरीकॉट सुटिंग 5 मी. | 21 | 117 | 2457 |
| 5 | पाढरा टेरीकॉट सुटिंग मी 7.5 | 9 | 117 | 1053 |
| 6 | पाढरा टेरीकॉट सुटिंग 5 मी. | 56 | 117 | 6552 |
| 7 | निळा टेरीकॉट सुटिंग मी 4.50 | 101 | 117 | 11817 |
| 8 | निळा शर्टींग मी 3.5 | 35 | 55 | 1925 |
| 9 | निळा शर्टींग .मी 2.5 | 35 | 55 | 1925 |
| | एकूण रक्कम रु. | | | 112143 |

वित्तीय वर्ष 2013-14 मध्ये सोलापुर मनपाने नवीन निविदा मागविण्यापुर्वी वित्तीय वर्ष 2012-13 चा पुरुष गणवेश शिल्लक साठा वजा करुन नवीन खरेदी करणे आवश्यक होते. तथापि तसे न करता नवीन संपुर्ण गणवेश खरेदी केलेला आहे. त्यामुळे महानगरपालिकेचा रक्कम रु.112143/- चा निधी निष्फळ ठरला आहे.

7) प्रशासकिय मान्यता रु.1670000/- असुन खरेदी रक्कम रु.1739106/- ची केलेली आहे. त्यामुळे प्रशासकिय मान्यतेपेक्षा रु.69106/- ची जादा खरेदी केली आहे. ज्या कामगारांना गणवेशाचे कापड वाटप केलेले आहे. त्याची पोहोच घेतलेली नाहीत.त्यामुळे गणवेश कापड वाटपाची खात्री पटत नाही.

8) खर्चाची प्रमाणके लेखापरिक्षणास उपलब्ध झाली नाही.

## *79 सोलापुर महानगरपालिका वित्तीय वर्ष 2013-14 मधील सेवकासांठी पादत्राणे खरेदीबाबत अनियमितता*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 06**

*लेखा शीर्ष : भांडार विभाग मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 598633.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 598633.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 1950.00/-

***संत रोहीदास चर्मोउदयोग विकास महामंडळ यांच्याकडून Vat Registration तसेच आयकर विवरणपत्र घेतलेले नाही. पात्र सेवकांना सन मार्च 2015 पर्यंत किती पादत्राने वाटप केले व वाटपाअंती किती साठा शिल्लक आहे, हे साठा नोंदवहीवरुन समजुन येत नाही. खर्चाची प्रमाणके लेखापरिक्षणास उपलब्ध झाली नाहीत. माल 78 दिवस विलंबाने दिल्यामुळे करारातील अटीनुसार प्रति दिवस 25/- दंड म्हणून रक्कम रु.1950/- संत रोहीदास चर्मोउदयोग विकास महामंडळ यांचेकडून वसुल करुन महानगरपालिका निधीमध्ये जमा करावी.***

सोलापुर महानगरपालिकामधील गणवेशपात्र सेवकांना 2 वर्षातुन एकदा पादत्राणे पुरविली जातात. सदर सेवकांसाठी मा. शासनाचे अंगिकृत संस्था असलेले संत रोहीदास चर्मोउदयोग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादीत मुबई (लिडकॉम) महाराष्ट्र शासनाचा उपक्रम यांचेकडून पादत्राणे खरेदी करण्यांत येते. त्या अनुसरुन संबधीत संस्थेचे दरपत्रक मागविले असता त्यांचे दरपत्रक 2012-13 साठी असलेले दर वित्तीय वर्ष 2013-14 करीता लागू राहतील व त्याप्रमाणे मालाचा पुरवठा केला जाईल असे ठरले.

| अ.क्र. | पादत्राणे खरेदीचा तपशिल | मागणी (जोडप्रमाणे) | दर (प्रति जोडप्रमाणे) | एकूण रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| 1 | जेन्टस चप्पल क्रोम फोल्डींग अप्परसह | 1350 | 211.32 | 285282 |
| 2 | लेडीज चप्पल क्रोम फोल्डींग अप्परसह | 800 | 147.71 | 118168 |
| 3 | ऑक्सफर्ड शूज लेदर सोलसह | 250 | 604.95 | 151237.50 |
| 4 | पठाणी सॅन्डल लेदर सोलसह | 05 | 533.50 | 2667.50 |
| 5 | जोधपुरी शूज लेदर सोलसह | 60 | 687.96 | 41277.60 |
| | Total | | | 598633 |

सदर प्रस्तावाला स्थायी समिती ठराव 197 दिनांक 07-09-13 ने मंजूरी मिळाली. तसेच मा.

आयुक्त यांची दिनांक 25-9-2013 ला मान्यता आहे.

सदर खर्चाचे लेखापरिक्षणामध्ये आढळून आलेल्या अनियमिततावाबत अर्धसमास पत्र क्र76/दिनांक 24-11-2017 अन्वये कळविले असता विभागाने त्यांचे पत्र क्र.सआस/साप्र-1/603 दिनांक 09/02/2018 रोजी अनुपालन सादर केले आहे. अनुपालन सयुक्तिक नसल्यामुळे पुढील आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

7) संत रोहीदास चर्मोउदयोग विकास महामंडळ यांच्याकडून Vat Registration तसेच आयकर विवरणपत्र घेतलेले नाही.

8) भांडारशाखा येथील साठा नोंदवही तपासली असता वित्तीय वर्ष 2013-14 ला पादत्राने यांचा किती शिल्लक साठा भांडारामध्ये होता. तसेच पात्र सेवकांना सन मार्च 2015 पर्यंत किती पादत्राने वाटप केले व वाटपाअंती किती साठा शिल्लक आहे. हे साठा नोंदवहीवरुन समजुन येत नाही.

9) संत  रोहीदास चर्मोउदयोग विकास महामंडळ यांनी वर्क ऑर्डर दिनांक 10/102013 च्या दिनांकापासुन 2 महीन्यामध्ये दिनांक 10/12/2013 ला सदर साठा महानगरपाकिका यांना देणे आवश्यक असताना सदर माल महानगरपालिकेत दिनांक 28/02/2014 ला उशिराने प्राप्त झाला. सदर माल 78 दिवस विलंबाने दिल्यामुळे करारातील अटीनुसार प्रति दिवस 25/- दंड म्हणून रक्कम रु.1950/- संत रोहीदास चर्मोउदयोग विकास महामंडळ यांचेकडून वसुल करुन महानगरपालिका निधीमध्ये जमा करावी.

10) खर्चाची प्रमाणके लेखापरिक्षणास उपलब्ध झाली नाहीत.

FDSJRDM6801 (Ref No : 99, Hmm No : 76)

### *80 गलिच्छ वस्ती सुधारणा (वसूली) विभागाकडून महाराष्ट्र शिक्षण कर व नौकर शाश्वतीकर (रोजगार हमी कर) शासनाकडे जमा न करण्यात आल्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष :00 शासन निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 817703.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 817703.00/-

***शिक्षण व रोजगार हमी उपकर अधिनियम 1962, महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग शासन परीपत्रक क्रमांक- ईडीसी-1097/ प्र.क्र.205/ल-5, मंत्रालय, मुंबई दि. 03/04/1998 नुसार जमिन व इमारती यावरील कराच्या रककमा ज्या आठवडयात वसूल केल्या जातात अशा रकमांचा शासकीय कोषागारात पुढील आठवडा संपण्याच्या आत भरणा करावयाचा आहे. जी नगरपालिका शासकीय कोषागारापासून आठ कि.मी. पेक्षा जास्त अंतरावर असेल अशा नगरपालिकेने वसूल केलेली रकमा नगरपालिकेचे खाते असेल अशा बॅकेंत भरुन पुढील महीन्याच्या 7 तारखेच्या आत शासकीय कोषागारात भरणा करणे आवश्यक आवश्यक आहे. सोलापूर महानगरपालिकेचे गलिच्छ वस्ती सुधारणा (वसूली) विभागाचे वित्तीय वर्ष 2013-14 लेखापरीक्षण केले असता, गलिच्छ वस्ती सुधारणा (वसूली) विभागाकडून महाराष्ट्र शिक्षण कर व नौकर शाश्वती कर (रोजगार हमी कर) याखाली रु. 8,34,390/- एवढी रक्कम वसूल करण्यात आलेली असून सदर रक्कमेमधून 2 टक्के रिबेट रु16,687/- वजा जादा रककम रु.8,17,703/- एवढी रक्कम शासनाकडे जमा करणे आवश्यक असतांना सदर वसूल केलेली रक्कम शासन खाती जमा केलेली खात्री पटली नाही.***

सोलापूर महानगरपालिकेचे गलिच्छ वस्ती सुधारणा (वसूली) विभागाचे वित्तीय वर्ष 2013-14 लेखापरीक्षण केले असता, गलिच्छ वस्ती सुधारणा (वसूली) विभागातील मालमत्ता करदात्याकडून महाराष्ट्र शिक्षणकर व नौकर शाश्वती कर खालील प्रमाणे वसूल केलेला आहे.

| **महिना** | महाराष्ट्र शिक्षणकर | नौकर शाश्वती | **एकूण** |
|---|---|---|---|
| **एप्रिल 2013** | **33938** | **1175** | **35113** |
| **मे 2013** | **31600** | **892** | **32492** |
| **जून 2013** | **42035** | **1654** | **43689** |
| **जुलै 2013** | **51251** | **4645** | **55896** |
| **ऑगस्ट 2013** | **60740** | **3864** | **64604** |
| **सप्टेंबर 2013** | **44301** | **1059** | **45360** |
| **ऑक्टोबर 2013** | **56192** | **4297** | **60489** |
| **नोंव्हेंबर 2013** | **107038** | **3884** | **110922** |
| **डिसेंबर 2013** | **131683** | **4105** | **135788** |
| **जानेवारी 2014** | **77273** | **2421** | **79694** |
| **फेब्रुवारी 2014** | **55492** | **2209** | **57701** |
| **मार्च 2014** | **107010** | **5632** | **112642** |
| **एकूण** | **798553** | **35837** | **834390** |

शिक्षण व रोजगार हमी उपकर अधिनियम 1962, महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग शासन परीपत्रक क्रमांक- ईडीसी-1097/ प्र.क्र.205/ल-5, मंत्रालय, मुंबई दि. 3 एप्रील 1998 नुसार जमिन व इमारती यावरील कराच्या रककमा ज्या आठवडयात वसूल केल्या जातात अशा रकमांचा शासकीय कोषागारात पुढील आठवडा

संपण्याच्या आत भरणा करावयाचा आहे. जी नगरपालिका शासकीय कोषागारापासून आठ कि.मी. पेक्षा जास्त अंतरावर असेल अशा नगरपालिकेने वसूल केलेली रकमा नगरपालिकेचे खाते असेल अशा बॅकेंत भरुन पुढील महीन्याच्या 7 तारखेच्या आत शासकीय कोषागारात भरणा करणे आवश्यक आवश्यक आहे.

गलिच्छ वस्ती सुधारणा (वसूली) विभागाकडून महाराष्ट्र शिक्षण कर व नौकर शाश्विती कर (रोजगार हमी कर) याखाली रु. 8,34,390/- एवढी रक्कम वसूल करण्यात आलेली असून सदर रक्कमेमधून 2 टक्के रिबेट रु.16,687/- वजा जादा रककम रु.8,17,703/- एवढी रक्कम शासनाकडे जमा करणे आवश्यक असतांना, सदर रक्कम शासनाकडे जमा का करण्यात आलेली नाही? याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 95 दिनांक 29/12/2017 अन्वये विभागास विचारणा केली असता विभागाचे पत्र क्र. जाक्र./गवसू/441 दि.03/01/2018 अन्वये खुलासा सादर केलेला आहे. परंतु सादर केलेला खुलासा कोणत्या अर्धसमास पत्राशी संबांधित आहे याचा उल्लेख केलेला नाही. तसेच दैनंदिन भरणा हा किर्द मध्ये उतरवून त्याप्रमाणे एकूण रक्कमेचे एकवट चलन तयार करून त्याचा भरणा बँकेत जमा करून त्याची स्लीप एकवट चलनास जोडूली जाऊन त्यानंतर मा. मुख्यलेखापाल कार्यालयाकडे चलन सुपूर्त करण्यात येत असल्याचे नमूद केलेले आहे. विभागाने सादर केलेला खुलासा संयुक्तिक नसल्याने सदर रक्कम शासनाकडे जमा करण्यात आली किंवा नाही याची खात्री पटली नसल्याने आक्षेप कायम करण्यात आलेले आहेत.

FDSDKPM7201 (Ref No : 106, Hmm No : 95)

## *81 नागरी समुदाय विकास योजना अंतर्गत वित्तीय वर्ष 2013-2014 मधील अभिलेखे उपलब्ध न झाल्याबाबत.....*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष : नागरी समुदाय मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9ब*

***वित्तीय वर्ष 2013 -2014 चे परिच्छेदात नमूद अभिलेखे अपहार झाल्यामुळे पोलीस स्टेशन सांगोला येथे जमा असल्याबाबत खुलाश्यामध्ये नमुद केले आहे. परिणामी अभिलेखे उपलब्ध झाली नाहीत.***

सोलापूर महानगरपालिकेतील नागरी समुदाय विकास योजना अंतर्गत वित्तीय वर्ष 2013-2014 मधील पुढील प्रमाणे नस्ती व अभिलेखे उदा. 1) आय एच एस डी पी योजना - प्राप्त अनुदान नस्ती, लाभार्थीचे ओळख पत्र, लाभार्थीची यादी, बँक स्टेटमेट, कॅश बुक व इतर अनुषंगीक नस्ती. 2) सुवर्ण जयंती शहर रोजगार योजना--प्राप्त अनुदान नस्ती, लाभार्थीची यादी, बँक स्टेटमेट, प्रशिक्षण 3)यु सी डी नागरी समुदाय विकास- प्राप्त अनुदान नस्ती लाभार्थीची यादी, बँक स्टेट,

प्रशिक्षण कार्यक्रम व खर्च व उद्दीष्टे व साध्ये (भौतिक व वित्तीय), कॅश बुक व इतर अनुषंगीक नस्ती लेखापरीक्षणाकरिता उपलब्ध करून देण्याबाबत अर्धसमास क्रमांक 89. दि.22/12/2017 अन्वये कळविले असता विभागाने पत्र क्र.447 दि.29/12/2017 च्या पत्राअन्वये वित्तीय वर्ष 2013 -2014 मध्ये अपहार झाल्यामुळे अभिलेखे पोलीस स्टेशन, सांगोला येथे जमा करण्यात आले असल्याबाबत खुलाशामध्ये नमुद केले आहे. त्यामुळे सदर खुलासा विचारात घेवून अभिलेख उपलब्ध न झाल्याबाबतचा आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे. महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा परीक्षा (सुधारणा) अधिनियम 2011 मधील कलम 6 नुसार अभिलेख्याची लेखापरीक्षणसाठी मागणी करण्यात येवूनही महाराष्ट्र स्थानीक निधी लेखापरीक्षा अधीनियम 2011 मधील कलम 7 नुसार अभिलेखे/ कागदपत्रे लेखापरीक्षणास सादर करण्याची जबाबदारी स्थानिक संस्थेची असून यामध्ये कसूर झाल्यास महाराष्ट्र स्थानिक निधी कलम 8 अन्वये रुपये 25000/- पर्यंतची दांडाची तरतूद आहे. वित्तीय वर्ष 2013 -2014 चे अभिलेखे अपहार झाल्यामुळे पोलीस स्टेशन सांगोला येथे जमा असल्याबाबत खुलाश्यामध्ये नमुद केले आहे. परिणामी अभिलेखे उपलब्ध झाली नाहीत.

DATYMKM6601 (Ref No : 108, Hmm No : 89)

## *82 अतिक्रमण विभागाचे अभिलेखे उपलब्ध न झालेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 02**

*लेखा शीर्ष : अतिक्रमण विभाग मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9ब*

***अतिक्रमण विभागाकडील वित्तीय वर्ष 2013-14 मध्ये विभागाने धोकादायक इमारतीचे पाडकाम झालेले किती प्रकरणे आहेत? तसेच सदर कालावधीत किती अतिक्रमण तोडण्यात आलेली आहे? दंडापोटी किती रक्कम महानगरपालिका लेख्यात जमा झालेली आहे? याची माहिती तसेच महानगरपालिका कार्यक्षेत्रात 4 ज्यु. इंजिनियर कार्यरत असुन त्यांचेकडील धोकादायक इमारतीचे पाडकाम झालेले प्रकरणे मागणी करुन तपासण्याकरीता मिळालेली नाही.***

1)अतिक्रमण विभागाकडील 2013-14 मध्ये विभागाने धोकादायक इमारतीचे पाडकाम झालेले किती प्रकरणे आहेत. तसेच सदर कालावधीत किती अतिक्रमण तोडण्यात आलेली आहे? दंडापोटी किती रक्कम महानगरपालिका लेख्यात जमा झालेली आहे? याचा तपशील व अभिलेखे निरीक्षण

पथकास वारंवार मागणी करुन सुघ्दा तपासण्याकरीता उपलब्ध झालेला नाही.

2) महानगरपालिका कार्यक्षेत्रात 4 ज्यु. इंजिनियर कार्यरत असुन त्यांचेकडील धोकादायक इमारतीचे पाडकाम झालेले प्रकरणे मागणी करुन तपासण्याकरीता मिळालेले नाही. त्यामुळे सदर प्रकरणे निरीक्षण पथकास तपासता आली नाहीत.

अर्धसमास क्र.102 दिनांक 05/01/2018 नुसार उपरोक्त बाबत खुलासा सादर करावयास सांगितले असता विभागाने खुलासा सादर केलेला नाही. त्यामुळे सदर आक्षेप कायम ठेवण्यात आलेला आहे.

FDSJRDM6801 (Ref No : 119, Hmm No : 102)

## *83 1 ते 10 वी पर्यंतच्या मुलींना मोफत बस प्रवास या योजनेतील अनियमितताबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 4**

*लेखा शीर्ष : महिला व बाल कल्याण व मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 7980000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 7980000.00/-

***परिवहन उपक्रमाकडून प्रति विदयार्थी मासिक पास देताना मार्गनिहाय व त्याचे मासिक पास रक्कम निहाय रक्कमेची आकारणी करुन त्याची रक्कम देय असताना सरसकट प्रति महिना रु.665000/- दिल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे प्रतिपूर्तीची रक्कम योग्य असल्याची लेखापरीक्षणास खात्री करता आली नाही. सदरची योजना ही मुलींच्या शिक्षणास प्रोत्साहन देण्याकरीता मुलींना घरापासून शाळेपर्यंतच्या अंतरासाठी मोफत बसप्रवास यासाठी असल्याने शाळेच्या दीर्घ सुटटीच्या वेळी सदरची रक्कम परिवहन उपक्रमास देय नसताना सरसकट प्रती महिना रक्कम रु.665000/- या प्रमाणे 2013-14 मध्ये रु.7980000/- इतकी रक्कम अदा केली. त्यामुळे दिर्घ सुटटी कालावधीतील जादा अदा रक्कम वसूल करणे आवश्यक आहे. हजर व गैरहजर मुलींच्या हजेरीपत्रकानुसार रक्कम अदा करणे आवश्यक असताना पटसंख्या विचारात घेवून रक्कम अदा केली आहे.***

वित्तीय वर्ष 2013-14 या कालावधीत महिला व बाल कल्याण विभागातील 1 ते 10 वी पर्यंतच्या मुलींना मोफत बस प्रवास या योजनेची नस्ती तपासली असता खालील प्रमाणे त्रुटी आढळून आलेली आहे. सोलापुर महानगरपालिकेच्या परिवहन विभागाकडील बसेसमधुन इ. 1 ते 10 वी पर्यंतच्या मुलींना घरापासुन शाळेपर्यंतच्या अंतरासाठी मोफत प्रवास दिला जातो. या योजनेसाठी

वार्षिक तरतुद रक्कम रु.80,00,000/- इतकी असुन खर्च रक्कम रु.7980000/- झालेला आहे.

सर्वसाधारण ठराव क्र.198/30-3-13 आहे. जा.क्र. 3094 दिनांक 26-11-2013 नुसार मुख्यलेखापाल यांचे पत्रांनुसार 80 लाख तरतुद असणेबाबत पत्र आहे.

1) एकूण 2218 मुलीला 20/- प्रमाणे 25 दिवसाचे 500/- प्रमाणे प्रती महिना प्रमाणे परिवहन विभागास रक्कम रु.1109000/- इतका खर्च येत आहे. तथापि महानगरपालिके कडुन प्रति महिना रक्कम रु.665000/- इतकीच रक्कम परिवहन विभागास मिळते. त्यामुळे परिवहन विभागास रक्कम रु.440000/- इतका खर्चाचा भार प्रती महिना सोसावा लागतो.

2) परिवहन उपक्रमाकडून प्रति विदयार्थी मासिक पास देताना मार्गनिहाय व त्याचे मासिक पास रक्कम निहाय रक्कमेची आकारणी करुन त्याची रक्कम देय असताना सरसकट प्रति महिना रु.665000/- दिल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे प्रतिपूर्तीची रक्कम योग्य असल्याची लेखापरीक्षणास खात्री करता आली नाही.

3) सदरची योजना ही मुलींच्या शिक्षणास प्रोत्साहन देण्याकरीता मुलींना घरापासून शाळेपर्यंतच्या अंतरासाठी मोफत बसप्रवास यासाठी असल्याने शाळेच्या दीर्घ सुटटीच्या वेळी सदरची रक्कम परिवहन उपक्रमास देय नसताना सरसकट प्रति महिना रक्कम रु.665000/- या प्रमाणे 2013-14 मध्ये रु.7980000/- इतकी रक्कम अदा केली. त्यामुळे दिर्घ सुटटी कालावधीतील जादा अदा रक्कम वसूल करणे आवश्यक आहे. दिर्घ सुटटी कालावधीत सदरची रक्कम देणे योग्य होणार नाही.

4) हजर व गैरहजर मुलींच्या हजेरीपत्रकानुसार रक्कम अदा करणे आवश्यक असताना पटसंख्या विचारात घेवून रक्कम अदा केली आहे.

वरील असलेल्या त्रुटीबाबत विभागाला अर्धसमास ज्ञापन क्र.125 दिनांक 15/02/2018 अन्वये खुलासा सादर करण्याबाबत कळविले असता विभागाने खुलासा सादर केलेला नाही. त्यामुळे वरील आक्षेप कायम ठेवण्यांत येत आहे

FDSJRDM6801 (Ref No : 121, Hmm No : 125)

## *84 नगर अभियंता मशनरी विभागाच्या वाहनांच्या देखभाल/दुरुस्तीवर करणेत आलेल्या खर्चामध्ये झालेल्या अनियमितताबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष : वाहन व मशनरी विभाग   मनपा निधी*

*अनियमितता कलम  : 9ब*

गुंतलेली रक्कम  रु. 1036583.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1036583.00/-

***उद्योग उर्जा व कामागार विभाग यांचेकडील शासन निर्णय ब्-10/3/2635/उद्योग-6 दिनांक 16/7/1993 नुसार वर्षिक खरेदी ही रुपये 50000/- पेक्षा जास्त असल्यास निविदा प्रक्रिया राबवुन खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच उद्योग उर्जा व कामागार विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.भाखंस/1088/2512/उद्योग-6 दिनांक 2/01/1992 मधील परिच्छेद क्र.8.3 ई नुसार वर्षामधील आवश्यकतेनुसार वस्तु खरेदी करण्यासाठी दरवर्षी संख्या करारापेक्षा दरकरार करणे आवश्यक असताना बजेट तरतुद 2013-14 मध्ये रक्कम रु 50 लाख असताना निविदा प्रक्रिया न राबविता एकूण रु. 1036583/- वाहनावरील सुटे भाग खरेदीचे 77 तुकडे पाडून खाजगी व्यवसायीकाकडुन वाहनाच्या सुटया भागाची खरेदी करण्यांत आलेली आहे. हे नियमबाहय आहे.***

मशनरी विभागाकडील अधिनस्त असलेल्या वाहनावर वित्तीय वर्ष 2013-14 मध्ये सुटया भागावर झालेल्या खरेदीबाबतच्या नोंदी बजेट कंट्रोल नोंदवहीवरुन तपासणी केली असता तुकडे करुन एकूण 77 प्रमाणकाद्वारे महानगरपालिकेच्या मशनरी विभागाच्या अंतर्गत असणा-या वाहनावरील सुटे भाग खरेदीसाठी खाजगी व्यवसायीकाकडुन वाहनाच्या सुटया भागाची तुकडे पाडून खरेदी केलेली आहे. यावर एकूण रक्कम रु.1036583/- खर्च झालेला आहे

उद्योग उर्जा व कामागार विभाग यांचेकडील शासन निर्णय ब्-10/3/2635/उद्योग-6 दिनांक 16/7/1993 नुसार वर्षिक खरेदी ही रुपये 50000/- पेक्षा जास्त असल्यास निविदा प्रक्रिया राबवुन खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच उद्योग उर्जा व कामागार विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.भाखंस/1088/2512/उद्योग-6 दिनांक 2/01/1992 मधील परिच्छेद क्र.8(3) ई नुसार वर्षामधील आवश्यकतेनुसार वस्तु खरेदी करण्यासाठी दरवर्षी संख्या करारापेक्षा दरकरार करणे आवश्यक असताना बजेट तरतुद 2013-14 मध्ये रक्कम रु 50 लाख असताना निविदा प्रक्रिया न  राबविता एकूण रु. 1036583/- वाहनावरील सुटे भाग खरेदीचे एकूण 77 तुकडे पाडून खाजगी व्यवसायीकाकडुन वाहनाच्या सुटया भागाची खरेदी करण्यांत आलेली आहे. हे नियमबाहय आहे.

वरील असलेल्या त्रुटीबाबत विभागाला अर्धसमास ज्ञापन क्र.127 दिनांक 15/02/2018 खुलासा सादर करण्याबाबत कळविले असता विभागाने त्यांचे पत्र क्र.निरंक दिनांक 20/02/2018 अन्वये खुलासा सादर केलेला नाही. खुलासा सयुक्तिक नसल्यामुळे वरील आक्षेप कायम ठेवण्यांत येत आहे

FDSJRDM6801 (Ref No : 123, Hmm No : 127)

## *85 उद्यान विभागाकडील प्राणी संग्रहालयाकरिता दररोज बीफ पुरविणेचे वार्षिक दरकराराबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष  : 2013-2014**

सोलापूर महानगरपालिका

**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 335628.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 335628.00/-

***सोलापूर महानगरपालिकेच्या उद्यान विभागाकडील महात्मा गांधी प्राणी संग्रहालयाकरिता दररोज बीफ पुरविणे करिता प्राप्त निविदेतील सर्वात कमी दर असलेले म.शरीफ अ.माजीर कुरेशी याचेशी चर्चा करुण प्रतिकिलो दर रु.83/- पर्यंत कमी करुण त्यांना सदरचा 15/03/2013 ते 14/03/2014 या कालावधीत बीफ पुरविणेसाठीचा मक्ता दि. 19.03.2013 रोजी रु.100/- च्या स्टॅप पेपरवर करारनामा करण्यात येऊण दि.21/03/2013 रोजी पुरवठा अदेश देण्यात आलेला आहे. प्राप्त निविदेतील दोन मक्तेदारांचा पत्ता एकच असल्याचे सिद्ध होते. तसेच मक्तेदारांची रजिस्ट्रेशन केले असल्याची कागदपत्रे लेखाप्रीक्षनास उपलब्ध झाली नाहीत. त्यामुळे तीन निविदा प्राप्त न झाल्याने सदर निविदा प्रक्रिया रद्द न करताच मक्तेदार म.शरीफ अ.माजीर कुरेशी, याचेशी चर्चा करुण त्यांनाच मक्ता दिलेला आहे. निविदेतील अटी व शर्ती नुसार संबंधित मक्तेदाराने प्राणी संग्रहालयाकरिता दररोज वेळेत व योग्य प्रमाणात बीफ पुरवठा केले बाबतची नोंदवही , देयके व प्रमाणके , व दररोज पुरवठा केलेल्या बीफची तपासणी अहवाल ले लेखापरीक्षणास सादर केलेला नाही.***

सोलापूर महानगरपालिकेच्या उद्यान विभागाकडील महात्मा गांधी प्राणी संग्रहालयाकरिता दररोज बीफ पुरविणे करिता जाहीर निविदा दैनिक पुढारी या स्थानिक वर्तमानपत्रात जाहिरात देऊन दि.27/11/2012 रोजी दुपारी 1.00 वाजेपर्यंत निविदा मुख्यालेखापाल यांचेकडे पाठविण्याबाबत जाहीर प्रसिद्धीकरण केले आहें. त्यानुसार मुख्यालेखापाल यांचेकडे तीन निविदा खालीलप्रमाणे प्राप्त झाल्या होत्या.

| अ.क्र. | मक्तेदाराचे नाव | मक्तेदाराचा पत्ता | मालाचा | प्रतिकिलो दर |
|---|---|---|---|---|
| 1 | म.शरीफ अ.माजीर कुरेशी | 488 दक्षिण सादर बाजार ,सोलापूर | दररोज 25 ते किलो बीफ पुरविणे | रु.85/- |
| 2 | आली जाफर साब मुछाले | बेगम पेठ सोलापूर | दररोज 25 ते किलो बीफ पुरविणे | रु.95/- |
| 3 | म.युसुफ अ.माजीर कुरेशी | 488 दक्षिण सादर बाजार ,सोलापूर | दररोज 25 ते किलो बीफ पुरविणे | रु.90/- |

उपरोक्त प्राप्त निविदेतील सर्वात कमी दर असलेले म.शरीफ अ.माजीर कुरेशी याचेशी चर्चा करुन प्रतिकिलो दर रु.83/-पर्यंत कमी करुण त्यांना सदरचा 15/03/2013 ते 14/03/2014 या कालावधीत बीफ पुरविणेसाठीचा मक्ता दि. 19.03.2013 रोजी रु.100/- च्या स्टॅप पेपरवर करारनामा करण्यात येऊण दि.21/03/2013 रोजी पुरवठा अदेश देण्यात आलेला आहे. लेखा परीक्षणामध्ये आढळून आलेल्या अनियमिततांबाबत लेखापरीक्षणाचेवेळी अर्धसमास ज्ञापन क्रमांक 129 दिनांक 20/02/2018 अन्वये खुलासा विचारणा केला असता विभागाने याबाबत खुलासा केलेला नाही. सदर बाबत

खालीलप्रमाणे लेखापरीक्षणाचे आक्षेप कायम करण्यात आलेले आहेत.
1. निविदेतील अटी व शर्ती नुसार संबंधित मक्तेदाराने प्राणी संग्रहालयाकरिता दररोज वेळेत व योग्य प्रमाणात बीफ पुरवठा केले बाबतची नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध झालेली नाही.
2. निविदा सादर करताना (1) म.शरीफ अ.माजीर कुरेशी, राहणार 488 दक्षिण सादर बाजार ,सोलापूर,व (2) म. युसुफ अ. माजीर कुरेशी, राहणार 488 दक्षिण सादर बाजार लष्कर सोलापूर या दोघांचा पत्ता एकच असल्याचे सिद्ध होते. दोन्हीही मक्तेदारांची रजिस्ट्रेशन केले असल्याची कागदपत्रे लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाहीत. त्यामुळे तीन निविदा प्राप्त न झाल्याने सदर निविदा प्रक्रिया रद्द न करताच मक्तेदार म. शरीफ अ. माजीर कुरेशी, याचेशी चर्चा करुन त्यांनाच मक्ता दिलेला आहे. हे नियमबाह्य आहे.
3. मक्तेदाराने प्राणी संग्रहालयाकरिता दररोज वेळेत व योग्य प्रमाणात बीफ पुरवठा केले बाबतची देयके व प्रमाणके लेखापरीक्षणास उपलब्ध झालेली नाहीत.
4. मक्तेदाराने प्राणी संग्रहालयाकरिता दररोज पुरवठा केलेल्या बीफची तपासणी अहवाल लेखापरीक्षणास सादर केलेला नाही.
आक्षेपाधिन रक्कम रु.335628/-

DATMDSM7101 (Ref No : 127, Hmm No : 129)

## *86 घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत घराघरातून कचरा संकलन, वर्गीकरण व वाहतूक मक्त्यातील अनियामितता.........*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 20**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 29511822.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 5106093.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 23245786.00/-

***सोलापूर महानगरपालिकेचे घनकचरा व्यवस्थापन विभागाकडून लेखापरीक्षणाकरिता अभिलेख उपलब्ध झाले. त्याअनुषंगाने निदर्शनास आलेल्या अनियमितता खालीलप्रमाणे आढळून येते. सदरच्या निविदेचा तांत्रिक लिफाफा व फायनॅन्सीयल बीड उपलब्ध झालेले नाही, सदरच्या कामाचा DPR लेखापरिक्षण करताना उपलब्ध करून देण्यांत आला नाही, 12 व्या वित्त आयोगाकडून रक्कम रु.6,00,39,378/- एवढा निधी प्राप्त झाला असून या कामावरील वार्षिक खर्च रु. 9,39,00,000/-एवढा असल्याने सदर प्राप्त निधी आठ महिन्याकरिता पुरेसा असल्याने उर्वरित कालावधीकरिता निधीची तरतुद कोणत्या लेखाशिर्षातुन करण्यात आली याबाबत माहिती उपलब्ध झाली नाही, शासन निर्णय नगरविकास,विभाग,क्र.घनव्य /1006/ प्र.क्र. 53/नवि.16 दिनांक 26/10/2006 परिच्छेद क्र 28 नुसार कंत्राटदारांना द्यावयाची रक्कमेचे दर हे टनावर आधारित नसावेत असे***

***स्पष्ट नमूद असतांना मनपा ने प्रती टन 650/- प्रमाणे दर मंजुर केले हे नियमबाह्य आहे, सदर कामाचे Third Party Audit करणे आवश्यक असतांना Third Party Audit केलेले आढळून येत नाही, विमा संचालक, शासकीय विमा निधी, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र क्र.प्रविनी -2300/सहविमा/जिप-2 दि.07 जानेवारी 2004 नुसार मंजूर निविदा रकमेच्या 1% विमा कामासाठी व कामगाराच्या सुरक्षेसाठी विमा निधीत भरणे आवश्यक असून 1% प्रमाणे विमा रक्कम वसूल केलेली नाही. त्यामुळे विमा रक्कम रु.1,14,30,393/- वसुल करुन शासकीय विमा निधीकडे भरणा करणे आवश्यक आहे. तसेच उद्योग उर्जा व कामगार विभाग महाराष्ट्र शासन निर्णय क्र.बी सी ए-2009 /प्रक्र 108/ कामगार 7 दिनांक 17/06/2010 नुसार कामगार कल्याण उपकर 1% प्रमाणे उपकरची रक्कम रु.1,14,30,393/- वसुल करुन शासकीय निधीकडे भरणा करणे आवश्यक आहे. शासन निर्णय 2006 च्या निर्णयातील परिच्छेद 78 ते 80 अ नुसार ही प्रक्रिया आर्थिकदृष्ट्या परवडणारी असावी यासाठी सर्व स्तरावरील कचरा उत्पादकाकडून सेवाकर वसुलीबाबत कार्यवाही केलेली नाही, सदरच्या कच-याव्दारे डेब्रिज गोळा करावयचा नसल्याने स्वतंत्ररित्या डेब्रिज विल्हेवाट बाबत कोणत्या उपाययोजना केल्यात? हे नस्तीमध्ये आढळून येत नाही, वाहनाचे लॉगबुक लेखापरीक्षणास उपलब्ध झालेली नाही उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे पत्र नस्तीला आहे परंतु कॅाम्पॅटर चे भाडे दर पत्रामध्ये नमूद नाही. P.W.D. मॅन्युअलतील पृष्ठ क्र 87 परिच्छेद क्र 214 नुसार सुरक्षा रक्कम ही 50% काम सुरु करण्यापूर्वी व 50% बिलातून कपात करणे आवश्यक आहे, परंतु देयकाच्या रक्कमेच्या 2% रक्कम वसूल केलेली आहे, सुरक्षा रक्कमेचे बँक FD तपासणी करिता उपलब्ध झालेली नाही, वजन काटा प्रमाणीत केल्याचे प्रमाणपत्र उपलब्ध झालेली नाही, वजनाची बिले पुरविण्यात आलेली नाहीत, सोलापूर बॉयोएर्नजी वेस्ट 300 टन अधिकवजा 20 % असून किती कचरा बॉयोएर्नजी वेस्टला दिला याचा अभिलेख उपलब्ध झालेला नाही, बजेट अभिप्राय जा क्र मुले-6/359 दि. 27/12/2011 नुसार रक्कम रु.60039378/- एवढी तरतूद होती, याऐवजी डेब्रिज व हिरवा कचरा यासाठी किती दर ठरविला व किती रक्कम खर्च केली याची माहिती उपलब्ध झालेली नाही. थर्डपार्टी तांत्रिक लेखापरीक्षण याचा उल्लेख करारामध्ये नाही. शासन निर्णय नगरविकास,विभाग,क्र. घनव्य /1006/ प्र.क्र.53/नवि.16 दिनांक 26/10/2006 परिच्छेद क्र 59 ते 69 मध्ये असलेल्या तरतुदी नुसार खाजगी क्षेत्राचा सहभाग असणे आवश्यक आहे, परंतू त्यानुसार अंबलबजावणी केलेली आढळून येत नाही. सर्व कचरा वाहनाचे Net weight (रिकाम्या गाड्याचे) वजन प्रमाणीत केल्याबाबतचा अभिलेख नस्तीत आढळत नाही. मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 अनुसूची-1 मधील तरतुदी नुसार करारनामा करतांना 10 लाखाच्या कामाकरिता रु.100/- व त्यापुढील प्रत्येक 1 लाखाकरिता 100/- यानुसार रक्कम रु.114,30,39,315/- च्या करारनाम्याकरिता फक्त रक्कम रु 1,15,000/- च्या मुद्रांक शुल्कावर करारनामा केलेला असल्याने, मुद्रांक शुल्काची रक्कम रु.385000/- वसूलपात्र आहे.***

सोलापूर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत घराघरातून कचरा संकलन, वर्गीकरण व वाहतूक याकरिता जाहीर सोलापूर महानगरपालिकेकडून निविदा मागविल्या असता तीन वेळा जाहीर निविदेस पुरेसा प्रतिसाद न मिळाल्याने तीन वेळेस निविदा प्रक्रिया रद्दबदल ठरल्याने दि.18/07/2011 रोजी चौथ्या वेळेस जाहीर निविदा प्रसिध्द केली असता तीन निविदा पुढीलप्रमाणे

तीन निविदा प्राप्त झाल्यात (1) मे समीक्षा क्न्स्ट्रक्शन कंपनी ठाणे प्रती टन दर रु. 650/-(2)रॅमके एन्व्हीरो प्रती टन दर रु. 756/- (3) अजिंक्य बायोफर्ट प्रती टन दर रु. 950/- त्यापैकी मे.समीक्षा क्न्स्ट्रक्शन कंपनी ठाणे प्रती टन दर रु. 650/- कमी असल्याने त्यांची निविदा मान्य करण्यात आली. सोलापूर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाचे वित्तीय वर्ष 2013-14 मधील घराघरातून कचरा संकलन,वर्गीकरण व वाहतूक निविदाबाबतच्या तपशील पुढीलप्रमाणे आहे.

## कामाचा तपशील

| | | |
|---|---|---|
| 01 | मक्तेदाराचे नाव | मे समीक्षा क्न्स्टक्शन कंपनी ठाणे |
| 02 | मक्त्याची रक्कम | 114,30,39,315/- |
| 03 | स्थायी सभेची मान्यता | विषय क्र 1060 ठराव क्र 1074 अन्वये दिनांक 24/02/12 नुसार मान्यता |
| 04 | बजेट तरतूद 2013-2014 | मुख्य लेखापाल जा क्र मुले-6/359 दि.27/12/2011 12 व्या वित्त आयोगातंर्गत अनुदान रक्कम रु.60039378/- |
| 05 | निविदा जाहिरात दिनांक | दि.18/07/2011 |
| 06 | दैनिकाचे नाव | मुंबई सकाळ, टाईम्स ऑफ इंडिया |
| 07 | सुरक्षा रक्कम | रु.22860786/- एकूण किमंतीच्या 2% |
| 08 | कामाचा कालावधी | 10 वर्षाकरिता |
| 09 | करारनामा मुद्रांक शुल्क | 115000/- |
| 10 | कार्यादेश | जा क्र 44 दि. 08/06/2012 |
| 11 | धावते / अंतिम देयक रक्कम | 01. देयक क्र. 04/01.06.2013 रु.9604194/-<br>02. देयक क्र. 77/04.07.2013 रु.6580003/-<br>03. देयक क्र. 28/02.08.2013 रु.6341030/-<br>04. देयक क्र. 32/04.09.2013 रु.6986595/- देयक क्र.04 ची स्थळ प्रत लेखापरिक्षणासाठी उपलब्ध झाले नाहीत. |

सोलापूर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाचे वित्तीय वर्ष 2013-2014 च्या लेखापरीक्षा निविदा नस्ती उपप्रमाणके व इतर अनुषंगिक अभिलेख उपलब्ध करून देण्याबाबत अर्धसमास क्रमांक-134 दि. 20/02/2017 अन्वये कळविले असता विभागाकडून अभिलेख प्राप्त झालेले नसल्याने अभिलेख उपलब्ध न केल्याबाबत आक्षेप कायम ठेवण्यात आलेला होता. परंतु सोलापूर महानगरपालिकेच्या 2013-2014 च्या अंतिमीकरणाच्या बैठकीत दिनांक 15/05/2018 ला मा.आयुक्त सोलापूर महानगरपालिका व उपसंचालक स्थानिक निधी लेखापरिक्षा रायगड भवन नवी मुंबई यांच्यात झालेल्या चर्चेनुसार लेखापरीक्षणा करिता उपलब्ध न झालेल्या अभिलेख्याचे लेखापरीक्षण करण्याबाबत सुचविले, त्याअनुषंगाने सोलापूर महानगरपालिकेचे घनकचरा व्यवस्थापन विभागाकडून पत्र जा क्र.100/ दिनांक 18/05/2018 नुसार लेखापरीक्षणाकरिता अभिलेख उपलब्ध झाले. सदर अभिलेख्याचे लेखापरीक्षण केले असता निदर्शनास आलेल्या उणीवाबाबत अर्धसमास क्रमांक-148 दि.14/06/2018 अन्वये खुलासा मागविला असता लेखापरीक्षणास खुलासा प्राप्त झालेला नाही त्यामुळे सदरचे आक्षेप खालीलप्रमाणे कायम ठेवण्यात येत आहेत.

1. सदरच्या निविदेचा तांत्रिक लिफाफा व फॉयन्सील बीड लेखापरीक्षाणास उपलब्ध झालेले

नाही.

2. सदरच्या कामाचा DPR लेखापरिक्षण करताना उपलब्ध करून देण्यात आला नाही.
3. 12 व्या वित्त आयोगाकडून रक्कम रु.6,00,39,378/- एवढा निधी प्राप्त झाला असून या कामावरील वार्षिक खर्च रु. 9,39,00,000/- एवढा असल्याने सदर प्राप्त निधी आठ महिन्याकरिता पूरणार असल्याने उर्वरित कालावधीकरिता निधीची तरतुद कोणत्या लेखाशिर्षातुन करण्यात आली. याबाबत लेखापरिक्षण माहिती उपलब्ध केली नाही.
4. शासन निर्णय नगरविकास,विभाग,क्र.घनव्य /1006/प्र.क्र.53/नवि.16 दिनांक 26/10/2006 परिच्छेद क्र 28 नुसार कंत्रादारांना द्यावयाची रक्कमेचे दर हे टनावर आधारित नसावेत असे स्पष्ट नमूद असतांना मनपाने प्रती टन 650/- प्रमाणे दर मंजुर केले आहेत, हे नियमबाहय आहे.
5. सदर कामाचे Third Party Audit करणे आवश्यक असतांना Third Party Audit केलेले आढळून येत नाही.
6. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग क्र.विमास1098/प्र.क्र.28/98 दि.19/08/1998 अन्वये राज्यातील सर्व महानगरपालिकांनी त्यांच्या विविध योजनांतर्गत देण्यात येणा-या कंत्राटी कामाचा विमा व्यवहार फक्त शासकीय विमा निधीकडे करणे आवश्यक आहे. विमा संचालक, शासकीय विमा निधी, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र क्र.प्रविनी-2300/सहविमा/ जिप-2 दि. 07 जानेवारी 2004 नुसार मंजूर निविदा रकमेच्या 1% विमा कामासाठी व कामगाराच्या सुरक्षेसाठी विमा निधीत रक्कम भरणे आवश्यक आहे. सदर कामाचा विमा उतरविले असलेबाबत कागदपत्रे नस्तीमध्ये आढळले नाही. 1% प्रमाणे विमा रक्कम वसूल केलेली नाही. त्यामुळे विमा रक्कम रु.1,14,30,393/- वसुल करुन शासकीय विमा निधीकडे भरणा करणे आवश्यक आहे.
7. उद्योग उर्जा व कामगार विभाग महाराष्ट्र शासन निर्णय क्र.बी सी ए -2009 /प्रक्र 108/ कामगार 7 दिनांक 17/06/2010 नुसार कामगार कल्याण उपकर 1% वसुल करणे आवश्यक आहे. परंतु सदर रक्कम वसूल केलेली आढळून येत नाही. त्यामुळे कामगार कल्याण उपकरची रक्कम रु.1,14,30,393/- वसुल करुन शासकीय निधीकडे भरणा करणे आवश्यक आहे.
8. शासन निर्णय 2006 च्या निर्णयातील परिच्छेद 78 ते 80 अ नुसार ही प्रक्रिया आर्थिकदृष्ट्या परवडणारी असावी यासाठी सर्व स्तरावरील कचरा उत्पादकाकडून सेवाकर वसुलीबाबत कार्यवाही केलेली नाही.
9. सदरच्या कच-याव्दारे डेब्रिज गोळा करावयचा नसल्याने स्वतंत्ररित्या डेब्रिज विल्हेवाट बाबत कोणत्या उपाययोजना केल्यात? हे नस्तीमध्ये आढळून येत नाही.
10. वाहनाचे लॉगबुक लेखापरीक्षणास उपलब्ध झालेली नाहीत.
11. उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे प्रत्र नस्तीला आहे परंतु कॅाम्पॅटर चे भाडे दर पत्रामध्ये नमूद नाही.
12. P.W.D. मॅन्युअलतील पृष्ठ क्र 87 परिच्छेद क्र 214 नुसार सुरक्षा रक्कम ही 50% काम सुरु करण्यापूर्वी व 50% बिलातून कपात करणे आवश्यक आहे. परंतु रक्कमेच्या 2% रक्कम वसूल केलेली आहे.

13. सुरक्षा रक्कमेचे बँक FD तपासणी करिता उपलब्ध झालेली नाही.
14. वजन काटा प्रमाणीत केल्याचे प्रमाणपत्र उपलब्ध झालेली नाही. गोळा केलेल्या कच-याची वजनाची बिले पुरविण्यात आलेली नाहीत.
15. सोलापूर बॉयोएर्नजी वेस्ट 300 टन अधिकवजा 20 % असून किती कचरा बॉयोएर्नजी वेस्टला दिला ? याचे अभिलेख उपलब्ध झालेले नाही.
16. डेब्रिज व हिरवा कचरा यासाठी किती दर ठरविला व किती रक्कम खर्च केली याची माहिती उपलब्ध झालेली नाही.
17. थर्डपार्टी तांत्रिक लेखापरीक्षण याचा उल्लेख करारनाम्यामध्ये नाही.
18. शासन निर्णय नगरविकास,विभाग,क्र.घनव्य /1006/प्र.क्र.53/नवि.16 दिनांक 26/10/2006 परिच्छेद क्र 59 ते 69 मध्ये असलेल्या तरतुदी नुसार खाजगी क्षेत्राचा सहभाग असणे आवश्यक आहे, डेब्रिज व मोठया कंपन्यासाठी खाजगी क्षेत्र व सेवाभावी संघटनाचे कचरा वेचक समुह यांचाही सहभाग असावा असे नमूद आहे परंतू या बाबतची अंबलबजावणी केलेली आढळून येत नाही.
19. सर्व कचरा वाहनाचे Net Weight (रिकाम्या गाड्याचे) वजन प्रमाणीत केल्याबाबतचे अभिलेख नस्तीत आढळत नाही.
20. मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 अनुसूची-1 मधील तरतुदी नुसार करारनामा करतांना 10 लाखाच्या कामाकरिता रु.100/- व त्यापुढील प्रत्येक 1 लाखाकरिता 100/- यानुसार रक्कम रु. 114,30,39,315/- च्या करारनाम्याकरिता रक्कम रु. 11,42,100/- एवढ्या रक्कमेचे मुद्रांक शुल्क आकारावयाचे होते, परंतु सदर नियमातील तरतुदी नुसार मुद्रांक शुल्काची कमाल मर्यादा 5 लाख असताना मक्तेदाराने फक्त रक्कम रु 1,15,000/- च्या मुद्रांक शुल्कावर करारनामा केलेला असल्याने, कमी पडलेली मुद्रांक शुल्काची रक्कम रु.385000/- वसूलपात्र आहे.
21. तसेच अर्धसमास क्र.134 / दि.20/02/2017 मधील अनु क्र.4 व 9 नुसार देयक क्र.04/01/04/2013 रक्कम रु.4,21,576/- देयक क्र. 47/07/10/2013 रक्कम रु.46,84,517/- चे प्रमाणके लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नसल्याने सदर रक्कम रु.5106093/- आक्षेपाधीन ठेवण्यात येते आहे.

एकूण वसूल पात्र रक्कम रु.385000+14330393+14330393=23245786/-

DATYMKM6601 (Ref No : 136, Hmm No : 148)

# कलम ९ क खालील आक्षेप

लेख्यामध्ये दाखविणे आवश्यक असतानाही लेख्यात दाखविण्यात आली नसेल अशी रक्कम

------------------- **निरंक** -------------------

# <u>भाग दोन</u>

# सर्वसाधारण अनियमितता

# कलम ९ ड खालील आक्षेप

खंड अ,ब,क मध्ये नमूद केलेल्या बाबीं व्यतिरिक्त इतर महत्वाच्या अनुचित किंवा नियमबाह्य बाबी

## *87 नेहरूनगर स्मशानभूमी येथे विविध सुधारणा करणे (फेज-1 व 2). (2013-14)*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 04**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 1446646.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 228281.00/-

***सदरचे कामाचे फेज-1 व फेज- 2 या दोन भागामध्ये विभाजन करून निविदा मागवण्यात आल्या. हे नियमबाह्य आहे. सदरच्या कामाच्या निविदेस वृत्तपत्रामध्ये योग्य ती प्रसिद्धी देण्यात आल्याचे दिसून येत नाही. कामाची निविदा नस्ती लेखापरीक्षणास प्राप्त झाली नाही. त्यामुळे निविदा अट व शर्तीनुसार काम झाल्याचे खात्री करता आली नाही. स्टील खरेदीची चलने लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाहीत.***

ठेकेदाराचे नाव :- मे. अमरदीप कन्स्टकशन.
प्रशासकीय मान्यता- जिल्हाधिकारी कार्या. पत्र क्र. 2014/नपा/प्रशा-2/प्र.क्र.45/आर.आर./265/2014 दि.02.03.2014.

| अक्र. | कामाची बाब | नेहरूनगर स्मशानभूमी येथे विविध सुधारणा करणे -फेज) (1 | नेहरूनगर स्मशानभूमी येथे विविध सुधारणा करणे-फेज) (2 |
|---|---|---|---|
| 1 | प्राकलन | रु.7,46,644/- | 7,00,102/- |
| 2 | स्थायी समिती मान्यता | ठराव क्र 193.दि2./01/14. | ठराव क्र 314.दि.11/09/14. |
| 3 | करारनामा | दि.15/07/14. | दि.16/05/14. |
| 4 | कामाचा आदेश | जा 17/नअ.क्र.दि.15/07/14 | जा 78/नअ.क्र.दि.10/11/14. |
| 5 | निविदा मंजूर दर | 3% कमी दराने | निविदा दराने |
| 6 | पु.ग.प. मान्यता | ठराव क्र 66.दि.10/12/13. | ठराव क्र.230 दि.17/02/14. |

कामाची स्थिती-लेखापरीक्षण कालावधी मार्च 2015 पर्यंत काम अपुर्ण आहे.

सदरच्या कामाची नस्ती, मोजमाप पुस्तिका व प्रमाणक तपासले असता त्याअनुषंगाने निदर्शनास आलेल्या उणीवाबाबत अर्धसमास क्रमांक 19 दि. 12/07/2017 अन्वये खुलासा मागविला असून विभागाने अद्यापपर्यंत कोणताही खुलासा सादर केला नसल्याने लेखापरीक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. सदरचे कामाचे फेज-1 व फेज- 2 या दोन भागामध्ये विभाजन करून निविदा मागवण्यात आल्या. हे नियमबाह्य आहे.

2. सदरच्या कामाच्या निविदेस वृत्तपत्रामध्ये योग्य ती प्रसिद्धी देण्यात आल्याचे दिसून येत नाही, त्यामुळे स्पर्धात्मक दर प्राप्त होऊ न शकल्यामुळे महापालिकेस त्याचा फायदा झाला नाही.
3. सदरच्या कामाची निविदा नस्ती लेखापरीक्षणास प्राप्त झाली नाही. त्यामुळे निविदा अट व शर्तीनुसार काम झाल्याचे खात्री करता आली नाही.
4. फेज-1 च्या कामासाठी रक्कम रु.1,69,281/- चे तर फेज-2 च्या कामासाठी रक्कम रु.59,000/- चे स्टील वापरले आहे, तथापि त्यांच्या खरेदीची चलने लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाहीत, त्यामुळे रक्कम रु.2,28,281/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.
एकूण आक्षेपाधिन रक्कम= रु. 2,28,281/-

DGPAGPM8503 (Ref No : 6, Hmm No : 19)

## *88 पुर्न:डांबरीकरण नाला ते बलादव हॉस्पिटल रस्ता करणे कामातील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 03**

*लेखा शीर्ष : सुर्वण जयंती नागरोत् शासन निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

***मोजमाप पुस्तकामध्ये रस्त्याचे डांबरीकरणनंतर खडीकरण व मुरुमीकरण कशी नमूद केली आहेत याबाबत स्पष्टीकरण करावे. कामास वापरणेत आलेले डांबर, खडी, मुरुम इ. साहित्याचा शासकीय प्रयोगशाळेतील चाचणी अहवाल नस्तीमध्ये आढळून येत नाही. मोजमाप पुस्तकामध्ये नमूद केलेली मोजमापे उपअभियंता यांनी 100 टक्के व कार्यकारी अभियंता यांनी 5 टक्के मोजमापे तपासल्याचे मोजमापासमोर तारखेसह स्वाक्षरी केली नाही.***

पुर्न:डांबरीकरण नाला ते बलादव हॉस्पिटल रस्ता करणे कामाची माहिती खालीलप्रमाणे आहे.
1.अंदाजपत्रकिय रक्कम रु.19,03,304/-
2. निविदा रक्कम रु.19,03,304/-
3. निविदा मान्यता - स्थायी समिती ठराव क्र.560 दि.28/02/2013 (कार्योतर)
4. लेखाशिर्ष - सुर्वण जयंती नागरोत्थान (जिल्हास्तर)
5. निधी - शासन.
6. ठेकेदाराचे नाव - मे. सिद्धेश्वर कस्ट्रक्शन

7. कार्यारंभ आदेश क्र. नअ/70 दि.30/04/2013 (15.55% कमी दराने)
8. कामाचा कालावधी - 90 दिवस.(30/04/2013 ते 27/11/2013)
9. मुदतवाढ - 1) दि.30/04/2014 दंडाने.
2) दि.31/12/2015 विनादंडाने
10. एकूण खर्च रु.17,79,070/-
11. मोजमाप पुस्तक क्र.33 .

सदर कामाची नस्ती, देयकाची व मोजमाप पुस्तकातील नोंदीची तपासणी केली असता आढळून आलेल्या अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्र.28 दि.04/08/2017 अन्वये विचारणा केली होती. खात्याने अनुपालन सादर केले नसल्याने लेखापरीक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1)मोजमाप पुस्तकातील नोंदीची तपासणी केली असता पान क्र.136 वर दि.19/11/2013 ते10/12/2013 या कालावधीत डांबरीकरणाचे काम केल्याचे नमूद करण्यात आले आहे. तदनंतर दि.03/06/2014 ते 13/06/2014 या कालावधीत खडीकरण व मुरुमीकरण केल्याचे नमूद करण्यात आले आहे. डांबरीकरणानंतर खडीकरण व मुरूमीकरण केल्याचे दिसून येत आहे. याबाबत स्पष्टीकरण सादर करावे.

2) कामास वापरणेत आलेले डांबर, खडी, मुरूम इ. साहित्याचा शासकीय प्रयोगशाळेतील चाचणी अहवाल नस्तीमध्ये आढळून येत नाही. त्यामुळे कामास वापराणेत आलेले साहित्य हे योग्य प्रतीचे असल्याची खात्री करता येत नाही.

3) सार्वजनिक बांधकाम नियमावलीमधील परिशिष्ट क्र.24 नुसार मोजमाप पुस्तकामध्ये नमूद केलेली मोजमापे उपअभियंता यांनी 100 टक्के व कार्यकारी अभियंता यांनी 5 टक्के मोजमापे तपासल्याचे मोजमापासमोर तारखेसह स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. परंतु तशी कार्यवाही केली नाही.

DGPKVSM6101 (Ref No : 25, Hmm No : 28)

## *89 विद्युत विभागाकडील रस्त्यावरील दिवे दुरुस्तीसाठी लागणारे साहित्य खरेदीमधील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 06**

*लेखा शीर्ष : विद्युत दिवे दुरुस्त मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 4714300.00/-

| |
|---|
| ***40 वॅट स्टार्टर (3500 नग) याची शासकीय पॉलिटेक्नीक सोलापूर यांचेकडून तांत्रिक तपासणी करण्यात आलेली नाही. राष्ट्रीय महापालिका लेखासंहिता मधील जोडपत्रातील एस.टी.1 ते एस.टी.3 या नमुन्यामध्ये भांडारलेखे व साठानोंदवही राष्ट्रीय लेखासंहितानुसार विहीत नमुन्यात ठेवले जात नाही. सदरच्या कामाची प्रमाणके उपलब्ध करण्यात आली नाही तसेच उपरोक्त आक्षेपांचा संयुक्तिक खुलासा होईपर्यंत झालेला खर्च र.रु. 47,14,300/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.*** |

सन 2013-14 या आर्थिक वर्षामध्ये रस्त्यावरील दिवे दुरुस्तीकरीता साहित्य खरेदी या लेखाशीर्षाअंतर्गत विद्युत विभाग सोलापूर महानगरपालिका यांचेकडून र.रु.47,14,300/- एवढया रकमेचे विद्युत साहित्य खरेदी करणेत आली.

| | |
|---|---|
| कामाचे नाव | विद्युत विभागाकडील रस्त्यावरील दिवे दुरुस्ती लागणारे साहित्य |
| ठेकेदाराचे नाव | अभिजीत एजन्सी ( क्रोम्पटन ग्रीव्हज) |
| प्रशासकीय मंजुरी | स्थायी समिती ठराव क्रमांक 282, दिनांक 30/11/2013 |
| अंदाजपत्रकाची रक्कम | 60 लाख |
| इसारा रक्कम | 50,000/- |
| निविदा रक्कम | 49,90,755/- वाटाघाटी नंतर 47,15,078/- |
| सुरक्षा अनामत | 94,302/- (+2% देयकातून) |
| कामाचा कालावधी | 2 महिने |
| करारनामा मुद्रांक शुल्क | 4000/- दिनांक 10/12/2013 |
| दोष्दायीत्व कालावधी | 1 वर्षे |
| कार्यारंभ आदेश / पहिला टप्पा | जा.क्र. 791 दिनांक 11/12/2013 |
| दुसरा टप्पा | दि.01/03/2014, |
| धावते/अंतीम देयक | 1) 18,27,609/-<br>2) 12,29,241/- |
| एकूण | 47,14,300/- |

रस्त्यावरील दिवे दुरुस्तीकारीता साहित्य खरेदी या नस्तीची तपासणी केली असता अनियममिततेबाबत अर्धसमास पत्र क्र. 01 दि. 12/04/2017 अन्वये विचारणा करण्यात आले होते. त्यानुसार खात्याने त्यांचेकडील पत्र क्र.1166 दि.25/04/2017 अन्वये अनुपालन सादर करण्यात आले आहे. खात्याने सादर केलेले अनुपालन

विचारात घेता लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1)मा.आयुक्त यांचे दिनांक जा.क्र. 791 दिनांक 11/12/2013 च्या वर्क ऑर्डर प्रमाणे पुरवठा करण्यात आलेल्या 40 वॅट स्टार्टर (3500 नग) याची शासकीय पॉलिटेक्नीक सोलापूर यांचेकडून तांत्रिक तपासणी करण्यात आलेली नाही. स्टार्टरची तपासणी कोणतीही तांत्रिक व्यक्ती सहजसाजी करू शकतो. त्यामुळे तपासणी करून स्टार्टर घेण्यात आले असा खुलास केला आहे. परंतु तपासणी अहवाल अनुपालनासोबत सादर केलेला नाही.

2)विदयुत साहित्य खरेदी करणेपूर्वी तांत्रिक समितीची मान्यता सादर करण्यात कळविले असता सोलापूर महानगरपालिकेकडे तांत्रिक समिती नाही असा खुलासा केल्याने आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

3)विदयुत साहित्य खरेदी करणेपूर्वी किती साहित्याची आवश्यकता आहे. याबाबत कोणत्याही क्षेत्रिय कार्यालय (वॉर्ड) विभागाचे मागणी पत्र नस्तीमध्ये उपलब्ध नाहीत. त्यामुळे मागणी विचारात न घेता खरेदी केल्याचे दिसून येते. आवश्यकतेबाबतचे सर्व विभागीय कार्यालयाचे मागणी पत्र अनुपालनासोबत सदर करण्यात आले नाही.

4)वाटप करणेत आलेले विदयुत साहित्य क्षेत्रिय कार्यालयाने किती वापरले आहे, किती शिल्लक आहे याबाबतचा अहवाल नस्तीमध्ये उपलब्ध नाही. खुलाशामध्ये शिल्लक साहित्याची नोंद विभागीय कार्यालयाकडे असून या संबधित माहिती इलेक्ट्रिकल सुपर वायझर व विभागीय अधिकारी यांच्याकडे असल्याचे नमूद केले आहे. परंतु माहिती अनुपालाबरोबर सादर केली नाही.

5)राष्ट्रीय महापालिका लेखासंहिता मधील जोडपत्रातील एस.टी.1 ते एस.टी.3 या नमुन्यामध्ये भांडारलेखे व साठानोंदवही राष्ट्रीय लेखासंहितानुसार विहीत नमुन्यात ठेवले जात नाही.

6)सदरच्या कामाची प्रमाणके उपलब्ध करण्यात आली नाही तसेच उपरोक्त आक्षेपांचा संयुक्तिक खुलासा होईपर्यत झालेला खर्च र.रु. 47,14,300/-आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

DATVRKM8002 (Ref No : 11, Hmm No : 01)

## *90 8 % ईटीपी (ETP) चार्जेस वसुलीबाबत....*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 04**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

| |
|---|
| ***सदरची रक्कम शासन निधीतून कपात केल्याने शासकीय अनुदानाच्या योजनांवर/ विकास कामांवर शासन निधीचा संपूर्णपणे/ 100% खर्च होत नसून केवळ 92% खर्च होत आहे. त्यामुळे शासन निधी (8%) मनपा*** |

| |
|---|
| ***निधीकडे वर्ग होत आहे. सदरचे ईटीपी (ETP) चार्जेस कोणत्या प्राधिकारानुसार कपात केले जातात, ते प्राधिकार पत्र लेखापरीक्षणास सादर केले नाही. सदरचा निधी कोणत्या बँक खात्यात जमा केला जातो ते खातेपुस्तक व बँक विवरणपत्र लेखापरीक्षणास सादर केली नाहीत. सदरचा कपातीचा निधी कोणत्या बाबींवर खर्च केला जातो? याची माहिती लेखापरीक्षणास दिली नाही.*** |

सोलापूर महानगरपालिकेच्या वित्तीय वर्ष 2013-14 व 2014-15 च्या लेखापरीक्षणामध्ये शासकीय अनुदानामधून करण्यात आलेल्या सर्व योजना व विकास कामावरील खर्चामधून 8 % रक्कम ईटीपी (ETP) चार्जेस म्हणुन कपात करण्यात आलेले आहेत, याबाबत अर्धसमास क्रमांक 04 दि.08/05/2017 अन्वये खुलासा मागविला असता विभागाने कोणताही खुलासा/अनुपालन सादर केले नसल्याने लेखापरीक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय कायम करण्यात येत आहे.

1) सदरची रक्कम अगोदर बिलामध्ये समाविष्ट केली जाते व नंतर ती 2% सुरक्षा रक्कम, 2% आयकर, 2% व्हट, याबरोबर बिलामधून कपात केली जाते, त्यामुळे ती मक्तेदाराच्या बिलातून कपात न होता शासन निधीतून कपात होत आहे. परंतु सदरची रक्कम शासन निधीतून कपात केल्याने शासकीय अनुदानाच्या योजनांवर/ विकास कामांवर शासन निधीचा संपूर्णपणे/ 100% खर्च होत नसून केवळ 92% खर्च होत आहे. त्यामुळे शासन निधी (8%) मनपा निधीकडे वर्ग होत आहे. याबाबत विभागाने कोणताही खुलासा केला नाही.

2) सदरचे ईटीपी (ETP) चार्जेस कोणत्या प्राधिकारानुसार कपात केले जातात, ते प्राधिकार पत्र लेखापरीक्षणास सादर केले नाही.

3) सदरचा निधी कोणत्या बँक खात्यात जमा केला जातो, ते खातेपुस्तक व बँक विवरणपत्र लेखापरीक्षणास सादर केली नाहीत.

4) सदरचा कपातीचा निधी कोणत्या बाबींवर खर्च केला जातो? याची माहिती लेखापरीक्षणास दिली नाही.

DGPAGPM8503 (Ref No : 35, Hmm No : 04)

## *91 पाणीपुरवठा विभागाची 2013-14 व 2014-15 या आर्थिक वर्षातील पाणी उपसा,पाणीपट्टी, नळ कनेक्शनधारका संबधित माहिती व इतर अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध न केल्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 1**

*लेखा शीर्ष : पाणीपुरवठा शासन/मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

| |
|---|
| ***महाराष्ट्र स्थानिक निधी व लेखपरिक्षा सुधारणा अधिनियम 2011 मधील कलम 6 (3) नुसार अर्धसमास*** |

***ज्ञापन 07 दिनांक 24/05/2017 अन्वये पाणीपुरवठा विभागास पाणी उपसा, पाणीपट्टी, नळ कनेक्शनधारका संबधित माहिती व इतर अभिलेख्यांची मागणी केली असतांना सदर अभिलेखे लेखापरीक्षणास पाणीपुरवठा विभागाच्या लेखापरीक्षणाच्या अंतिम दिनांकापर्यंत उपलब्ध झाले नाहीत.***

1. दररोज नदीमधुन होणारा पाणी उपसा --------------------- प्रती द.ल.ली.

2. फिल्टर होणारे एकुण पाणी -------------------- प्रती द.ल.ली.

3. दररोज नळकनेक्शनधारकांना पुरविण्यात येणार पाणी. ------- प्रती द.ल.ली

4. दररोज सार्वजनिक नळाद्वारे पुरविण्यात येणारे पाणी.------------- प्रती द.ल.ली

5. गळती व फिल्टर वॉश मुळे वाया जाणारे पाणी------------ प्रती दलली

6. एकुण वाया जाणारे पाणी. ----------- प्रती दलली

7. पाण्याचा उपसा करुन वितरण करण्यासाठी अस्थापनेवर झालेला खर्च. --- प्रती दलली

8. भांडवली खर्च.--------------------------- प्रती दलली

9. केमिकल व रसायने यांचेवर झालेला खर्च.------------------ प्रती दलली

10. पाणी उपसा व वितरणासाठी झालेला विद्युत खर्च ----------- प्रती दललि.

11. 1 द.ल.लि.पाणी शुध्द करुन वितरण करणेस येत असलेला खर्च.

12. प्रत्यक्षात येणारी तुट प्रती द.ल.लि.

13. 2013-14 व 2014-15 या वितिय वर्षाची एकुण पाणीपट्टी मागणी व वसुल रक्कम.

14. 2013-14 व 2014-15 या वित्तिय वर्षाची थकीत पाणीपट्टी. जादा थकबाकी असलेल्या 50 थकबाकीदारांची यादी. थकबाकी वसुलीसाठी किती नळजोडण्या तोडण्यात आल्या व किती थकबाकी रक्कम वसुल करण्यात आली याची माहिती

15. पाणीपट्टीचे दर व कोणत्या वर्षी दर सुधारित करण्यात आले ते वर्ष, दर वाढविले नसल्यास त्याची कारणे. तसेच महानगरपालिकेचे ठराव.

16. एकुण नळ कनेक्शनधारकांची संख्या:- घरगुती, वाणिज्यिक व औद्योगिक व त्याचे ठरविण्यात आलेले दर व ठराव, मागणी नोंदवही.

17. 2013-14 व 2014-15 मध्ये नविन कनेक्शन घेतलेल्या नळकनेक्शनधारकांची संख्या, मागणी अर्ज, नळ कनेक्शन रजिस्टर व प्रथम देयक कधी आदा केले त्याची तारीख, नळ कनेक्शन मंजूरीचे दर, रस्ता खुदाई फीचे दर याबाबतचे ठराव.

18. एकुण बंद मिटरधारकांची संख्या व त्यांचेकडुन कोणत्या दराने पाणीपट्टी आकारली जाते याची माहिती व अभिलेखे.

19. एकुण मिटर रिडरांची संख्या व त्यांचे कडील मिटर रिडींग पुस्तके व दरमहा देण्यात आलेली पाणीपुरवठा देयके.

20. 2013-14 व 2014-15 या वित्तिय वर्षामध्ये पाणीपट्टी वसुलीसाठी वापरलेल्या पावती पुस्तकांची संख्या, पावत्या, नागरी सुविधा केंद्राकडे तसेच अन्य वसुली केंद्रामार्फत जमा झालेल्या रक्कमेची चलने, बँक भरणा केलेच्या पावत्या, रोजकीर्द, दरमहा जमा रकमांचे विवरणपत्रक व वर्गीकरण नोंदवही.

21. पाणीपुरवठा विभागाकडे कार्यरत असलेले एकुण प्लंबर, प्लंबर परवाना जमा फी(2013-14 व 2014-15), प्रत्येक प्लंबरकडून देण्यात आलेली नविन पाणी कनेक्शन

22. 2013-14 व 2014-15 या वित्तिय वर्षामध्ये सिंचन विभागास आदा केलेली सिंचन पाणीपट्टी व त्याची प्रमाणके

23. वसुल केलेली रक्कम लेखा शाखेकडे भरणा केलेल्या रक्कमाची चलने, बँक भरणा रक्कम चलने, बँक पासबुक व ताळमेळ पत्रक

24. एकुण मागणी, वसुली, थकबाकीची मागील तीन वर्षाची विवरणपत्रे.

वरील विहित नमुन्यातील लेखे उपलब्ध करून देण्याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 7, दि. 24/05/2017 अन्वये पाणीपुरवठा विभागास कळविले असता, विभागाकडून याबाबत अनुपालन सादर करण्यात आले नाही. मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 1930 कलम 4 अन्वये लेखापरीक्षणासाठी अभिलेख सादर करण्याची जबाबदारी स्थानिक प्राधिकरणाची आहे. तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची 'ड' प्रकरण 3 मधील नियम 6 (1) (2) अन्वये लेखापरीक्षणास सर्व प्रमाणके, कागदपत्रे व स्पष्टीकरणे उपलब्ध करून देणे हे सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे कर्तव्य आहे. परंतु त्याचे पालन झालेले नाही. महाराष्ट्र स्थानिक निधी व लेखपरिक्षा सुधारणा अधिनियम 2011 मधील कलम 6 (3) नुसार अर्धसमास ज्ञापन 07 दिनांक 24/05/2017 अन्वये नमूद अभिलेख्यांची मागणी केली असतांना सदर अभिलेखे लेखापरीक्षणास विभागाच्या लेखापरीक्षणाच्या अंतिम दिनांकापर्यंत उपलब्ध झाले नाहीत.

DATVRKM8002 (Ref No : 12, Hmm No : 7)

## *92 चिंतलवार वस्ती येथे ड्रेनेज लाईन घालणे व खाजगी नळांना मीटर बसविणे याकामाची निविदा नस्तीवव मोजमाप नोंदवही उपलब्ध न केल्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 02**

*लेखा शीर्ष : नागरी दलित वस्ती सुध शासन निधी निधी*
*अनियमितता कलम : 9ड*
गुंतलेली रक्कम रु. 28074058.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 28074058.00/-

***चिंतलवार वस्ती येथे ड्रेनेज लाईन घालणे व खाजगी नळांना मीटर बसविणे याकामाची निविदा नस्ती व मोजमाप नोंदवही लेखापरीक्षणसाठी उपलब्ध करण्यात आले नाही.***

सोलापूर महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाशी संबधित चिंतलवार वस्ती येथे ड्रेनेज लाईन घालणे, मक्ता रक्कम रु.5,74,054/- या कामाची मोजमाप पुस्तिका व शहरातील खाजगी नळांना मीटर बसविणे मक्ता रक्कम रु.2,75,00,000/- या कामाची निविदा नस्ती, देयक व मोजमाप पुस्तिका लेखा परिक्षणास त्वरित सादर करणेबाबत अर्धसमास पत्र क्र.08 दि.25/05/2017 अन्वये कळविले असता खात्याने याबाबत माहिती उपलब्ध करून दिली नसल्याने सदर कामावर केलेला खर्च रक्कम रु.2,80,74,058/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे. महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 1930 कलम 4 अन्वये लेखापरीक्षणासाठी अभिलेख सादर करण्याची जबाबदारी स्थानिक प्राधिकरणाची आहे. तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची ड प्रकरण 3 मधील नियम 6 (1)(2) अन्वये लेखापरीक्षणासाठी सर्व प्रमाणके, कागदपत्रे व स्पष्टीकरणे उपलब्ध करून देण्याचे सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे कर्तव्य आहे. परंतु त्याचे पालन झाले नाही.

DATVRKM8002 (Ref No : 13, Hmm No : 08)

## *93 होटगी रोड ते कंबर तलाव लगत नव्याने ड्रेनेज पाईप लाईन टाकणे बाबत......*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 05**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

***सोलापूर महानगरपालिकेचे उपअभियंता ड्रेनेज विभागाकडून लेखापरीक्षणाकरिता अभिलेख उपलब्ध झाले. त्याअनुषंगाने निदर्शनास आलेल्या अनियामितता खालीलप्रमाणे आढळून येते. शासनाने वितरीत केलेल्या निधीचे विनियोग प्रमाणपत्र जिल्हाधिकारी व शासनास सादर केल्याबाबतची नस्तीत आढळून येत नाही. वित्तीय वर्ष 2013-2014 मध्ये या कामावर झालेल्या खर्चाची प्रमाणके उपलब्ध केली नाहीत, तसेच शासनाकडून या कामाकरिता किती अनुदान प्राप्त झाले. वित्तीय वर्ष 2013-2014 पर्यत किती रक्कम खर्ची पडली, सदर अनुदान खर्च करण्याकरिता शासनस्तरावरून कालावधी किती होता याबाबत नस्ती वरून खात्री होत नाही, सदर माहिती लेखापरीक्षणास उपलब्ध करण्यात आलेली नाही. तसेच साहित्याची साठा नोंदवही मध्ये नोद घेण्यात आली किवा नाही, याची खात्री होत नाही. या कामासाठी राज्य व जिल्हा पातळीवरील वर्तमान पत्रातुन जाहीर प्रसिध्दीकरण करण्यात येवून दोन लिफाफा पद्धतीने मूल्य निविदा मागविणे आवश्यक होते परंतु तशी कार्यवाही झालेली अभिलेख्यावरून आढळून येत नाही, एम. जी. पी. डी सी आर सूची उपलब्ध न झाल्यामुळे पूर्वगणकपत्रक पहाता त्यातील बाबीच्या दराबाबत खात्री करता आली नाही.***

सोलापूर महानगरपालिकेच्या ड्रेनेज विभागाकडून विभागाचे वित्तीय वर्ष 2013-2014 च्या लेखापरीक्षाणास निविदा नस्ती उपप्रमाणके व इतर अनुषंगिक अभिलेख उपलब्ध करून देण्याबाबत अर्धसमास क्र. 06 दि. 23/05/2017 अन्वये कळविले असता विभागाकडून अभिलेख उपलब्ध न केल्याने आक्षेप कायम ठेवण्यात आलेला होता. परंतु सोलापूर महानगरपालिकेच्या 2013-2014 च्या अंतिमिकरणाच्या बैठकीत दिनांक 15/05/2018 ला मा. आयुक्त सोलापूर महानगरपालिका व उपसंचालक स्थानिक निधी लेखापरिक्षा रायगड भवन नवी मुंबई यांच्यात झालेल्या चर्चेनुसार लेखापरीक्षणाकरिता उपलब्ध न झालेल्या अभिलेख्याचे लेखापरीक्षण करण्याबाबत सुचविले त्याअनुषंगाने सोलापूर महानगरपालिकेचे उपअभियंता ड्रेनेज विभागाकडून पत्र जा क्र.178/ दि.17/05/2018 नुसार लेखापरीक्षणा करिता अभिलेख पुढीलप्रमाणे उपलब्ध झाले आहे.

## <u>कामाचा तपशील</u>

| | | |
|---|---|---|
| 01 | मक्तेदाराचे नाव | श्री एम एस मुधोळकर |
| 02 | मक्त्याची रक्कम | 15369052/- |
| 03 | तांत्रिक मंजुरी | ------------ |
| 04 | प्रशासकीय मंजुरी | विभागीय आयुक्त क्र निशा/कार्या -03/मनपा /विनी /प्रशामा/182/10 दि.02/08/2010 |
| 05 | स्थायी सभेची मान्यता | मा.स्थायी समिती विषय क्र 460 ठराव क्र 394 दि 02/07/2010 नुसार मान्यता |
| 06 | बजेट तरतूद | रुपये 10 कोटी म न पा क्षेत्रातील प्राथमिक सोयी व विकास कामाकरिता विषेश अनुदान |

| | | |
|---|---|---|
| | | मंजूर |
| 07 | निविदा जाहिरात दिनांक | दि.08/05/2010 |
| 08 | निविदा कालावधी व दैनिकाचे नाव | दि.26/05/2010 दुपारी 1.00 पर्यत दैनिक लोकमत |
| 09 | बयाना रक्कम | 153691/- |
| 10 | सुरक्षा रक्कम | 307382/- |
| 11 | कामाचा कालावधी | 12 महिने |
| 12 | करारनामा मुद्रांक शुल्क | 14400/- |
| 13 | कार्यादेश | दिनांक 216 / 18/10/2011 |
| 14 | धावते / अंतिम देयक रक्कम | 2013-2014 मध्ये खर्चाबाबत देयके नाहीत |

त्यानुसार सोलापूर महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य अभियंता विभागाचे वित्तीय वर्ष 2013-14 मधील होटगी रोड ते कंबर तलाव लगत नव्याने ड्रेनेज पाईप लाईन टाकणे या कामाच्या नस्तीचे लेखापरीक्षण करण्यात आले. सदर लेखापरीक्षणात निदर्शनास आलेल्या उणीवाबाबत अर्धसमास क्रमांक-149 दि.14/06/2018 अन्वये खुलासा मागविला असता लेखापरीक्षणास खुलासा प्राप्त झालेला नाही. त्यामुळे सदर आक्षेप खालीलप्रमाणे कायम ठेवण्यात येत आहे.

1. शासनाने वितरीत केलेल्या निधीचे विनियोग प्रमाणपत्र जिल्हाधिकारी व शासनास सादर केल्याबाबतची प्रत नस्तीत आढळून येत नाही.
2. वित्तीय वर्ष 2013-2014 मध्ये या कामावर झालेल्या खर्चाची प्रमाणके आढळून येत नाहीत. तसेच शासनाकडून या कामाकरिता किती अनुदान प्राप्त झाले. वित्तीय वर्ष 2013-2014 पर्यत किती रक्कम खर्ची पडली. सदर अनुदान खर्च करण्याकरिता शासन कालावधी किती होता याबाबत नस्ती वरून खात्री होत नाही. सदरची माहिती उपलब्ध करण्यात आलेली नाही.
3. साहित्याची साठा रजिस्टर मध्ये नोद घेण्यात आली किवा नाही याची खात्री होत नाही.
4. या कामासाठी राज्य व जिल्हा पातळीवरील वर्तमान पत्रातुन जाहीर प्रसिध्दीकरण करण्यात येवून दोन लिफाफा पद्धतीने मूल्य निविदा मागविणे आवश्यक होते परंतु तशी कार्यवाही झालेली आढळून येत नाही.
5. एम. जी. पी. डी सी आर सूची उपलब्ध न झाल्यामुळे पूर्वगणकपत्रक पहाता त्यातील बाबीच्या दराबाबत खात्री करता आली नाही.

DATYMKM6601 (Ref No : 135, Hmm No : 149)

## *94 विकास आराखडयाची अंमलबजावणीसाठी आरक्षित जागा संपादनासाठी प्रदान केलेली TDR प्रमाणपत्र उपलब्धतेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 03**

*लेखा शीर्ष : नगर रचना*
*अनियमितता कलम : 9ड*

***विकास आराखडयाची अंमलबजावणीसाठी आरक्षित जागा संपादनासाठी प्रदान केलेली TDR प्रमाणपत्र लेखापरीक्षणास उपलब्ध करण्यात आली नाही.***

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 अन्वये विकास आराखडयामध्ये आरक्षित जागांचे भूसंपादन करुन आरक्षणांचा विकास करण्याचे दायित्व महानगरपालिकेचे आहे. महापालिकेचे वार्षिक अर्थसंकल्पानुसार महापालिकेचे 2013-14 साठी TDR पासून किती उत्पन्न झाले आहे. याबाबत विभागास TDR संबंधी खालील माहिती अभिलेख्यासह लेखापरीक्षणास सत्वर सादर करण्यासाठी अर्ध समास पत्र क्र.17 दिनांक 10/07/2017 अन्वये कळविले असता माहिती उपलब्ध करण्यात आली नाही. त्यामुळे खालील बाबीचे लेखापरीक्षण करता आले नाही.

a) ज्या भुसंपादन प्रकणात मुळ जमिन मालकास महापालिकेने TDR मंजूर केला आहे, अशा प्रकरणांच्या प्रकरण निहाय नस्ती, वितरीत TDR प्रमाणपत्रांचे कार्यालयीन प्रती व याबाबतचा एकत्रित लेखा.

b) ज्या TDR प्रमाणपत्रांचे TDR प्रमाणपत्र धारकाकडून विकासकाकडे हस्तांतरण झाले आहे. अशा हस्तांतरण प्रकरणांच्या नोंदीचे अभिलेखे.

c) ज्या TDR प्रमाणपत्रांच्या आधारे विभागाने विकासकांना जादा चटई क्षेत्र (FSI) मंजूर केला आहे, अशा प्रकरणांच्या नोंदीचे अभिलेखे तसेच सदर प्रकरणाच्या प्रारंभ प्रमाणपत्राचे संचिका याबाबचे मुळ अभिलेख लेखापरीक्षणास अद्याप उपलब्ध झाले नाही.

मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 1930 चे कलम 4 अन्वये लेखापरीक्षेसाठी अभिलेख सादर करण्याची जबाबदारी स्थानिक प्राधिकरणाची असून ती पार पाडलेली नाही. तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनुसूचि " ड" प्रकरण 3 मधील नियम 6 (1) (2) अन्वये लेखापरीक्षणास सर्व प्रमाणके, कागदपत्रे व स्पष्टीकरणे उपलब्ध करुन देणे हे सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे कर्तव्य आहे. परंतु त्याचे पालन झालेले नाही.

## *95 भविष्य निर्वाह निधी विभागाकडील नोंदीच्या अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 07**

*लेखा शीर्ष : भ.नि.नि. मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***कर्मचाऱ्यांचे भविष्य निर्वाह निधीची खतावणीमध्ये वर्षाखेरीस हिशोब परिपूर्ण करून सक्षम प्राधिकाऱ्याची स्वाक्षरी व शिक्का उमटविणेत आलेला नाही. अग्रीमाचे परतफेडीचा ही किती हप्त्यापैकी कितवा हप्ता वसूल केला आहे त्याचा क्रमांक नमूद करणेत आलेला नाही. माहे फेब्रुवारी पेड इन मार्च 2014 चे भ.नि.नि.चे वजातीचे तक्त्यातील रक्कम ही संगणक प्रणालीव्दारे वेतन देयकातून वसूल केलेल्या रक्कमेपेक्षा रक्कम रु.600/- ने जादा आहे. 2013-14 या वर्षात कर्मचाऱ्यांचे खात्यामध्ये जमा केलेली व कर्मचाऱ्यांचे वेतनातून वसूल केलेली रक्कम यामध्ये रक्कम रु.68,24,299/- इतकी तफावत आहे. भ.नि.नि. खात्यामध्ये रक्कम रु.63,998/- इतकी रक्कम संबधीताच्या खात्यामध्ये जमा केल्याचे दिसून येत नाही. सन 2013-14 या अर्थिक वर्षामध्ये वसुल केलेल्या रकमा हया 11 ते 18 महिने उशिरा वर्ग केल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे कर्मचा-याना देण्यात आलेल्या व्याजाच्या रकमाचे कसे समायोजित केले जाते याचे स्पष्टीकरण देण्यात आलेले नाही. कर्मच-यांना अग्रीम ज्या महिन्यात प्रदान केले आहे त्या महिन्यात खातावणीमध्ये नोंदी करुन सक्षम अधिका-याची स्वाक्षरी घेणेत आलेले नाही.***

मनपा सोलापूर लेखा अंतर्गत असणारे भविष्य निर्वाह निधीचे अभिलेखेचे तपासणी केली असता आढळुन आलेल्या त्रुटीबाबत अर्धसमास पत्र क्र.53 दि.02/11/2017 अन्वये विचारणा केली होती. खात्याने त्यांचेकडील पत्र क्र.मुले 6/लेखा परिक्षण/53/2017 दि.26/12/2017 अन्वये अनुपालन सादर केले आहे. खात्याने सादर केलेल्या अनुपालनाचा विचार करता लेखापरीक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1)सोलापूर मनपाचे अंतर्गत असणारे लेखा विभागाने कर्मचाऱ्यांचे भविष्य निर्वाह निधीची खतावणी ठेवण्यात आली आहे. खतावणीमध्ये दरमहाचे कर्मचाऱ्याचे वेतनातून वसूल केलेल्या रकमेच्या नोंदी घेऊन वर्षाखेरीस हिशोब करून लेखे परिपूर्ण करून बंद करणेत आले आहेत. सदर लेखेचे खाली सक्षम प्राधिकाऱ्याची स्वाक्षरी व शिक्का उमटविणेत आलेला नाही.

आक्षेपात नमूद केलेनुसार वर्षाखेरीस हिशोब करून लेखे परिपूर्ण करून बंद करणेत आले आहेत. सदर लेखेचे खाली सक्षम प्राधिकाऱ्याचे स्वाक्षरीने प्रमाणीत केल्याचे खात्याने अनुपालन सादर केले आहे. परंतु लेखा परीक्षणास अभिलेखे सादर केले नसल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

2) भ.नि.नि.चे वजातीचे तक्त्यामध्ये कर्मचाऱ्याने घेतलेल्या अग्रीमाचे परतफेड ही किती हप्त्यापैकी कितवा हप्ता वसूल केला आहे त्याचा क्रमांक नमूद करणेत आलेला नाही.

याबाबत आहरण व वितरण अधिका-याना सुचना देण्यात आल्याचे खात्याने कळविल्याने आक्षेप कायम करण्यात येत आहे.

3) संगणक प्रणालीव्दारे वेतन देयकाचा वजातीसह गोषवारा व भ.नि.नि.च्या वजातीचे तक्त्याची तपासणी केली असता गोषवाऱ्यामध्ये वसूल केलेली रक्कम रु.51,08,682/- इतकी आहे व वजातीचे तक्त्याची बेरीज रक्कम रु.51,09,282/- इतकी आहे. भ.नि.नि.चे वजातीचे तक्त्यातील रक्कम ही संगणक प्रणालीव्दारे वेतन देयकातून वसूल केलेल्या रक्कमेपेक्षा रक्कम रु.600/- ने जादा आहे. तरी याबाबत सविस्तर स्पष्टीकरण सादर करावे. तसेच इतर महिन्यात अशप्रकारे फरक नसल्याबाबत तपासणी करुन खात्री पटवावी.

तफावतीच्या रकमेची आवश्यक ते अभिलेख्याची तपासणी करुन खात्री पटविण्याची कार्यवाही करण्यात येत आहे असे खात्याने कळविल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

4) सन 2013-14 या आर्थिक वर्षात कर्मचाऱ्यांचे भ.नि.नि.च्या खात्यामध्ये जमा केलेली रक्कम व व्याजाच्या रकमेचा हिशोब करून वर्षाखेरीस शिल्लक दर्शविणाऱ्या तक्त्याची (Brad Sheet) तपासणी केली असता सन 2013-14 या आर्थिक वर्षात कर्मचाऱ्यांचे खात्यामध्ये जमा केलेली रक्कम रु.27,03,73,119/- इतकी आहे. कर्मचाऱ्यांचे वेतनातून वसूल केलेली रकमांची गुंतवणुक रु.23,01,36,389/-, रोखवहीतील शिल्ल्क रक्कम रु.16,58,130/- व मनपाकडुन वित्तीय वर्ष 2013-14 मधील येणे रक्कम रु.4,54,02,899/- इतकी असून असे एकुण रक्कम रु.27,71,97,418/- इतकी आहे. वर्षात कर्मचाऱ्यांचे खात्यामध्ये जमा केलेली व कर्मचाऱ्यांचे वेतनातून वसूल केलेली रक्कम यामध्ये रक्कम रु.68,24,299/- इतकी तफावत आहे. कर्मचा-यांच्या वेतनातून वसुल केलेली सर्व रक्कम त्यांचे खात्यात जमा केल्याचे दिसून येत नाही. तरी किती कर्मचा-यांचे खात्यामध्ये जमा केली नाही, त्याचे तपशीलासह स्पष्टीकरण करणेत यावे.

2013-14 मध्ये जमा न केलेल्या व अपुर्ण असलेल्या खात्याचा शोध घेऊन जमा न केलेली रक्कम रु.68,24,299/- इतकी जमा घेण्यात येऊन सर्व खाते पुर्ण करुन लेखा परीक्षणास दाखविण्यात येत आहे असे खात्याने अनुपालन सादर केले आहे. खात्याने अनुपालन केले नसल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

5) माहे फेब्रुवारी पेड इन मार्च 2014 चे कर्मचाऱ्यांचे वेतनातून वसूल केलेल्या तक्त्यातील रक्कम त्यांचे भ.नि.नि. खात्यामध्ये जमा केल्याची तपासणी केली असता रक्कम रु.63,998/- इतकी रक्कम संबधीताच्या खात्यामध्ये जमा केल्याचे दिसून येत नाही. खात्यामध्ये जमा न केलेली रक्कम ही

महिना नमूद करून यादीसह तपशील देऊन निलंबन लेख्यामध्ये जमा करणे आवश्यक आहे. तदनंतर ज्यावेळी ती रक्कम संबंधीताचे खात्यामध्ये रक्कम जमा केली जाईल त्यावेळी तेवढी रक्कम निलंबन खात्यामधून कमी करणे आवश्यक आहे. परंतु मनपाने तसे निलंबन लेखे ठेवलेले नाही व त्याप्रमाणे कार्यवाही करीत नसल्याचे दिसून येत नाही.

आक्षेपानुसार कार्यवाही करणेत असल्याचे खात्याने कळविल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

6) कर्मचा-याचे वेतनातुन वसुल केलेली रक्कम ही वेतन प्रदान केलेनंतर त्वरीत भ.नि.नि. खात्याकडे रक्कम वर्ग केली जात नाही. सन 2013-14 या अर्थिक वर्षामध्ये वसुल केलेल्या रकमा ह्या 11 ते 18 महिने उशिरा वर्ग केल्याचे दिसून येत आहे. वसुल केलेल्या भ.नि.नि.चे रकमेवर कर्मच-याना व्याज द्यावे लागत असल्याने सदरच्या रकमा ह्या त्वरीत वर्ग करुन त्या वेळीच गुंतवणुक करणे आवश्यक आहे. मनपाने वेतनातुन वसुल केलेल्या रकमा ह्या संबंधीत कर्मचा-याच्या खात्यात व्याजासहीत जमा केल्याचे नोंदी केल्या आहेत. वसुल केलेल्या रकमा वेळीच गुंतवणुक केल्या असत्या तर त्यावर मिळणारे व्याजाची रक्कम कर्मचा-याना व्याज देणे सुकर झाले असते. परंतु मनपाने सदरच्या रकमा वेळीच गुंतवणुक केली नसल्याने त्यावरील व्याजाची रक्कम मनपास मिळलेले नाही. त्यामुळे व्याजाच्या रकमेचा भार मनपा निधीवर पडत आहे. तरी कर्मचा-याना देण्यात आलेल्या व्याजाच्या रकमाचे कसे समायोजित केले जाते याचे स्पष्टीकरण करणेत यावे.

मनपाची आर्थिक परिस्थीती बिकट झाल्याने कपातीच्या रकमा उशीराने देण्यात आलेल्या आहेत यापुढे कपातीच्या रकमा दर महा देण्यात येत आहे असे खात्याने अनुपालन सादर केले आहे.

खात्याने भ.नि.नि.च्या संपुर्ण रकमा जमा केल्याचे व कर्मचा-याना देण्यात आलेल्या व्याजाच्या रकमाचे कसे समायोजित केले याचे स्पष्टीकरण केले नसल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

7) महाराष्ट्र सर्वसाधरण भविष्य निर्वाह निधी नियम 1998 मधील नियम क्र.13 व 16 नुसार कर्मच-यांना अग्रीम ज्या महिन्यात प्रदान केले आहे त्या महिन्यात खातावणीमध्ये नोंदी करुन सक्षम अधिका-याची स्वाक्षरी घेणे आवश्यक आहे. सन 2013-14 मध्ये तशी कर्यवाही केल्याचे आढळुन आले नाही.

अक्षेपानुसार कार्यवाही करण्याची दक्षता घेण्यात येत असल्याचे खात्याने कळविले आहे. आक्षेपाचे अनुपालन केले नसल्याने आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DGPKVSM6101 (Ref No : 31, Hmm No : 53)

## *96 परिभाषित अशंदान निवृतीवेतन योजनेच्या अमंलबजावणीमधील उणिवाबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**अनियमितता संख्या : 04**

*लेखा शीर्ष : परिभाषित अशंदान निवृ मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

| |
|---|
| ***अशंदायी निवृतीवेतन योजना लागू झालेपासून बँकेमध्ये स्वतंत्र खाते उघडणेत आलेले नाही. 40 कर्मचा- यांचे वित्तलब्धीच्या 10% रक्कम वसुल न करता अंदाजे रक्कम वसुल केली जाते. तसेच त्यांच्या वेतनातून वसुल केलेल्या रकमे इतके मनपा हिस्सा त्यांचे खात्यात जमा करण्यात आली नाही. सन 2013-14 या अर्थिक वर्षामध्ये वसुल केलेल्या रकमा ह्या 11 ते 18 महिने उशिरा वर्ग केल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे कर्मचा- याना देण्यात आलेल्या व्याजाच्या रकमाचे कसे समायोजित केले जाते याचे स्पष्टीकरण देण्यात आलेले नाही. अशंदायी निवृतीवेतन योजनेत असणा- या कर्मचा- यांच्यासाठी अशंदायी निवृतीवेतन योजनाचा वेगळा क्रमांक देणे आवश्यक असताना त्याना सर्वसाधारण भ.नि.नि. वर्गणीदाराप्रमाणे त्यापुढील क्रमांक देण्यात आलेला आहे.*** |

अशंदायी निवृतीवेतन योजनाचे अभिलेखेचे तपासणी केली असता आढळुन आलेल्या त्रुटीबाबत अर्धसमास पत्र क्र.54 दि.02/11/2017 अन्वये विचारणा केली होती. खात्याने त्यांचेकडील पत्र क्र.मुले6/लेखा परिक्षण/54/2017 दि.06/12/2017 अन्वये अनुपालन सादर केले आहे. खात्याने सादर केलेल्या अनुपालनाचा विचार करता लेखापरीक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1)अशंदायी निवृतीवेतन योजनेचे बँकेमध्ये स्वतंत्र खाते उघडणेत आलेले नाही. सदरच्या रकमा ह्या सर्वसाधारण भ.नि.नि.च्या खात्यामध्ये जमा केल्या जातात. त्यामुळे सदर योजनेमध्ये किती शिल्लक आहे याची खात्री करता येत नाही. अशंदायी निवृतीवेतन योजनेचे स्वतंत्र खाते ठेवणे आवश्यक आहे.

सदर योजनेचे महाराष्ट्र बँकेत दि.18/12/2015 रोजी स्वतंत्र खाते उघडणेत आले असून त्यामध्ये आज अखेर रक्कम रु.21600000/- इतकी मुदत ठेवी मध्ये रक्कम ठेवण्यात आलेली आहे असे खात्याने कळविले आहे.

सदर योजना कर्मचा-याना लागू केलेपासून आज अखेर किती रक्कम जमा करणे आवश्यक होती व किती जमा केली आहे याबाबत उल्लेख केला नसल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

2) खात्याने सादर केलेल्या महीतीनुसार सन 2013-14 या आर्थिक वर्षामध्ये सदर योजनेमध्ये एकुण 119 कर्मचारी आहेत. कर्मचा-यांचे वेतनातून एकूण वित्तलब्धीच्या 10% रक्कम वसुल करुन तेवढीच रक्कमे एवढा मनपा हिस्सा यांची एकूण रक्कम त्यांचे खात्यात जमा करणे आवश्यक आहे. परंतु एकुण कर्मचा-यांपैकी 40 कर्मचा-यांचे वित्तलब्धीच्या 10% रक्कम वसुल न करता अंदाजे रक्कम वसुल केली जाते. तसेच त्यांच्या वेतनातून वसुल केलेल्या रकमे इतके मनपा हिस्सा त्यांचे खात्यात जमा करण्यात आली नाही. तरी त्याप्रमाणे कार्यवाही करुन लेखापरीक्षणास अहवाल सादर करावा.

आक्षेपात नमूद केलेनुसार 40 कर्मचा-यांचे वेतनातून कमी कपात केलेली रक्कम माहे सप्टेंबर 2017 पासून वसुल करण्यात येत आहे असे खात्याने अनुपालन सादर केले आहे.

40 कर्मचा-यांचे किती रक्कम वसुल करणे आवश्यक होते व ती किती हप्त्यात वसुल करणेत येत आहे. तसेच त्या रकमे इतकी मनपा हिस्सा जमा केला जातो किंवा कसे याबाबत स्पष्टीकरण सादर केलेले नसल्याने आक्षेप कायम कराणेत येत आहे.

3) कर्मचा-यांच्या वेतनातून वसुल केलेल्या रकमा ह्या वेतन प्रदान केलेनंतर त्वरीत अशंदायी पेंशन योजना खात्याकडे रक्कम वर्ग केली जात नाही. सन 2013-14 या अर्थिक वर्षामध्ये वसुल केलेल्या रकमा ह्या 11 ते 18 महिने उशिरा वर्ग केल्याचे दिसून येत आहे. वसुल केलेल्या अशंदायी पेंशन योजनाचे रकमेवर कर्मच-याना व्याज द्यावे लागत असल्याने सदराच्या रकमा ह्या त्वरीत वर्ग करुन त्या वेळीच गुंतवणुक करणे आवश्यक आहे. मनपाने वेतनातुन वसुल केलेल्या रकमा ह्या संबंधीत कर्मचा-याचे खात्यात व्याजासहीत जमा केल्याचे नोंदी केल्या आहेत. वसुल केलेल्या रकमा वेळीच गुंतवणुक केले असते तर त्यावर मिळणारे व्याजाची रकमेतून कर्मचा-याना व्याज देणे सुकर झाले असते. परंतु मनपाने सदरच्या रकमा वेळीच गुंतवणुक केली नसल्याने त्यावरील व्याजाची रक्कम मनपास मिळलेले नाही. त्यामुळे व्याजाच्या रकमेचा भार मनपा निधीवर पडत आहे. तरी कर्मचा-याना देय असलेल्या व्याजाच्या रकमाचे कसे समायोजित केले जाते याचे स्पष्टीकरण करणेत यावे.

आक्षेपात नमूद केलेनुसार संबंधीत आहरण व वितरण अधिका-याना सुचना दिल्या असून माहे मार्च 2017 च्या वेतनातून कपात करण्यात येत आहे असे खात्याने कळविले आहे.

आक्षेपानुसार खात्याने अनुपालन सादर केले नसल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

4) अशंदायी निवृतीवेतन योजनेत असणा-या कर्मचा-यांच्यासाठी अशंदायी निवृतीवेतन योजनाचा वेगळा क्रमांक देण्यात आलेला नाही. त्याना भ.नि.नि. वर्गणीदाराप्रमाणे त्यापुढील क्रमांक देण्यात आलेला आहे. त्यामुळे सदर योजनेत किती कर्मचारी आहेत याची खात्री करता येत नाही.

आक्षेपानुसार कार्यवाही करण्यात येत असल्याचे खात्याने कळविल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

DGPKVSM6101 (Ref No : 32, Hmm No : 54)

## *97 सोलापूर महानगरपालिकेच्या 2013-14 या आर्थिक वर्षाच्या कर्ज नोंदवहीतील अनियमततेबाबत..*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 05**

*लेखा शीर्ष : कर्ज निवारण निधी मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

| |
|---|
| ***सोलापूर महानगरपालिकेने कर्ज परतफेडीसाठी कर्ज निवारण निधीची निर्मिती केली नसून निधीबाबत रोखवही ठेवण्यात आली नाही. कर्ज नोंदवहीतील अनेक नोंदी अपूर्ण दिसत असून काही नोंदी मुख्य लेखापाल यांच्या स्वाक्षरीने प्रमाणित केल्या नाहीत. कर्जाची मुद्दल रक्कम 3,12,45,040/- व व्याजाची रक्कम 8,83,033/- इतक्या रक्कमेची परतफेड 2013-14 या आर्थिक वर्षामध्ये केली असून अद्याप रक्कम रु.29,52,41,122/- इतकी रक्कम व त्यावरील व्याज थकित असताना महापालिकेकडे कर्ज निवारण खाते ठेवले नसून परतफेडीची तरतूद केली नाही. मुंबई प्रादेशिक महानगरपालिका अधिनियमातील नियम 126 (2) प्रमाणे कर्ज निवारण निधीची वार्षिक विवरण पत्रे मा.आयुक्त यांनी दरवर्षी महानगरपालिकेच्या सभेपुढे ठेवणे आवश्यक असताना तशी कार्यवाही सन 2013-14 आर्थिक वर्षामध्ये केली नाही. महानगरपालिकेने 1972-73 ते 2010-11 पर्यंतच्या लेखापरीक्षण अहवालातील किती परिच्छेदाचे अनुपालन सादर केले? व किती परिच्छेद निरंक झाले असुन किती परिच्छेद प्रलंबित आहेत? याची माहिती लेखापरीक्षणास उपलब्ध केली नाही.*** |

सोलापूर महानगरपालिकेकडील कर्ज नोंदवहीची 2014-15 करीता तपासणी केली असता आढळुन आलेल्या अनियमितताबाबत अर्धसमास क्रमांक 52 दि.25/10/2017 अन्वये खुलासा मागविला असता विभागाने कोणतेही अनुपालन सादर केले नसल्याने लेखापरीक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय कायम करण्यात येत आहे.

21) सोलापूर महानगरपालिकेने कर्ज परतफेडीसाठी कर्ज निवारण निधीची निर्मिती केली नसून निधीबाबत रोखवही ठेवण्यात आली नाही. महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियम 142 प्रमाणे नमुना नं.1 मध्ये सदर बाबतची रोखवही ठेवणे आवश्यक असुनही व स्थानिक निधी लेखा परीक्षा विभागाच्या लेखापरीक्षण अहवाल मध्ये याबाबत वेळोवेळी आक्षेप नोंदवून ही अशा प्रकारची रोखवही 2013-14 या आर्थिक वर्षामध्ये ठेवली नाही.

22) कर्ज नोंदवहीतील अनेक नोंदी अपूर्ण दिसत असून काही नोंदी मुख्य लेखापाल यांच्या स्वाक्षरीने प्रमाणित केल्या नाहीत. उदा.पृष्ठ क्र.134,149,144,147,179 वरील नोंदी.

3) महानगरपालिकेने विविध शहर विकास कामासाठी, पाणीपुरवठा योजनेसाठी शासनाकडून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व खुल्या बाजारातून (वित्तीय संस्थाकडुन) घेतलेल्या कर्जाची व व्याजाची मार्च 2014 अखेर खालील प्रमाणे थकबाकी असल्याचे आढळून आले.

| अ.क्र. | कर्जबाब | कर्ज रक्कम | सन 2013/14 मधील परतफेड | | मार्च 2014 अखेर थकबाकी. |
|---|---|---|---|---|---|
| | | | मुद्दल रु. | व्याज रु. | मुद्दल रु. |
| 1 | राज्य शासन कर्जे | 50600000/- | 0 | 0 | 0 |
| 2 | अग्निशामक दल सुधारणा | 2050000/- | 0 | 0 | 513340/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 3 | म आयुर्विमा .प्रा.जी. महामंडळ | 10317000/- | 4,68,955/- | 5,79,158/- | 42,20,585/- |
| 4 | म ,मुंबई .प्रा.जी. सोलापूर | 185900000/- | 30000000/- | 0 | 138400000/- |
| 5 | आयुर्विमा महामंडळ कर्जावरील ग्यारंटी फी | 776085/- | 776085/- | 303875/- | 0 |
| 5 | महाराष्ट्र शासन हुडको | 128500000/- | 0 | 0 | 128500000/- |
| 6 | जिल्हास्तरीय विकास योजना | 22219497/- | 0 | 0 | 22219497/- |
| 7. | हुडको | 2251,700/- | 0 | 0 | 13,87,700/- |
| | **एकूण** | **40,26,14,282/-** | **3,12,45,040/-** | **8,83,033/-** | **29,52,41,122/-** |

वरील कर्ज रक्कमेपैकी कर्जाची मुद्दल रक्कम 3,12,45,040/- व व्याजाची रक्कम 8,83,033/- इतक्या रक्कमेची परतफेड 2013-14 या आर्थिक वर्षामध्ये केली असून अद्याप रक्कम रु.29,52,41,122/- इतकी रक्कम व त्यावरील व्याज थकित असताना महापालिकेकडे कर्ज निवारण खाते ठेवले नसून परतफेडीची तरतूद केली नसल्याचे आढळून आले. महाराष्ट्र महानगरपालिका अहिनियाम 1949 (प्रकरण 10) कलम 112(1) प्रमाणे चक्रवाढ व्याजाच्या संचित रकमांसह जी रक्कम मान्य केलेल्या कालावधीत कर्ज चुकते करण्यासाठी पुरेशी होईल अशी रक्कम अशा कर्ज निवारण निधीत भरली पाहिजे परंतु अशी कार्यवाही महानगरपालिकेने केलेली नाही. तसेच कर्जाची मुद्दल रक्कम वेळीच न फेडल्याने महानगरपालिकेस मोठया प्रमाणात व्याजाचा भुर्दंड सहन करावा लागत असल्याचे आढळून येत आहे. वरील कर्जाची परतफेड करण्यासाठी मनपाने पुरेसा कर्ज निवारण निधी उभा केला नसल्याचे आढळुन आले.

4) मुंबई प्रादेशिक महानगरपालिका अधिनियमातील नियम 126 (2) प्रमाणे कर्ज निवारण निधीची वार्षिक विवरण पत्रे मा.आयुक्त यांनी दरवर्षी महानगरपालिकेच्या सभेपुढे ठेवणे आवश्यक असताना तशी कार्यवाही सन 2013-14 आर्थिक वर्षामध्ये केली नाही.

5) कर्ज निवारण निधीचे लेखापरीक्षण स्थानिक निधी लेखा परीक्षा विभाग सोलापूर यांनी 2010-11 पर्यंत केले होते. सदर विभागाच्या लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद खालील प्रमाणे प्रलंबित असल्याचे आढळुन आले.

| कालावधी | प्रलंबित परिच्छेद क्र . | प्रलंबित परिच्छेदची |
|---|---|---|

| | | एकूण संख्या |
|---|---|---|
| 1972-73 ते 94-95 | ---- | माहिती उपलब्ध नाही |
| 1995-96 ते 98-99 | ---- | एकूण 9 |
| 1999 ते 2001-02 | 3 ते 8 | 6 |
| 2002 ते 2003 | 1 ते 13 | 13 |
| 2003-04 ते 2004-05 | 3 ते 21 | 19 |
| 2005-06 ते 2010-11 | 1 ते 16 | 16 |

परंतु महानगरपालिकेने 1972-73 ते 2010-11 पर्यंतच्या लेखापरीक्षण अहवालातील किती परिच्छेदाचे अनुपालन सादर केले? व किती परिच्छेद निरंक झाले असुन किती परिच्छेद प्रलंबित आहेत? याची माहिती लेखापरीक्षणास उपलब्ध केली नाही.

DGPAGPM8503 (Ref No : 36, Hmm No : 52)

## *98 मुदत ठेवीवरील व्याजाच्या रकमा कमी मिळालेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**अनियमितता संख्या : 02**

*मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

वसूलपात्र रक्कम रु. 19895.00/-

***भ.नि.नि. रकमाचे गुंतवणुक नोंदवहीतील नोंद क्र.399 वर नमुद केलेली आय.डी.बी.आय. बँकेत मुदत ठेवीपोटी गुंतवण्यात आलेली रक्कमेपोटी मुदतीनंतर रक्कम रु.19,895/- कमी प्राप्त झाली असल्याने ती बँकेकडून प्राप्त करुन घेण्यात यावी.***

मनपाचे लेखा विभागामार्फत ठेवण्यात आलेल्या गुंतवणुक नोंदवहीतील नोंदीची तपासणी केली असता आढळुन आलेल्या त्रुटीबाबत अर्धसमास पत्र क्र.55 दि.02/11/2017 अन्वये विचारणा केली होती. खात्याने त्यांचेकडील पत्र क्र.मुले6/लेखा परिक्षण/55/2017 दि.26/12/2017 अन्वये अनुपालन सादर केले आहे. खात्याने सादर केलेल्या अनुपालनाचा विचार करता लेखापरीक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1)भ.नि.नि. रकमाचे गुंतवणुक नोंदवाहीतील नोंद क्र.399 वर नमुद केलेली आय.डी.बी.आय. बँकेत मुदत ठेवीपोटी गुंतवण्यात आलेली रक्कमेपोटी मुदतीनंतर रक्कम रु.15,98,701/- प्राप्त होणार होती. परंतु बँकेने

रक्कम रु.15,88,701/- इतकी दिली आहे अशी नोंद क्र.489 वर नमुद करुन त्याची पुनर्गुंतवणुक केल्याची नोंद करण्यात आली आहे. बँकेने रक्कम रु,10,000/- कमी दिल्याने तेवढी रक्कम पुनर्गुंतवणुक केली नाही. तरी बँकेकडून तेवढी रक्कम व त्यावरील व्याज प्रप्त करुन घ्यावे.

आक्षेपात नमूद केलेली रक्कम बँकेकडून प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही करणेत येत आहे असे खात्याने अनुपालन सादर केले असल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

2) शासन निधिमधील रक्कम रु. 5,26,251/- ही इंडीयन बंकेत दि.05/03/201 रोजी 1 वर्षासाठी मुदत ठेव स्वरुपात गुंतवणुक करण्यात आली होती. सदर गुंतवणुकीपोटी मुदतीनंतर रक्कम रु.575296/- इतकी प्राप्त होणार असे नमुद करण्यात आले होते. परंतु बॅकेने मुदतीनंतर दि.05/03/2014 रोजी रु.5,65,401/- इतकी रक्कम दिली आहे. बॅकेकडून रक्कम रु.9,895/- कमी प्राप्त झाली आहे ती प्राप्त करुन घेणेत यावी व बॅकेकडे व्याजाची मागणी करावी.

वसुलपात्र रक्कम रु1.9,895 -/

DGPKVSM6101 (Ref No : 60, Hmm No : 55)

## *99 महानगरपालिका सेवकांना लागू करण्यात आलेल्या सहाव्या वेतन आयोगानुसार सुधारीत वेतन श्रेणीबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 01**

*मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

***शासन निर्णय क्रमांक 1095/ पक1/95/बारा दिनांक 08 जुन 1995 मधील परिच्छेद-2 मधील-ब नुसार पदोन्न्तीची कार्यपध्दती अनुसरणे आवश्यक असताना शासन निर्णयातील बाबीची पूर्तता न करता कर्मचा-याना आश्वासित प्रगती योजानेचा लाभ देण्यात आला.***

सोलापूर महानगरपालिकेमध्ये लेखा विभागातील वित्तीय वर्ष 2013-2014 महानगरपालिका सेवाकांना सहाव्या वेतन आयोगानुसार आश्वासित प्रगती योजनेतर्गत देण्यात आलेल्या लाभाच्या सेवा पुस्तकाची तपासणी केली असता त्याअनुषंगाने निदर्शनास आलेल्या उणीवाबाबत अर्धसमास क्रमांक-39 दि.20/09/2017 अन्वये खुलासा मागविला असता, विभागाने पत्र क्र.निरंक दि.17/11/2017 अन्वये सादर केलेला खुलासा विचारात घेवून लेखापरीक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. महानगरपालिका सेवकांना आश्वासित प्रगती योजनेतर्गत कालबद्ध पदोन्नतीच्या पदाकरिता विहीत केलेली अर्हता पात्रता, जेष्ठता अर्हता, विभागिय परिक्षा वगेरे या सर्व बाबीची शासन निर्णय क्रमांक 1095/पक1/95/बारा दिनांक 08 जुन 1995 मधील परिच्छेद-2 मधील-ब नुसार पदोन्न्तीची कार्यपध्दती अनुसरणे आवश्यक असताना शासन निर्णयातील बाबीची पूर्तता न करता कर्मचा-याना आश्वासित प्रगती योजानेचा लाभ देण्यात आला. उदा. श्री रमेश एन कोंडगुळे,श्री आनंद अशोक जोशी, श्रीमती सविता शेखर कैंभावी, श्री नजीर अहमद नबीसाहेब शेख इत्यादी.

DATYMKM6601 (Ref No : 67, Hmm No : 39)

### *100 2013-2014 या आर्थिक वर्षात लेखाशाखेत रोखपालाकडे जमा होणा-या रक्कमाबाबत व नोंदवहीबाबत.....*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 04**

*लेखा शीर्ष : जमा नोंद वही मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

***जमा किर्दे नोंदवहीवरुन जमा रक्कमेचे एकूण अकरा बँक खाते असल्याचे आढळून येते. परंतू त्याचे वित्तीय वर्ष 2013-2014 चे बॅक स्टेटमेंट लेखापरिक्षणाकरिता प्राप्त झालेले नाही. त्यामुळे रोखपालाकडे प्राप्त होणा-या रक्कमा व धनादेश बॅक खात्यात जमा केल्याची खात्री झालेली नाही. वित्तीय वर्ष 2013-2014 या आर्थिक वर्षात बँक खात्याशी ताळमेळ घेतल्याबाबत अभिलेख लेखापरिक्षणास प्राप्त झालेले नाहीत.***

सोलापूर महानगरपालिकेतील लेखा विभागाची वित्तीय वर्ष 2013-2014 ची रोखपालाकडे जमा होणा-या रक्कमाची जमा रोकडवहीची पडताळणी केली असता त्याअनुषंगाने निदर्शनास आलेल्या उणीवाबाबत अर्धसमास क्रमांक-47 दि.10/10/2017 अन्वये खुलासा मागविला असता विभागाने पत्र क्र. निरंक दि.17/11/2017 अन्वये सादर केलेला खुलासा विचारात घेवून लेखापरीक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

13) वित्तीय वर्ष- 2013-2014 आर्थिक वर्षातील जमा किर्दे नोंदवहीतील दिनांक 01/03/2014 व दिनांक 06/03/2014 ची तपासणी केली असता जमा रक्कमेबाबत निर्गमित केलेल्या

पावत्यांचे निरनिराळे नंबर आढळून येतात. खालील प्रमाणे

| अनु क्रमांक | जमा रक्कमेबाबत निर्गमित केलेल्या पावती क्रमांक | पावती दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|
| 1 | 007986 | दिनांक नमूद नाही | 9140 |
| 2 | 004691 | 28/02/2014 | 9244 |
| 3 | 079318 | दिनांक नमूद नाही | 9220 |
| 4 | 7012 | दिनांक नमूद नाही | 1400 |
| 5 | 4695 | दिनांक नमूद नाही | 3620 |
| 6 | 010491 | 01/03/2014 | 3800 |
| 7 | 016732 | दिनांक नमूद नाही | 1850 |
| 8 | 009472 | 26/02/2014 | 226255 |
| 9 | 052196 | 21/02/2014 | 5250 |
| 10 | 009105 | 14/02/2014 | 7325 |

14) 2013-2014 या आर्थिक वर्षात जमा केलेल्या रक्कमेबाबत निर्गमित केलेल्या मुद्रीत पावती व संगणक पावत्यांचे साठा नोंदवही व मागील शिल्लक असलेल्या पावत्यांसह साठा नोंदवही लेखापरिक्षणा करिता उपलब्ध झालेली नाही.

15) जमा किर्दे नोंदवही वरुन जमा रक्कमेचे एकूण अकरा बँक खाते असल्याचे आढळून येते. परंतू त्याचे 2013-2014 चे बॅक स्टेटमेंट लेखापरिक्षणाकरिता प्राप्त झालेले नाही. त्यामुळे रोखपालाकडे प्राप्त होणा-या रक्कमा व धनादेश खात्यात जमा केल्याची खात्री झालेली नाही.

16) 2013-2014 या आर्थिक वर्षात बँक खात्याशी ताळमेळ घेतल्याबाबत अभिलेख लेखापरिक्षणास प्राप्त झालेली नाहीत.

DATYMKM6601 (Ref No : 68, Hmm No : 47)

## *101 महाराष्ट्र नागरी सेवा नियमाप्रमाणे अधिकारी /कर्मचारी यांच्या सेवापुस्तकांमध्ये आवश्यक नोंदी न घेण्याबाबत....*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 03**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

***सोलापूर महानगरपालिकेतील लेखा विभागातील अधिकारी /कर्मचारी यांच्या सेवापुस्तकांची पडताळणी केली असता, (1) महाराष्ट्र नागरी सेवा नियम (वेतन) नियम 1981, (2) महाराष्ट्र नागरी सेवा नियम (रजा) नियम 1981, (3) महाराष्ट्र नागरी सेवा नियम निवृत्ती वेतन) नियम 1982, (4) महाराष्ट्र नागरी सेवा नियम (सेवा सर्वसाधारण शर्ती) नियम 1982, नुसार अधिकारी /कर्मचारी यांच्या रजा लेखा कालक्रमानुसार ठेवणे आवश्यक आहे. तसेच महत्वाच्या नोंदी उदा कुटूंबाचा तपशिल महाराष्ट्र नागरी सेवा नियम (निवृत्ती वेतन) नियम 1982 मधील प्रपत्र क्र-3, भविष्य निर्वाह निधी क्रमांकाची नोंद, चारीत्र पडताळणी प्रमाणपत्राची नोंद सेवा पुस्तकात घेण्यात आलेल्या नाही.***

सोलापूर महानगरपालिकेतील लेखा विभागातील अधिकारी /कर्मचारी यांच्या सेवापुस्तकांची पडताळणी केली असता (1)महाराष्ट्र नागरी सेवा नियम (वेतन)नियम 1981, (2) महाराष्ट्र नागरी सेवा नियम (रजा)नियम 1981, (3) महाराष्ट्र नागरी सेवा नियम निवृत्ती वेतन)नियम 1982, (4) महाराष्ट्र नागरी सेवा नियम (सेवा सर्वसाधारण शर्ती)नियम 1982 व शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय व परीपत्रके प्रमाणे सेवापुस्तकांमध्ये नोंदी घेण्यात आलेल्या नसल्यामुळे अर्धसमास क्रमांक-48 दि.11/10/2017 अन्वये खुलासा मागविला असता, विभागाने पत्र क्र. निरंक दि.17/11/2017 व पत्र क्र.निरंक दि. 17/05/2018 अन्वये सादर केलेल्या खुलासे व सेवापुस्तकच्या प्राप्त छायांकीत प्रती नुसार मुद्दा क्र.1,2,3,4,6,8,9,10 वगळण्यात येवून उर्वरित मुद्दे क्र.05,07,11 मधील आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

| अ. क्र. | अधिकारी /कर्मचा-यांचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| 01 | श्रीमती शारदा राठोड | कनिष्ठ श्रेणी लिपीक |
| 02 | श्रीमती के. एस. चौधुडे | कनिष्ठ श्रेणी लिपीक |
| 03 | श्री. अरूण एक. सांळूके | कनिष्ठ श्रेणी लिपीक |
| 04 | श्रीमती सुजाता चव्हाण | कनिष्ठ श्रेणी लिपीक |
| 05 | श्रीमती एस. एस. केंभावी | कनिष्ठ श्रेणी लिपीक |
| 06 | श्री संजय पवार | कनिष्ठ श्रेणी लिपीक |
| 07 | श्री यु. पी. काकडे | वरिष्ठ श्रेणी लिपीक |

| | | |
|---|---|---|
| 08 | श्री अविनाश अंबादास मोहीते | वरिष्ठ मुख्य लेखापाल |
| 09 | श्री अतुल विष्णुपंत भालेराव | सहाय्यक अभीयंता |
| 10 | श्री संजय भगवान जगताप | कनिष्ठ श्रेणी लिपीक |
| 11 | श्री बी. बी. इंगळे | कनिष्ठ श्रेणी लिपीक |
| 12 | श्री नाझीर नबीसाहेब शेख | भूमापक |
| 13 | श्रीमती टी. व्ही. रजपूत | मिडवाईफ |
| 14 | श्री आनंद ए. जोशी | कनिष्ठ अभीयंता |
| 15 | श्री दत्तात्रय गंगाराम मंजाळ | वडार |
| 16 | श्री कुबेर रामचंद्र ढेपे | मुख्य आरोग्य निरिक्षक |
| 17 | श्री जगन्नाथ रंगनाथ माढेकर | कनिष्ठ श्रेणी लिपीक |
| 18 | श्री रमेश एन कोंडगुळे | मिश्रक |
| 19 | श्री लालसिंग झापू राठोड | वाहन चालक |
| 20 | श्री शामसुंदर ज. मदूरे | जे सी बी ऑपरेटर |
| 21 | श्री विक्रांत विलास लोकापुरे | भुपापक |
| 22 | श्रीमती उज्वला रविन्द्र गणपुळे | आरेखक |

1. चरीत्र पडताळणी प्रमाणपत्राची नोंद सेवा पुस्तकात घेतलेली नाही.
2. कर्मचा-यांना घर बांधणी, मोटर सायकल, संगणक अग्रिम दिल्याची नोंद सेवापुस्तकात घेण्यात आलेली नाही.
3. सेवा पुस्तकातील अंतीम पृष्ठावरील विहीत रकान्यातील वार्षिक सेवेची पडताळणी करण्यात येत नाही.

DATYMKM6601 (Ref No : 69, Hmm No : 48)

## *102 वित्तीय वर्ष-2013-2014 या आर्थिक वर्षातील बयाणा/सुरक्षा अनामत रक्कमेबाबत...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 05**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***नोदवहीमध्ये कार्यालय प्रमुखाच्या स्वाक्षरीने पृष्ठसंख्याचे प्रमाणपत्र नमुद करण्यात आलेले नाही. नोंदवहीमध्ये कोरे पृष्ठ सुटलेले आहेत. ते रदद करणे आवश्यक आहे. रक्कमेची महिना निहाय बेरीज घेण्यात आलेली नाही. सदर रक्कमेचा परतावा संबधितास अदा करण्यात आला किंवा नाही याबाबत खात्री होत नाही. तसेच नोंदवहीमध्ये बाबनिहाय मासिक गोषवारा व आर्थिक वर्षाच्या शेवटचा गोषवारा घेण्यात आलेला नाही. त्यामुळे आर्थिक वर्षातील शिल्लक रक्कमेबाबत खात्री होत नाही. बॅकेशी घेण्यात आलेल्या ताळमेळाबाबतचा अभिलेख तपासणीकरिता उपलब्ध करुन दिले नाहीत. आर्थिक वर्षात संबधिताने भरणा केलेल्या पावती पुस्तकाची स्थळ प्रति तपासणीकरिता सादर केली नाहीत. वित्तीय वर्ष 2013-2014 या आर्थीक वर्षाची जमा किर्द नोदंवहीची तपासणी केली असता भरणा केलेल्या रक्कमा जमा झाल्याची खात्री झालेली नाही.***

सोलापूर महानगरपालिकेमध्ये लेखा विभागाची वित्तीय वर्ष 2013-2014 ची सुरक्षा अनामत व बयाणा रक्कमेच्या नोंदवहीची तपासणी केली असता त्याअनुषंगाने निदर्शनास आलेल्या उणीवाबाबत अर्धसमास क्रमांक-37 दि.20/09/2017 अन्वये खुलासा मागविला असता विभागाने पत्र क्र. निरंक दि.17/11/2017 अन्वये सादर केलेला खुलासा विचारात घेवून लेखापरीक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

23) वित्तीय वर्ष 2013-2014 या आर्थिक वर्षातील बयाणा / सुरक्षा अनामत नोंदवहीची पडताळणी केली असता सदर नोदवहीमध्ये कार्यालय प्रमुखाच्या स्वाक्षरीने पृष्ठसंख्याचे प्रमाणपत्र नमुद करण्यात आलेले नाही. नोंदवहीमध्ये कोरे पृष्ठ सुटलेले आहेत. ते रदद करणे आवश्यक आहे. रक्कमेची महिना निहाय बेरीज घेण्यात आलेली नाही.

24) सदर नोंदवहीतील बयाणा/सुरक्षा अनामत रक्कमा वर्तुळाकार केल्याचे आढळून येते, तसेच काही रक्कमा वर्तुळाकार केल्याचे आढळून येत नाही. सदर रक्कमेचा परतवा संबधीतास अदा करण्यात आला किंवा नाही याबाबत खात्री होत नाही. तसेच नोंदवहीमध्ये बाबनिहाय मासिक गोषवारा व आर्थिक वर्षाच्या शेवटचा गोषवारा घेण्यात आलेला नाही. त्यामुळे आर्थिक वर्षातील शिल्लक रक्कमेबाबत खात्री होत नाही.

25) नोंदवहीतील रक्कमेचे बॅक खात्यातील रक्कमेशी ताळमेळ घेण्यात आला नाही. बॅकेशी घेण्यात आलेल्या ताळमेळाबाबतचे अभिलेख तपासणीकरिता उपलब्ध करुन दिले नाहीत.

26) वित्तीय वर्ष 2013-2014 या आर्थिक वर्षात संबधिताने भरणा केलेल्या पावती पुस्तकाची स्थळ प्रति तपासणीकरिता सादर केली नाहीत,

27) भरणा केलेल्या रक्कमेची जमा किर्द नोदंवहीत नोंद घेण्यात आली किंवा नाही, याबाबत खात्री करण्याकरिता वित्तीय वर्ष 2013-2014 या आर्थीक वर्षाची जमा किर्द नोदंवहीची तपासणी केली असता भरणा केलेल्या रक्कमा जमा झाल्याची खात्री झालेली नाही.

## *103 मालमत्ता कराची धनादेशाव्दारे जमा रकमांची पक्की पावती उशिराने केली जात असल्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

***सोलापूर महानगरपालिकेच्या करसंकलन विभागाच्या शहर विभाग व हद्दवाढ विभागामध्ये मिळकतदाराकडुन मालमत्ता कराची रक्कम धनादेशाव्दारेही जमा होते. मिळकतदाराने धनादेश दिल्यानंतर त्याची नोंद नोंदवहीत न घेता त्यास कच्ची पावती दिली जाते व धनादेश बँकेत वटल्यावर त्याची पक्की पावती केली जाते. कर संकलन व हद्दवाए विभागाकडील धनादेश नोंदवहीची तपासणी केली असता काही धनादेश बँकेत वटल्यानंतर दोन महिने ते सहा महिने उशिराने त्याची पक्की पावती केली जात असल्याचे आढळुन आले.***

सोलापूर महानगरपालिकेच्या करसंकलन विभागाच्या शहर विभाग व हद्दवाढ विभागामध्ये मिळकतदाराकडुन मालमत्ता कराची रक्कम धनादेशाव्दारेही जमा होते. मिळकत दाराने धनादेश दिल्यानंतर त्याची नोंद नोंदवहीत न घेता कच्ची पावती दिली जाते व धनादेश बँकेत वटल्यावर त्याची पक्की पावती केली जाते.

कर संकलन व हद्दवाढ विभागाकडील धनादेश नोंदवहीची तपासणी केली असता काही धनादेश बँकेत वटल्यानंतर दोन महिने ते सहा महिने उशिराने त्याची पक्की पावती केली जात असल्याचे आढळुन आले. मार्च महिना अखेरीस अशा मोठया प्रमाणात पावत्या केल्याचे आढळुन आले.

| अ.क्र. | विभाग | धनादेश क्र | धनादेशाचा दिनांक | रक्कम रु. | बँकेत वटल्याचा दिनांक | पक्की पावती क्रमांक व दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | कर संकलन (शहर) | 132698 | 10.5.2013 | 1582 | 27.5.2013 | 33034639/30.3.2014 |
| 2 | कर संकलन (शहर) | 83800 | 10.5.2013 | 3899 | 27.5.2013 | 33026896/29.9.2013 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 3 | कर संकलन (शहर) | 132087 | 27.5.2013 | 10480 | 4.6.2013 | 33032700/4.3.2014 |
| 4 | कर संकलन (शहर) | 271613 | 5.7.2013 | 13075 | 12.7.2013 | 33027727/14.10.2013 |
| 5 | कर संकलन (शहर) | 723582 | 4.7.2013 | 8253 | 12.7.2013 | 33031325/18.1.2014 |
| 6 | कर संकलन (शहर) | 137182 | 25.7.2013 | 340346 | 7.8.2013 | 33028579/14.11.2013 |
| 7. | कर संकलन (शहर) | 35454 | 29.7.2013 | 7521 | 7.8.2013 | 33034696/30.3.2014 |
| 8 | कर संकलन (शहर) | 9912 | 1.8.2013 | 8846 | 7.8.2013 | 33034779/31.3.2014 |
| 9 | कर संकलन (शहर) | 160281 | 31.7.2013 | 10199 | 7.8.2013 | 032708/22.3.2014 |
| 10 | कर संकलन (शहर) | 99824 | 30.7.2013 | 13130 | 7.8.2013 | 33033512/20.3.2014 |
| 11 | कर संकलन (शहर) | 128792 | 30.7.2013 | 9320 | 7.8.2013 | 033505/31.3.2014 |
| 12 | कर संकलन (शहर) | 914305 | 29.7.2013 | 13357 | 7.8.2013 | 33034444/29.3.2014 |
| 13 | कर संकलन (शहर) | 071782 | 29.7.2013 | 11535 | 7.8.2013 | 33034516/24.3.2014 |
| 14 | कर संकलन (शहर) | 08762 | 27.7.2013 | 86780 | 7.8.2013 | 033509/31.3.2014 |
| 15 | कर संकलन (शहर) | 99112 | 31.7.2013 | 42554 | 7.8.2013 | 33034699/30.3.2014 |
| 16 | कर संकलन (शहर) | 361910 | 27.7.2013 | 29038 | 7.8.2013 | 032709/22.3.2014 |
| 17 | कर संकलन (शहर) | 400639 | 31.7.2013 | 23109 | 22.8.2013 | 032711/23.3.2014 |
| 18 | कर संकलन (शहर) | 41973 | 15.8.2013 | 12072 | 22.8.2013 | 33034703/30.3.2014 |
| 19 | कर संकलन (शहर) | 171369 | 22.8.2013 | 47475 | 27.8.2013 | 33034577/30.3.2014 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 20 | कर संकलन (शहर) | 204842 | 27.8.2013 | 30075 | 2.9.2013 | 33034641/30.3.2014 |
| 21 | कर संकलन (शहर) | 000587 | 30.9.2013 | 750000 | 7.10.2013 | 33031104/9.1.2014 |
| 22 | कर संकलन (शहर) | 019604 | 1.12.2013 | 25164 | 9.12.2013 | 028418/11.3.2014 |
| 23 | कर संकलन (शहर) | 062493 | 2.12.2013 | 25193 | 9.12.2013 | 029287/31.3.2014 |
| 24 | कर संकलन (शहर) | 64423 | 11.3.2014 | 23945 | 21.3.2014 | 001360/10.6.2014 |
| 25 | कर संकलन (हद्दवाढ) | 767605 | 15.4.213 | 1929 | 20.4.2013 | 34000083/20.6.2013 |
| 26 | कर संकलन (हद्दवाढ) | 002237 | 25.4.2013 | 44443 | 27.4.2013 | 077545/20.6.2013 |
| 27 | कर संकलन (हद्दवाढ) | 031632 | 3.5.2013 | 2043 | 6.5.2013 | 080395/3.7.2013 |
| 28 | कर संकलन (हद्दवाढ) | 040801 | 25.7.2013 | 19925 | 29.7.2013 | 34013140/3.9.2013 |
| 29 | कर संकलन (हद्दवाढ) | 088985 | 26.7.2013 | 8941 | 29.7.13 | 34013141/3.9.2013 |
| 30 | कर संकलन (हद्दवाढ) | 059415 | 29.7.2013 | 19979 | 31.7.2013 | 34016164/19.10.2013 |
| 31 | कर संकलन (हद्दवाढ) | 009298 | 27.7.2013 | 286784 | 31.7.2013 | 089733/19.9.2013 |
| 32 | कर संकलन (हद्दवाढ) | 010932 | 27.7.2013 | 7349 | 31.7.2013 | 34015769/10.10.2013 |
| 33 | कर संकलन (हद्दवाढ) | 001531 | 5.8.2013 | 26562 | 7.8.2013 | 094990/4.3.2014 |
| 34 | कर संकलन (हद्दवाढ) | 030684 | 14.8.2013 | 6043 | 17.8.2013 | 34020056/21.1.2014 |

धनोदश वटल्यानंतर एवढया उशिराने पक्की पावती देण्यास विलंब का झाला? याचा खुलासा सादर करण्यात यावा. उशिराने पक्की पावती केल्याने रक्कम लेख्याबाहेर राहते, त्यामुळे कराच्या वसुलीची टक्केवारी कमी दिसते. तसेच बँक खात्यातील शिल्लक व एकत्रित किर्द शिल्लक यामधील तफावत वाढते तरी धनादेशाव्दारे जमा रकमांची पक्की पावती वेळीच करणे आवश्यक आहे.

उपरोक्त मुद्द्या संदर्भात अर्धसमास पत्र क्रमांक 61 दिनांक 17/11/2017 अन्वये विभागास विचारणा केली असता विभागाचे पत्र क्र.657 दि.22.11.2017 अन्वये अ.क्र.25 ते 34 खुलासा सादर केलेला आहे. परंतु अ.क्र.1 ते 24 संदर्भात याबाबतचे अनुपालन सादर केलेले नाही. तथापि सदरचा खुलासा सयुक्तिक नसल्यामुळे सदरचे आक्षेप कायम करण्यात आलेले आहेत.

FDSDKPM7201 (Ref No : 46, Hmm No : 61)

### *104 मालमत्ता कराच्या थकीत रक्कमाबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 04**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

वसूलपात्र रक्कम रु. 271531229.00/-

***सोलापूर महानगरपालिकेकडील शहर व हद्दवाढ भागात एकूण 1,93,172 इतक्या मालमत्ता असून मागील थकबाकीसह एकूण मागणी रककम रु.236,44,77,226/- इतकी आहे. मागणी रककमेपैकी चालू वर्षामध्ये रककम रु.85,59,70,396/- इतकी वसूली करण्यात आली असून रक्कम रु.150,85,06,830/- इतकी रक्कम थकीत आहे. एकूण मागणी रक्कमेनुसार 36.20 टक्के रककम वसुल करण्यात आल्याचे दिसून येते. मागणीनुसार वसुलीची टक्केवारी खुपच कमी आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील अनुसूची ड प्रकरण 8 कराधान नियम 41(2) नुसार बिल सादर केल्यानंतर बिलात विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकास देय रक्कम न भरल्यास 2009 च्या सुधारणा अधिनियमानुसार पोट कलम 1 अन्वये प्रतिमहिन्यासाठी कराच्या 2 टक्के इतकी रककम शास्ती म्हणून वसूल करणे आवश्यक असल्याने मालमत्ता कर थकबाकी रक्कम रु.150,85,06,830/- वर 9 महीन्यासाठी 18% प्रमाणे रक्कम रु.27,15,31,229/- इतकी शास्ती वसूल करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 अनुसूची ड प्रकरण 8 मधील नियम क्र.42 नुसार कर न भरणाऱ्या कसूरदाराची जंगम मालमत्तेची अटकावणी व विक्री करुन कराची थकबाकी वसुल करणे आवश्यक आहे. मागील 10 वर्षापासून शहर व हद्दवाढ विभागातील मालमत्ता कर व इतर कराची रक्कम रु.362721876/- थकीत आहे.***

सोलापूर महानगरपालिकेकडील शहर व हद्दवाढ भागातील मालमत्ता कराची उपलब्धसंगणिकृत माहितीनुसार करांची वसूली व थकबाकी बाबत वित्तीय वर्ष 2013-14 या कालावधीची तपासणी केली असता खालीलप्रमाणे त्रृटी आढळून आल्या.

11) वित्तीय वर्ष 2013-14 या आर्थिक वर्षामध्ये शहर व हद्दवाढ भागात एकूण 1,93,172 इतक्या मालमत्ता असून मागील थकबाकीसह एकूण मागणी रककम रु.236,44,77,226/- इतकी आहे. मागणी रककमेपैकी चालू वर्षामध्ये रककम रु.85,59,70,396/- इतकी वसूली करण्यात आली असून रक्कम रु.150,85,06,830/- इतकी रक्कम थकीत आहे. एकूण मागणी रक्कमेनुसार 36.20 टक्के रककम वसुल करण्यात आल्याचे दिसून येत आहे. मागणीनुसार वसुलीची टक्केवारी खुपच कमी आहे.

12) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील अनुसूची ड प्रकरण 8 कराधान नियम 41(2)नुसार बील सादर केल्यानंतर बीलात विनिर्दिष्ट केलेल्यादिनांकास देय रक्कम न भरल्यास 2009 च्या सुधारणा अधिनियमानुसार पोट कलम 1 अन्वये प्रतीमहीन्यासाठी कराच्या 2 टक्के इतकी रककम शास्ती म्हणून वसूल करणे आवश्यक आहे. त्याअन्वये मालमत्ता कर थकबाकी रक्कम रु.150,85,06,830/- वर 9 महीन्यासाठी 18% प्रमाणे रक्कम रु.27,15,31,229/- इतकी शास्ती वसूल करणे आवश्यक असताना ती करण्यात आलेली नसल्याने सदर नियमानूसार शास्ती वसूल करण्यात यावी. तोपर्यंत सदरची रक्कम रु.27,15,31,229/- वसूलपात्र ठेवण्यात येत आहे.

13) मनपाचे मालमत्ता कर हे प्रमुख उत्पन्नाचे स्त्रोत आहे. कराची थकबाची ही मोठया प्रमाणात असल्याने मनपाची आर्थिक स्थिती कमजोर होत असल्याचे दिसून येत आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 अनुसूची ड प्रकरण 8 मधील नियम क्र.42 नुसार कर न भरणाऱ्या कसूरदाराची जंगम मालमत्तेची अटकावणी व विक्री करुन कराची थकबाकी वसुल करणे आवश्यक आहे. परंतु मनपाने वित्तीय वर्ष 2013-14 मध्ये अशी कार्यवाही केली नाही. त्यामुळे जादा थकबाकी राहीली आहे.

14) संगणक विभागाकडून प्राप्त झालेल्या माहीतीच्या आधारे वित्तीय वर्ष 2013-14 पर्यंत मागील 10 वर्षापासून शहर व हद्दवाढ विभागातील मालमत्ता कर व इतर कर पुढील प्रमाणे थकीत असल्याचे दिसून येते.

| अ.क्र. | विभाग | एकूण मालमत्ता | थकीत रक्कम |
|---|---|---|---|
| 1 | कर संकलन विभाग शहर | 14396 | 260246192 |
| 2 | शहर हद्दवाढ | 12596 | 102475684 |
| | एकूण | 26992 | 362721876 |

उपरोक्त मुद्द्या संदर्भात अर्धसमास पत्र क्रमांक 71 दिनांक 23/11/2017 अन्वये विभागास

विचारणा केली असता विभागाने याबाबतचे अनुपालन सादर केलेले नाही. त्यामुळे सदरचे आक्षेप कायम करण्यात आलेले आहे.

FDSDKPM7201 (Ref No : 47, Hmm No : 71)

### *105 मालमत्ता कराचे धनादेश बँकेतून न वटता परत आल्याबाबत....*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 03**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***सोलापूर महानगरपालिकेच्या करसंकलन विभागाच्या शहर विभाग व हद्दवाढ विभागामध्ये मिळकतदाराकडुन मालमत्ता कराची रक्कम धनादेशाव्दारे प्राप्त होते. सदर प्राप्त झालेले धनादेश लगेच बँकेत जमा करण्यात येतात. संबधीत मालमत्ता धारकाचे धनादेश बँकेत वटल्यावर त्याची पक्की पावती मालमत्ता धारकाचे नावे केली जाते. कर संकलन व हद्दवाढ विभागाकडील धनादेश नोंदवहीची तपासणी केली असता मोठया प्रमाणात धनादेश बँकेत वटलेले नसल्याचे लेखापरीक्षणात दिसून आले. धनादेश बॅकेत वटले नसल्याने संबधीत मालमत्ता धारकास परत करण्यात आल्यामूळे संबधिताकडून रोखीने रककम वसूल करण्यात आलेली आहे काय? व केव्हा वसूल करण्यात आली. धनादेश परत झाल्यामूळे महानगरपालिकेस तेवढया रक्कमेने त्या वर्षी महसूल कमी प्राप्त झाला. धनादेश न वटल्याने संबधितावर कोणती कार्यवाही करण्यात आली. याची माहिती लेखापरीक्षणास सादर केली नाही.***

सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या करसंकलन विभागाच्या शहर विभाग व हद्दवाढ विभागामध्ये मिळकतदाराकडुन मालमत्ता कराची रक्कम धनादेशाव्दारे प्राप्त होते. सदर प्राप्त झालेले धनादेश लगेच बँकेत जमा करण्यात येतात. संबधीत मालमत्ता धारकाचे धनादेश बँकेत वटल्यावर त्याची पक्की पावती मालमत्ता धारकाचे नावे केली जाते.

कर संकलन व हद्दवाढ विभागाकडील धनादेश नोंदवहीची तपासणी केली असता मोठया प्रमाणात धनादेश बँकेत वटलेले नसल्याचे लेखापरीक्षणात दिसून आले. बँकेत न वटलेले धनादेशांची माहीती पुढील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | मालमत्ता क्र. | पेठेचे नांव | मालमत्ता धारकाचे नांव | धनादेश क्र. | दिनांक | रक्कम | धनादेश परत केल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | 120083 | साखर | श्री.भुसणा शंकर मजूरे | 889191 | 28/6/2013 | 20540 | 3/7/2013 |
| 2. | 100836 | जो.भा. | श्री.जयराम रा.बाकडे | 12126 | 9/7/2013 | 15028 | 12/7/2013 |
| 3. | 234841 | मुरारजी | श्रीमती माधरी जी.पवार | 026059 | 5/12/2013 | 23577 | 9/12/2013 |
| 4. | 120190 | साखर | श्री.हणमंतु इरय्या | 061376 | 10/12/2013 | 5000 | 16/12/2013 |
| 5. | 011830 | द.करबा | श्रीमती अंबुबाई ए.पवार | 011490 | 20/12/2013 | 7000 | 26/12/2013 |
| 6. | 234489 | मुरारजी | श्रीमती शांताबाई प्र.गुरव | 55216 | 28/8/2013 | 34045 | 2/9/2013 |
| 7. | 168168 | पाच्छा | श्री.श्रीधर नि.दिडडी | 717562 | 28/8/2013 | 11546 | 2/9/2013 |
| 8. | 140416 | शुक्रवार | अ.जन.म.टुसे | 360673 | 27/8/2013 | 68398 | 7/9/2013 |
| 9. | 240966 | लक्ष्मी | श्री.रमेश वि. इंदूकंगंदे | 028932 | 23/9/2013 | 31323 | 25/9/2013 |
| 10. | 174602 | उ.स | श्री.पांडूरंग द.यनगरी | 000521 | 12/10/2013 | 5000 | 18/10/2013 |
| 11 | 163625 | पाच्छा | श्री.अशोक ग.पाडे | 014761 | 13/12/2013 | 10000 | 26/12/2013 |
| 12 | 162738 | पाच्छा | श्री.राजेश | 088201 | 25/12/2013 | 13798 | 3/1/2014 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | य.शिध्दया | | | | |
| 13 | 090098 | सोमवार | श्री मौलाली खा.लोकाय | 172684 | 27/12/2013 | 7000 | 3/1/2014 |
| 14 | 162444 | पाच्छा | श्री.नरयम्मा म.कोठबनी | 109861 | 24/12/2013 | 2000 | 3/1/2014 |
| 15 | 110091 | गणेश | श्री.सनअल्ल हबीब | 363097 | 25/12/2013 | 5000 | 3/1/2014 |
| 16 | 164759 | पाच्छा | श्री.अप्पशा माणीक | 000198 | 31/12/2013 | 20000 | 3/1/2014 |
| 17 | 043452 | बुधवार | श्रीमती पुष्पा वि.शेटे | 331931 | 26/12/2013 | 10000 | 3/1/2014 |
| 18 | 100901 | जोड | श्री.पदभाव रा.अंकम | 208876 | 31/12/2013 | 20000 | 3/1/2014 |
| 19 | 260319 | नि.ह. | श्री.कृष्णा शे.आक्षादे | 984371 | 15/1/2013 | 15000 | 20/1/2014 |
| 20 | 080085 | गुरुवार | श्री.कमलाकर रा.सुलाखे | 331537 | 20/12/2013 | 4000 | 26/12/2013 |
| 21 | 162751 | पाच्छा | श्री.रामभल्लू रा. गुंडेती | 112870 | 2/1/2014 | 4000 | 6/1/2014 |
| 22 | 164201 | पाच्छा | श्री.विष्णु नि. आडकी | 037588 | 7/1/2014 | 5000 | 13/1/2014 |
| 23 | 202626 | रे.ला. | श्री.राघवेड रा.कुलकर्णी | 016370 | 8/1/2014 | 10000 | 13/1/2014 |
| 24 | 167795 | पाच्छा | श्री.मोहन वि. पोऊ | 720173 | 20/1/2014 | 5598 | 31/1/2014 |
| 25 | 322459 | वि.छ. | श्री.एन.के.बिरला | 034545 | 25/1/2014 | 15000 | 3/2/2014 |
| 26 | 163028 | पाच्छा | श्रीमती भागीरथी तु.कोटा | 328888 | 15/1/2013 | 5000 | 5/2/2014 |
| 27 | 163028 | पाच्छा | श्रीमती भागीरथी तु.कोटा | 328887 | 24/1/2014 | 5000 | 10/2/2014 |
| 28 | 010955 | द. क. | श्री.मुश्ताक अहमद कादर | 102316 | 7/2/2014 | 100204 | 26/2/2014 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 29 | 163062 | पाच्छा | श्री.बालजी पु.छोगा | 059025 | 18/2/2014 | 15000 | 26/2/2014 |
| 30 | 167131 | पाच्छा | श्रीमती अनुराधा श्री. मोरे | 325621 | 10/2/2014 | 10000 | 26/2/2014 |
| 31 | 166140 | पाच्छा | श्री.लक्ष्मण धो. खंडागडे | 151475 | 5/2/2014 | 15000 | 4/3/2014 |
| 32 | 130245 | शनिवार | श्री.अशोक ना.गुल्ला | 916336 | 10/2/2014 | 11000 | 26/2/2014 |
| 33 | 163062 | पाच्छा | श्री.बालजी पु.छोगा | 922336 | 25/2/2014 | 20000 | 3/3/2014 |
| 34 | 070612 | पूर्ण | श्री.मधूसूदन कृ.कोल्हापूरे | 093794 | 26/2/2014 | 20000 | 6/3/2014 |
| 35 | 301959 | वि.रो. | श्री.भिमाशंकर स.पुजारी | 051290 | 10/3/2014 | 5000 | 5/3/2014 |
| 36 | 166346 | पाच्छा | श्री.सोमा सुकप्पा जाधव | 119609 | 5/3/2014 | 25000 | 12/3/2014 |
| 37 | 162571 | पाच्छा | श्री.व्यंकय्या छोगा | 007237 | 5/3/2014 | 10500 | 12/3/2014 |
| 38 | 140385 | शुक्रवार | श्री.शीवा गणपत शिंदे | 550305 | 7/3/2014 | 9000 | 14/3/2014 |
| 39 | 291989 | हो.रो. | श्री.आनंद अ.कांबळे | 108678 | 15/10/2013 | 27972 | 20/3/2014 |
| 39 | 070769 | पू.मं. | श्री.सलाम नूरमहमद खलीका | 092190 | 20/3/2014 | 50000 | 25/3/2014 |
| 40 | 301120 | वि.रो. | श्री.निर्भलसिंग न.चव्हाण | 052536 | 20/3/2014 | 15000 | 27/3/2014 |
| 41 | 290913 | हो.रो. | श्री.हरीदरास गोपाळ गुल्ला | 399979 | 24/3/2014 | 5000 | 27/3/2014 |
| 42 | 163397 | पाच्छा | श्रीमती इंदुबाई सि. श्रीराम | 007138 | 25/3/2014 | 28129 | 25/3/2014 |

4) उपरोक्त धनादेश बॅकेत वटले नसल्याने व ते संबधीत मालमत्ता धारकास परत करण्यात आल्यामूळे संबधिताकडून रोखीने रककम वसूल करण्यात आलेली आहे काय ? व केव्हा वसूल करण्यात आली. याबाबतची माहिति सादर केली नाही.

5) धनादेश परत झाल्यामूळे महानगरपालिकेस तेवढया रक्कमेने त्या वर्षी तेवढा महसूल कमी प्राप्त झाला.

6) धनादेश न वटल्याने संबधितावर कोणती कार्यवाही करण्यात आली? याची माहिति लेखापरीक्षणास सादर केली नाही.

उपरोक्त मुद्द्या संदर्भात अर्धसमास पत्र क्रमांक 72 दिनांक 23/11/2017 अन्वये विभागास विचारणा केली असता विभागाने याबाबतचे अनुपालन सादर केलेले नाही. त्यामुळे सदरचे आक्षेप कायम करण्यात आलेले आहे.

FDSDKPM7201 (Ref No : 48, Hmm No : 72)

## *106 वित्तीय वर्ष 2013-14 या वर्षातकर संकलन विभाग व संगणक विभाग यांचे कडील मालमत्ता करांचे जमा रक्कमामध्ये असलेल्या तफावतीबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 1**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

***सोलापूर महानगरपालिकेच्या शहर विभाग व हद्दवाढ विभागाकडील वित्तीय वर्ष 2013-14 या कालावधीत मालमत्ता करांच्या जमा रक्कमा व संगणक विभागाकडील सदर करांच्या जमा रक्कमा यामध्ये तफावत असल्याचे आढळुन आले. संगणकीय प्रणालीव्दारे मालमत्ता कर वसुली रक्कमा संबंधित मिळकतदारांच्या खात्यास आपोआप नोंदली जाते तर कर्मचाऱ्याकडील पावती पुस्तकाव्दारे वसुल रक्कम पुन्हा संगणक विभागामध्ये संबंधित मिळकतदाराच्या खात्यामध्ये नोंदवली जाते त्यामुळे वसुल करण्यात आलेल्या सर्व करांची रक्कम सर्व संबंधित मिळकतदारांचे मागणी (डिमांड) मधुन कमी केली जाते. त्यामुळे एकत्रित किर्दीनुसार करांची जमा रक्कम व संगणकीय विभागानुसार करांची जमा रक्कम एकच असणे आवश्यक आहे. परंतु वित्तीय वर्ष 2013-14 ची मालमत्ता करांची एकूण जमा रक्कम यामध्ये खालीलप्रमाणे तफावत असल्याचे लेखापरीक्षणास आढळुन आले.***

सोलापूर महानगरपालिकेच्या शहर विभाग व हद्दवाढ विभागाकडील वित्तीय वर्ष 2013-14 या कालावधीत मालमत्ता करांच्या जमा रक्कमा व संगणक विभागाकडील सदर करांच्या जमा रक्कमा यामध्ये तफावत असल्याचे आढळुन आले.

1)सोलापूर महानगरपालिकेत मालमत्ता करांची रक्कम नागरिकांकडून वसुली कर्मचारी यांचे मार्फत पावती पुस्तकाव्दारे वसुल केली जाते. तसेच संगणक विभागाचे नागरी सुविधा केद्रामध्ये संगणकीय पावत्याव्दारे वसुल केली जाते. धनादेशाव्दारे जमा झालेली मालमत्ता कराची रक्कम धनादेश वटल्यानंतर संगणकीय पावतीव्दारे अथवा कर्मचाऱ्यांकडील पावती पुस्तकाव्दारे पावती दिली जाते. संगणकीय प्रणालीव्दारे मालमत्ता कर वसुली रक्कमाच्या संबंधित मिळकतदारांच्या खात्यास आपोआप नोंदली जाते तर कर्मचाऱ्याकडील पावती पुस्तकाव्दारे वसुल रक्कम पुन्हा संगणक विभागामध्ये संबंधित मिळकतदाराच्या खात्यामध्ये नोंदवली जाते, त्यामुळे वसुल करण्यात आलेल्या सर्व करांची रक्कम सर्व संबंधित मिळकतदारांचे मागणी (डिमांड) मधुन कमी केली जाते.

संगणक विभागाचे नागरी सुविधा केंद्राकडील मालमत्ता करांची वसुल रक्कम व वसुली कर्मचाऱ्याकडील पावती पुस्तकाव्दारे वसुल रक्कम शहर व हद्दवाढ विभागामध्ये ठेवण्यात आलेल्या एकत्रित किर्दीस जमा घेतली जाते. त्यामुळे एकत्रित किर्दीनुसार करांची जमा रक्कम व संगणकीय विभागानुसार करांची जमा रक्कम एकच असणे आवश्यक आहे. परंतु वित्तीय वर्ष 2013-14 ची मालमत्ता करांची एकूण जमा रक्कम यामध्ये खालीलप्रमाणे तफावत असल्याचे लेखापरीक्षणास आढळुन आले.

(अ)शहर विभाग

| अ.क्र. | कराचे नाव | शहर विभागाकडील एकत्रित किर्दनुसार जमा रक्कम रु | संगणक विभागानुसार शहर विभागाची जमा रक्कम रु. | तफावत रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | सर्वसाधारण कर | 176823017 | 176979976 | -156959 |
| 2 | स्वच्छता कर | 45491381 | 45545631 | -54250 |
| 3 | सार्व. पाणीपट्टी | 7922966 | 7950374 | -27408 |
| 4 | खाजगी पाणीपट्टी | 134043747 | 134080071 | -36324 |
| 5 | इतर कर | 30675088 | 30704711 | -29623 |
| 6 | नोटीस कर | 1123167 | 1149332 | -26165 |
| 7 | वारंट फी | 2237581 | 2269329 | -31748 |
| 8 | युजर | 52264798 | 52187820 | 76978 |
| | एकूण | | | -285499 |

(ब) हद्दवाढ विभाग

| अ.क्र. | कराचे नाव | शहर विभागाकडील एकत्रित किर्दनुसार जमा रक्कम रु. | संगणक विभागानुसार शहर विभागाची जमा रक्कम रु. | तफावत |
|---|---|---|---|---|
| 1 | सर्वसाधारण कर | 114389538 | 114464010 | -74472 |
| 2 | स्वच्छता कर | 23112988 | 23047181 | 65807 |
| 3 | सार्व. पाणीपट्टी | 9697224 | 9614782 | 82442 |
| 4 | खाजगी पाणीपट्टी | 92656275 | 92753032 | -96757 |
| 5 | इतर कर | 20498480 | 20679058 | -180578 |
| 6 | नोटीस कर | 814616 | 836573 | -21957 |
| 7 | वारंट फी | 1714388 | 1707014 | 7374 |
| 8 | युजर | 57904152 | 57760025 | 144127 |
| एकूण | | | | -74014 |

सदर तफावतीबाबत विभागाने कोणताही खुलासा केलेला नसल्याने मालमत्ता विभागाच्या संगणकीय व पावती पुस्तकाद्वारे वसुलीच्या कार्यवाहीमध्ये त्रुटी असल्याचे दिसत आहे.

उपरोक्त मुद्द्या संदर्भात अर्धसमास पत्र क्रमांक 73 दिनांक 23/11/2017 अन्वये विभागास विचारणा केली असता विभागाने याबाबतचे अनुपालन सादर केलेले नाही. त्यामुळे सदरचे आक्षेप कायम करण्यात आलेले आहेत.

FDSDKPM7201 (Ref No : 49, Hmm No : 73)

### *107 वित्तीय वर्ष 2013-14 मधील पाणीपट्टी थकबाकी बाबत...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 7**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***आर्थिक वर्ष 2013-14 या कालावधीमध्ये पाणीपट्टीची थकबाकी रक्कमेमध्ये वाढ झाल्याचे आढळून आले. वर्ष***

***2012-13 अखेर थकबाकी रु.480478387/- एवढी होती, ती 2013-14 अखेर रु.51,25,73,944/- झाल्याने थकबाकीमध्ये रक्कम रु.3,20,95,557/- एवढी वाढ झाली आहे. पाणी पुरवठा विभागातील कर्मचारी, अधिकारी यांचे वेतन व भत्त्यावर, लाईट बील, मेटेंनन्स, पाणीपुरवठा योजना, कर्जे त्यांचे व्याज, परतावा यावर वित्तीय वर्ष 2013-14 मध्ये किती खर्च करण्यात आलेला आहे, याबाबतची माहिती विभागाने सादर केलेली नाही. पाणीपट्टीचे वित्तीय वर्ष 2013-14 चे एकूण उद्दिष्ट किती होते, त्यापैकी प्रत्यक्षात किती रक्कम वसूल करण्यात आलेली आहे व किती रक्कम थकीत या बाबतची माहिती विभागाकडून सादर केलेली नाही. मीटर विभागाचे वित्तीय वर्ष 2013-14 मध्ये पाणीपट्टी चे एकूण उद्दिष्ट रक्कम रु. 115317658/- एवढे असताना रक्कम रु.85416874/- एवढीच वसुली झाली असून रक्कम रु.29900784/- थकबाकी असल्याचे दिसून येत आहे. मीटर विभागाकडून एकूण वसुली उद्दिष्टाच्या 75% पेक्षा कमी असल्याचे दिसून आलेले आहे. पाणी पुरवठा विभागाचे पाणी लेखापरीक्षण (वॉटर ऑडीट) करण्यात आले होते किंवा कसे ? याबाबतची माहिती विभागाकडून सादर करण्यात आलेली नाही.***

सोलापूर महानगरपालिकचे शहर व हद्दवाढ भागामधील पाणीपट्टी मागणी, वसुली व थकबाकी यांचा आढावा घेतला असता काहि अनियमितता आढळुन आल्या असल्याने या संदर्भात अर्ध समास पत्र क्र. 78 दि.12/12/2017 अन्वये विभागास विचारणा केली असता त्याचे अनुपालन विभागाने सादर केले नाही. त्यामुळे लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) आर्थिक वर्ष 2013-14 या कालावधीमध्ये पाणीपट्टीची थकबाकी रक्कमेमध्ये खालीलप्रमाणे वाढ झाल्याचे आढळून आले. वर्ष 2012-13 अखेर थकबाकी रु.480478387/- एवढी होती, ती 2013-14 अखेर रु.51,25,73,944/- झाल्याने थकबाकीमध्ये रक्कम रु.3,20,95,557/- एवढी वाढ झाली आहे.

2) पाणी पुरवठा विभागातील कर्मचारी,अधिकारी यांचे वेतन व भत्त्यावर, लाईट बील, मेटेंनन्स, पाणीपुरवठा योजना, कर्जे त्यांचे व्याज, परतावा यावर सन 2013-14 मध्ये किती खर्च करण्यात आलेला आहे या बाबतची माहिती सादर करण्याबाबत कळविले असता विभागाने याबाबतची माहिती सादर केलेली नाही.

3) शहर व हद्दवाढ विभागाचे पाणीपट्टी चे सन 2013-14 चे एकूण उद्दिष्ट किती होते, त्यापैकी प्रत्यक्षात किती रक्कम वसूल करण्यात आलेली आहे व किती रक्कम थकीत आहे. या बाबतची माहिती सादर करण्याबाबत कळविले असता विभागाने याबाबतची माहिती सादर केलेली नाही.

4) आकारणी करसंकलन कार्यालय मीटर विभागाकडून प्राप्त माहिती नुसार सन 2013-14 मध्ये मीटर विभागाचे पाणीपट्टी चे एकूण उद्दिष्ट रक्कम रु. 115317658/- एवढे असताना रक्कम रु.85416874/- एवढीच वसुली झाली असून रक्कम रु.29900784/- थकबाकी असल्याचे दिसून येत आहे. मीटर विभागाकडून एकूण वसुली उद्दिष्टाच्या 75% पेक्षा कमी असल्याचे दिसून आलेले आहे.

5) शहर व हद्दवाढ विभागातील 1 इंच पेक्षा जास्त नळ आकाराच्या बाबतीतील सन 2013-14 यावर्षामध्ये पाणपट्टी मागणी किती होती त्यापैकी वसुली किती झाली,व मार्च 2014 अखेर थकबाकी किती आहे. तसेच सदर1 इंचापेक्षा जादा आकारमान मीटर संख्या, वापर प्रकार, बंद मीटर, चालु मीटर संख्या इ. माहिती सादर करण्यात आलेली नाही.

6) मुख्यलेखापाल कार्यालयाकडे प्रत्येक विभागाचे खर्चाचे व जमेची हिशोब असल्याने वित्तीय वर्ष

2013-14 या वित्तीय वर्षात पाणी पुरवठा विभागाचा प्रत्यक्ष खर्च व प्रत्यक्ष जमा किती? याबाबची माहिती मुख्यलेखापाल कार्यालयाकडून सादर करण्यात आलेली नाही.
7) पाणी पुरवठा विभागाचे वित्तीय वर्ष 2013-14 या वित्तीय वर्षाचे पाणी लेखापरीक्षण (वॉटर ऑडीट) करण्यात आले होते किंवा कसे ? याची याबाबतची माहिती सादर करण्यात आलेली नाही.

FDSDKPM7201 (Ref No : 71, Hmm No : 78)

## *108 नगरसेवक - पदाधिकारी यांचे दूरध्वनी, लेखनसामुग्री व लेटरपॅड छपाईवर करण्यात आलेल्या खर्चाबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

वसूलपात्र रक्कम रु. 566651.00/-

***महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-2009/प्रक्र 148/नवि-26 दिनांक 22/01/2010 नुसार नगरसेवकांना मानधनापोटी (दुरध्वनी, लेखनसामुग्री व टपाल या बाबीवरील खर्च लक्षात घेऊन) दरमहा रु.7,500/- प्रदान करावयाचे आहे. सोलापूर महानगरपालिकेकडून नगरसेवकांना 2013-14 या आर्थिक वर्षात एकूण रक्कम रु.95,72,387/- अदा करण्यात आली आहे. नगरसेवक, पदाधिका-यांना दरमहा मानधनासोबत दूरध्वनी, लेखनसामुग्री व टपाल या बाबींवरील खर्चाकरिता स्वतंत्र रक्कम रु.7,500/- प्रदान केलेली असतांनाही दूरध्वनी, लेखनसामुग्री व लेटरपॅड छपाईवर नियमबाहयरीत्या स्वतंत्रपणे एकुण खर्च रक्कम रु.5,66,651/- इतका खर्च केलेला आहे. सदरची रक्कम वसूलपात्र आहे.***

महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-2009/प्रक्र.148/नवि-26 दिनांक 22/01/2010 नुसार नगरसेवकांना मानधनापोटी दरमहा रु.7,500/-(दुरध्वनी, लेखनसामुग्री व टपाल या बाबीवरील खर्च लक्षात घेऊन) प्रमाणे 2013-14 या आर्थिक वर्षात एकूण रक्कम रु.95,72,387/- अदा करण्यात आली आहे.

उपरोक्त प्रमाणे प्रदान करण्यात आलेल्या मानधनामध्ये नगरसेवानां दूरध्वनी, लेखनसामुग्री व टपाल या बाबीवरील खर्च भागवावयाचा असतांना खालीलप्रमाणे रक्कम रु.5,66,651/- इतका खर्च मनपा निधीमधून पदाधीकारी व नगरसेवकांकरीता करण्यात आलेला आहे.

| वित्तीय वर्ष | दूरध्वनी वरील खर्च रुपये | मा.मनपा सदस्यांचे 5 लेटर पॅड, 5 मोठे लेटर पॅड, 500 व्हिजिटींग कार्ड प्रत्येक सदस्यांकरीता | एकूण रुपये |
|---|---|---|---|
| 2013-2014 | 1,62,726/- | 4,03,925/- | 5,66,651/- |

नगरसेवक, पदाधिका-यांना दरमहा मानधनासोबत दूरध्वनी, लेखनसामुग्री व टपाल या बाबींवरील खर्चाकरिता रक्कम रु.7,500/- प्रदान केलेली असतांनाही सदर बाबींवरील खर्चासाठी नियमबाहयरीत्या स्वतंत्रपणे एकुण खर्च रक्कम रु.5,66,651/- इतका खर्च केलेला असल्याचे लेखापरीक्षणास दिसून आल्याने अर्ध समास क्र.74 दि.23/11/2017 अन्वये विभागास विचारणा केली असता विभागाने याबाबतचे अनुपालन सादर केलेले नाही. त्यामुळे सदरचा आक्षेप कायम करण्यात येत आहे.

वसूलपात्र रक्कम रु 5,66,651/-

FDSDKPM7201 (Ref No : 50, Hmm No : 74)

## *109 वित्तीय वर्ष 2013-14 या वर्षात अंदाजपत्रकामध्ये अनावश्यक तरतुद करण्यात आल्याबाबत...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 9715000.00 /-

***वित्तीय वर्ष 2013-14 या वर्षामध्ये सोलापूर महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकामध्ये नगर सचिव विभागाकडून होणाऱ्या खर्चाबाबतची करण्यात आलेली तरतुद व नगर सचिव विभागाकडून त्यावर्षात प्रत्यक्षात करण्यात आलेल्या खर्चाबाबतची माहीती तपासली असता ,नगर सचिव विभागाकडून एकूण तरतुदीच्या 60% बचत झालेली असल्याचे लेखापरीक्षणास दिसून आलेली असल्याने, त्यानुसार अंदाजपत्रकामध्ये नगर सचिव विभागाकडून अनावश्यक तरतुद करण्यात आल्याचे आढळून आलेले आहे.***

वित्तीय वर्ष 2013-14 मध्ये सोलापूर महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकामध्ये नगर सचिव विभागाकडून होणाऱ्या खर्चाबाबतची करण्यात आलेली तरतुद नगर सचिव विभागाकडून त्यावर्षात केलेला प्रत्यक्षात करण्यात आलेल्या खर्चाबाबतची माहीती तपासली असता मोठया प्रमाणात बचत झालेली असल्याचे लेखापरीक्षणास दिसून आलेले आहे. नगर सचिव विभागाकडून करण्यात आलेली तरतुद व प्रत्यक्ष करण्यात आलेला खर्च व झालेली बचत पुढील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | खर्चाचे लेखाशिर्ष | 2013-14 मध्ये करण्यात आलेली तरतुद | 2013-14 मध्ये प्रत्यक्ष झालेला खर्च | बचत |
|---|---|---|---|---|
| 1 | इंधन खर्च | 2500000 | 1567456 | 932544 |
| 2 | सुटेभाग खरेदी | 600000 | 357829 | 242171 |
| 3 | संकीर्ण खर्च | 2500000 | 1088425 | 1411575 |
| 4 | स्वागत समारंभ | 100000 | 43182 | 56818 |
| 5 | मा. महापौर सहल व प्रवास खर्च | 300000 | 76858 | 223142 |
| 6 | सांस्कृतीक कार्यक्रम | 300000 | 0 | 300000 |
| 7 | कौन्सील हॉल देखभाल दुरुस्ती | 2000000 | 174585 | 1825415 |
| 8 | वाहन स्वच्छता व दुरुस्ती आकारणी | 25000 | 1135 | 23865 |
| 9 | मा. उप महापौरांचा ऐच्छिक खर्च | 400000 | 138593 | 261407 |
| 10 | मा. सभागृह नेता यांचा ऐच्छिक खर्च | 400000 | 129683 | 270317 |
| 11 | मा.विरोधी पक्षनेता यांचा ऐच्छिक खर्च | 250000 | 214767 | 35233 |
| 12 | मा. सहा समिती ऐच्छिक खर्च | 300000 | 50839 | 249161 |
| 13 | मा. महापौर व्यय नियतन भत्ता | 40000 | 1464 | 38536 |
| | एकूण | 9715000 | 3844816 | 5870184 |

उपरोक्त लेखाशिर्षा खाली एकूण रक्कम रु.5870184/- एवढी बचत झालेली असून सदर बचत ही एकूण तरतुदीच्या 60% आहे. सदर बचतीची टक्केवारी हि खर्चाच्या टक्केवारी पेक्षा जास्त असल्याने याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 83 दिनांक13/12/2017 अन्वये विभागास विचारणा केली असता विभागाने याबाबतचा खुलासा सादर केलेला नाही. त्यामुळे सदरचे आक्षेप कायम करण्यात आलेले आहेत.

FDSDKPM7201 (Ref No : 74, Hmm No : 83)

## *110 धनादेशाव्दारे प्राप्त झालेल्या रकमेची धनादेश वाटण्यापूर्वी कच्ची पावती न देता पक्की पावती देण्यात आल्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***सोलापूर महानगरपालिकेच्या अग्निशामक विभागाकडे बांधकाम विभागाच्या आदेशान्वये संबधित इमारतीला अग्निशामक यंत्रणा बसविण्यकरिता अग्निशामक सुरक्षा फी आकारण्यात येते. सन 2013-14 या आर्थिक वर्षातील अग्निशामक सुरक्षा फीबाबत पावती पुस्तकाचे लेखापरीक्षण केले असता धनादेशाव्दारे प्राप्त झालेल्या रकमेची धनादेश वटण्यापूर्वी कच्ची पावती न देता पक्की पावती देण्यात आल्याचे निर्दशनास आले.***

सोलापूर महानगरपालिकेच्या अग्निशामक विभागाकडे बांधकाम विभागाच्या आदेशान्वये संबधित इमारतीला अग्निशामक यंत्रणा बसविण्याकरिता अग्निशमन सुरक्षा फी आकारण्यात येते. 2013-14 या आर्थिक वर्षातील अग्निशमन सुरक्षा फीबाबत पावती पुस्तकाचे लेखापरीक्षण केले असता धनादेशाव्दारे प्राप्त झालेल्या रकमेची धनादेश वाटण्यापूर्वी कच्ची पावती न देता पक्की पावती देण्यात आल्याचे निर्दशनास आले. धनादेश वाटण्यापूर्वी पक्की पावती देण्यात आलेल्या रक्कमाबाबतची मीहिती पुढील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | धनादेश क्र | धनादेशाचा दिनांक | रक्कम रु. | पक्की पावती क्रमांक | पावती क्रमांक व दिनांक | धनादेशजमा केल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 207951 | 01/07/2013 | 150000 | 0189475 | 01/07/2013 | 02/07/2013 |
| 2 | 007157 | 18/07/2013 | 25000 | 0189489 | 20/07/2013 | 20/07/2013 |
| 3 | 613805 | 25/07/2013 | 35000 | 0189492 | 30/07/2013 | 30/07/2013 |
| 4 | 000339 | 29/08/2013 | 20000 | 018009 | 06/09/2013 | 07/09/2013 |
| 5 | 237308 | --- | 2000 | 018056 | 23/10/2003 | 23/10/2013 |
| 6 | 015864 | 22/11/2013 | 14000 | 018075 | 22/11/2013 | 22/11/2013 |
| .7 | 001710 | 09/12/2013 | 4000 | 012703 | 11/12/2013 | 11/12/2013 |
| 8 | 191511 | 10/12/2013 | 50000 | 012704 | 11/12/2014 | 11/12/2013 |
| 9 | 029011 | 04/01/2014 | 69836 | 012721 | 07/01/2014 | 08/01/2014 |
| 10 | 029020 | 04/01/2014 | 30000 | 012722 | 07/01/2014 | 08/01/2014 |
| 11 | 010232 | 02/01/2014 | 40000 | 012723 | 07/01/2014 | 08/01/2014 |
| 12 | 191511 | 10/12/2013 | 50000 | 012704 | 11/12/2014 | 11/12/2013 |

उपरोक्त मुद्द्या संदर्भात अर्धसमास पत्र क्रमांक 79 दिनांक 12/12/2017 अन्वये विभागास विचारणा केली असता विभागाने याबाबतचा खुलासा सादर केलेला नाही. त्यामुळे सदरचे आक्षेप कायम

करण्यात आलेले आहेत.

FDSDKPM7201 (Ref No : 72, Hmm No : 79)

## *111 अग्निशामक विभागाकडील फायरमनच्या सेवा पुस्तकातील त्रुटी बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***सोलापूर महानगरपालिकेच्या अग्निशामक विभागाकडे असलेल्या फायरमनच्या सेवा पुस्तकाची तपासणी केली असता सेवा पुस्तकात त्रुटी असल्याचे आढळून आलेल्या आहेत. त्यामध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे.***

सोलापूर महानगरपालिकेच्या अग्निशामक विभागाकडे असलेल्या फायरमनच्या सेवा पुस्तकाची तपासणी केली असता खालील प्रकारच्या त्रुटी आढळून आलेल्या आहेत.

| अ.क्र. | कर्मचारयाचे नावं | पद नाम | सेवा पुस्तकातील त्रुटी |
|---|---|---|---|
| 1. | श्री. तानाजी धोंडीबा मठाळाकर | फायरमन | 1)वैद्याकीय दाखाल्यची नोंद नाही.<br>2)नामनिर्देशन, निवृत्ती वेतन नामनिर्देशन, मृत्यु सेवानिवृत्ती नामनिर्देशन पत्रक भरलेली आहेत परंतु त्याची नोंद सेवापुस्तकात घेतलेली नाही.<br>3) दि.02/03/2015 ते दि.04/03/2015 अर्जित रजा मंजूर असताना अर्धवेतनी रजा लेख्यात खर्ची पाडण्यात आलेली आहे.<br>4) दि.01/07/2010ते दि.31/12/2010 पर्यंतची अर्जित रजा जमा केलेली नाही. |
| 2 | श्री.भिमराव महदेव बिराजदार | फायरमन | 1) नामनिर्देशन, निवृत्ती वेतन नामनिर्देशन, मृत्यु सेवानिवृत्ती नामनिर्देशन पत्रक भरलेली नाहीत. त्याची नोंद सेवापुस्तकात घेतलेली नाही. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | 2) दि.24/08/2012ते दि.30/08/2012 (7दिवस) अर्जित रजा लेख्यात खर्ची पडण्यात आलेली नाही.<br>3) दि.13/08/2014ते दि.23/08/2014 (11दिवस) अर्जित रजा लेख्यात खर्ची पाडण्यात आलेली नाही. |
| 3. | श्री अरुण गणपत साबळे | फायरमन | 1) नामनिर्देशन, निवृत्ती वेतन नामनिर्देशन, मृत्यु सेवानिवृत्ती नामनिर्देशन पत्रक भरलेली आहेत परंतु त्याची नोंद सेवापुस्तकात घेतलेली नाही.<br>2) शैक्षणिक आहर्ताची नोंद सेवा पुस्तकाच्या पहिल्या पानावर घेतलेली नाही.<br>3) दि.11/03/2015ते दि.20/03/2015 (10दिवस) अर्जित रजा लेख्यात खर्ची पाडण्यात आलेली नाही.<br>4) दि.18/08/2016ते दि.25/08/2016 (8 दिवस) अर्जित रजा लेख्यात खर्ची पाडण्यात आलेली नाही.<br>5) आश्वासित प्रगती योजने अंतर्गत देण्यात आलेल्या पद्दोन्नती बाबतची नोंद सेवा पुस्तकात घेण्यात आलेली नाही. |
| 4 | श्री सिद्धराम संगप्पा अडगळे | फायरमन | 1) नामनिर्देशन, निवृत्ती वेतन नामनिर्देशन, मृत्यु सेवानिवृत्ती नामनिर्देशन पत्रक भरलेली आहेत परंतु त्याची नोंद सेवापुस्तकात घेतलेली नाही.<br>2) दि.01/07/2000ते दि.31/12/2000 या कालावधीची रजा जमा करण्यात आलेली नाही.<br>3) दि.01/01/2001ते दि.31/12/2001पर्यंत 30 दिवस रजा जमा करण्या एवजी 15 दिवस रजा जमा करण्यात आलेली आहे. |
| 5 | श्री जहागीर बाबूलाल सिंदगिकर | फायरमन | 1) नामनिर्देशन, निवृत्ती वेतन नामनिर्देशन, मृत्यु सेवानिवृत्ती नामनिर्देशन पत्रक भरलेली नाहीत. त्याची नोंद सेवापुस्तकात घेतलेली नाही.<br>2) दि.06/01/2014 ते दि.09/01/2014 (4दिवस) अर्जित रजा होत असताना आदेशात 5 दिवस नमूद केलेली आहे. परंतु सदर रजा खर्ची पाडण्यात आलेली नाही. |

| | | | |
|---|---|---|---|
| 6 | श्री अंकुश यल्लप्पा नारायणकर | | 1)नामनिर्देशन, निवृत्ती वेतन नामनिर्देशन, मृत्यु सेवानिवृत्ती नामनिर्देशन पत्रक भरलेली आहे, परंतु त्याची नोंद सेवापुस्तकात घेतलेली नाही.<br>2) दि.1/7/2011ते दि.31/12/2011 (15 दिवस) अर्जित रजा जमा करताना पूर्वीचा शिल्लक रजा 185 असताना 185 + 15 = 200 अर्जित रजा होत असताना 190 दिवस रजा दाखविण्यात आहे. |

उपरोक्त सेवा पुस्तकातील त्रुटी संदर्भात अर्धसमास पत्र क्रमांक 80 दिनांक 12/12/2017 अन्वये विभागास विचारणा केली असता विभागाने याबाबतचा खुलासा सादर केलेला नाही. त्यामुळे सदर आक्षेप कायम करण्यात आलेले आहेत.

FDSDKPM7201 (Ref No : 73, Hmm No : 80)

## *112 वित्तीय वर्ष 2013-14 या कालावधीत अग्निशमक विभागातील जडसंग्रह नोंदवहीतील त्रुटी बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 03**

*लेखा शीर्ष :अग्निशमक विभाग मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***वस्तुची व वाहनाची नोंद करताना आदेश क्रमांक व दिनांक नमुद नाही. तसेच सदर नोंदी कोणत्या दिवशी घेण्यात आल्या त्याचा दिनांक लिहीलेला नाही. सार्वजनीक आरोग्य अभियंता यांची स्वाक्षरी नाही. तसेच कोणती वस्तु खरेदी केल्या, त्याची सविस्तर नोंद नोंदवहीमध्ये लिहलेली नाही. जडसंग्रह नोंदवहीमध्ये दरवर्षी मार्च महीन्यामध्ये संक्षम प्राधिकारी यांचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. सदर प्रमाणपत्र नोंदवहीमध्ये घेण्यांत आलेले नाही.***

सन 2013-14 या कालावधीतील अग्निशमक विभागातील जडसंग्रह नोंदवहीची तपासणी केली असता खालीलप्रमाणे त्यात त्रृटी आढळून आल्यात.

1) वस्तुची व वाहनाची नोंद करताना आदेश क्रमांक व दिनांक नमुद नाही.तसेच सदर नोंदी कोणत्या दिवशी घेण्यात आल्या त्याचा दिनांक लिहीलेला नाही. सार्वजनीक आरोग्य अभियंता यांची स्वाक्षरी नाही. तसेच कोणती वस्तु खरेदी केल्या, त्याची सविस्तर नोंद नोंदवहीमध्ये लिहलेली नाही.

2) गाडीला लागणारे स्पेअरपार्ट, खरेदीच्या नोंदी जडसंग्रह नोंदवहीमध्ये घेण्यांत आलेल्या आहे. सदर नोंदी या नोंदवहीमध्ये घेण्यांत येऊ नये. सदर नोंद Histery Sheet मध्ये घ्यावीत.

3) जडसंग्रह नोंदवहीमध्ये दरवर्षी मार्च महीन्यामध्ये सक्षम प्राधिकारी यांचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. सदर प्रमाणपत्र नोंदवहीमध्ये घेण्यात आलेले नाही.

वरील असलेल्या त्रृटीबाबत विभागाला अर्धसमास ज्ञापन क्र.85 दिनांक 13/12/2017 खुलासा सादर करण्याबाबत कळविले असता विभागाने खुलासा सादर केलेला नाही. त्यामुळे वरील आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

FDSJRDM6801 (Ref No : 94, Hmm No : 85)

## *113 वित्तीय वर्ष 2013-14 या कालावधीत अग्निशामन विभागातील लॉगबुकमधील त्रृटीबाबत..*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 1**

*लेखा शीर्ष : अग्निशमक विभाग मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

***अग्निशामन विभागातील गाडयाचे लॉगबुकची तपासणी केली असता असे निदर्शनात आले की गाडीचा वापर करीत असताना लॉगबुकमध्ये प्रत्येक वेळी (दिवसाला) गाडी क्रमांकानुसार त्या गाडीवर असलेल्या वाहनचालकाचे नांव तसेच सुरवातीचे शिल्लक डिझेल, वापर झालेले डिझेल तसेच शिल्लक डिझेल किती आहे, हे दररोज लॉगबुकमध्ये नमुद करणे आवश्यक आहे. तथापी लॉगबुकमध्ये फक्त डिझेल किती टाकले याची नोंद केली जाते. सदरच्या पध्दतीमुळे त्या वाहनावर महीन्याप्रमाणे किती डिझेल खर्च होते हे कळून येत नाही. तसेच प्रत्येक गाडीवर महिन्याला किती डिझेलचा खर्च झालेला आहे, याप्रमाणे मासिक गोषवारा काढलेला नाही.***

वित्तीय वर्ष 2013-14 या कालावधीतील अग्निशामन विभागातील लॉगबुकची तपासणी केली असता खालीलप्रमाणे त्यात त्रृटी आढळून आल्यात.

अग्निशामन विभागातील गाडयाचे लॉगबुकची तपासणी केली असता असे निदर्शनात आले की गाडीचा वापर करीत असताना लॉगबुकमध्ये प्रत्येक वेळी (दिवसाला) गाडी क्रमांकानुसार त्या गाडीवर असलेल्या वाहनचालकाचे नांव तसेच सुरवातीचे शिल्लक डिझेल, वापर झालेले डिझेल तसेच शिल्लक डिझेल किती आहे हे दररोज लॉगबुकमध्ये नमुद करणे आवश्यक आहे. तथापी लॉगबुकमध्ये फक्त डिझेल किती टाकले याची नोंद केल्या जाते. सदरच्या पध्दतीमुळे त्या वाहनावर महीन्याप्रमाणे किती डिझेल खर्च होते, हे कळून येत नाही. तसेच प्रत्येक गाडीवर महिन्याला किती डिझेलचा खर्च झालेला आहे, याप्रमाणे मासिक गोषवारा काढून वित्तीय वर्ष 2013-14 मध्ये लॉगबुक अदयावत करुन सादर करणे आवश्यक होते. परंतु ते अद्यावत केले नाही.

वरील असलेल्या त्रुटीबाबत विभागाला अर्धसमास ज्ञापन क्र.84 दिनांक 13/12/2017 खुलासा सादर करण्याबाबत कळविले असता विभागाने खुलासा सादर केलेला नाही. त्यामुळे वरील आक्षेप कायम ठेवण्यांत येत आहेत.

FDSJRDM6801 (Ref No : 95, Hmm No : 84)

### *114 आश्वासित प्रगती योजनेची (पहिला लाभ) अंमलबजावणी मधील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 02**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***महानगरपालिकेने या योजनेअंतर्गत पदोन्न्तीच्या पदाची वेतनश्रेणी देय ठरविली असल्याने वरीष्ठ वेतनश्रेणी मिळवण्यासाठी पदोन्न्तीच्या पदाकरीता विहीत केलेली अर्हता, पात्रता, ज्येष्ठ्ता अर्हता परीक्षा, विभागीय परिक्षा या सर्व बाबींची पुर्तता करणे तसेच पदोन्नदतीच्या कार्यपध्दती अनुसरणे आवश्यक राहील, असे असताना महानगरपालिकेच्या नगर अभियंता विभागाकडील वर्ग 4 च्या कर्मचा-यांचे बाबतीत अशी प्रक्रिया राबविली नसल्याचे आढळुन आले. सेवाअंतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या लाभाच्या सर्व प्रकरणांमध्ये सामान्य प्रशासन विभागाकडून मंजुरी घेतली जात नसल्याचे आढळुन आले. सदर कर्मचारी पदोन्न्तीस पात्र***

***आहे किंवा नाही याची वरीलप्रमाणे शहानिशा न करता मुख्यलेखापाल कार्यालयाकडून कर्मचा-यांची सेवा विचारात न घेता फक्त एका वेतन श्रेणीमध्ये 12 वर्ष पुर्ण झालेल्या दिनांकापासून संबंधित कर्मचारी यांना वरीष्ठ वेतनश्रेणी मंजूर केली आहे व त्यास फक्त सामान्य प्रशासन विभागाची मान्यता घेतली आहे व त्यानंतर संबंधित कर्मचारी/अधिकारी यांना त्यानप्रमाणे वेतन व भत्ते आदा केले असल्याचे लेखापरीक्षणास आढळून आले.***

सोलापूर महानगरपालिकेच्या वर्ग 1 ते वर्ग 4 च्या् कर्मचा-यांना महानगरपालिकेने आश्वासित प्रगती योजनेचा (पहिला) लाभ महाराष्ट्र शासन (वित्त विभाग) चे शा.नि.क्र. वेतन/1999/5क 2/99/सेवा-3, दिनांक 20/07/2001 अन्वये मंजूर करुन वरीष्ठ वेतन श्रेणी मधील ग्रेड वेतनमध्ये. वेतन निश्चीती केली असल्याचे आढळुन आले.

1) पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नसल्याने कुंठीतता घालवणेसाठी शासनाने दि.8 जून 1995 अन्वये गट क व ड या कर्मचा-यांसाठी कालबध्द पदोन्नती दि.01/10/1994 पासुन अंमलात आणली होती, नंतर दिनांक 20/07/2001 च्या शासन निर्णय प्रमाणे 8000-13500 व त्याहून कमी वेतन श्रेणीत वेतन घेणा-या अधिकारी कर्मचारी यांना सेवाअंतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू केली, त्यामध्ये सेवेत दोनपेक्षा कमी वेळा पदोन्न्ती मिळालेल्या व संबंधित पदावरील 12 वर्षाची नियमित सेवा पुर्ण करणा-या व 5 वे वेतन आयोगातील 8000-13500 व त्याहून कमी वेतन श्रेणीमध्ये वेतन घेणा-या अधिकारी कर्मचारी यांना सदरच्या योजनेच्या अटी व शर्तीच्या अधिन मंजुर करण्यात आली. त्याप्रमाणे महानगरपालिकेने या योजनेअंतर्गत पदोन्नतीच्या पदाची वेतनश्रेणी देय ठरविली असल्याने वरीष्ठ वेतनश्रेणी मिळवण्यासाठी पदोन्नपतीच्या पदाकरीता विहीत केलेली अर्हता, पात्रता, ज्येष्ठता अर्हता परीक्षा, विभागीय परिक्षा या सर्व बाबींची पुर्तता करणे, तसेच पदोन्नतीच्या कार्यपध्दती अनुसरणे आवश्यक राहील, असे असताना महानगरपालिकेच्या नगर अभियंता विभागाकडील वर्ग 4 च्या कर्मचा-यांचे बाबतीत विहित कार्यपद्धती राबविली नसल्याचे आढळुन आले. सेवाअंतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या लाभाच्यात सर्व प्रकरणांमध्ये सामान्य प्रशासन विभागाकडून मंजुरी घेतली जात नसल्याचे आढळुन आले. सदर कर्मचारी पदोन्नतीस पात्र आहे किंवा नाही याची वरीलप्रमाणे शहानिशा न करता मुख्य लेखापाल कार्यालयाकडून कर्मचा-यांची सेवा विचारात न घेता फक्त एका वेतन श्रेणीमध्ये 12 वर्ष सेवा पुर्ण झालेल्या दिनांकापासून संबंधित कर्मचारी यांना वरीष्ठं वेतनश्रेणी मंजूर केली आहे व त्यास फक्त सामान्य प्रशासन विभागाची मान्यता घेतली आहे व त्या नंतर संबंधित कर्मचारी/अधिकारी यांना त्या प्रमाणे वेतन व भत्ते आदा केले असल्याचे लेखापरीक्षणास आढळून आले. सदरची पध्दत चुकीची आहे.

2) सेवा अंतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मंजूर करताना पदोन्नतीस पात्र कर्मचा-याला संबंधित पदावरील 12 वर्षाची नियमित सेवा केल्यांनंतर सामान्य प्रशासन विभागाच्या मंजूरीने देय असताना नगर अभियंता विभागाकडील वर्ग 4 च्या निवडक सेवा पुस्तकांची तपासणी केली असता खालील कर्मचा-यांची शैक्षणिक पात्रता चौथी पास पेक्षा कमी असताना त्यांना सेवाअंतर्गत अश्वासित प्रगती योजनेचा पहिला लाभ

मंजूर करुन त्याप्रमाणे वेतन व भत्ते मंजूर केल्यांचे आढळुन आले.

| अ. क्र. | कर्मचा-यांचे नाव | पदनाम | पात्रता | नेमणुक दिनांक | से.अ.प.सो. पहिला लाभ मंजूर दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| 1 | मनगेनि मारुती वडतिले | मजूर | अशिक्षित | 16/08/2001 | 16/08/2013 |
| 2 | बाबू नरसप्पा मुळे | मजूर | इ 2.री | 16/08/2001 | 16/08/2013 |
| 3 | अंबादास गंगाराम हक्को | मजूर | इ 3.री | 16/08/2001 | 16/08/2013 |
| 4 | लक्ष्म2ण यल्लकप्पाण गोप | मजूर | इ 2.री | 16/08/2001 | 16/08/2013 |
| 5 | भिमराव धमी इंजनवार (शाळा सोडल्याचे दाखल्यामध्ये गैरहजर असल्याचे नमुद) | मजूर | इ 4.थी | 16/08/2001 | 16/08/2013 |
| 6 | प्रेमिला जविराज बज्ज र | मजूर | अशिक्षित | 16/08/2001 | 16/08/2013 |
| 7 | सिद्राम सायण्णा बोज्जूरल | मजूर | अशिक्षित | 16/08/2001 | 16/08/2013 |
| 8 | सामवेल सायण्णा‍ा चिन्ना पागूल | मजूर | अशिक्षित | 16/08/2001 | 16/08/2013 |
| 9 | बसम्मा2 सिद्राम मेनकुदळे | मजूर | अशिक्षित | 01/09/1991 | 01/9/2003 पहिला लाभ |
| 10 | बबन विठ्ठल पवार | मजूर | इ 2.री | 16/08/2001 | 01/09/2015 दुसरा लाभ |
| 11 | यल्ल9प्पा‍ी मंगप्पाभ बुग | मजूर | इ 1.ली | 16/08/2001 | 16/08/2013 |
| 12 | सत्यावान दशरथ वाघमारे (शाळा सोडल्याचे दाखल्यामध्ये 4 थी पास नाही) | मजूर | इ 4.थी | 05/04/2002 | 16/08/2013 |
| 13 | रंगनाथ पुजारी मैकल | मजूर | इ 2.री | 16/08/2001 | 05/04/2014 |
| 14 | कमल भारत चिरमल (पास नोंद नाही. गैरहजर) | मजूर | इ 4.थी | 16/08/1994 | 16/08/2013 |

तरी शासन निर्णय दि. 08/06/1995 व 20/07/2001 नुसार पात्र कर्मचाऱ्यांना कालबद्ध पदोन्नती व आश्वासित प्रगती यो जनेचा लाभ देवून अपात्र कर्मचाऱ्यांना कालबद्ध पदोन्नती व आश्वासित प्रगती योजनेचा लाभ काढून घेऊन अतिप्रदान रकमेची वसुली करणे आवश्यक आहे.

उपरोक्त मुद्याबाबत अर्धसमास पत्र क्र.15 दि.30/06/2017 अन्वये कळविले असता विभागाने अनुपालन सादर केले नाही. त्यामुळे आक्षेप कायम करण्यात येत आहेत.

DATRNDM7201 (Ref No : 78, Hmm No : 15)

## *115 वित्तीय वर्ष 2013-14 या कालावधीत सामान्य प्रशासन विभागाच्या भांडार शाखेकडील लेखे/नोंदवहया नियमानुसार न ठेवलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 06**

*लेखा शीर्ष : सामान्य प्रशासन विभा मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

***महाराष्ट्र नगरपरीषद लेखा सहिता 1971 च्या नियम क्र.145 नुसार राष्ट्रीय महानगरपालिका लेखा संहितेमधील (National Municipal Accounts Manual) जोडपत्रातील एसटी 1 ते एसटी 3 अन्वये भांडार लेखे ठेवण्यात आलेले नाहीत.***

सामान्य प्रशासन विभागाच्या भांडार शाखेमार्फत मुख्यालय तसेच अन्य प्रशासकीय विभाग व पुरष सेवकांसाठी गणवेश खरेदी, स्त्री सेवकांसाठी गणवेश खरेदी तसेच सोलापुर महानगरपालिका मधील सेवकासांठी पादत्राणे खरेदी, स्टेशनरी साहित्य खरेदी, अग्निशामक दल विभागासाठी निळा (लोकरी) उलन गणवेश कापड खरेदी तसेच विभागीय कार्यालये यांचेकरीता वर्ग-4 कर्मचा-याचे गणवेश, झेरॉक्स पेपर, फाईल कव्हर व तत्सम दैनदिन वापराच्या भांडार साहित्याची खरेदी केली आहे. नोंदवहया/लेखे ठेवण्याबाबत पुढील अनियमितता आढळुन आल्या आहेत.

1) महाराष्ट्र नगरपरीषद लेखा सहिता 1971 च्या नियम क्र.145(1) नुसार नोंदवही नमुना क्र.116 व 117 वापराच्या भांडार साहित्याच्या नोंदी ठेवणे आवश्यक असताना सदर नमुन्यात नोंदवहया ठेवण्यात आलेल्या नाहीत. तसेच जरुरीप्रमाणे प्रत्येक प्रकारच्या वस्तु/मालाकरीता स्वतंत्रे पृष्ठे वापरण्यात आलेली नाहीत.

2) नियम क्र.145(2) अन्वये प्रत्येक महिनाअखेर लेखा पुर्ण करुन वस्तुमालाची शिल्लक पडताळणी करुन पुढील महिन्याची प्रांरभिक शिल्लक म्हणुन नोंद घेतली पाहिजेत. अशी कार्यपध्दती वापरण्यात येत नाहीत.

3) महानगरपालिकेकडे ठेवण्यात आलेल्या नोंदवहयांमध्ये पुरवठा प्राप्त वस्तुंची फक्त संख्या

नोंदविण्यांत येते. अशा वस्तुंची नोंद घेताना त्याचा चलन क्रमांक, बीजक क्रमांक, वस्तुची प्रती नग किंमत, बीजकाची एकूण रक्कम नोंदविणे आवश्यक आहे. तथापि अशा पध्दतीने नोंदी घेण्यात येत नाहीत.

4) शासन निर्णय क्र.लेखास-102004/71/प्र.क्र.5/नवि-31 दिनांक 6/7/2005 अन्वये व भारताचे नियंत्रक व लेखापरीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्र शासनाच्या नगरविकास विभागाने तयार केलेल्या राष्ट्रीय महानगरपालिका लेखा संहितेमधील (राष्ट्रीय महानगरपालिका लेखासंहिता) जोडपत्रातील एसटी 1 ते एसटी 3 या नमुन्यात भांडार लेखे ठेवणे आवश्यक आहे. ही कार्यपध्दती वापरण्यात येत नाही.

उपरोक्त मुद्यांबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.109 दिनांक 22/01/2018 नुसार खुलासा सादर करावयास सांगितले असता विभागाने त्याचे पत्र क्र.सआस/साप्र-1/604 दिनांक 09/028/2018 रोजी खुलासा सादर केलेला आहे. खुलासा संयुक्तिक नसल्यामुळे सदर आक्षेप कायम ठेवण्यात आलेला आहे.

FDSJRDM6801 (Ref No : 91, Hmm No : 109)

### *116 कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांचे आकृतीबंधाबाबत अनियमितताबाबत.....*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 04**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

***सोलापूर महानगरपालिकेमध्ये सामान्य प्रशासन विभागाच्या आकृतीबंधाबाबत मुंबई प्रांतिक आकृतीबंध नियम 1949 मधील 51 (4) नुसार व शासन निर्णय संकीर्ण- 1005 /वर्गीकरण/ प्रक्र/ 379/05/अवि-24 दि.04/05/2006 एकूण पदाबाबत विभागवार नवीन कृतीआराखडा तयार करून त्यास शासनाची मंजुरी घेण्यात आली असल्यास मंजुर आकृतीबंध व त्यानुसार कार्यरत व रिक्त पदे याची माहिती उपलब्ध करून देण्याबाबत कळविले असता ती उपलब्ध केली नाही.***

सोलापूर महानगरपालिकेमध्ये सामान्य प्रशासन विभागाची वित्तीय वर्ष 2013-2014 आकृतीबंधाची पडताळणी केली असता त्याअनुषंगाने निदर्शनास आलेल्या उणीवाबाबत अर्धसमास क्रमांक-101 दि.05/01/2017 अन्वये खुलासा मागविला असता विभागाकडून याबाबत लेखापरीक्षणास

खुलासा प्राप्त झालेला नाही त्यामुळे खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

सोलापूर महानगरपालिकेचे कार्यरत कर्मचारी/अधिकारी,1,2,3,4 वर्ग या पदांची संख्या खालील प्रमाणे आहे. त्यामध्ये खालील त्रुटी आढळून येते. सोलापूर महानगरपालिका आस्थापनेवरील वर्गनिहाय कार्यरत अधिकारी/कर्मचारी पदाची माहीती

| अ.क्र. | वर्ग | स्थाई | अस्थाई | एकून पदांची संख्या |
|---|---|---|---|---|
| 1 | अ | 24 | 17 | 41 |
| 2 | ब | 111 | 127 | 238 |
| 3 | क | 1141 | 518 | 1659 |
| 4 | ड | 1321 | 283 | 3504 |
| | एकूण पदांची संख्या | 4497 | 945 | 5442 |

1. आकृतीबंधाबाबत मुंबई प्रांतिक आकृतीबंध नियम 1949 मधिल 51 (4) नुसार व शासन निर्णय संकीर्ण- 1005 /वर्गीकरण/प्रक्र/379/05/अवि-24 दि.04/05/2006 एकूण पदाबाबत विभागवार नवीन कृतीआराखडा तयार करून त्यास शासनाची मंजुरी घेण्यात आली असल्यास मंजुर आकृतीबंध व त्यानुसार कार्यरत व रिक्त पदे याची माहिती उपलब्ध करुन देणे बाबत कळविले असता ती उपलब्ध केली नाही.
2. अस्थायी पदांबाबतची माहिती व पदे पुढे चालू ठेवण्याकरिता शासनाकडील मंजुरी आदेश लेखापरीक्षणास उपलब्ध झालेला नाही.
3. शासन निर्णय क्रमांक संकीर्ण- 1005 /वर्गीकरण/प्रक्र/379/05/अवि-24 दि.04/05/2006 नुसार कोणतेही कार्यवाही आकृतीबंधाबाबत झाल्याचे आढळून येत नाही.
4. शासन निर्णय क्रमांक संकीर्ण- 1005 /वर्गीकरण/प्रक्र/379/05/अवि-24 दि. 04/05/2006 मधिल परीच्छेद 2(1) नुसार आस्थापनावरील खर्चाची मर्यादा 35% एवढी आहे. त्याअनुषंगाने वित्तीय वर्ष 2013-2014 आस्थापनावरील खर्चाची माहिती ज्यामध्ये वेतन,वाहन,कार्यालयीन खर्च,निवृत्तीवेतन, महानगरपालिकेस आऊट सोर्सिग मार्फत होणारी कामे दुरूस्ती,बैठकीवरील खर्च,स्टेशनरी यासाठी महानगरपालिकेस येणारा खर्चचा समावेश आहे. त्याप्रमाणे वित्तीय वर्ष 2013-2014 मध्ये आस्थापनेवर झालेल्या खर्चाची माहिती टक्केवारीसह उपलब्ध करुन देण्यात आली नाही.

DATYMKM6601 (Ref No : 109, Hmm No : 101)

## *117 विभागीय कार्यालय -7, मधील वर्ग-4 च्या कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तकातील त्रुटी बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 04**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***सोलापूर महानगरपालिकेच्या विभागीय कार्यालय -7, मधील वर्ग-4 च्या कर्मचाऱ्यांची सेवा पुस्तकाची तपासणी केली असता सेवापुस्तकात अनेक त्रुटी आढळून आल्या. उदा. वैद्यकीय दाखल्याची नोंद पहिल्या पानावर घेण्यात आलेली नाही. नामनिर्देशन, निवृत्ती वेतन नामनिर्देशन, मृत्यु सेवानिवृत्ती नामनिर्देशन पत्रक भरलेली नाही. अर्जित रजा पूर्ण वर्षाची 30 प्रमाणे जमा करण्यात आलेली आहे. रजा लेखा तयार करण्यात आलेला नाही.***

सोलापूर महानगरपालिकेच्या विभागीय कार्यालय ,7-मधील वर्ग4- च्या कर्मचाऱ्यांच्या सेवा पुस्तकाची तपासणी केली असता खालीलप्रकारच्या त्रुटी आढळून आलेल्या आहेत.

| अ.क्र. | कर्मचारयाचे नावं | पद नाम | सेवा पुस्तकातील त्रुटी |
|---|---|---|---|
| 1. | श्रीमती अलका भारत गायकवाड | झाडूवाली | 1) वैद्यकीय दाखाल्यची नोंद पहिल्या पानावर घेण्यात आलेली नाही.<br>2)नामनिर्देशन, निवृत्ती वेतन नामनिर्देशन, मृत्यु सेवानिवृत्ती नामनिर्देशन पत्रक भरलेली नाही.<br>3) अर्जित रजा पूर्ण वर्षाची 30 प्रमाणे जमा करण्यात आलेली आहे. |
| 2 | श्री. अरविंद आडव्यप्पा मैदगिकर | झाडूवाला | 1) नामनिर्देशन, निवृत्ती वेतन नामनिर्देशन, मृत्यु सेवानिवृत्ती नामनिर्देशन पत्रक भरलेली नाही. त्याची नोंद सेवापुस्तकात घेतलेली नाही. |
| 3. | श्रीमती कमल मुकुंद दुवाके | झाडूवाली | 1) वैद्यकीय दाखाल्यची नोंद पहिल्या पानावर घेण्यात आलेली नाही.<br>2)नामनिर्देशन, निवृत्ती वेतन नामनिर्देशन, मृत्यु सेवानिवृत्ती नामनिर्देशन पत्रक भरलेली नाही. |
| 4 | श्री. रामलू गंगय्या मंदापुरे | झाडूवाला | 1) नामनिर्देशन, निवृत्ती वेतन नामनिर्देशन, मृत्यु सेवानिवृत्ती नामनिर्देशन पत्रक भरलेली आहे परंतु त्याची नोंद सेवापुस्तकात घेतलेली नाही.<br>2) रजा लेखा तयार करण्यात आलेला नाही. |

यासंदर्भात अर्धसमास पत्र क्रमांक 118 दिनांक 02/02/2018 अन्वये उपरोक्त मद्यांचा खुलासा सादर करण्याबाबत विभागास विचारणा केली असता विभागाने याबाबतचे अनुपालन सादर केलेले नसल्याने आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

FDSDKPM7201 (Ref No : 84, Hmm No : 118)

## *118 विहित मुदतीत रोख रक्कम कोषागारात जमा केली नसल्याबाबत.....*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***सोलापूर महानगरपालिकेच्या विभागीय कार्यालयाकडे महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियम आणि विवाह नोंदणी अधिनियम,1998 (सन 1999 चा अधिनियम 20) नुसार ठरलेल्या दराने अर्जदाराकडून फी आकारून अर्जदारास विवाह नोंदणी प्रमाणपत्र विभागीय कार्यालयाकडून देण्यात येते. अर्जदाराकडून प्रमाणपत्राकरिता आकारण्यात आलेली नोंदणी फी ची पावती संबंधितास देण्यात येते व आकारण्यात आलेल्या नोंदणी फी ची रक्कम रोखवहीत नोंदविण्यात येते. सदर नोंदणी फी रक्कम शासनाच्या लेखाशीर्ष 0030- मुद्रांक व नोंदणी फी, 03 नोंदणी फी, 800 इतर जमा अंतर्गत रक्कम जमा करण्यात येते. विभागीय कार्यालय यांच्याकडील, वित्तीय वर्ष 2013-14 च्या विवाह नोंदणी फी रोखवही चे लेखापरीक्षणास केले असता विवाह नोंदणी फी दोन दिवसा पेक्षा जास्त दिवसांनी बँक कोषागार कार्यालयात जमा केल्या असल्याचे निर्दशनास आलेले आहे.***

सोलापूर महानगरपालिकेच्या विभागीय कार्यालयाकडे महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियम आणि विवाह नोंदणी अधिनियम,1998 (सन 1999 चा अधिनियम 20) नुसार विवाह झाल्यापासून अर्ज केल्याच्या तारखेपर्यंत ठरलेल्या दराने अर्जदाराकडून फी आकारून अर्जदारास विवाह नोंदणी प्रमाणपत्र विभागीय कार्यालयाकडून देण्यात येते. अर्जदाराकडून अर्जाची रक्कम रु.15/- व प्रमाणपत्राकरिता आकारण्यात आलेली नोंदणी फी ची पावती संबंधितास देण्यात येते. त्यापैकी प्रमाणपत्राकरिता आकारण्यात आलेल्या नोंदणी फी ची रक्कम रोखवहीत नोंदविण्यात येते. प्रमाणपत्राकरिता आकारण्यात आलेली नोंदणी फी रक्कम शासनाच्या लेखाशीर्ष 0030- मुद्रांक व नोंदणी फी , 03 नोंदणी फी, 800 इतर जमा अंतर्गत रक्कम जमा करण्यात येते.

विभागीय कार्यालय यांच्याकडील, वित्तीय वर्ष 2013-14 च्या विवाह नोंदणी फी रोख वही चे लेखापरीक्षणास केले असता विवाह नोंदणी फी दोन दिवसा पेक्षा जास्त दिवसांनी बँक कोषागार कार्यालयात जमा केल्या असल्याचे निर्दशनास आलेले आहे. याबाबतचे विवरण पत्र सोबत जोडण्यात आलेले आहे. महाराष्ट्र कोषागार नियम 1968 मधील नियम 8 अन्वये राज्य शासनाचा महसूल म्हणून शासकीय कार्यालयांनी स्वीकारलेली रक्कम अशी रक्कम स्वीकारलेनंतर विनाविलंब व दोन दिवसात शासकीय लेख्यामध्ये जमा करणे आवश्यक आहे. दोन दिवसांच्या मर्यादेचे पालन करणे शक्य नसल्यास अपवादात्मक परिस्थितीमध्ये अशी रक्कम सात दिवसाच्या आत कोषागारात / बँकेत जमा करणे आवश्यक असताना, शासनाला देय असलेली रक्कम एवढ्या विलंबाने का जमा करण्यात आली याबाबतचा खुलासा सादर करण्याबाबत अर्ध समास क्रमाक 120 दिनांक 15/02/2018 अन्वये विभागास विचारणा केली असता विभागाकडून याबाबत कोणतेही अनुपालन सादर केलेले नाही. त्त्यामुळे सदरचे आक्षेप कायम करण्यात येत आहेत.

### *119 विभागीय कार्यालय-6,4,2,8 मधील वर्ग-4 च्या सेवापुस्तकामधील त्रुटी बाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 04**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***सेवा पुस्तकातील अंतीम पृष्ठावरील विहीत रकान्यातील वार्षीक सेवची पडताळणी करण्यात येत नसल्याचे दिसून येते. सेवा पुस्तकातील पृष्ठ क्रमांक एक वरील बदलाबाबत पृष्ठ क्रमांक दोन वर 5 वर्ष मुदतीने दयावयाचे प्रमाणपत्र कार्यालय प्रमुखाने दिल्याचे व त्याची नोंद सेवा पुस्तकात घेतली नसल्याचे दिसून येते. वैद्यकीय दाखल्याची नोंद सेवा पुस्तकाच्या पहिल्या पानावर घेण्यात आलेली नाही. सेवापुस्तकातील व रजा लेखे अदयावत व सक्षम प्राधिका-याकडून साक्षाकित केलेले नाही.***

सोलापूर महानगरपालिकेमध्ये सोलापूर महानगरपालिकेच्या विभागीय कार्यालय 6,4,2,8 मधील वर्ग-4 च्या सेवापुस्तकाची तपासणी केली असता खालील प्रमाणे त्रुटी आढळून येतात तपासणी केली असता त्याअनुषंगाने निदर्शनास आलेल्या उणीवाबाबत अर्धसमास क्रमांक-140 दि.26/02/2018 अन्वये खुलासा मागविला आहे. परंतु विभागाकडून खुलासा प्राप्त झालेला नाही. त्यामुळे खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

| अ क्र | विभागीय कार्यालय क्र. | कर्मचा-यांचे नाव | पद नाम | सेवा पुस्तकेतील तृटी |
|---|---|---|---|---|
| 01 | 02 | 03 | 04 | 05 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 01 | विभागीय कार्यालय क्र-6 | श्री नागनाथ बाबू घुले | मुकदम | 01) सेवा पुस्तकातील अंतीम पृष्ठावरील विहीत रकान्यातील वार्षिक सेवची पडताळणी करण्यात येत नसल्याचे दिसून येते. 02) सेवापुस्तकातील व रजा लेखे अदयावत व सक्षम प्राधिका-याकडून साक्षाकित केलेले नाही. |
| 02 | | श्री आनंदकुमार दशरथ म्हेत्रे | मजूर | |
| 03 | | श्रीमती पुषपाबाई प्रकाश कोळी | मजूर | |
| 04 | | श्री जगन्नाथ बिरप्पा बेल्ले | मजूर | |
| 05 | | श्रीमतीआवडाबाई भारत खांडेकर | मजूर | |
| 06 | | श्री महमद शरीफ नबीलाल शेख | मजूर | |
| 07 | | श्री चोखोबा गोपाळ गायकवाड | मजूर | |
| 08 | | श्री राजेंद्र जनार्दन नवगीरे | मजूर | |
| 09 | | श्री किशोर लक्ष्मण येळणे | मजूर | |
| 10 | | श्री कबीर मच्छिंद्र निकंबे | मजूर | |
| 01 | विभागीय कार्यालय क्र-4 | सौ फुलबाई सिद्राम मस्के | झाडूवाली | 03) सेवा पुस्तकातील पृष्ठ क्रमांक एक वरील बदलाबाबत पृष्ठ क्रमांक दोन वर 5 वर्ष मुदतीने दयावयाचे प्रमाणपत्र कार्यालय प्रमुखाने दिल्याचे व त्याची नोंद सेवा पुस्तकात घेतली नसल्याचे दिसून येते. 04) वैद्यकीय दाखल्याची नोंद सेवा पुस्तकाच्या पहिल्या पानावर घेण्यात आलेली नाही. |
| 02 | | श्रीमती मंगल भारत मोरे | झाडूवाली | |
| 03 | | श्रीमती शारदा दिपक चंदनशिवे | झाडूवाली | |
| 04 | | श्री अर्जुन धुळप्पा लाडगे | मजूर | |
| 05 | | श्री राजेंद्र धोंडीबा अंबुरे | मुकदम | |
| 06 | | श्रीमती अनुसया बसप्पा चौगुले | मजूर | |
| 07 | | श्री बन्सी सिद्राम इंगळे | बिगारी | |
| 08 | | श्रीमती सरूबाई लकुळ सरवदे | झाडूवाली | |
| 09 | | श्रीमती गंगु बलभीम मस्के | झाडूवाली | |
| 10 | | श्रीमती अन्नपूर्णा सुरेश सिताफळे | बिगारी | |
| 11 | | सौ सुनंदा मच्छिंद्र कांबळे | झाडूवाली | |
| 12 | | श्री ज्ञानोबा सोपान कांबळे | मजूर | |
| 13 | | श्री म.शफी इनामदार | मुकदम | |
| 14 | | श्रीमती लक्ष्मी मोलवी गाडे | झाडूवाली | |
| 15 | | श्री दत्ता धर्मा माने | मजूर | |
| 16 | | श्री अर्जुन बाजीराव पोळ | मजूर | |
| 01 | विभागीय कार्यालय क्र-2 | श्रीमती सुशिला शरणप्पा कांबळे | झाडूवाली | |
| 02 | | श्रीमती धुळनवा बापू थोरात | झाडूवाली | |
| 03 | | श्रीमती वत्सला मारुती जेटीभोर | झाडूवाली | |
| 04 | | श्रीमती शरण्या जयवंत कांबळे | झाडूवाली | |
| 05 | | श्री तिरुपती ल.पानघंटी | सफाई का | |
| 06 | | श्री ईश्वर नागनाथ भुताळे | झाडूवाला | |
| 07 | | श्रीमती लीलाबाई बबन गायकवाड | झाडूवाली | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 01 | विभागीय कार्यालय क्र-8 | श्री अविनाश कृष्णा पिगुलवार | सफाई का | |
| 02 | | श्रीमती उषाताई पंडित कसबे | झाडूवाली | |
| 03 | | श्रीमती लक्ष्मी अशोक कुचेकर | झाडूवाली | |
| 04 | | श्रीमती कृपम्मा रमेश अडाकुल | झाडूवाली | |
| 05 | | श्री संजीव आमतराव सरवदे | सफाई का | |
| 06 | | श्री परशुराम को. रामगल्लू | सफाई का | |
| 07 | | श्रीमती सुजाता प्रभाकर गवळी | झाडूवाली | |
| 08 | | श्रीमती मुक्ता भिमराव मिसाळ | झाडूवाली | |
| 09 | | श्रीमती कस्तुरा धर्मा कदम | झाडूवाली | |
| 10 | | श्रीमती रुबाबी अकबर शेख | सफाई का | |

वरील सेवापुस्तकामधील तक्ता क्रमाक 5 नुसार असलेल्या त्रुटीची पूर्तता करण्यात यावी, तसेच याप्रमाणे आपल्या स्तरावर उर्वरित सेवापुस्तकांची पडताळणी करण्यात येवून सेवापुस्तके अद्यावत करण्यात यावीत.

DATYMKM6601 (Ref No : 116, Hmm No : 140)

## *120 कुटुंब कल्याण विभागाच्या रोखवहीमधील त्रुटीबाबत....*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 04**

*मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***आरोग्य विभागाच्या अखत्यारीत असलेल्या कुटुंब कल्याण विभागाची रोखवहीची पडताळणी केली असता लेखापरीक्षणामध्ये पुढील प्रमाणे त्रुटी आढळून आल्या. उदा. रोखवहीच्या सुरुवातीला रोखवहीमध्ये किती पृष्ठ आहेत ते प्रमाणित केले नाही. रोखवही बंद करताना सक्षम अधिकारी यांची स्वाक्षरी घेतली नाही. मासिक गोषवारा तयार केला नाही. बरीच धनादेश आरोग्य केंद्रांकडून वटलेली नसल्याने धनादेश रद्द झालेले आहेत.***

आरोग्य विभागाच्या अखत्यारीत असलेल्या कुटुंब कल्याण विभागाची रोखवहीची पडताळणी केली असता लेखापरीक्षणामध्ये त्रुटी आढळून आल्याने संदर्भात अर्धसमास पत्र क्रमांक 114 दिनांक 23/01/2018 अन्वये विभागास विचारणा केली असता विभागाने याबाबतचे अनुपालन सादर केलेले नाही. त्यामुळे सदरचे आक्षेप कायम करण्यात येत आहे.

1.रोखवहीच्या सुरुवातीला रोखवहीमध्ये किती पृष्ठ आहेत ते प्रमाणित करणे आवश्यक असताना तसे प्रमाणपत्र सक्षम अधिकारी यांनी दिलेले नाही.
2.प्रत्येक दिवशी दिवसाअखेर रोखवही बंद करताना सक्षम अधिकारी यांची स्वाक्षरी करणे आवश्यक असताना तसे करण्यात आलेले नाही.
3.महिन्याच्या शेवटी मासिक गोषवारा तयार करण्यात आलेला नाही.
4.कुटुंब कल्याण विभागाकडून आरोग्य केंद्रांना धनादेशाद्वारे रक्कम देण्यात आलेली असून बरेच धनादेश आरोग्य केंद्रांकडून वटली नसल्याने धनादेश रद्द झालेले आहेत.

FDSDKPM7201 (Ref No : 101, Hmm No : 114)

## *121 प्राणी संग्रहालयाकरिता पालेभाज्या व फळभाज्या पुरविण्याबाबतच्या निविदेबाबत...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 04**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 871080.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 871080.00/-

***जाहीर निविदा विलंबाने दि.25/04/2013 रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. वर्कऑडर देण्याकरिता 5 महिने 18 दिवस विलंब झालेला आहे. प्रत्यक्षात माल केव्हा पुरविण्यात आला, कोणकोणत्या दिवशी किती माल पुरविण्यात आला याबाबतची नोंदवही लेखापरिक्षणास उपलब्ध करून देण्यात आली नाही. मालाच्या पुरवठ्याबाबतची बिले लेखापरिक्षणास उपलब्ध करून देण्यात आली नाही.***

सोलापूर महानगरपालिकेच्या उद्यान विभागाच्या अखत्यारीत असलेल्या प्राणी संग्रहलयातील विविध प्राण्यांना दररोज पालेभाज्या फळभाज्या पुरविण्याबाबतच्या नस्तीचे लेखापरीक्षण केले असता नस्तीमध्ये काही त्रृटी आढळून आलेल्या असल्याने अर्धसमास पत्र क्रमांक 121 दिनांक 15/02/2018 अन्वये खालील मद्यांचा खुलासा सादर करण्याबाबत विभागास विचारणा केली असता विभागाने याबाबतचे अनुपालन सादर केलेले नसल्याने आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

17) सदर मालाचा पुरवठा करण्याचा मक्ता दि.31/02/2012 अखेर संपुष्ठात आला असताना जाहीर निविदा विलंबाने दि.25/04/2013 रोजी प्रसिध्द करण्यात आली.

18) प्राणी संग्रालयातील विविध प्राण्यांना दररोज पालेभाज्या फळभाज्या पुरविण्याबाबतची जाहीर निविदा 2013-14 या वित्तीय वर्षा करिता जाहीर निविदा दि.16/06/2013 रोजी उघडले असताना श्री.नागेश एन्टरप्राजेस यांना दि.1/2/2014 रोजी वर्क ऑडर देण्यात

आले. त्याबाबतचा करारनामा दि.1/2/2014 ते दि.31/1/2015 या कालावधीचा करण्यात आला. वर्कऑडर देण्याकरिता 5 महिने 18 दिवस विलंब झाला.

19) मालाचा पुरवठा रोजचे रोज प्राणी संग्रालयात सकाळी 9 ते 10 वाजे पर्यंत देण्यात येण्यबाबतची अट करारात असताना प्रत्यक्षात माल केव्हा पुरविण्यात आला. कोणकोणत्या दिवशी किती माल पुरविण्यात आला याबाबतची नोंदवही लेखापरिक्षणास उपलब्ध करून देण्यात आली नाही.

20) मालाचा पुरवठा समाधानकारक व मुदतीत होताच दरमहा दोन प्रतीमध्ये मालाचे बिल उद्यान विभागाकडे देण्यात येण्याबाबतची तरतुद करारनाम्यात असताना मालाच्या पुरवठ्या बाबतची बिले लेखापरिक्षणास उपलब्ध करून देण्यात आली नाही. तसेच बीलातील कपातीच्या रक्कमांची खात्री करता आली नाही. त्यामुळे वित्तीय वर्ष 2013-14 मध्ये याबाबीवर करण्यात आलेला खर्च रककम रु.8,71,080/- आक्षेपीत ठेवण्यात येत आहे.

FDSDKPM7201 (Ref No : 103, Hmm No : 121)

## *122 वर्ष 2013-14 चे तरतुद रजिष्टर प्रमाणे झालेल्या खर्चाची माहीती उपलब्ध करुन देण्यात न आल्याबाबत.....*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 01**

*मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 681365.00/-

***सोलापूर महानगरपालिकेच्या उद्यान विभागाकरिता वित्तीय वर्ष 2013-14 च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकामध्ये करण्यात आलेल्या तरतुदीच्या खर्चाचे तरतुद रजिष्टर, देयके तसेच त्यासंबधीत नस्ती लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यात आली नाही. त्यामुळे खर्चाची रक्कम रु. 6813165/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.***

सोलापूर महानगरपालिकेच्या उद्यान विभागाकरिता वित्तीय वर्ष 2013-14 च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकामध्ये करण्यात आलेल्या तरतुदीबाबतचे लेखापरीक्षण केले असता खालील लेखाशिर्षाखाली करण्यात आलेली तरतुद व झालेला खर्च खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | खर्चाचा लेखाशिर्ष | वित्तीय वर्ष 2013-14 मधील तरतुद | 2013-14 मध्ये झालेला खर्च |
|---|---|---|---|
| 1. | मनपा बागेची देखभाल दुरुस्ती | 8000000 | 5156742 |
| 2. | वृक्षांचे संरक्षण व संवर्धक वन महोत्सव | 300000 | 799700 |
| 3. | मनपा मालकीचे जागेत झाडे लावणे | 200000 | 165155 |
| 4. | संस्मरण उद्यान व साधुवासवानी उद्यान तयार करणे | 1000000 | 691568 |
| | एकूण | | 6813165 |

उपरोक्त लेखाशीर्षाखाली करण्यात आलेल्या खर्चाची तरतुद रजिष्टर, देयके तसेच त्यासंबधीत नस्ती लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्याबाबत अर्ध समास क्र.133 दि.20/02/2018 अन्वये विभागास विचारणा केली असता विभागाने नस्ती लेखापरीक्षणास उपलब्ध करुन दिलेल्या नाहीत. त्यामुळे खर्चाची रक्कम रु. 6813165/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

FDSDKPM7201 (Ref No : 125, Hmm No : 133)

## *123 स्थानिक संस्था कर व पारगमन शुल्काची 2013-2014 आर्थिक वर्षाचे बजेट बुक मध्ये प्रत्यक्ष जमा रक्कम व स्थानिक संस्था कर विभागाने सादर केलेल्या विवरणपत्रात दर्शविलेल्या जमा रक्कम यातील तफावतीबाबत....*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 04**

*मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***सोलापूर महानगरपालिकेमध्ये स्थानिक संस्था कर व पारगमन शुल्काची वित्तीय वर्ष 2013-2014 ची आर्थिक वर्षाचे बजेट बुकमधील प्रत्यक्ष जमा रक्कम व स्थानिक संस्था कर विभागाने सादर केलेल्या विवरणपत्रात दर्शविलेल्या जमा रक्कमेत तफावती आढळून आल्या.***

सोलापूर महानगरपालिकेमध्ये स्थानिक संस्था कर व पारगमन शुल्काची वित्तीय वर्ष 2013-2014 ची आर्थिक वर्षाचे बजेट बुकमधील प्रत्यक्ष जमा रक्कम ही स्थानिक संस्था कर विभागाने सादर केलेल्या विवरणपत्रात दर्शविलेल्या जमा रक्कमेमध्ये तफावत आढळून येते. त्या अनुषंगाने निदर्शनास आलेल्या उणीवाबाबत अर्धसमास क्रमांक-103 दि.18/01/2017 अन्वये खुलासा मागविला असता विभागाने पत्र क्र.961 दि.22/01/2018 अन्वये सादर केलेला खुलासा विचारात घेवून लेखापरीक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. स्थानिक संस्था करातील जमा रक्कममेच्या तफावतीबाबत.

| अ.क्रं. | तपशिल | बजेटप्रमाणे 2013-14 ची जमा रुपये | विभागाने सादर केलेल्या विवरणपत्रा प्रमाणे 2013-14 ची जमा रुपये | तफावत |
|---|---|---|---|---|
| 1 | आयातकर/स्थानिक संस्था कर | 1262720194 | 1250367880 | 12352314 |
| 2 | पारगमन शुल्क | 259470342 | 299909010 | (-) 40438668 |
| 3 | नोंदनी फी | 0 | 959100 | (-) 959100 |
| 4 | इतर जमा | 38590963 | 405127 | 38185836 |
| | एकूण रुपये | 1560781499 | 1551641117 | 9140382 |

उपरोक्त दर्शविल्याप्रमाणे बजेट बुकातील प्रत्यक्ष जमा रक्कम ही विभागाने सादर केलेल्या विवरणपत्रात दर्शविलेल्या जमा रक्कमेपेक्षा रु.9140382/- ने रक्कम जास्त आढळून येते.

2. स्थानिक संस्था कर विभागाने लेखापरिक्षणास सादर केलेल्या 2013-2014 या वित्तीय वर्षाच्या जमेच्या विवरणपत्राप्रमाणे माहे मार्च-2014 ची एकूण जमा रक्कम रु.159424288/- अशी दर्शविली आहे. परंतु जमाकिर्द नोंदवहीनुसार रक्कम रु.156823774/- अशी आढळून येते. त्यामुळे रक्कम रु.2600514/- ची तफावत दिसून येते.

3. पारगमन शुल्का अंतर्गत माहे मार्च-2014 च्या जमेच्या विवरणपत्राप्रमाणे जमा रक्कम रु.26385190/-अशी दर्शविली आहे. परंतु जमाकिर्द नोंदवहीनुसार रक्कम रु.20730990/- अशी आढळून येते. त्यामुळे रक्कम रु.5654200/- ची तफावत दिसून येते.

4. दिनांक 29/06/2014 चा भरणा बँक ऑफ महाराष्ट्र बँक खाते क्रमांक 60095635455 मध्ये दिनांक 30/06/2013 ला रु.853400/- भरणा केला तशी नोंद जमा किर्द नोंदवहीत आढळून येते. परंतु बँक विवरणपत्रात आढळून येते नाही. उपरोक्त दर्शविल्याप्रमाणे तफावती बाबतचा ताळमेळ घेणे आवश्यक आहे.

## *124 स्थानिक संस्था कर विभागाच्या 2013-2014 या वित्तीय वर्षातील कर निर्धारण प्रकरणातील कर आकारणी अनियमिततेबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**अनियमितता संख्या : 04**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***व्यापाऱ्यांनी धनादेशाव्दारे रक्कम जमा केली असून धनादेश वटल्याबाबत बँक ताळमेळ घेतला नसल्यामुळे रक्कम प्रत्यक्षात लेख्यात जमा झाल्याची खात्री होत नाही. वित्तीय वर्ष 2013-2014 चे विवरणपत्र "ड" प्रकरणाला आढळून येत नाही. खरेदी केलेल्या वस्तूची नोंदवही (Purchase Register), प्रकरणात समाविष्ट नसल्याचे दिसून येते. वित्तीय वर्ष 2011-2012 ते 2014-2015 पर्यतचे असेसमेंट आर्थिक वर्षनिहाय न करता दिनांक 02/01/2017 ला विलंबाने करण्यात आलेले आहे.***

